
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
१९६५.



REFBK-0014467

चरित्र
१२६३

४०१०१
चरित्र
२८.१२.६५

१२६३

४०१०१
१२६३ चरित्र
२८।१।६५

सं १९८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४०९०९ वि: चारित्र
क्रमांक ९२६३ नों: दि: २८।४।६५
९२६३

# विश्वविख्यात क्रिकेटपटु सर डॉनल्ड ब्रॅडमन

लेखक
अरविंद ताटके

[illegible]

REFBK-0014467

नीलकंठ प्रकाशन, [illegible], पुणे ९

प्रकाशक :
प्रकाश दामोदर रानडे
नीलकंठ प्रकाशन
१६४३ सदाशिव पेठ, पुणें ९

प्रथमावृत्ति : २७ ऑगस्ट १९६५

© अरविंद ताटके

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१।४ सदाशिव, पुणें २

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४०७०७ वि: चारित्र
क्रमांक १२६६३ नों दि: २८।१२।५५

# मनोगत

एकदां आम्ही मित्रमंडळी क्रिकेटविषयक गप्पा मारीत बसलों होतों. जगांतल्या मोठमोठ्या क्रिकेटपटूंच्या अविस्मरणीय डावांची चर्चा आम्ही करीत होतों. तेवढ्यांत माझे क्रिकेट विषयाचे व्यासंगी मित्र श्री. जनार्दन शेंबवणेकर चटकन् म्हणाले :

"ब्रॅडमनच्या १९३० च्या लीड्सच्या टेस्टमधल्या डावासारखा खेळ पूर्वी कधीं झाला नाहीं अन् पुन्हां कधीं होणार नाही. एका दिवसांत त्यानं ३०९ धांवा काढल्या."

"शक्य नाहीं." मी म्हटलें.

"घ्या तर मग पैज." शेंबवणेकर हट्टाला पेटले.

"घेतोच कीं" मीहि उत्साहानें जबाब दिला त्यांना.

थोडा वेळ गेला नि मग शेंबवणेकरांनी माझ्या हातांत 'स्पोर्ट ॲन्ड पासटाइम' या क्रीडाविषयक साप्ताहिकाचा अंक दिला. त्याच्या पहिल्याच पानावर ब्रॅडमननीं टेस्टमध्यें एका दिवसांत ३०९ धांवा केल्याचा विक्रम नमूद केला होता.

मी पैज हरलों अन् तेव्हांपासून ब्रॅडमन हा जणुं माझ्या व्यासंगाचा विषय बनला—त्यांच्या क्रिकेट जीवनाबद्दल मला कमालीची उत्सुकता वाटूं लागली. त्यांच्यासंबधीं मिळतील ते ग्रंथ वाचण्याचा सपाटा मीं चालूं केला. मीं जें वाचलें त्यांत मी रमून गेलों. त्यांच्या रोमांचकारी क्रिकेट जीवनानें मी दिपून गेलों. त्यांच्या क्रिकेट जीवनाची गाथा मला अपूर्व वाटली...त्यांतली गोडी अवीट भासली. तेव्हां वाटलें कीं त्यांच्या कथेला शब्दरूप द्यावें. त्याचेंच फळ म्हणजें हें ब्रॅडमन चरित्र.

ब्रॅडमन यांचें अद्‌भुत क्रिकेट जीवन रंगविण्यास नेव्हिल कार्डस्, जॅक फिंगल्टन नि रे रॉबिनसन यांच्यासारखे इंग्लिश–ऑस्ट्रेलियन, लेखकच हवेत. हे लेखणीबहाद्दर शिलेदार, त्यांची जीवनकथा केव्हां लिहितील ते लिहोत, तोपर्यंत माझ्यासारखे कथेकरी त्यांची कथा सांगत राहतील अन् त्यांच्या तेजस्वी खेळाची स्मृति कायम ठेवण्याचा प्रयोग करीत राहतील. प्रस्तुत चरित्राचा प्रयत्न हा त्यांतलाच एक म्हणाना.

विसाव्या शतकांत, क्रिकेट क्षेत्रांत ब्रॅडमन यांच्याएवढी लोकप्रियता कुणालाच लाभली नाहीं. अगदीं लहान वयांत त्यांनीं असामान्य उच्चांक प्रस्थापित केले. विशेष म्हणजे आपला फॉर्म त्यांनीं अखेरपर्यंत कायम ठेवला. तो टिकविण्यासाटीं आवश्यक तीं पथ्यें त्यांनीं कटाक्षानें पाळली. क्रीडांगण म्हणजे जणुं रणांगण अशा भावनेनें ते क्रिकेट खेळले. शिस्तपालनांत त्यांनीं कसूर केली नाहीं. अन् म्हणून क्रिकेटपटु म्हणून ते आदर्श ठरले. त्यांचें क्रिकेट जीवन अनेकांना मार्गदर्शक ठरेल—प्रोत्साहक वाटेल, असा विश्वास वाटला म्हणून त्यांचें चरित्र लिहिण्यास मी उद्युक्त झालों.

प्रस्तुत चरित्र लिहितांना ब्रॅडमन यांच्यासंबंधीं उपलब्ध असलेल्या अनेक छोट्या मोठ्या ग्रंथांची मला मदत झाली. सगळ्याच इंग्रजी शब्दांचें भाषांतर करण्याचे भरीस मी पडलों नाहीं. जिथें युक्त वाटेल तिथें मराठी शब्दांचा उपयोग केला आहे. ब्रॅडमन यांच्या आधीं जे

माझे क्रिकेटप्रेमी मित्र

***र. गो. सरदेसाई***

यांना

त्यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तिनिमित्त

मंगल अहेर

५०९०७ चरित्र



जागतिक कीर्तीचे फलंदाज होऊन गेले त्यांच्या कामगिरीचा आढावा पहिल्या प्रकरणांत घेतला आहे. तो आर्धाचा इतिहास सांगणें उचित वाटलें. मीं वाचलेल्या ग्रंथांतून, लेखांतून अन् वार्षिकांतून मला जसे ब्रॅडमन दिसले तसेंच मीं त्यांचें चित्र-चरित्र रंगविलें आहे. तें कादंबरीप्रमाणें चटकदार अन् उत्सुकता वाढविणारें ठरावें असा प्रयत्न मीं केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे तें वाचकांनीं ठरवावें.

ब्रॅडमन यांचीं कांहीं छायाचित्रें लंडनच्या 'स्पोर्ट ॲन्ड जनरल प्रेस एजन्सी'नें मिळवून दिलीं. 'फेअरवेल टू क्रिकेट' या आपल्या आत्म-चरित्रांतील कांहीं चित्रें वापरण्याची परवानगी सर डोनॉल्ड यांनीं दिली. त्याबद्दल त्या ग्रंथाच्या प्रकाशन संस्थेचे अन् ब्रॅडमन यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

माझे साहित्यिक अन् पत्रकार मित्र श्री. र. गो. सरदेसाई यांनीं मूळ हस्तलिखित वाचून बऱ्याच उपयुक्त अन् मार्मिक सूचना केल्या-ग्रंथ प्रसिद्धीबद्दल तगादा लावला. ब्रॅडमन यांचा खेळ पाहिलेल्या प्रा. दि. ब. देवधरांनीं ('पद्मश्री'चे मानकरी) माझ्या ब्रॅडमनबद्दलच्या अनेक शंकांना वेळोवेळीं पत्रांनीं उत्तरें दिलीं-चरित्र पुरें करण्या-बद्दल प्रोत्साहन दिलें-ब्रॅडमन यांचें एक छायाचित्रहि त्यांनी दिलें. पुस्तकास आशीर्वादहि त्यांनी लागलीच दिला. या उभयतांचे उपकार किती म्हणूं?

मुंबईच्या 'लोकसत्ता' दैनिकानें वेळोवेळीं माझ्या ब्रॅडमनविषयक लेखांना आपुलकीनें प्रसिद्धी दिली. नाशिकच्या 'रसरंग' साप्ताहिकानें माझ्या ब्रॅडमनविषयक लेखांना 'ब्रॅडमन गौरव अंक' काढून विशेष प्रसिद्धी दिली. त्याबद्दल लोकसत्तेचे संपादक श्री. ह. रा. महाजनी अन् 'रसरंग'चे संपादक श्री. अ. द. पोतनीस या उभयतांचा मी मनःपूर्वक आभारी आहें.

मुंबईच्या कांगा ग्रंथालयांत मला ब्रॅडमनसंबंधीं अनेक ग्रंथ वाचा-

वयास मिळाले. त्याबद्दल त्याचे चिटणीस श्री. एच्. एन्. कॉन्ट्रॅक्टर यांचे आभार मानणें मला अगत्याचें वाटतें.

माझे निकटचे स्नेही श्री. सुधीर वैद्य यांनीं या ग्रंथासाठीं अनेक कामें आपुलकीनें केलीं. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणांत राहणेंच मला इष्ट वाटतें. आणखी अनेकांनीं मदत केली. तिचा निर्देश कृतज्ञतापूर्वक करतों–त्यांना धन्यवाद देतों.

पूर्वपरिचय विशेषसा नसूनहि श्री. दा. पां. तथा अण्णासाहेब रानडे यांनीं या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी अत्यंत आनंदानें नि हौसेनें स्विकारली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

–अरविंद ताटके
२७ ऑगस्ट १९६५

पुरुषोत्तम निवास,
ब्राह्मण सोसायटी, नौपाडा,
ठाणें. ( मध्य रेल्वे )

# आ शी र्वा द

श्री. अरविंद ताटके यांच्या सर डोनॉल्ड ब्रॅडमन चरित्राचें हस्तलिखित मी समग्र नीट वाचून पाहिलें. लेखकानें सर्व माहिती काळजीपूर्वक मेहनतीनें मिळवून, चा कलात्मक व मनोरंजक पद्धतीनें उपयोग केला आहे.

केट क्षेत्रांत ब्रॅडमन हा अजूनपर्यंत अद्वितीय वीर ठरत असल्यानें, त्याचें चरित्र खेळाडूंना, क्रिकेटषौकिनांना व सामान्य वाचकांनाहि मनोरंजक व मार्गदर्शक वाटल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून अशा तऱ्हेच्या उपयुक्त पुस्तकाची उणीव ताटके यांच्या या पुस्तकानें भरून निघेल.

ब्रॅडमनवर मराठींत लिहिलेलीं कांहीं पुस्तकें नीट वाचल्यास, ताटके यांचें पुस्तक तुलनेनें सरस ठरतें. त्यांची भाषा साधी, सोपी परंतु चटकदार आहे व म्हणून क्रिकेट न समजणाऱ्यांनाहि हें पुस्तक वाचनीय वाटेल. चरित्रनायकाचें काल्पनिक, अतिशयोक्तीपूर्ण वर्णन टाळून, त्याचे पराक्रम गुणदोषासहित त्यांनीं पूर्ण दाखविले आहेत. ब्रॅडमन संबंधीं सर्व उपलब्ध ग्रथ वाचून, फक्त साधार अशी माहिती लेखकानें कटाक्षानें दिली आहे. त्यामुळें ब्रॅडमननें जे अनेक उच्चांक प्रस्थापित केले, त्याची बिनचूक माहिती या ग्रंथात अंतर्भूत असल्यानें तो संग्राह्य होईल अशी अपेक्षा आहे.

क्रिकेटची आवड आतां समाजांतील खालच्या थरांतहि वाढूं लागत असल्यानें, मराठींत लिहिलेलें असलें पुस्तक सर्व दृष्टींनीं उपयुक्त, बोधप्रद व मनोरंजक ठरल्यावांचून राहणार नाहीं.

**दि. ब. देवधर**

# अं त रं ग


आशीर्वाद

मनोगत

. " इथं खेळल्यावरच मला समाधान लाभेल " १

२. बाळपणींचा काळ सुखाचा... १०

३. " बाळ, सरळ बॅटीनें खेळ ! " १५

४. नांदी २३

५. ' अस्मान कडाडुन गेला ' २९

६. दिसों लागे मृत्यू ! ४०

७. अजगराच्या विळख्यांत ४७

८. " उद्यां द्विशतकच काढायला हवं ! " ६४

९. ना खेद ना खंत ७२

१०. सिंहाला शह ७८

११. जिंकूं किंवा मरूं ! ९१

१२. नवी घडी, नवें जग ९७

१३. " मरावें, पण ब्रॅडमनना खेळतांना पाहून ! " १०३

१४. शिकंदरची स्वारी ११२

१५. " पॉन्सफोर्ड बाद पण ब्रॅडमन खेळतोंय ! " १२३

१६. सूर्यास्त १३५

१७. विश्वविख्यात क्रिकेटपटु—सर डोनॉल्ड ब्रॅडमन १६८

परिशिष्टें

अनुक्र० ४०९०९ वि: चरित्र
क्रमांक १२६२ नों दि: २८।११।५६

# " इथं खेळल्यावरच मला समाधान लाभेल "

प्रसंग आहे १९०४ सालचा. लंडनमध्यें एका मेजवानीच्या प्रसंगीं अनेक नामवंत क्रिकेटपटु उपस्थित होते. भारतीय क्रिकेटपटु रणजितसिंह [ १८७२-१९३३ ] यांचा परमस्नेही चार्लस फ्राय [ १८७२-१९५६ ] हाहि तिथें हजर होता. बोलण्यांत हा अत्यंत चतुर. तो झटकन् उभा राहिला अन् म्हणाला, " मित्रांनो, पुन्हां एकदां आपले पेले भरा ! सुरुवातीला खेळण्यास जाऊन शेवटीं बाद झालेल्या ट्रूंपरच्या स्मृतिप्रित्यर्थ आतां तुम्हीं फिरून एकदां मदिरेचा घोट घ्या ! " फ्रायच्या या अनपेक्षित अन् उत्स्फूर्त भाषणानें पंगतींतली मंडळी झाली खजील अन मग टाळ्यांचा गगनभेदी कडकडाट झाला.

ऑस्ट्रेलियाचा विख्यात फलंदाज व्हिक्टर ट्रूंपर, [ १८७७-१९१५ ] विसाव्या शतकाच्या सुरुवातीस इंग्लंडांत अतिशय लोकप्रिय होता. १९०४ सालच्या आरंभाला इंग्लंड–ऑस्ट्रेलियाचा, कसोटी सामना ऑस्ट्रेलियांत मेलबोर्न येथें झाला. पहिल्या डावांत ऑस्ट्रेलियाचा १२२ धांवांत

धुव्वा उडाला. विकेट ओलसर होती, त्यामुळें ऑस्ट्रेलियन फलंदाजांना धांवा मिळविणें कठिण होऊन बसलें होतें. अशा अवघड परिस्थितींत ट्रंपरनें शेवटीं बाद होऊन ७४ धांवा केल्या. गोलंदाजांना हमखास यश मिळवून देणाऱ्या हिरवळीवर त्यानें या धांवा काढल्यामुळें, त्यांचें मोल शंभर धांवा काढण्यापेक्षांहि निःसंशय मोठें ठरलें. त्या कलेंत, तो पारंगतच होता म्हणा ना. अन् म्हणूनच ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या इतिहासांत त्याला फार मोठें स्थान आहे.

या शतकाच्या प्रारंभाला ट्रंपरनें क्रिकेट क्षेत्रांत मोठा लौकिक मिळविला. ऑस्ट्रेलियन फलंदाजांच्या तेजस्वी परंपरेची सुरुवात त्यानें केली. त्याच्या आधींहि तेथील फलंदाजांनीं थोडाबहुत पराक्रम केला होता.

इंग्लंड-ऑस्ट्रेलियाच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेची सुरुवात १८७६-७७ सालीं झाली. पहिला कसोटी सामना ऑस्ट्रेलियानें जिंकला. या पहिल्यावहिल्या कसोटी सामन्यांत शतक काढण्याचा बहुमान ऑस्ट्रेलियाच्या चार्लस बॅनरमन [ १८५१-१९३० ] या फलंदाजानें मिळविला. पहिल्या डावांत त्यानें १६५ धांवा काढल्या. त्यावेळीं तो बाद झाला नाहीं हेंहि त्याचें एक वैशिष्ट्य म्हटलें पाहिजे. हा मोठा उमदा अन् दिलदार क्रिकेटपटु होऊन गेला. इतर वेळीं हा न्यू साउथ वेल्सतर्फे खेळे. पहिल्या कसोटी सामन्यांत यानें शतक काढलें, तरी याच्या नेहमींच्या संघातर्फे याला कधींहि शतक काढतां आलें नाहीं. क्रिकेटला नशिबाचा खेळ म्हणतात तें अगदीं यथार्थ आहे असें त्यामुळेंच वाटतें. प्रकृतिअस्वास्थ्यामुळें कसोटी सामन्यांतून हा अकाली निवृत्त झाला. जॉनी मॉईज [ मृत्यु १८-१-१९६३ ] या प्रसिद्ध ऑस्ट्रेलिशन क्रिकेट समीक्षकानें याचें वर्णन ' दी फर्स्ट ऑफ दी ग्रेट ' ('The first of the Great') म्हणजे ' थोरांमधला पहिला ' असें केलें आहे तें यथातथ्य आहे.

बॅनरमनचा समकालीन परंतु त्याच्यापेक्षां कसोटी सामन्यांत जास्त डाव खेळणारा ऑस्ट्रेलियाचा सुप्रसिद्ध फलंदाज मरडॉक [ १८५५-

१९११ ] हा होय. सोळा वेळा हा कसोटी सामन्यांत संघनायकहि होता. कसोटी सामन्यांत पहिलें द्विशतक यानें काढलें, तें सन १८८४ मध्यें इंग्लंड विरुद्ध. त्यावेळीं इंग्लंडच्या ओव्हल क्रीडांगणावर यानें २११ धांवा केल्या. १८८० सालींहि आणीबाणीच्या वेळीं कसोटी सामन्यांत याच ओव्हलवर इंग्लंड विरुद्ध नाबाद १५३ धांवा त्यानें केल्या. आतां हे विक्रम फारसे महत्त्वाचे वाटणार नाहींत. परंतु कसोटी सामन्यांच्या प्राथमिक अन् बाल्यावस्थेंत मरडॉकचा हा पराक्रम केव्हांहि मोठा समजला पाहिजे. ऑस्ट्रेलियांत हा अतिशय लोकप्रिय होता. ऑस्ट्रेलियाच्या सुरुवातीच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेपासून ते सन १८९० पर्यंत हा ऑस्ट्रेलियातला पहिल्या प्रतीचा फलंदाज समजला जाई.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस अन् विसाव्या शतकाच्या आरंभीं अनेक थोर क्रिकेटपटु ऑस्ट्रेलियांत होऊन गेले. ऑर्मस्ट्रॉंग, बार्डस्ले, कॉलीन्स, डार्लिंग, ग्रेगरी, गिफीन, क्लेम हिल, नोबल व जॅक रायडर वगैरे महान् क्रिकेटपटूंनीं त्या काळांतल्या ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा इतिहास घडविला. हे सर्व आपापल्यापरी श्रेष्ठ होते. पण या काळांतला ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा खरा शिल्पकार ट्रंपर हा होय. ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या फलंदाजीचा पाया ट्रंपरनें घातला व नंतर या पायावर कर्तृत्वाचा मोठा इमला चार्ल्स मॅकार्टनें [ १८८६–१९५८ ] यानें उठविला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीचे ऑस्ट्रेलियाचे दोन महान् फलंदाज म्हणजे व्हिक्टर ट्रंपर अन् मॅकार्टने हे होत.

एकोणिसाव्या शतकाचा अस्तकाळ अन् विसाव्या शतकाचा उदयकाळ हा क्रिकेटमधला सुवर्णकाळ समजतात. त्या काळांत, डॉ. डब्ल्यू जी. ग्रेस [ १८४८–१९१५ ], रणजितसिंह अन् जॅक हॉब्स [ १८८२–१९६३ ] या क्रिकेटपटूंचीं नांवें जगांत दुमदुमत होतीं. डॉ. ग्रेस यांना क्रिकेटचे ‘ भीष्माचार्य ’ समजतात. रणजींना ‘ फलंदाजीचे जादूगार ’ (Wizard)

संबोधतात; तर कसल्याहि प्रकारच्या हिरवळीवर सारख्याच सातत्यानें खेळणारा हॉब्ससारखा सलामीचा फलंदाज अजून झाला नाहीं असें अनेकांचें मत आहे. ऑस्ट्रेलियाशीं झालेल्या कसोटी सामन्यांच्या झुंजींत या तीन शिलेदारांनीं नेत्रदीपक कामगिरी बजावलीच, शिवाय सगळे क्रिकेट क्षेत्रहि त्यांच्या पराक्रमानें उजळून निघालें, म्हणून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचें दर्शन घडविणेंहि उचित आहे.

डॉ. ग्रेस हा लोकोत्तर क्रिकेटपटु होऊन गेला. क्रीडांगणावर जशी त्यानें लोकप्रियता मिळविली तशी प्रीति त्यानें सार्वजनिक क्षेत्रांतहि मिळविली. सुमारें ५० वर्षें तो क्रिकेट खेळत होता. प्रकृतीनें तो होता दांडगेश्वर. तशांत त्यानें दाढी ठेविली असल्यानें त्याचें व्यक्तिमत्त्व फार उठून दिसे. धांवा काढणें व बळी (wickets) घेणें म्हणजे त्याच्या हातचा मळ. आपल्या क्रिकेटच्या अमदानींत त्यानें ५०,००० च्या वर धांवा केल्या नि २८६४ विकेट्स् घेतल्या. हा खेळावयास निघाला कीं प्रतिपक्षाची पांचावर धारण बसे तर प्रेक्षकांच्या मनाचा फुलोरा आनंदानें फुलला जाई. ही स्वारी केवळ क्रिकेटमध्येंच नव्हे तर सर्व खेळांत पटाईत होती व त्या त्या खेळांत पारितोषिकें मिळविण्यापर्यंत ह्याची प्रगति होती. हा खेळत असला कीं, मैदानावर प्रेक्षकांची थाप लागलेली असे व सामन्यांना किफायतहि भरपूर होई. इंग्लंडचा पंतप्रधान ग्लॅडस्टन [१८०९–१८९८] याच्या तोडीची लोकप्रियता ग्रेसला लाभली होती. स्थानकाच्या फलाटावर हा जर स्नेह्याशीं गप्पा मारीत असला तर गाडीचा गार्डहि त्याच्यासाठीं गाडी एकदोन मिनिटें जास्त थांबवीत असे. फलंदाजी अन् गोलंदाजी या दोन्ही शाखांत हा चांगलाच वाकबगार होता. पेशानें हा डॉक्टर असला व याची उभी हयात क्रिकेट खेळांत खर्च झाली, तरी त्यानें आपल्या व्यवसायांत कधींहि कुचराई केली नाहीं. मैदानावर जसे प्रेक्षक त्याच्यावर खूष असत त्याप्रमाणें त्यानें आपल्या रुग्णाइतांचें प्रेमहि संपादन केलें. एकदां २०० धांवा काढल्यावर थोडीहि विश्रांती न घेतां

तो तडक एका बाईला तपासण्यास गेला व तिला दिलेला शब्द त्यानें पाळला. इतका अष्टपैलु व लोकप्रिय क्रिकेटपटु पुन्हां होणार नाहीं म्हणून कौतुकानें त्याला ' दी ग्रेट ग्रेस ' असें म्हणतात. १९४८ सालीं याच्या जन्मशताब्दीचा उत्सव इंग्लंडांत मोठ्या थाटांत साजरा झाला, अन् लंडनमधील लॉर्डस्च्या मैदानाच्या प्रवेशद्वारावर नांव कोरून त्याचें चिरस्मरणीय स्मारक करण्यांत आलें.

ग्रेसपेक्षां चोवीस वर्षांनीं लहान पण कांहीं कसोटी सामन्यांत त्याच्या-बरोबर ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळलेले दुसरे इंग्लंडमधले अत्यंत लोकप्रिय क्रिकेटपटु रणजितसिंह हे होत. ' रणजी ' या नांवानें ते क्रिकेट क्षेत्रांत ख्यातनाम झाले. जन्मानें हे भारतीय. भारतीय क्रिकेटसाठीं यांच्या हातून कांहींच कामगिरी झाली नाहीं तरी भारतीय क्रिकेटबद्दल आस्था अन् कळकळ इंग्लंड-ऑस्ट्रेलियांतील क्रिकेट खेळाडूंना वाटूं लागली याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे रणजींनीं त्या खेळांत मिळविलेला मोठा नांवलौकिक अन् लोकप्रियता हें सांगतां येईल. हे ट्रंपरचे समकालीन. दम्याच्या व्यथेनें जर्जर झाले असूनहि क्रीडांगणावर धांवांचा पाऊस पाडण्यांत त्यांनीं मुळींच कसूर केली नाहीं. एकदां यांनीं सारी रात्र मासे पकडण्यांत घालविली नि दुसऱ्या दिवशीं सामन्यांत खेळतांना २८५ धांवाहि सहज केल्या. कसोटी सामन्यांत पहिल्याच पदार्पणांत यांनीं ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक केलें. इंग्लंडमध्यें यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. नवानगरच्या गादीवर आल्यावर त्यांचें क्रिकेटमधील लक्ष कमी झालें.

रणजी भारतांत फारसे खेळले नाहींत. सुप्रसिद्ध भारतीय गोलंदाज पी. बाळू [ १८७६–१९५५ ] ह्यांनीं रणजींना तीन वेळां अगदीं अल्प धांवांत बाद केलें होतें. १८९८ सालीं पुण्यास पूना क्लबवर खेळतांनाहि ते दोन्ही डावांत शून्यांत बाद झाल्यानें पुणेकर प्रेक्षकांचा फार मोठा अपेक्षाभंग झाला. एक गोष्ट मात्र खरी कीं, ज्या भारतीय क्रिकेटपटूनें

इंग्लंडवर आपल्या क्रिकेट-नैपुण्यानें कमालीची भुरळ पाडली असे रणजी हे एकच क्रिकेटपटु होत. त्यांच्या निधनोत्तर १९३४ सालापासून त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आपल्याकडे रणजी करंडक सामने खेळले जाऊं लागले व ते आजतागायत चालूं आहेत, 'उत्तम क्रिकेट कसें खेळाल ?' या आपल्या ग्रंथांत प्रो. दि. ब. देवधर यांनी रणजींचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे : "त्यांच्या खेळाचा विशेष म्हणजे 'लेट कट्' व 'लेग ग्लान्स' हे दोन टोले ते इतक्या सहज व सफाईनें मारीत असत, कीं यष्टीवर वेगानें चाल करून येणारा चेंडू जादू केल्याप्रमाणें, एकदम सीमेपार जातांना दिसे. अर्थातच तज्ज्ञ प्रेक्षक खूष होऊन, त्यांना 'फलंदाजीचा जादूगार' म्हणत असत."

जॅक हाब्स रणजींहून दहा वर्षांनीं लहान. रणजींनीं बक्षीस दिलेली सोन्याची सुंदर सिगरेटपेटी यानें आपल्या वस्तुसंग्रहांत मोठ्या आदर-पूर्वक ठेविली होती. प्रथम श्रेणीच्या सामन्यांत यानें १९७ शतकें काढलीं. त्याचा हा विक्रम अजून अजिंक्य आहे. १९३० सालीं हा भारतांत आला होता. त्या वेळीं तीन शतकें त्यानें काढलीं. परंतु ते सामने प्रथम श्रेणीचे नसल्यानें तीं शतकें १९७ शतकांत जमा न झाल्यानें तो फार हळहळला. २०० शतकांचा विक्रम करण्याची त्याची मनीषा होती. १९२४–२५ सालीं मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) कसोटी सामन्यांत ऑस्ट्रे-लियानें इंग्लंडविरुद्ध ६०० धांवांचा कोट रचला. त्या वेळीं लंडनच्या एका वृत्तपत्रानें आपल्या पत्राला मथळा दिला तो असा : 'ऑस्ट्रेलिया ६००, हॉब्स आतां चल' ('Australia 600 : Come on Hobbs !') नंतर हॉब्स व त्याचा जोडीदार हर्बर्ट सट्क्लीफ [ जन्म १८९४ ] या उभयतांनीं मिळून २८३ धांवा काढल्या. दोघेहि आघाडीचेच फलंदाज. तेव्हां त्याच पत्रानें मथळा दिला तो असा 'शाबास हॉब्स !' ('Thank you Hobbs !') याच्याबद्दल प्रा. दि. ब. देवधरांनीं म्हटलें ('उत्तम क्रिकेट कसें खेळाल?' पृ. १६७-१६८) आहे : "डब्ल्यू. जी. ग्रेसनंतर इंग्लिश

क्रिकेट जर कोणाचें ऋणी असेल तर तें अनेक वर्षें ( १९११ ते १९२८ पर्यंत) टेस्ट सामन्यांत इंग्लंडची आघाडी उत्कृष्ट फलंदाजीनें संभाळणाऱ्या जॅक हॉब्सचें आहे." इंग्लंडनें 'नाइटहुड' म्हणजे ' सर ' ही पदवी देऊन ( १९५३ ) हॉब्सचा मोठा गौरव केला.

क्रिकेटच्या सुवर्णयुगांतले हे शिलेदार जसे त्रिखंडकीर्ति पावले त्याप्रमाणें ऑस्ट्रेलियांतल्या ट्रंपर- मॅकार्टने या जोडगोळीनेंहि विसाव्या शतकाचा प्रारंभकाळ आपल्या पराक्रमानें उजळून टाकला. पैकीं ट्रंपर प्रेक्षकांच्या गळ्यांतला ताईत होता...

ट्रंपर २२ व्या वर्षी १८९९ मध्यें इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला तेव्हां लार्डस् क्रीडांगणावर इंग्लंडविरुद्ध टेस्ट सामन्यांत त्यानें पहिलें शतक काढलें. त्या दौऱ्यांत ब्रायटन येथें ससेक्स विरुद्ध त्यानें ३०० धांवा केल्या. इंग्लंडमध्यें प्रथमश्रेणी सामन्यांत ३०० धांवा करणारा ट्रंपर हा पहिला ऑस्ट्रेलियन फलंदाज. त्याच वेळीं त्यानें प्रेक्षकांचीं मनें जिंकलीं. १९०२ मध्यें पुन्हां तो इंग्लंडांत गेला त्या वेळीं मँचेस्टर येथील टेस्ट सामन्यांत त्यानें एक अपूर्व विक्रम केला. पहिल्या दिवशीं सकाळीं खेळण्यास जाऊन उपाहारापूर्वी त्यानें कसोटी सामन्यांत शतक काढलें. असा विक्रम त्या वेळेपर्यंत कसोटी सामन्यांत कुणीहि केला नव्हता. बऱ्याच वेळां त्याला ओल्सर विकेटवर खेळावें लागलें. पण तरीहि त्यानें त्या दौऱ्यांत २५७० धांवा केल्या अन् ११ शतकें काढलीं. त्याचें १२ वें शतक फक्त ४ धांवांनीं चुकलें.

ट्रंपरच्या लोकप्रियतेचा प्रसंग सुरुवातीलाच वर्णिला आहे. व्यवसायानें तो क्रिकेटपटु असला तरी मनानें तो फार कनवाळु होता. त्याचें क्रिकेटचें सामान विकण्याचें दुकान होतें. दुकानांत त्याला फारशी प्राप्ति होत नसे. अंतःकरणानें हा अति उदार. एका मुलानें बॅट त्याच्याकडून विकत घेतली नि मैदानावर जाऊन ती मोडूनहि टाकली. लागलीच तें पोरगें पळत ट्रंपरच्या दुकानांत आलें नि म्हणालें, " बॅटीला चिर गेली

हो!" ट्रूंपरनें कसलीहि कुरकूर न करतां त्या मुलाला कोरी करकरीत बॅट बदलून दिली. दुकानांत असेल ती बॅट घेऊन हा सरळ मैदानावर जाई नि टेस्ट सामन्यांत शतक काढी. शतक काढलेली ती बॅट कुणा शौकिनानें विकत मागितली तर बेलाशक तो ती अर्ध्या किंमतीला देऊन टाकी.

ट्रूंपर ४८ कसोटी सामने खेळला. त्यानें ३१६३ धांवा केल्या अन् ८ शतकें काढलीं. १९१३ सालीं त्याच्या गौरवाप्रित्यर्थ ऑस्ट्रेलियांत खेळलेल्या सामन्याचें उत्पन्न त्या काळीं ३००० पौंड आलें. या रकमेंत कांहीं देणग्याहि होत्या. हौशीनें क्रिकेटपटु, व्यवसायानें दुकानदार पण अंतःकरणानें तुकाराम असें ट्रूंपरचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. 'देवहि त्याच्यावर प्रेम करी म्हणून त्याला लौकर मरण आलें.' ('The Gods of cricket loved him, so he died.') असें त्याचें वर्णन नेव्हिल कार्डस् या इंग्लिश क्रिकेट समीक्षकानें केलें आहे, (विस्डेन वार्षिक, १९६३) तें यथार्थ आहे.

ट्रूंपरचाच वारसा मॅकार्टनेनें घेतला. हा मोठा धडाडीचा फलंदाज. १९२६ सालीं उतारवयांतहि यानें इंग्लंडविरुद्ध टेस्ट सामन्यांत लागोपाठ तीन शतकें काढलीं. लीड्स येथें त्याने टेस्टमध्यें उपाहारापूर्वी शतक काढून ट्रूंपरच्या विक्रमाची बरोबरी केली. अवघ्या १०३ मिनिटांत त्यानें शतक काढलें. यावरून चाळिशीच्या घरांत असूनहि त्याची फलंदाजी कशी तडफदार होती तें समजतें. वेगानें धांवा काढण्यांत हा तरबेज होता. हा १९३५-३६ सालीं भारतांत आला होता. कौतुकानें त्याला 'गव्हर्नर जनरल' असें म्हणत. कसोटी सामन्यांत त्यानें २१३२ धांवा काढल्या अन् ७ शतकें काढलीं.

१९२१ सालीं मॅकार्टनेनें इंग्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलियांत सिडने येथें टेस्ट सामन्यांत १७० धांवा काढल्या. त्या वेळीं त्याचा खेळ फार आकर्षक झाला. तो पहाण्यास एक तेरा वर्षांचा छोकरा वडिलांबरोबर आला

होता. त्याला खेळ आवडला तसेंच तें सिडनेचें मैदानहि त्याच्या अगदीं मनांत भरलें अन् त्या आवेगांत तो आपल्या वडिलांना म्हणाला, " इथं खेळल्यावरच मला समाधान लाभेल." पोरवयांतले हे उद्गार त्या मुलानें खरे केले...ग्रेस, रणजी, हॉब्स, ट्रंपर नि मॅकार्टने यांच्या विक्रमांवर त्यानें मात केली. त्या बालयुवकाचें नांव डोनॉल्ड जॉर्ज ब्रॅडमन ! क्रिकेट क्षेत्रांत थोड्याच वर्षांत हें नांव ध्रुवताऱ्याप्रमाणें चिरंजीव झालें.

# २

# बाळपणींचा काळ सुखाचा....

दिनांक २७ ऑगस्ट १९०८ रोजीं ऑस्ट्रेलियांतील (न्यू साउथ वेल्स) कुटमुंडरा या गांवीं डॉन ब्रॅडमन यांचा जन्म झाला. त्यांच्या डोनॉल्ड नांवाला डॉन हें संक्षिप्त रूप चार्लस फ्राय यानें दिलें. नंतर डॉन हें नांव सर्वत्र प्रचलित झालें.

ब्रॅडमन घरांत सर्वांत लहान. इतर चार भावंडें त्यांच्याहून मोठीं. त्यांचा भाऊ व्हिक्टर त्यांच्यापेक्षां चार वर्षांनीं मोठा व बहिणी आयसलेट, लिली व मे या तिघी या दोघा भावांपेक्षां मोठ्या. व्हिक्टर उंचीनें सहा फूट होता. ब्रॅडमन त्याच्या मानानें फार ठेंगू. उंचीचें उणेपण पुढील काळांत स्वपराक्रमानें त्यांनीं भरून काढलें, तरी लहानपणीं ते फार बुटके दिसत.

ब्रॅडमन यांच्या वडिलांचा व्यवसाय सुतारकामाचा. त्यांना क्रिकेटचा नाद होता. ब्रॅडमन यांच्या भावाला क्रिकेटचा छंद नव्हता. त्यांच्या आजोळकडची मंडळी होती क्रिकेटप्रेमी. तेव्हां त्यांना क्रिकेटचा वारसा

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...


पितृमातृ पक्षाकडून प्राप्त झाला असावा असें दिसतें. त्यांना तिसरें वर्ष लागण्यापूर्वी ब्रॅडमन-कुटुंब बौरल येथें स्थायिक झालें. हें गांव सिडने शहरापासून ८० मैलांवर असून, सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें मोठें रमणीय आहे.

हल्लीं उदयोन्मुख व होतकरू क्रिकेटपटूंना तज्ज्ञ क्रिकेट शिक्षकांकडून क्रिकेटचें पद्धतशीर शिक्षण देण्याची प्रथा सर्वत्र रूढ आहे. परंतु ट्रंपर नि मॅकार्टने यांच्याप्रमाणें ब्रॅडमननाहि क्रिकेटचें मार्गदर्शन अगर शिक्षण कुणीहि दिलें नाहीं. महाभारतांतला एकलव्य जसा धनुर्विद्या स्वतःच शिकला त्याप्रमाणें त्यांनीं क्रिकेटचा खेळ स्वतःच आत्मसात केला. एकलव्याला निदान गुरुस्थानीं म्हणून का होईना द्रोणाचार्यांकडून स्फूर्ति मिळाली होती. ब्रॅडमन यांच्यापुढें तसा कुणाचाच आदर्श नव्हता. विटांच्या भिंतीवर चेंडू फेकून आणि स्टंपचा बॅट म्हणून उपयोग करून ते आपली क्रिकेट हौस भागवून घेत. त्यांच्या घराशेजारीं त्यांच्याबरोबर खेळण्यास कुणीहि सवंगडी नसल्यामुळें गोल्फचा चेंडू ते स्वतः भिंतीवर आपटत नि तो चेंडू वेगानें परत आला कीं स्टंपनें जोरानें टोलवीत. सोबती कुणीहि नसत म्हणून मोटर गॅरेजच्या दरवाजाचा उपयोग विकेटसाठीं करून ते आपली क्रिकेटची तहान भागवीत. खेळण्याच्या ऐन नादांत असतांना त्यांची आई त्यांना जेवणासाठीं हांक मारी. त्यावेळीं ते खरोखरी हिरमुसले होत. कारण, मध्येंच खेळ टाकून जाणें त्यांच्या अगदीं जिवावर येई.

क्रिकेट खेळण्याच्या अनेक क्लृप्त्या ब्रॅडमन त्यांच्या डोक्यांत असत. त्यांच्या घराच्या आवारांत एक पाण्याची टाकी होती. त्यांनीं एक स्टंप व रबरी चेंडू पैदा केला अन् मग त्या स्टंपच्या सहाय्यानें रबरी चेंडू टाकीवर वर-खालीं मारण्याचा सपाटा त्यांनीं सुरू केला. एकट्यानें खेळण्यांतहि त्यांना आनंद वाटे. भिंतीवर आपटून परत येणारा चेंडूहि आपल्या हातांतल्या स्टंपनें अगर फळकुटानें झोडपून काढण्यांत ते तासचे तास घालवीत. या मेहनतीमुळें त्यांची दृष्टि तीक्ष्ण बनली नि

हातपाय अतिशय चपळ झाले. स्टंपवर लांबून चेंडू अचूक मारण्याचा परिपाठहि त्यांनीं चालू ठेवला. नेम चुकला कीं, चेंडू हातांत घेण्यासाठीं पळावें लागे. त्यामुळें क्षेत्ररक्षणाची संवय त्यांना अनायचसेंच झाली. अशा विविध प्रकारांनीं लहानपणीं त्यांनीं क्रिकेटची आराधना केली. क्रिकेटचें शास्त्रोक्त शिक्षण त्यांना कुणाकडूनहि मिळालें नाहीं. स्वप्रयत्नानें त्यांनीं क्रिकेटचें शिक्षण मिळविलें. त्यांचा लहानपणचा किस्ता अनुकरण करण्याइतका आदर्श आहे.

प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर ब्रॅडमन बौरल येथें असलेल्या शाळेंत गेले. ही शाळा सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुखसोयींनीं समृद्ध असली तरी मुलांच्या खेळासाठीं विशेष सोय तिथें नव्हती. परंतु शाळेचे मुख्याध्यापक श्री. ली हे सर्व प्रकारच्या खेळांत चांगले पारंगत होते. मुलांशीं खेळून ते त्यांना प्रोत्साहन नि उत्तेजन देत. खेळाच्या तज्ज्ञ शिक्षकाची सोय मात्र त्या शाळेंत नव्हती.

शाळेंत असतांना क्रिकेट खेळणाऱ्या वरच्या वर्गातल्या मुलांकडे ब्रॅडमन उत्सुकतेनें बघत बसत. आपल्यालाहि त्यांनीं खेळावयास घ्यावें असें त्यांना वाटे. मग कधीं कधीं चारदोन फटके मारावयास देण्याची मेहेरबानी तीं मुलें ब्रॅडमन यांच्यावर करीत.

ब्रॅडमन यांना अकरावें वर्ष लागल्यावर त्यांनीं पहिल्या क्रिकेट सामन्यांत भाग घेतला. प्रतिपक्षांत एक डावखुरा गोलंदाज होता. ब्रॅडमन यांच्या संघानें फलंदाजी स्वीकारली होती. संघाचे दोन फलंदाज त्या डावखुऱ्या गोलंदाजानें पाठोपाठ बाद केले. आणखी एक विकेट मिळाली कीं हॅट-ट्रिक घेण्याचा मान त्या गोलंदाजाला मिळणार होता. त्या वेळीं ब्रॅडमन खेळण्यास आले. मनांतून ते पुरे हबकलेले होते. एक तर वय लहान. सामन्यांत खेळण्याचा पहिलाच प्रसंग. तशांत दोन खेळाडू लागोपाठ बाद झालेले. त्यामुळें त्यांचे पाय लटपटत होते अन् त्यांच्या कपाळाला घाम आला होता — आत्मविश्वास नष्ट झाला होता. पहिला

चेंडू सूं सूं करीत सुटला. परंतु ते बचावले ! नंतर मात्र ते चांगले खेळले अन् त्यांनीं ५५ धांवा केल्या.

पुढील वर्षी १२ व्या वर्षी शाळेतर्फे खेळून ब्रॅडमननीं एका सामन्यांत नाबाद ११५ धांवा केल्या. तेंच त्यांचें पहिलें शतक ! त्यांच्या संघाच्या १५६ धांवा झाल्या होत्या. त्यांत एकट्या ब्रॅडमननींच ११५ धांवा केल्या. त्यामुळें त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. दुसऱ्या एका शाळेच्या सामन्यातहि त्यांनीं ७२ धांवा केल्या. त्या वेळींहि ते नाबाद राहिले. अशा रीतीनें तीनहि शालेय सामन्यांत नाबाद राहून त्यांनीं एकूण २४२ धांवा केल्या. त्यांच्या पुढील उत्कर्षाचीं बीजें या लहानपणच्या धांवसंख्येंत दिसत होतीं...

१३ व्या वर्षी मोठ्या मंडळींच्या सामन्यांत खेळण्याची संधि ब्रॅडमनना लाभली ती केवळ योगायोगानें. बौरल संघाचा शेजारच्या खेड्यां-तल्या संघाशीं सामना ठरला होता. बौरल संघाचें नेतृत्व त्यांच्या चुलत्या-कडे होतें. धांवांचा स्कोअर लिहावयाच्या जागेवर ब्रॅडमनना नियुक्त करण्यांत आलें. परंतु या वेळीं त्यांचें नशीब खास जोरावर होतें. कारण शेवटच्या घटकेला संघांतला एक खेळाडू न आल्यानें बौरलच्या संघांत त्यांची वर्णी लागली.

शाळेच्या सामन्यांत ब्रॅडमन चांगले चमकलेले होते. परंतु मोठ्या लोकांत खेळण्याचा सराव त्यांना त्या वेळीं नव्हता. तरी त्यांची जिद्द दांडगी असल्यानें त्या वेळीहि त्यांनी कच मुळींच खाल्ली नाहीं. त्यांच्या संघाचे आठ गडी बाद झाल्यावर त्यांची खेळण्याची पाळी आली. त्यावेळीं सदरा नि अर्ध्या चड्डीतच ते खेळावयास गेले. त्यांच्या बॅटची उंची त्यांच्या एवढीच होती. अशा थाटांत ते विकेट जवळ आले अन् मग मोठ्या मंडळींविरुद्ध खेळून त्यांनीं ३७ धांवा केल्या. या वेळींहि ते नाबाद राहिले. हा सामना पुढील शनिवारीं चालू झाला. दुसऱ्या डावांत त्यांना आघाडीला खेळावें लागलें. त्या वेळीं त्यांनीं २९ धांवा

केल्या – ते नाबादच राहिले. त्यांचा लहानपणचा खेळ असा होता...

क्रिकेटखेरीज ब्रॅडमन इतर खेळांतहि रस घेत. टेनिस, फुटबॉल अन् पळण्याच्या शर्यतींतहिं ते आनंदानें भाग घेत. नेमबाजीचा छंद तर त्यांना होताच आणि खाडीच्या किनाऱ्यावर बसून मासे पकडण्यांतहि त्यांना मौज वाटे. गणित विषय त्यांना मनापासून आवडे. विज्ञानाचीहि त्यांना आवड होती. परंतु प्रयोगाच्या वेळीं एका मुलाच्या हातून अनवधानानें चूक झाली अन् त्यामुळें एकाएकीं स्फोट झाला. तेव्हां-पासून त्यांच्या मनांत विज्ञानाची पक्की दडस बसली. त्यांचें शालेय जीवन होतें तें असें.

सिडने येथें त्यांनीं मॅकार्टनेचा टेस्ट सामन्यांतला खेळ पाहिला तें मागें सांगितलेंच. कसोटी सामन्याच्या दर्शनामुळें त्यांच्या अनुभवांत भर पडली. मोठमोठे क्रिकेटपटु पहावयास मिळाल्यानें क्रिकेटपटु होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा वाढीस लागली. त्या सुमारास त्यांना टेनिसचा नाद लागला, पण अखेरीस क्रिकेटचा छंदच श्रेष्ठ ठरला. टेनिसचा निरोप घेऊन क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्याचा निश्चय त्यांनीं मनाशीं ठरविला.

शिक्षण पुरें झाल्यावर ब्रॅडमन 'डेव्हीस ॲन्ड वेस्ट ब्रुक' नांवाच्या व्यापारी संस्थेंत नोकरीस लागले अन् येथेंच त्यांचें बालपण संपलें. नदीचें मूळ प्रथम लहान असतें. पुढें तिचा प्रवाह मोठा होऊन तो सागराला मिळतो. त्यांच्या जीवनाचें असेंच झालें. कारण पुढील चार-पांच वर्षांतच ते लोकप्रियतेच्या शिखरावर बसले. त्यांच्या बालपणाच्या घटना मामुली होत्या. तरी त्यांचे बाळपणींचे दिवस स्वास्थ्यमय होते. त्यांचा शैशवकाळ सुखांत गेला.. !

# ३

## “ बाळ, सरळ बॅटीनें खेळ ”

ब्रॅडमन जिथें नोकरीस होते त्या संस्थेचा मालक मोठा सज्जन होता. त्यानें त्यांना क्रिकेटसाठीं सर्व सवलती दिल्या.

१९२५ सालीं सतराव्या वर्षीं ब्रॅडमन मोठ्या सामन्यांत भाग घेऊं लागले. त्या वेळीं ते बौरल संघातर्फे खेळत. या संघातले त्यांचे इतर सहकारी तिशीच्या पुढचे असत; पण ब्रॅडमन त्यांच्या तोडीचे ठरत. त्या वर्षीं बौरल विरुद्ध विंगेलो असा एक मोठा अविस्मरणीय सामना झाला. हा सामना प्रथम श्रेणीचा नसला ( First Class Match—त्या त्या देशांतील क्रिकेट बोर्डाच्या नियंत्रणाखालीं जे सामने होतात त्यांना प्रथम श्रेणीचे सामने समजतात ) तरी लहानपणीं ब्रॅडमन यांची भरारी कशी मोठी होती त्याची साक्ष म्हणजे हा सामना.

विंगेलो संघांत पुढें नांवारूपाला आलेला प्रसिद्ध गोलंदाज बिल् ओरीली होता तरी ब्रॅडमननीं त्याला दाद दिली नाहीं. पहिल्या दिवशीं त्यांनीं २३४ धांवा केल्या. शेवटच्या ५० धांवांत त्यांनीं चार षट्कार

नि सहा चौकार हाणले होते. दुसऱ्या दिवशीं आपल्या पहिल्या चेंडूनें ओरीलींनीं त्यांची विकेट घेतली. अवघ्या १७ व्या वर्षी त्यांनीं २३४ धांवा काढलेल्या पाहून त्यांच्या उज्ज्वल भविष्यकाळासंबंधींची चाहूल त्या वेळीं अनेकांना लागली......

त्या वर्षी बौरल संघाचा अंतिम सामना मॉस व्हेल संघाविरुद्ध झाला. या सामन्यांत ब्रॅडमननीं धांवा केल्या तीनशें. त्यांच्या चुलत्यांनींहि द्विशतक काढलें. मॉस व्हेल संघ दोन्ही डावांत अनुक्रमें १३४ व २०० धांवांत उखडला गेल्यानें बौरल संघ विजयी झाला. त्रिशतक काढल्यामुळें ब्रॅडमन यांच्यापुरता हा सामना संस्मरणीय झाला. त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा उंचावल्या अन् त्यांनाहि स्वतःबद्दल कमालीचा विश्वास वाटूं लागला. या सामन्यांत शतक काढल्यास नवी बॅट देण्याचें आश्वासन त्यांना त्यांच्या आईनें दिलें होतें. या वेळीं त्रिशतक काढल्यानें त्यांनीं आईपाशीं तीन बॅटी मागितल्या. पण आई होती खमंग. तिनें एकच बॅट त्यांना दिली. ही बॅट विल्यम साईक्स लि. या कंपनीची होती. पुढें या कंपनीच्या बॅटी ब्रॅडमन यांच्या स्वाक्षरीनें निघूं लागल्या... अर्थातच हें त्रिशतक त्यांना शकुनाचें ठरलें. पुढील वर्षी ( १९२६ ) देखील त्यांनीं मॉस व्हेल संघाविरुद्ध ३२० धांवा काढल्या. बौरल संघाच्या ४८० धांवांपैकीं त्यांच्या एकट्याच्या ३२० धांवा होत्या. बौरलच्या यशश्रींत त्यांचा वांटा मोठा होता.

सन १९२७-२८ च्या क्रिकेट हंगामांत ब्रॅडमननीं पहिल्या सामन्यांत १३० धांवा केल्या. प्रतिपक्षांत जॅक ग्रेगरीसारखा [ जन्म १८९५ ] अष्टपैलु खेळाडू असल्यानें त्यांच्या कौशल्याची सर्वत्र तारीफ झाली. या सुमारास त्यांना न्यू साउथवेल्स क्रिकेट असोसिएशनच्या कार्यवाहकाचें पत्र पुढीलप्रमाणें आलें : ‘ गेल्या हंगामांतल्या तुमच्या खेळाकडे राज्य निवड-मंडळाचें लक्ष आहे. आतां त्यांना तुमचा खेळ प्रत्यक्ष पहावयाचा आहे. तरी चांचणीसाठीं सिडनेच्या क्रिकेट मैदानावर तुम्हीं यावें. ’ या



ऐनपणांतल्या पावित्र्यांतील ब्रॅडमन ( १९३० )




ब्रॅडमनना आलेल्या पत्राचा लिखाफा ( १९४८ )

निमंत्रणानें ब्रॅडमन यांच्या भाग्यपर्वास सुरुवात झाली...

आपल्याकडील रणजी करंडक सामन्यांच्या धर्तीप्रमाणें शेफिल्ड शील्ड सामने ऑस्ट्रेलियांत खेळले जातात. याच शेफिल्ड सामन्यांसाठीं न्यू साउथ वेल्स तर्फें खेळण्यासाठीं ब्रॅडमन यांची निवड झाली. आतांपर्यंत ते दुय्यम दर्जाच्या सामन्यांत खेळत, पण आतां अव्वल दर्जाच्या सामन्यांत खेळून कसोटी सामन्यांत खेळण्याचें स्वप्न साकार करण्याची संधि त्यांना लाभणार होती. त्यासाठीं त्यांनीं सिडने येथें वास्तव्य करण्याचें ठरविलें. कारण प्रॅक्टीससाठीं बौरलहून सिडनेला जायचें त्रासाचे असे अन् प्रवासामुळें वेळ फुकट जाऊन त्याचा परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होई.

न्यू साउथ वेल्स संघाचा दक्षिण ऑस्ट्रेलियाशीं जो पहिला सामना झाला त्यांत ब्रॅडमन न्यू साउथ वेल्स कडून खेळले. प्रथम श्रेणी सामन्यांत खेळण्याचा तो त्यांचा पहिला प्रसंग. प्रतिपक्षांत ग्रिमेटसारखा ( टेस्ट सामन्यांत दोनशेंहून जास्त विकेटस् घेण्याचा पहिला बहुमान यानें मिळविला. ज० १८९२ ) जागतिक कीर्तीचा गोलंदाज होता......

पण ब्रॅडमन निर्भयपणें खेळले अन् त्यांनी ११८ धांवा केल्या. ही घटना दि. १७ डिसेंबर १९२७ रोजीं घडली. अखेरच्या शेफिल्ड सामन्यांत त्यांनीं व्हिक्टोरिया विरुद्ध १३४ धांवा केल्या. वयाच्या मानानें त्यांना हा हंगाम फलदायी ठरला. १० डावांत त्यांनीं ४१६ धांवा केल्या अन् दोन शतकें काढलीं. या हंगामांतली त्यांची सरासरी ४६·२२ झाली. त्यांची यशाची वाटचाल, आतां हळुहळु सुरू झाली होती...

पुढील वर्ष ब्रॅडमन यांच्या कसोटीचें होतें. त्यावर्षीं ( १९२८-२९ ) चॅपमनच्या [ज. १९००] नेतृत्वाखालीं इंग्लंडचा एम्. सी. सी. संघ ऑस्ट्रेलियांत येणार होता. अर्थात् या संघाविरुद्ध टेस्ट सामन्यांत खेळण्याची महत्त्वाकांक्षा ब्रॅडमन यांच्या मनांत मूळ धरूं लागली होती. इंग्लंडचा हा संघ चांगला प्रबळ होता. हॉब्स, हॅमंड, जार्डिन [ १९००–१९५८ ]

लारवूड, टेट, वगैरे थोर खेळाडु या संघांत होते. या सुमारास ब्रॅडमनना बढती मिळाली. त्यांच्या कचेरीची शाखा सिडनेला सुरू झाल्यानें कार्यवाह म्हणून तिथें त्यांची निवड झाली. यश येऊं लागलें कीं दाही दिशांनीं येतें. कारण त्यांनीं त्यावेळीं क्विन्सलंड विरुद्ध खेळून दोन्ही डावांत शतकें काढलीं. पहिल्या डावांत त्यांनीं १३१ ( नाबाद ) धांवा केल्या अन् दुसऱ्या डावांत १३३ धांवा काढून ते बाद झाले. अवघ्या विसाव्या वर्षीं प्रथमश्रेणी सामन्यांत त्यांनीं हा विक्रम केल्यामुळें कसोटी सामन्या-साठीं त्यांची निवड होणार याबद्दल कुणालाच शंका वाटत नव्हती. जो तो त्यांची चहा करीत होता. कसोटी सामन्यांत त्यांचा प्रवेश होण्याचा क्षण जवळ जवळ येत चालला होता.

प्रयत्नाला संधीची अन् दैवाची जोड मिळत गेली कीं माणसाचा उत्कर्ष होण्यास वेळ लागत नाहीं. ब्रॅडमन यांचें तसेंच झालें. एम्. सी. सी. संघाविरुद्ध झालेल्या पहिल्या सामन्यांत पहिल्या डावांत त्यांनी ८७ धांवा केल्या नि दुसऱ्या डावांत तर त्यांनीं शतकच ( १३२ ) काढलें. त्यावेळीं ते नाबादहि राहिले. एम्. सी. सी. विरुद्ध झालेल्या दुसऱ्या सामन्यांत ५८ ( नाबाद ) व १८ धांवा त्यांनीं काढल्या. यशाचा पेला ओठाजवळ येत चालला होता. कसोटी सामन्यांत खेळण्यासाठीं ऑस्ट्रे-लियन संघात आपली निवड होईल अशी आशा त्यांच्या मनांत लुकलुकत होती. अखेर तो सोनियाचा दिवस येऊन ठेपला....

दिवस बुडाला होता अन् रात्र सुरू झाली होती. ब्रॅडमन अंथरुणावर पडले होते. आज त्यांचें भवितव्य ठरणार होतें......

तेवढ्यांत आकाशवाणीवर कसोटी सामन्यासाठीं निवडलेल्या ऑस्ट्रे-लियन खेळाडूंचीं नांवें जाहीर होत होतीं ! ब्रॅडमन कान टवकारून ऐकूं लागले. नांवें आद्याक्षराच्या क्रमानें आलीं अन् त्यांत पहिलेंच नांव ब्रॅडमन यांचे होते. ब्रॅडमन सुखावले. तपश्चर्येचें अन् प्रयत्नांचें सार्थक झाल्याचें पाहून त्यांना मनस्वी आनंद झाला.

पहिल्या टेस्ट सामन्यांत ब्रॅडमनना दैवानें हात दिला नाहीं. हा सामना ( नोव्हें० – डिसें० १९२८ ) ब्रिस्ब कांब क्रीडांगणावर झाला. इंग्लंडनें पहिल्या डावांत ५२१ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाचा डाव १२२ धांवांत आटपला. ब्रॅडमन सातव्या अनुक्रमावर खेळावयास गेले अन् १८ धांवा काढून बाद झाले. इंग्लंडने दुसऱ्या डावांत ३४२ धांवा केल्या अन् मग डाव घोषित करून ऑस्ट्रेलियन संघास त्यानें खेळण्यास दिलें. या खेपेस ऑस्ट्रेलियन संघ अवघ्या ६६ धांवांत कोसळला. ब्रॅडमननी १ च धांव काढली. हा सामना इंग्लंडनें ६७५ धांवांनी जिंकला. पहिल्या टेस्ट सामन्यांत ब्रॅडमनना अपयशाचे धनी व्हावें लागलें. पण त्यांचें साहसी मन पुटपुटत होतें कीं ‘ संधि पुन्हां येईलच. ’

दुसऱ्या टेस्ट सामन्याच्या वेळीं, बारावा खेळाडु म्हणून ब्रॅडमन यांची निवड झाली. त्याचें कारण असें कीं पहिल्या कसोटी सामन्यांत त्यांचें क्षेत्ररक्षण अगदीं सुमार झालें. एक दोन झेलहि त्यांनीं सोडले. सामना सुरू झाल्यावर ऑस्ट्रेलियाचा फलंदाज पॉन्सफोर्ड याला दुखापत झाल्यानें पुनरपि तो या सामन्यांत खेळला नाहीं. त्यामुळें बारावा खेळाडु या नात्यानें ब्रॅडमनना क्षेत्ररक्षण करावें लागलें. यावेळीं त्यांनीं क्षेत्ररक्षणांत बिलकूल ढिलाई केली नाहीं. तरीहि सिडने येथें झालेला हा टेस्ट सामना इंग्लंडनें पुन्हां जिंकला.

तिसरा टेस्ट सामना मेलबोर्न येथें जानेवारी १९२९ रोजीं सुरू झाला. यावेळीं मागचें अपयश ब्रॅडमननीं धुऊन काढलें. पहिल्या डावांत ७९ व दुसऱ्या डावांत ११२ धांवा त्यांनीं केल्या. टेस्टमधलें त्यांचें तें पहिलेंच शतक. त्यावेळेस त्यांची ऑस्ट्रेलियन संघात निवड झाली ती कायमची. ते निवृत्त होईपर्यंत वीस वर्षांच्या काळांत निवडसमितीनें त्यांना कधींहि अर्धचंद्र दिला नाहीं. कांहीं वेळां प्रकृतिच्या अस्वास्थ्यामुळें व अन्य कारणामुळें ते स्वतःच ऑस्ट्रेलियन संघातर्फे खेळूं शकले नाहीत. हा तिसरा टेस्ट सामनाहि इंग्लंडनें जिंकला.

चौथ्या टेस्ट सामन्यापूर्वी ब्रॅडमननीं व्हिक्टोरिया विरुद्ध खेळून ३४० धांवा केल्या. हा विक्रम त्यांनीं अवघ्या विसाव्या वर्षीं केला हें त्यांचें वैशिष्ट्य होय. चौथा कसोटी सामना पुन्हा इंग्लंडनेंच जिंकला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ४० व दुसऱ्या डावांत ५८ धांवा केल्या. हा सामना गाजविला इंग्लंडच्या वॉल्टर हॅमंडनें. त्यानें दोन्ही डावांत शतकें (११९ व १७७) काढून मोठा लौकिक मिळविला. पहिल्या डावांत तो नाबाद होता. ब्रॅडमन यांच्या थोर समकालीनांत त्याची गणना होते. त्याचें प्रथम दर्शनहि त्यांना मजेदारपणें घडलें.

न्यू साउथ वेल्स विरुद्ध एम्. सी. सी. चा पहिला सामना झाला तेव्हां ब्रॅडमन यांच्या अचूक चेंडू फेंकीमुळें (Throw) हॅमंड धांवचीत झाला होता. तंबूंत आल्यावर त्यानें कोणाला तरी म्हटलें, "कोण हो तो छोकरा?" "डॉन ब्रॅडमन" असें नांव त्याला सांगण्यात आलें. "बरं आहे, मी त्याची आठवण ठेवीन" हॅमंड म्हणाला.

अन् ती आठवण, नव्हे ब्रॅडमन यांचें स्मरण, हॅमंडला पुढील काळांत अनेकदां झालें. कारण प्रतिस्पर्धी संघाचे कर्णधार म्हणून क्रीडांगणावर ते दोघे अटीतटीच्या झुंजी खेळले. असें असलें तरी चौथ्या टेस्ट मधील हॅमंडच्या तेजस्वी खेळाचें दर्शन पाहून ब्रॅडमनना फार संतोष झाला. आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट' या आत्मचरित्रांत त्यांनीं हॅमंडबद्दल पुढील उद्गार काढले आहेत: "त्याची फलंदाजी त्यावेळीं ऐन बहरांत होती असं मला खरोखरी वाटतं."

पांचवा कसोटी सामना मार्च १९२९ रोजीं मेलबोर्न येथें झाला. आधींचे चार कसोटी सामने ओळीने जिंकल्यामुळें अॅशीस-मालिका (Series) इंग्लंडनें जिंकली होती. त्यामुळे मालिकेंतली चुरस कमी झाली.

इंग्लंड–ऑस्ट्रेलियाच्या मालिकांना 'अॅशीस' म्हणण्याचा प्रघात आहे. त्यासंबंधींची मनोरंजक हकिगत अशी: ऑगस्ट १८८२ मध्यें

इंग्लंडच्या ओव्हल मैदानावर इंग्लंड विरुद्ध ऑस्ट्रेलिया हा सामना दोनच दिवसांत संपला. पण तो अतिशय अटीतटीचा झाला. दोन्ही संघाच्या धांवा पुढीलप्रमाणें होत्या, इंग्लंड १०१ व ७७.; ऑस्ट्रेलिया ६३ व १२२. हा सामना ऑस्ट्रेलियानें ७ धांवांनीं जिंकला. हा सामना अतिशय चित्तथरारक झाल्यानें लंडनच्या ' स्पोर्टिंग टाइम्सनें ' या सामन्याविषयीं पुढील मृत्युलेख ( Obituary ) लिहिला :

" २९ ऑगस्ट १८८२ रोजीं मृत्यु पावलेल्या इंग्लिश क्रिकेटच्या आठवणीनें, इंग्लिश क्रिकेटच्या मित्रपरिवाराला अन् संबंधितांना अतीव दुःख होत आहे. विशेष सूचना : अंत्यविधी होऊन रक्षा ऑस्ट्रेलियाला नेण्यांत येतील. "

१८८२ च्या अखेरीस इंग्लंडचा संघ आयव्हो ब्लायच्या [ १८५९ – १९२७ ] नेतृत्वाखालीं ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेला. तेथील तिसऱ्या कसोटी सामन्यांत कांहीं स्त्रियांनीं स्टंप्स जाळून, त्यांची रक्षा एका करंडकामधून इंग्लिश संघनायक ब्लायला दिली. १९२७ सालीं जेव्हां ब्लाय निधन पावला तेव्हां त्याच्या स्मरणार्थ हा करंडक, ' इंपिरियल क्रिकेट मेमोरियल ' वस्तुसंग्रहालयामध्यें ठेवण्यांत आला.

अर्थातच १८८२-१८८३ सालापासून इंग्लंड-ऑस्ट्रेलियाच्या टेस्ट मालिकांना ' ॲशीस ' हें नांव पडलें.

पांचव्या टेस्टच्या ( १९२८–२९ ) पहिल्या डावांत ब्रॅडमननीं १२३ धांवा केल्या, तर दुसऱ्या डावांत ३७ धांवा काढून ते बाद झाले. हा सामना ऑस्ट्रेलियाने जिंकला. चार कसोटी सामने मिळून ८ डावांत ब्रॅडमननीं ४६८ धांवा केल्या. त्यांनीं दोन शतकें काढलीं. त्यांच्या फलंदाजीची सरासरी भरली ६६·८५. ( यावेळीं हॅमंडनें पांच टेस्ट सामन्यांतील ९ डावांत ९०५ धांवा करून, दोन द्विशतकें अन् दोन शतकें काढलीं होती. असा पराक्रम ब्रॅडमन यांनींहि लौकरच पुढें केला.) सन १९२८-२९चा हंगाम त्यांना यशदायी ठरला. न्यू साउथ वेल्स तर्फे दक्षिण

ऑस्ट्रेलिया विरुद्ध काढलेल्या १७५ धांवा जमेस धरतां त्यांनीं या हंगामांत ७ शतकें केलीं. पैकीं दोन कसोटी सामन्यांतलीं. ते एकंदर २४ डाव खेळले. ६ वेळा ते नाबाद राहिले. ३४० या त्यांच्या उच्चांक धांवा. संपूर्ण हंगामांत त्यांनीं १६९० धांवा केल्या. त्यांच्या बॅटिंगची सरासरी ९३·८८ अशी झाली. आतां त्यांचें पाऊल एकसारखें पुढेंच पडत होते अन् यश त्यांना सामोरें जात होतें.

एम. सी सी. बरोबर त्यावेळीं इंग्लंडचा प्रख्यात गोलंदाज मॉरीस टेट हाहि ऑस्ट्रेलियांत आलेला होता. एके ठिकाणीं त्यानें ब्रॅडमनना खेळतांना पाहिलें. त्यांची खेळण्याची स्टाईल–शैली पाहून त्याला फार वैषम्य वाटलें. खेळण्याची त्यांची बेंगरूळ अन् अशास्त्रीय पद्धत पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. अन् तें खरेंच होतें. ब्रॅडमन यांची बॅट धरण्याची पद्धत अगर पवित्रा मुळींच आकर्षक नव्हता. चेंडू टोलवितांना त्यांची बॅट वांकडी होतें तेंहि त्यानें पाहिलें अन् मग तो त्यांच्या जवळ जाऊन त्यांना आपुलकीनें म्हणाला, " बाळ, सरळ बॅटीनें खेळ. हल्लीं खेळतोस तसा खेळलास तर इंग्लंडमध्यें धांवा काढणें तुला अशक्य होईल. " ब्रॅडमननीं फक्त स्मित केलें. त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. टेटला तें उत्तर एक वर्षानें ब्रॅडमन इंग्लंडांत आले त्यावेळीं मिळालें अन मग टेटचें तोंड बंद झालें...

# ४

# नांदी

१९३० सालच्या एप्रिलमध्यें ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जावयाचा होता. आदल्या वर्षीं ब्रॅडमन यांनीं केलेले विक्रम ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळाच्या डोळ्यासमोर असल्याने इंग्लंडला जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघात त्यांचा समावेश होणार ही गोष्ट स्पष्ट होती.

स. १९२९-३० च्या हंगामात इंग्लंडचा संघ न्यूझीलंडच्या दौऱ्यावर निघाला असतांना त्या संघाचा एक सामना न्यु साउथ वेल्स संघाशीं झाला. या सामन्यांत इंग्लंडच्या फ्रॅंक वुलेचा [ ज० १८८७ ] आकर्षक खेळ ब्रॅडमनना पहावयास मिळाला;—त्याच्या खेळावर ते खूष झाले. या सामन्यांत ब्रॅडमननीं १५७ धांवा काढून हंगामाची सुरुवात सुरेख केली. इंग्लंडला जावयाच्या दौऱ्याकडे त्यांचें लक्ष होतें. इंग्लंड ही क्रिकेटची काशीच जणुं. उत्तम क्रिकेटपटुला—फलंदाजाला आपल्या कर्तृत्वाचा-कौशल्याचा कस तिथें पारखून घ्यावा लागतो. ब्रॅडमन यांची नजर आतां इंग्लंडकडे भिरभिरत होती. टेटला त्यांना उत्तर द्यायचें होतें, हॅमंड

सारखा पराक्रम क्रिकेटच्या राजधानींत-इंग्लंडात गाजवायचा होता. आतां त्यांचे सर्व मनोरथ पार पडण्याची वेळ आली होती....

इंग्लंडला जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाच्या निवडीसाठीं एक चाचणी सामना ऑस्ट्रेलियांत ठेवण्यांत आला. रायडर एलेव्हन विरुद्ध वुडफूल एलेव्हन अशा दोन संघात हा सामना होणार होता. ब्रॅडमन वुडफूल संघात होते. इंग्लंडचा दौरा हें त्यांचें एकमेव लक्ष्य होतें....

रायडर संघाने ६६३ धांवा केल्या. वुडफूल संघाच्या धांवा फार कमी झाल्या तरी ब्रॅडमननीं १२४ धांवा केल्या व ते सर्वांत शेवटीं बाद झाले. वुडफूल संघाला फॉलो-ऑन मिळून दुसऱ्या डावास प्रारंभ करावा लागला. दुसरा डाव सुरू झाला तेव्हां ब्रॅडमन आघाडीला खेळण्यास गेले. अर्थातच ज्या दिवशीं त्यांनी १२४ धांवा केल्या त्याच दिवशीं बाद झाल्यावर त्यांना दुसऱ्या डावाच्या आरंभाला खेळणें भाग पडलें. त्या दिवशीं दिवस संपताना दुसऱ्या डावांतहि त्यांच्या २०५ धांवा झाल्या होत्या अन् ते नाबाद होते. म्हणजे एकाच दिवशीं पहिल्या डावांत शतक व दुसऱ्या डावांत द्विशतक करण्याचा विक्रम त्यांनी केला. पहिल्या डावां-तल्या १२४ धांवांपैकी ५४ धांवा त्यांनी आदल्या दिवशीं केल्या होत्या. दुसऱ्या दिवशीं त्यांनी ७० धांवांची भर घातली व १२४ धांवा केल्या; पुन्हां दुसऱ्या डावांत त्यांनी त्याच दिवशीं २०५ धांवा केल्या. म्हणजे त्या दिवशीं ३०० मिनिटांत (५ तास) त्यांनी २७५ धांवा केल्या असें दिसून येईल. लहान वयांतहि ते धांवा किती वेगाने काढीत त्याची कल्पना या सामन्यावरून येतें. २२५ धांवा झाल्यावर ते बाद झाले. या पराक्रमानें त्यांचे इंग्लंडचे प्रस्थान पक्कें झालें अन् अधिकाधिक विक्रम करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढीस लागली.

या सामन्यानंतर ब्रॅडमननीं शेफिल्ड शील्ड सामन्यांत भाग घेतला. त्यांत त्यांनी अनुक्रमें ४८, ६६, २, ८४, ८९ नाबाद, २६, ४७, ७७, २०, १३९ व २७ अशा धांवा केल्या. या वर्षीं त्यांनी एक जागतिक

विक्रम केला. त्यामुळें क्रिकेट क्षेत्रांत त्यांचें नांव कर्णोपकर्णी झालें. इंग्लंडांत जाण्यापूर्वी त्यांनी हा विक्रम केला त्यामुळे इंग्लंडमधील क्रिकेट-प्रेमिकांतहि त्यांच्याबद्दल कमालीचे औत्सुक्य, निर्माण झालें.

नवीन वर्षाच्या सुमुहूर्तावर दि. ३, ४, ६ व ७ जानेवारी १९३० रोजीं न्यु साउथ वेल्स विरुद्ध क्विन्सलंड असा सामना सिडने येथें सुरू झाला. ब्रॅडमन न्यु साउथ वेल्सतर्फे खेळले. त्यांचा संघनायक होता ॲलन किपॅक्स. पहिल्या डावांत ब्रॅडमननीं फक्त ३ धांवा काढल्या. दुसऱ्या डावांतहि ते आघाडीला खेळण्यास गेले. तो शनिवारचा दिवस होता...

शनिवारी ब्रॅडमननी २०५ धांवा केल्या. रविवारी सामना नव्हता. सोमवारी उपहारापर्यंत १०५ धांवांची भर घालून त्यांनी आपली धांवसंख्या ३१० वर नेली. त्यावेळीं एखादा विक्रम आपण करूं अशी कल्पना त्यांना नव्हती. परंतु ३०० धांवा झाल्यावर मात्र आपण नवीन उच्चांक प्रस्थापित करूं अशी उमेद त्यांना वाटूं लागली. त्यांची प्रकृती त्यावेळीं उत्तम होती अन् दैवहि त्यांना अनुकूल होतें. मध्यन्तरानंतर त्यांनी आणखी १४२ धांवांची भर घालून आपली धांवसंख्या ४५२वर आणली. सन १९२६–२७ मध्यें ऑस्ट्रेलियाच्या पॉन्सफोर्डने ४३७ धांवांचा विक्रम केला होता. तो अर्थातच ब्रॅडमननीं मोडला. ४३७ धांवा काढण्यास पॉन्सफोर्डला ६२१ मिनिटें लागली तर ब्रॅडमननीं ४५२ धांवा अवघ्या ४१५ मिनिटांत केल्या. कमीत कमी वेळांत जास्तींत जास्त धांवा काढणें हें त्यांचें ब्रीद असे. तें त्यांनी यावेळींहि पूर्णपणें पाळलें.

पॉन्सफोर्डचा विक्रम मोडल्यानंतर ब्रॅडमनना अनेक तारा आल्या. पहिली अभिनंदनाची तार पॉन्सफोर्डची आली. त्यानें तारेंत म्हटलें: ' तुमच्या अतुलनीय पराक्रमाबद्दल प्रेमपूर्वक अभिनंदन ! तुमच्यासारखा कर्तृत्ववान फलंदाज खरोखरीच या बहुमानाला पात्र आहे. ' टेस्ट सामन्यांत पहिलें शतक काढणारा चार्लेस बॅनरमन, हा सामना पहाण्यास उपस्थित होता. त्याचें अन् ब्रॅडमन यांचें छायाचित्र, त्यावेळीं छाया-

चित्रकारांनी अचूकपणें टिपलें. न्यु साउथ वेल्सच्या ७६१ धांवा झाल्यावर किपॅक्सने डाव पुरा झाल्याचें घोषित केलें नसतें तर ब्रॅडमननीं त्यावेळीं ५०० च्या वर धांवा सहज केल्या असत्या. निदान शक्यता तरी तशी खास होती. कारण परिस्थिती त्यांना अनूकूल होती. त्यावेळीं त्यांनी ४९ चौकार हाणले. त्यांचा खेळ किती झंझावाती, आक्रमक अन् धडाक्याचा झाला त्याची प्रचिती येण्यास खालील आकडेवारी पुरी आहे. त्यांनीं ४५२ धांवा काढल्या त्या अशा :

| मिनिटें | धांवा |
|---|---|
| ५४ | ५० |
| १०३ | १०० |
| १४० | १५० |
| १८५ | २०० |
| २३० | २५० |
| २८८ | ३०० |
| ३३३ | ३५० |
| ३७७ | ४०० |
| ४१४ | ४५० |
| ४१५ | ४५२ |

प्रथम श्रेणीच्या सामन्यांत ब्रॅडमन यांच्या खेरीज आणखी चार जणांनी ४०० च्या वर धांवा केल्या आहेत. त्या सर्वांच्या विक्रमांची माहिती पुढील प्रमाणें आहे.

( १ ) इंग्लंडच्या मॅकलेरेननीं स. १८९५ मध्यें लॅंकशायरतर्फे खेळून सॉमरसेट विरुद्ध ४७० मिनिटांत ४२४ धांवा केल्या. त्यावेळीं त्याचें वय २४ होतें.

( २ ) ऑस्ट्रेलियाच्या बिल पॉन्सफोर्डने सन १९२२-२३ मध्यें ४२९ धांवा टास्मानिया विरुद्ध केल्या तेव्हां तो २२ वर्षांचा होता. पुनरपि

सन १९२६–२७ मध्यें त्यानें ६२१ मिनिटांत ४३७ धांवा क्विन्सलंड विरुद्ध केल्या. तेव्हां त्याचे वय २६ होतें.

( ३ ) ब्रॅडमननीं सन १९३० मध्यें ४१५ मिनिटांत ४५२ नाबाद धांवा केल्या. त्यावेळीं त्यांचें वय २१ होतें.

( ४ ) रणजी करंडक सामन्यांत आपल्याकडील श्री. भाऊसाहेब निंबाळकरांनी सन १९४८ मध्यें महाराष्ट्र संघातर्फे खेळून काठेवाड संघाविरुद्ध ४९४ मिनिटांत ४४३ नाबाद धांवा केल्या. त्यावेळीं त्यांचें वय २९ होतें. काठेवाड संघानें सामना अर्धवट टाकून पुढें खेळण्याचें रहीत केल्यानें ब्रॅडमन यांचा विक्रम मोडण्याची आलेली संधी निंबाळ-करांना गमवावी लागली.

( ५ ) पाकिस्तानच्या हनीफ महंमदनें सन १९५९ मध्यें कायदे आझम करंडक सामन्यांत कराची संघातर्फे खेळून बहावलपूर संघाविरुद्ध ६३५ मिनिटांत ४९९ धांवा केल्या. त्यावेळी त्याचें वय २५ होतें.

ब्रॅडमन यांचा ४५२ चा विक्रम सन.१९५९ च्या जानेवारींत पाकिस्ता-नच्या हनीफ महंमदनें ४९९ धांवा काढून मोडला तेव्हां रायटरच्या बातमीदारापाशीं दि. १३-१-१९५९ रोजीं ब्रॅडमननीं पुढील प्रमाणें उद्गार काढले. " जागतिक उच्चांक केल्याबद्दल मी हनीफ महंमदचे अभिनंदन करतो. "

ब्रॅडमन यांच्या ४५२ च्या विक्रमामुळें त्यांनीं कीर्तीचें शिखर गांठलें. इंग्लंडला जाणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाची नांवे जाहीर झालीं त्यांत त्यांचे नांव होतेच. " अनेक कारणांमुळें इंग्लंडला जाणाऱ्या सफरीकडेच तरुण क्रिकेटपटुच्या हृदयाचे वेध लागलेले असतात " असें उद्गार ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत काढले असल्याने त्यांचेहि डोळे या इंग्लंड दौऱ्याकडे लागलें असल्यास नवल नव्हे. नांवे जाहीर झाली तेव्हां ते आपल्या गांवी बौरल येथें होते. ते इंग्लंडला जाणार म्हणून गांवच्या

लोकांना अतिशय आनंद झाला. तेथील मंडळींनीं त्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार केला.

सन १९२९-३० चा ब्रॅडमन यांचा क्रिकेट हंगाम अत्युत्तम ठरला. या हंगामांत १६ डावांत त्यांनी १५८६ धांवा केल्या. २ वेळां ते नाबाद होते. ५ शतकें त्यांनी केली व त्यांतच ४५२ चा जागतिक विक्रम केला. या हंगामातली त्यांच्या फलंदाजीची सरासरी ११३·२८ अशी होती. आत्तांपर्यंतच्या कामगिरीवरून त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे अशी खूणगांठ ऑस्ट्रेलियांत अनेकांनी बांधली. पण इंग्लंडमधल्या कांहीं खेळाडूंची तशी समजूत नव्हती. ब्रॅडमन यांच्या अनाकर्षक शैलीमुळें अन क्रॉस बॅटनें खेळण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें इंग्लंडांत त्यांचा खेळ साफ पडेल अशी कल्पना कांही इंग्लिश खेळाडूंची होती. पण ब्रॅडमननीं त्यांच्या कल्पनेला धरणीकंपासारखे धक्के देऊन इंग्लंडमधल्या खेळाडूंची भविष्यें खोटीं ठरविली अन् आपल्या तेजस्वी खेळानें सर्वांचा पुरा भ्रमनिरास केला.

१९३० मध्यें इंग्लंडमध्यें ब्रॅडमननीं कसोटी सामन्यांत अनेक नाट्यमय विक्रम केले. त्यापूर्वीचा त्यांचा ४५२ चा विक्रम ही त्याची नुसती नांदी होती.

# ५

## ‘ अस्मान कडाडुन गेला ’

ब्रॅडमन यांची आकांक्षा फलद्रुप झालीं होती कारण इंग्लंडात पराक्रम गाजविण्यास त्यांना आतां संधी मिळणार होती. आपल्या कर्तृत्वाबद्दल त्यांना भरपूर विश्वास वाटत होता. टेटचें उद्गार त्यांच्या लक्षांत होते. त्याला उत्तर देण्याची संधी आली होती....

१९३० साल ब्रॅडमन यांच्या परमोत्कर्षाचें. याच वर्षाच्या सुरुवातीला त्यांनी ४५२ धांवांचा जागतिक विक्रम केला होता. त्या विक्रमावर कळस करण्याची महत्वाकांक्षा त्यांच्या मनांत वास करीत होती. त्यांच्या साहसी मनाला इंग्लंडात भरपूर वाव मिळणार होता.

अखेरीस ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडात येऊन थडकला. ब्रॅडमन यांना बोटीचा प्रवास फारसा मानवला नाहीं. बोटीवर त्यांची प्रकृती यथातथाच होती. ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व वुलफूलकडे होतें.

नेहमीच्या प्रथेनुसार ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना वूस्टरशायर-विरुद्ध झाला. या पहिल्याच सामन्यांत ब्रॅडमननीं २३६ धांवा केल्या.

असाच पराक्रम त्यांनी सतत चालू ठेवला. लिस्टर विरुद्ध १८५ नाबाद, सरे विरुद्ध २५२ नाबाद अन् हॅम्पशायरविरुद्ध १९१ धांवा काढून इंग्लंडच्या क्रिकेट प्रेमिकांत त्यांनी कमालीची लोकप्रियता मिळविली. दौरा सुरू झाला एप्रिल अखेरीस. मे महिना संपण्यापूर्वी त्यांनी या दौऱ्यांत १००० धांवा करून एक कठीण अन् अपूर्व विक्रम केला.

एव्हांना इंग्लिश रसिकवृंदांची मनें ब्रॅडमननीं काबीज केली होती. आतां टेस्ट सामन्यांतल्या त्यांच्या पराक्रमाकडे रसिकक्रिकेट शौकीनांचे लक्ष लागलें होतें. टेस्ट सामन्यांतहि त्यांनी प्रेक्षकांची अपेक्षा पूर्ण केली.

पहिला कसोटी सामना इंग्लंडने जिंकला. ब्रॅडमननी पहिल्या डावांत ८ व दुसऱ्या डावांत १३१ धांवा केल्या. इंग्लंडमधलें टेस्ट सामन्यातलें त्यांचें हें पहिलें शतक...

दुसरा टेस्ट सामना लॉर्डस क्रीडांगणावर झाला अन् तो ऑस्ट्रेलियानें जिंकला. यावेळीं रणजींचे पुतण्ये दुलीपसिंह [ १९०५–१९५९ ] इंग्लंडतर्फे खेळले व त्यांनी ऑस्ट्रेलिया विरुद्ध होणाऱ्या आपल्या पहिल्याच टेस्ट मध्यें शतक काढून ( १७३ ) रणजींची मनीषा पुरी केली. हा सामना पहाण्यास रणजी उपस्थित होते. त्यावेळीं त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. गदगदल्या अंतःकरणानें त्यावेळीं ते म्हणाले. “ आज इंग्लंडमध्यें मी सर्वांत सुखी इसम आहे. माझी महत्वाकांक्षा आज पुरी झाली. दुलीप शाळेंत असल्यापासून त्याच्या प्रत्येक फटक्याकडे मी उत्साहाने पाही. मी त्याला शिकविलें असल्यानें तो चेल्टनहॅमला जाईपर्यंत माझा त्याच्याबद्दलचा धीर सुटत असे. ”

दुलीपसिंह १७३ धांवा काढून बाद झाले त्यावेळीं आऊटफील्डवर ब्रॅडमननीं त्यांचा झेल टिपला. त्यावेळीं ते दुलीपना म्हणाले, “ तुम्ही टोलवाटोलवी करतांना एवढी घिसाडघाई व धोके कां पतकरलेत ? ” त्यांच्या या प्रश्नाचें उत्तर दुलीपनी १७-१८ वर्षांनीं भारतीय संघ ऑस्ट्रेलियांत गेला होता त्यावेळीं ब्रॅडमन टोलवाटोलवी करतांना बाद

झाले त्यावेळीं दिलें. तरी लॉर्डसवरील दुलीपचा खेळ ब्रॅडमनना अतिशय आवडला.

लॉर्डस क्रीडांगणावरील या दुसऱ्या टेस्ट सामन्यांत ब्रॅडमननीं २५४ धांवा केल्या. ते स्वतः आपल्या या डावावर अतिशय खूष झाले. आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट' या आत्मचरित्रांत त्याबद्दल पुढील उद्‌गार त्यांनी काढीले आहेत: " माझ्या दृष्टीनें, तांत्रिक दृष्ट्या माझ्या आयुष्यातला तो सर्वोत्कृष्ट असा डाव होता. " यावेळी पहिल्या १५५ धांवा त्यांनी फक्त १६० मिनिटांत केल्या.

या टेस्टच्या वेळीं एक गंमतीदार प्रकार घडला. सामना चालू असताना इंग्लंडचे राजेसाहेब ( पांचवे जॉर्ज ) अकस्मात् सामना पहावयास आले. ऑस्ट्रेलियाचा फलंदाज पॉन्सफोर्ड धांवा काढण्याच्या ऐन रंगात होता. पण राजे साहेब आल्यानें खेळाडूंची त्यांच्याशीं ओळख करून देण्यासाठीं सामना मध्येंच थांबविण्यात आला. ओळखीचा कार्यक्रम संपल्यानंतर खेळ चालू झाल्यावर पॉन्सफोर्ड लागलीच बाद झाला. तेव्हां इंग्लिश पत्रांनी दुसरें दिवशीं खळबळजनक मथळे अन् शीर्षकें देऊन हा प्रसंग चटकदारपणें वाचकांना निवेदन केला. कांहीं वर्तमानपत्रांनी – ' इंग्लंडमधले सर्वोत्कृष्ट गोलंदाज राजेसाहेबच ' ( The best Bowler in England was the king ' ) असें वर्णन केलें तर कांहीं पत्रांनी ' राजानें विकेट घेतली ' (' King took the wicket ') असे शीर्षक दिलें. राजेसाहेबांच्या ओळखीचा प्रसंग नि पॉन्सफोर्डची लौकर विकेट जाणें या दोन घटनांचा असा मजेदार अर्थ लावून ब्रिटिश पत्रांनी मोठी मौज उडवून दिली. इंग्लंडमधल्या आम जनतेंत क्रिकेटप्रेम कसे अतोनात रुजलें आहे याची साक्ष या प्रसंगात पहावयास सांपडते.

तिसऱ्या टेस्टची हकिगत सांगण्यापूर्वीं ब्रॅडमन यांच्या फलंदाजीच्या पद्धतीबद्दल थोडा उहापोह करावयास हवा. ज्याला इंग्रजीत ' स्टाईल ' म्हणजे शैली म्हणतात तशा प्रकारची शैली अगर आकर्षकता त्यांच्या

बॅटींगमध्यें नव्हती. कला अन् सौंदर्य या दोन गुणांचा त्यांच्या फलंदाजीत अभाव होता. पवित्रा घेतांना ते वांकून उभे रहात. चेंडू मारतांना त्यांची बॅट वांकडी होई. तशांत ते बॅटहि जास्त खालीं धरीत. त्यामुळें सुरुवातीला त्याच्या फलंदाजीचें दर्शन जाणकारांना अन् तज्ज्ञांना अनाकर्षक वाटे. नामांकित फलंदाजांप्रमाणें त्यांच्या खेळण्याची पद्धत मनोहर वाटत नसे. इंग्लंडच्या वॉल्टर हॅमंडसारखे कव्हर व बॅकफूट ड्राईवज्चे फटके त्यांना जमत नसत. षटकारांची सरबत्तींहि त्यांना कधीं जमत नसे. कारण उंचीने ते होते फार ठेंगु. पण त्यांची हिंमत, आत्मविश्वास नि चिकाटी जबर होती. झपाझप अन् वेगानें धांवा काढण्यांत ते फार पटाईत होते. त्यांचे फुटवर्क फार चपळ होतें. फटके अंतराळांत न मारण्याची ते दक्षता घेत. प्रत्येक फटका हिरवळीला समांतर असे. चेंडू उंच उडूं नये म्हणून ते फार सावध असत. शिवाय नैसर्गिक गुण, खेळामधल्या सर्व अंगांचा जिज्ञासू वृत्तीनें अभ्यास करण्याची तत्परता, कमालीची एकाग्रता, आरोग्य-संपन्नता अन् क्रिकेटला उचित नि युक्त अशी शांत अन् थंड प्रवृत्ति इत्यादी गुण त्यांच्या ठायीं प्रकर्षानें वास करीत होते.

असे अनेक गुण ब्रॅडमननीं आत्मसात केले असल्यामुळे शैलीच्या अभावी त्यांचें कधीं नडलें नाहीं. शैली असली तर उत्तमच परंतु धांवा काढण्यास शैली पाहिजेच असें नाहीं. याबाबतींत इंग्लंडमधल्या 'विस्डेन' वार्षिकानें ( १९३१ ) त्यांच्याविषयीं पुढील प्रमाणें उद्गार काढले आहेत: 'धांवा काढण्यांत ब्रॅडमॅन यांची बरोबरी कुणालाहि करतां येणार नाही. ट्रंपर अगर मॅकार्टने यांची शैली अगर आकर्षकता ब्रॅडमन यांच्या फलंदादाजी नसेल, पण त्यांच्या खेळातल्या आंकडेवारीकडे एकदां नजर टाका म्हणजे त्यांच्या फलंदाजींतील सर्वश्रेष्ठतेची कल्पना येईल." ब्रॅडमन यांचे हें 'विस्डेन' कृत वर्णन यथातथ्य आहे.

ब्रॅडमनना शैली नाही, ते क्रॉस बॅटीनें खेळतात असा ग्रह मॉरीस टेट व पर्सी फेंडर या इंग्लंडच्या प्रसिद्ध क्रिकेटपटुंनी करून घेतला

अनुक्रम २०७०९ वि: ५।२।
७२६० ता: २८।३।६५


होता. टेटने ब्रॅडमनना केलेला उपदेश मागेंच निवेदन केला आहे. फेंडरलाहि इंग्लंडमध्यें ते कितपत यशस्वी होतील याबद्दल साशंकता होती. १९३०च्या दौऱ्यांत या दोघांना ब्रॅडमननीं कृतीनें उत्तर दिलें. तिसऱ्या कसोटी सामन्यांत त्यांनीं जो पराक्रम केला तो पाहून या संशयात्म्यांना ब्र काढण्यास जागा राहिली नाहीं. हा सामना लीड्स येथें झाला अन् त्यानें त्यांना चिरकाल कीर्ती मिळवून दिली.

दि. ११, १२, १४, व १५ जुलै १९३० रोजीं लीड्स टेस्टची सुरुवात हेडिंग्ले क्रीडांगणावर झाली. ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकल्यावर कर्णधार वुडफूल अन् जॅकसन [ १९०९–१९३३ ) फलंदाजीस निघाले. पॉन्सफोर्डला दुखापत झाली असल्यानें त्याच्या जागीं जॅकसनचा समावेश करण्यांत आला होता. तो १ धांव काढून टेटच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यावेळीं ऑस्ट्रेलियाच्या २ धांवा झाल्या असून १ गडी बाद झाला होता. अन् मग ब्रॅडमन खेळावयास आले.

पहिल्या फटक्यापासूनच ब्रॅडमननीं गोलंदाजी झोडपण्यास आरंभ केला. प्रतिपक्षांत टेट, हॅमंड, गिअरी, टायड्स्ले अन् लारवूड हे पांच गोलंदाज बोलींग करीत होते. ब्रॅडमन कुणाच्याहि गोलंदाजीला दाद देत नव्हते. टेट थकून गेला. हॅमंड किंकर्तव्यमूढ झाला. गीअरीची मती गुंग झाली. लारवूडला लालबुंद होण्यापेक्षां जास्त कांहीं करतां येईना. टायड्स्ले तर थक्कच झाला. ब्रॅडमन यांच्या धांवांचा वेग थांबत नव्हता....

इंग्लंडचा यष्टिरक्षक डकवर्थ टेटला खवचटपणें म्हणाला, " टेट, मला वाटलें होतें कीं सरळ बॅटीने न खेळता येणाऱ्या या ब्रॅडमनला तूं सहज बाद करशील. " ऑस्ट्रेलियांत टेटने ब्रॅडमनना केलेल्या उपदेशाला ब्रॅडमननी या वेळीं कृतीनें उत्तर दिलें होतें. टेटने केलेला उपदेश डकवर्थला ठाऊक होता अन् म्हणूनच त्यानें टेटला वरील टोमणा मारला.

टेट पुन्हां उत्साहानें बोलींग करूं लागला. परंतु ब्रॅडमन यांच्यापुढें

कुणाचीच मात्रा चालेना. शैली फारशीं मनोरम नसूनहि हुकुमी फलंदाज क्रींडांगणावर काय किमया करूं शकतो याचें प्रात्यक्षिक त्यांनी प्रतिपक्षाला करून दाखविलें.

ब्रॅडमन त्या वेळीं एकविशीच्या घरांत होते. फटक्यांची रोषणाई वायुवेगानें करीत ते धांवांची रास रचीत होते. धांवांची धार अखंड लागलेलीं होती. रोटरी यंत्रांतून वृत्तपत्रांच्या प्रती जशा एका पाठोपाठ झपाट्यानें बाहेर पडतात, त्याप्रमाणेंच त्यांच्या बॅटीमधून धांवांचा सडा पडत चालला होता.

उपहारापुर्वी ९५ मिनिटांत ब्रॅडमननीं १०५ धांवा करून, उपहारापूर्वी कसोटी सामन्यांत शतक करण्याचा विक्रम ट्रंपर नि मॅकार्टने याच्याप्रमाणें करून दाखविला. असा विक्रम करणारे तिघेहि फलंदाज ऑस्ट्रेलियन असावेत हाहि एक योगायोग म्हटला पाहिजे. असा विक्रम ट्रंपरनें २५ व्या वर्षी केला. मॅकार्टनेनें असा विक्रम केला तेव्हां त्याचें वय ४० होतें. ब्रॅडमन यांनी हा विक्रम केला तेव्हां ते फक्त एकवीस वर्षांचे होते.

ऑस्ट्रेलियाच्या १९४ धांवा झाल्या तेव्हां वुडफूल ५० धांवा काढून बाद झाला. चहापानापर्यंत ऑस्ट्रेलियाच्या ३०९ धांवा झाल्या, त्यांत ब्रॅडमन यांच्या २२० धांवा झाल्या होत्या. नंतर त्यांनी इंग्लंडच्या आर. ई. फॉस्टरचा [ १८७८–१९१४ ] सन १९०३–४ मधील ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी सामन्यांत केलेला २८७ धांवांचा उच्चांक मोडला. फॉस्टरला २८७ धांवा करण्यास ७ तास २० मिनिटें लागली तर त्यांनी तेवढ्या धांवा ५॥ तासांत केल्या. खेळ संपतांना त्यांच्या ३०९ धांवा झाल्या होत्या व ऑस्ट्रेलियाच्या ४५८ धांवा झाल्या होत्या.

पांगळा कदाचित् हिमालय उल्लंघून जाईल पण इंग्लंडसारख्या प्रबळ संघाविरुद्ध टेस्टमध्यें एका दिवसांत स्वतःच्या ३०९ धांवा करणें ही गोष्ट अशक्यप्राय म्हटली पाहिजे. परंतु ब्रॅडमननीं एका दिवसांत टेस्टमध्यें

३०९ धांवा करून इंग्लंडमधल्या रसिकांना थक्क केलें. त्यांनीं त्या पहिल्या दिवशीं उपहारापूर्वी शतक काढलें, चहापानापर्यंत द्विशतक केलें अन् दिवस अखेरीस त्यांच्या धांवा ३०९ झाल्या होत्या. हा देखील एक अपूर्व विक्रम होता.

दुसरें दिवशीं सकाळीं १२ वाजण्यास वीस मिनिटें कमी असतांना ब्रॅडमन यांचा झेल डकवर्थने घेतला. त्यांची विकेट टेटनेच घेतली. मात्र त्याबद्दल त्याला धांवांचा जबर भूर्दंड ( १२४ धांवा, ) द्यावा लागला.

ब्रॅडमन ३३४ धांवा काढून बाद झाले. टेस्ट क्रिकेटमधला त्यावेळचा हा जागतिक विक्रम त्यांनी एकविसाव्या वर्षी केला. आदल्या दिवशीं त्यांच्या ३०९ धांवा झाल्या त्याबद्दल लंडनच्या ' टाइम्स 'ने लिहिलें: ' आमच्या इंग्लिश गोलंदाजांची संभावना त्यानें होतकरू नि शाळकरी गोलंदाजां-प्रमाणें केली. ' पहिल्या दिवशीं त्यांनी ३०९ धांवा केल्या तरी ते जरा देखील दमलेले नव्हते. प्रख्यात इंग्लिश क्रिकेट-समीक्षक नेव्हील कार्डस् यांनी यासंबंधीं लिहिलें आहे तें असें : ' लारवूड, गिअरी, टेट इत्यादिकांची गोलंदाजी जमीनदोस्त करून ३०९ धांवांचा फड जिंकून ब्रॅडमन जेव्हां तंबूत आला त्यावेळींहि त्याची मुद्रा स्नानगृहांतून बाहेर आल्याप्रमाणें शांत व तुकतुकीत दिसत होती. चाळीस चौकारांची फैर झाडूनहि त्याच्या अंगावर घामाचा टिपूस नव्हता '. कार्डस् यांच्या वक्तव्यावरून ब्रॅडमननीं धांवा किती सहजपणें काढल्या असतील त्याची कल्पना येतें.

फॉस्टरच्या विक्रमाप्रमाणें ब्रॅडमननीं इंग्लंडच्या संडहॅमनें [ ज० १८९० ] सन १९२९-३० मध्यें वेस्ट इंडिज विरुद्ध कसोटी सामन्यांत केलेला ३२५ धांवांचा विक्रमहि मोडला. ३३४ धांवा करण्यास त्यांना ६ तास १५ मिनिटें ( ३७५ मिनिटें ) लागली म्हणजे सुमारें तासाला ५२ धांवा त्यांनी केल्या. ४६ चौकार, ६ तीनचे फटके, २६ दुहेरी धांवा व ८० एकेरी धांवा काढून त्यांनी ३३४ धांवा केल्या. आपल्या

संघाच्या २ धांवा झाल्या असतांना ते खेळण्यास आले व संघाच्या ५०८ धांवा झाल्यावर ते बाद झाले. त्यांच्या २७३ धांवा झाल्या तेव्हां ते बाद व्हायचे. पण दैवानें त्यांच्यावर खैर केली.

३३४ धांवांचा विक्रम केल्याबद्दल खूष होऊन व्हाईटलॉ नांवाच्या धनाढ्य ऑस्ट्रेलियन इसमाने ब्रॅडमनना १००० पौंड दिले.

ऑस्ट्रेलियन संघाच्या पहिल्या डावांत ५६६ धांवा झाल्या. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३९१ धांवा झाल्या. त्यांत हॅमंडच्या ११३ धांवा होत्या. त्या काळीं टेस्ट सामने चार दिवसांचे होत असल्यानें ब्रॅडमन यांच्या जीवनांतला हा अपूर्व अन् रोमहर्षक सामना अखेरीस अनिर्णित राहिला.

चौथ्या मँचेस्टरच्या टेस्ट सामन्यांत फक्त ऑस्ट्रेलियाचा डाव पुरा झाला. इंग्लंडच्या २५१ धांवा होऊन ८ गडी बाद झाल्यावर पावसामुळें सामना पुढे चालू न झाल्यानें तो अनिर्णित राहिला. यावेळीं ब्रॅडमननीं फक्त १४ धांवा केल्या. पुढील सामन्यांत सॉमरसेट विरूद्ध त्यांनी ११७ धांवा केल्या. नंतर ऑस्ट्रेलियन संघ शेवटच्या कसोटी सामन्याच्या तयारीला लागला. आतांपर्यंत दोन सामने अनिर्णित राहिले होते. एक इंग्लंडने व एक ऑस्ट्रेलियाने जिंकला. त्यामुळें अखेरच्या सामन्याविषयीं प्रेक्षकांत अपार औत्सुक्य होतें. हा सामना सहा दिवसांचा होता.

शेवटच्या टेस्ट मध्यें इंग्लंडनें आपला संघनायक बदलला. चॅपमन ऐवजीं बॉब वायट हा कर्णधार झाला. ही गोष्ट ऑस्ट्रेलियाच्या पथ्यावर पडली. नेता म्हणून चॅपमन श्रेष्ठ होता.

पांचवा टेस्ट सामना ओव्हल येथें दि. १६ ऑगस्ट १९३० रोजीं सुरू झाला. यावेळीं ब्रॅडमननीं पुन्हां २३२ धांवा केल्या. या सामन्यांत इंग्लंडचा १ डाव अन् ३९ धांवांनी पराभव झाला. अर्थातच टेस्ट मालिका ऑस्ट्रेलियानें जिंकली. त्याचें बरेचसें श्रेय ब्रॅडमन यांच्या विक्रमी पराक्रमाला दिलें पाहिजे. या शेवटच्या सामन्याच्या वेळीं इंग्लंडचा

प्रसिद्ध फलंदाज जॅक हॉब्स टेस्ट सामन्यांतून निवृत्त होणार होता. त्यानें आपल्या अखेरच्या टेस्ट सामन्यांत अवघ्या ९ धांवा केल्या. ब्रॅडमनना त्याचा खेळ पहाण्याची इच्छा असल्यानें, तो लौकर बाद झाल्यामुळें त्यांची फार निराशा झाली. हॉब्सच्या टेस्ट निवृत्तीनंतर 'हॉब्स युग' संपलें असे जाणकार म्हणूं लागले; त्यावरून तो किती श्रेष्ठ दर्जाचा फलंदाज होता तें समजतें. अशा थोर खेळाडूनें आपल्या अखेरच्या कसोटी सामन्यांत विपुल धांवा काढाव्या अशी ब्रॅडमन यांची मनीषा. पण ती फलद्रुप झाली नाहीं.

पांचव्या टेस्ट सामन्यानंतर ब्रॅडमन आणखी चार सामने खेळले. केन्ट विरुद्ध दुसऱ्या डावांत त्यांनी २०५ धांवा केल्या. अखेरच्या लेवेसन-गोव्हर एलेवन विरुद्ध झालेल्या सामन्यांत त्यांनी ९६ धांवा केल्या. हा सामना आटपल्यावर ऑस्ट्रेलियन संघाचा इंग्लंडचा दौरा संपला.

ब्रॅडमन यांचा हा इंग्लंडचा दौरा कमालीचा यशस्वी झाला. या दौऱ्यांत मे महिना संपण्यापूर्वी अवघ्या एक महिन्याच्या आंत त्यांनी १००० धांवा केल्या. कसोटी सामन्यांत त्यांनी धांवांचा कल्लोळ उडविला. १ ल्या टेस्ट मध्यें १३१, दुसऱ्यांत २५४, तिसऱ्यांत ३३४ चा जागतिक विक्रम अन् पांचव्यांत २३२ धांवा मिळून दोन द्विशतकें, एक त्रिशतक नि एक शतक अशा शतकांचा धुमधडाका त्यांनी इंग्लंडच्या टेस्ट मालिकेंत केला. सन १९२८–२९ मध्यें इंग्लंडच्या हॅमंडनें ऑस्ट्रेलियांत, कसोटी सामन्यांच्या मालिकेंत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९०५ धांवा केल्या. त्याची फलंदाजीची सरासरी होती ११३.१२. ब्रॅडमननीं या १९३० च्या दौऱ्यांत कसोटी मालिकेंत ९७४ धांवा केल्या अन् हॅमंडचा उच्चांक मोडला. त्यांची टेस्ट मधील बॅटींगची सरासरी १३९.१४ अशी होती. ते प्रथम श्रेणीचे २७ सामने खेळले. ३६ डावांत त्यांनी २९६० धांवा केल्या. त्यांनी पांच द्विशतकें, एक त्रिशतक व चार शतकें मिळून १० शतकें काढली. त्यांच्या फलंदाजीची सरासरी ९८·६६ अशी होती. इंग्लंडच्या आपल्या पहिल्या

दौऱ्यांत त्यांनी ' न भूतो न भविष्यति ' असा पराक्रम केल्यानें जगांतल्या पहिल्या प्रतीच्या फलंदाजांत त्यांची गणना होऊं लागली !

या दौऱ्यांत इंग्लंडच्या राजा-राणींनी देखील ब्रॅडमन यांचा योग्य तो परामर्ष घेतला. त्यावेळीं रेडिओ-टेलिफोन ही चीज नवीन होती. ब्रॅडमननीं या टेलिफोनवरून ऑस्ट्रेलियांतल्या व्यक्तींशीं संभाषण केलें. लेखकांनी व टीकाकारांनी या दौऱ्यांत त्यांचा गौरव ' रन् गेटींग मशिन, म्हणजे ' धांवांचे यंत्र ' असा केला. एखाद्या डावांत ते लौकर बाद झाले तर ' ब्रॅडमन फेल्स ' म्हणजे 'ब्रॅडमन अयशस्वी झाले' असा मोठा मथळा संपादक आपल्या पत्राच्या शिरोभागीं घालूं लागले. एवंच ' ब्रॅडमन म्हणजे वृत्तपत्रांतील मोठी ' बातमी ' बनण्या एवढे वडे झाले. याचें कारण म्हणजे त्यांनीं इंग्लडच्या पहिल्या दौऱ्यांत केलेला अविस्मरणीय पराक्रम. या दौऱ्यांत ऑस्ट्रेलियाचा विजय झाला पण दौरा गाजविला ब्रॅडमननीं. म्हणून विजय ऑस्ट्रेलियाचा असला तरी ही इंग्लंड सफर खास ' ब्रॅडमनचा दौरा ' म्हणून ओळखली जाते.

प्रा. दि. ब. देवधरांनी नातू कृत ब्रॅडमन चरित्रांत ( १९३६ ) ब्रॅडमन यांच्या या दौऱ्यासंबंधीं अत्यंत मार्मिक वर्णन पुढील प्रमाणें केलें आहे. "डॉन ब्रॅडमनच्या वयाला वीस वर्षें होण्याच्या अगोदरच इंग्लंड आस्ट्रेलिया मध्यें अटीतटीच्या होणाऱ्या चुरशीच्या सामन्यांत खेळण्यास तो निवडला गेला व १९३० मध्यें इंग्लंडचा सर्व संघ अकरा खेळाडू, जितक्या धांवा काढूं शकला तितक्या, कधीं दोनशें तर कधीं तीनशेंच्यावर धांवा एकट्यानें आपल्या संघाची बाजू पडली असतांना काढून ऑस्ट्रेलियास त्यानें अनेक वेळा जय मिळवून दिला."

" योद्धयांत जसा नेपोलियन, मुत्सद्यांत बिस्मार्क, कवींत कालिदास तसाच क्रिकेटपटूंत ब्रॅडमन, आजपर्यंत तरी अद्वितीय गणला जाईल, " हे वर्णन अत्यंत समर्पक अन् यथार्थ म्हणतां येईल. १९३० च्या दौऱ्यांतली विषेश महत्वाची घटना म्हणजे ब्रॅडमननीं केलेला ३३४ धांवांचा विक्रम,

त्रिखंडात गाजला–त्यांना त्रिखंड कीर्ती लाभली. स्वा. सावरकरांनीं मार्से-लिस या ठिकाणीं असलेल्या बोटींतून उडी मारून पलायन केलें, तो प्रसंग लोककवि मनमोहन नातूंनी 'अस्मान कडाडुन गेला' या काव्यपंक्तीनी वर्णिला आहे. ब्रॅडमन यांच्या ३३४ धांवांच्या जागतिक विक्रमाचा प्रसंग आठवला कीं वरील काव्यपंक्ती ओठांत स्फुरूं लागतात.

# ६

## "दिसों लागे मृत्यू !"

इंग्लंडमधील दौरा आटपून ब्रॅडमन ऑस्ट्रेलियांत आल्यावर तेथील जनतेने त्यांचें फार मोठ्या प्रमाणांत स्वागत केलें. कारण त्यांनी त्या दौऱ्यावर केलेला अतुलनीय पराक्रम. त्यामुळें तरुण अन् उद्योन्मुख क्रिकेटपटूंना त्यांच्याखेरीज दुसरा विषयच नव्हता. ब्रॅडमनना आतां अफाट लोकप्रियता लाभलीं होती.

पण ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळाच्या मनांत दुसरेंच विचार घोळत होते. मंडळानें ब्रॅडमन यांचा सत्कार थोड्या वेगळ्या प्रकारानें केला. इंग्लंडचा दौरा चालू असतांना 'डॉन ब्रॅडमन्स बुक' या नांवाचें स्वतःची कथा निवेदन करणारें पुस्तक त्यांच्या नांवें प्रसिद्ध झालें होतें. हें पुस्तक आधीं लेखमालेच्या रूपानें इंग्लिश वृत्तपत्रप्रसि झालें. या प्रकाराची साद्यन्त हकिगत ऑस्ट्रेलियन संघाच्या व्यवस्थापकाने ऑस्ट्रेलियन मंडळाला सांगितली. या लेखमालेनें ब्रॅडमन यांनी मंडळाशीं झालेल्या खेळाडूंच्या कराराचा भंग केला अशी व्यवस्थापकाची

कल्पना होती. खेळाडू दौऱ्यावर असतांना त्यानें वृत्तपत्रांत दौऱ्यासंबंधीं अगर स्वतःसंबंधीं निवेदन करावयाचें नाहीं अशी सर्वसाधारण प्रथा खेळाडूकडून पाळली जाते. खेळाडूंनी दौऱ्यासंबंधीं कांहींही वाच्यता वृत्तपत्रांत करूं नये असें बंधन क्रिकेट मंडळानें दौऱ्यावर जाणाऱ्या खेळाडूंवर घातलेलें असतें. परंतु ब्रॅडमननीं लेखमाला लिहितांना संपादकांना अशी अट घातली होती कीं, ऑस्ट्रेलियन संघाचा दौरा पुरा होऊन तो संघ स्वगृही जाईपर्यंत दौऱ्यासंबंधींचा कांहींही मजकूर अगर विषय लेखमालेंत प्रसिद्ध करूं नये.

परंतु ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळानें वरील बाबींचा विचार न करतां ब्रॅडमनना शिस्तभंगाखालीं ५० पौंडांचा दंड ठोठावला. त्यांनीही हा दंड न कुरकुरतां आनंदानें सोसला. इंग्लंडच्या दौऱ्यावर त्यांनी अद्वितीय पराक्रम केला असला तरी त्यांनी शिस्तीचा भंग केला असल्यानें त्यांना दंडाची शिक्षा फर्माविण्यास ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळ कचरलें नाहीं. यावरून मंडळाच्या जागरूकतेची कल्पना येते. खेळाडू किती कां मोठा असेना, त्याच्यावर घातलेली बंधनें त्यानें पाळलींच पाहिजेत. एरवीं तो शिक्षेस पात्र होऊं शकतो याचें प्रात्यक्षिक, ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळानें त्यांना दंडाच्या शिक्षेची कृति करून दाखविलें.

दंडाचें सव्यापसव्य झाल्यावर शेफिल्ड शील्ड सामन्यांना सुरुवात झाली. त्या हंगामांत ब्रॅडमन ६ डाव खेळले. दक्षिण ऑस्ट्रेलिया विरूद्ध त्यांनी २५८ धांवा २८५ मिनिटांत केल्या. व्हिक्टोरिया विरुद्ध दुसऱ्या डावांत त्यांनी २२० धांवाहि फार झपाट्यानें केल्या. दक्षिण ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या पहिल्या सामन्यांतहि दुसऱ्या डावांत त्यांनी १२१ धांवा केल्या होत्या. एकूण काय तर त्यांच्या फलंदाजीचा बहर कायम होता.

हा हंगाम चालू असतांना वेस्ट इंडिज संघ ( सन १९३०-३१ ) ऑस्ट्रेलियांत आला. या संघात जॉर्ज हेडले हा सुप्रसिद्ध फलंदाज होता. तो इतका पट्टीचा फलंदाज होता कीं कौतुकानें त्याला ‘ काळा ब्रॅडमन ’

असें म्हणत. लिअरी कॉन्म्टंटाईन ( आतां याला ' सर ' पदवी मिळाली आहे. १९६२, ) हा अष्टपैलु क्रिकेटपटूहि या संघात होता. हे दोन खेळाडु वगळल्यास बाकीचे या संघातले खेळाडु बेतासबात होते. परंतु ऑस्ट्रेलियन संघ नुकताच इंग्लंडच्या दौऱ्यावर जाऊन आला होता. तशांत शेफिल्ड शील्ड सामनेहि चालू होते. त्यामुळें ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूंना आला होता शीण. अशाहि परिस्थितींत ऑस्ट्रेलियन संघाने वेस्ट इंडिजचा पराभव केला कारण वेस्ट इंडिज संघाच्या मानानें ऑस्ट्रेलियन संघ सर्व दृष्टीनें श्रेष्ठ अन् प्रबळ होता.

ऑस्ट्रेलियानें पहिले चार कसोटी सामने जिंकून वेस्ट इंडिजचा पूर्ण पराभव केला. पांचवा टेस्ट सामना वेस्ट इंडिजनें जिंकला. तिसऱ्या टेस्ट सामन्यांत ब्रॅडमननीं २२३ धांवा केल्या व चौथ्या कसोटी सामन्यांतहि त्यांनी १५२ धांवा केल्या. ५ कसोटी सामन्यांतील ६ डावांत ब्रॅडमननीं ४४७ धांवा वेस्ट इंडिज संघाविरूद्ध केल्या. वेस्ट इंडिजतर्फे हेडले फक्त चांगला खेळला. त्यानें तिसऱ्या व पांचव्या टेस्ट सामन्यांत ऑस्ट्रेलिया-विरूद्ध शतकें काढली. कॉन्स्टंटाईनचा खेळ इतर सामन्यांत चांगला झाला पण टेस्ट मध्यें त्याचा प्रभाव पडला नाहीं. हेडलेनें या दौऱ्यांत स्वतःच्या १००० धांवा पूर्ण केल्या. अशा रीतीनें ऑस्ट्रेलियानें वेस्ट इंडिज संघाचा पूर्ण पाडाव केला.

या सुमारास ब्रॅडमन यांची लोकप्रियता शिगेस पोहोंचली होती. वृत्तपत्रांत त्यांच्यावर स्तुतीसुमनें उधळलीं जात त्याप्रमाणें टीकाहि होई. मंदीचे दिवस होते ते...

ब्रॅडमन जिथें नोकरीस होते, ती नोकरी आर्थिक दृष्ट्या फारशी किफायतशीर नव्हती. भावि आयुष्याच्या दृष्टीनें दुसरा कांहीं उद्योग शोधला पाहिजे असे त्यांना वाटे. सन १९३१ मध्यें, ऑगस्ट महिन्यांत इंग्लंडमधल्या ॲक्रींग्टन क्लबानें लँकेशायर लीगमध्यें खेळण्यासाठीं त्यांना निमंत्रण दिलें. लौकरच त्या निमंत्रणाला त्यांनी नकारहि दिला. पण

वृत्तपत्रांत त्यांच्यावर टीका झाली. लँकेशायर लीगमध्यें ते हमखास खेळण्यास जाणार असा ग्रह करून ही टीका करण्यात येत होती. त्यांच्यावरील ही टीका पाहून ऑस्ट्रेलियाच्या लोकसभेच्या एका सभासदानें त्यांना पुढील प्रमाणें सुंदर अन् हृदयस्पर्शी पत्र लिहिलें: ' प्रिय मित्रा, तुझ्यावर होत असलेल्या टीकेमुळें मला फार वाईट वाटतें. ज्या अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंनी ऑस्ट्रेलियाला मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली त्यांना आपला वृद्धापकाळ अतिशय दारिद्र्यांत कंठावा लागला. तेव्हां दोस्ता, तुला आलेलें निमंत्रण तूं अवश्य स्विकारावेस असें मला वाटतें. '

पण इतर कांहीं थोर व्यक्तींनी, ब्रॅडमननीं ऑस्ट्रेलिया सोडून जाऊं नये असा सल्ला त्यांना दिला. त्यांच्यासंबंधीं अनेक उलट सुलट वातम्या त्यावेळीं वृत्तपत्रांत कशा येत होत्या त्या एकत्रित करून त्यांच्या ॲन्थनी डेव्हीस या चरित्रकारानें पुढील प्रमाणें दिल्या आहेत :

१. ते ऑक्सफर्ड विद्यापीठांत जाणार.

२. ते इंग्लंडांत स्थायिक होणार.

३. ते इंग्लीश युवतीशीं विवाहबद्ध होणार.

४. ते रंगभूमिवर प्रवेश करणार.

५. हॉलीवूडमधील एका चित्रपटांत ते भूमिका करणार.

६. त्यांना ॲनिमियानें पछाडलें असून, त्यांची क्रिकेट कारकीर्द संपुष्टात येणार.

७. ते इंग्लिश काउन्टीतर्फे खेळणार.

एकूण काय तर ब्रॅडमनना इंग्लंडच्या एका क्लबकडून हें निमंत्रण आलें म्हणून ही सर्व टीका होत होती. त्यांनी इंग्लंडांत जाणें ऑस्ट्रेलियांत कुणालाच मान्य नव्हतें, ही गोष्ट या टीकेवरून सिद्ध होतें. आतांपर्यंत त्यांच्या स्तुतीनें वृत्तपत्रें आपले रकाने भरीत. यावेळीं त्यांना प्रसिद्धि मिळाली ती टीकेमुळें. अशा रितीनें वृत्तपत्रांतल्या मथळ्यांचे ते मानकरी झाले.

परंतु अशा टीकेच्या तोफखान्यांतहि कांहीं विनोदी पत्रें त्यांना आली. एका वृद्ध स्त्रीनें त्यांना पुढील प्रमाणें विनोदी पत्र लिहिलें :

'बाळ, माझं म्हातारीचं थोडं ऐक. लोखंड तापलं आहे ना, तोंवरच त्यावर घाव घाल. एखाद्या श्रीमंत बाईशीं विवाह उरकून घे कसा. तुझ्या चेहऱ्यामोहऱ्यावरून, ती तुझा नक्की स्विकार करील'

या पत्राला उद्देशून ब्रॅडमननीं आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट' या आत्मचरित्रांत पुढील प्रमाणें मजेदार पुस्ती जोडली आहे : 'मी त्या बाईच्या मताशीं मुळींच सहमत नव्हतो. कारण एखादी धनाढ्य बाई केवळ माझ्या विक्रमांवर खूष होण्याची शक्यता नव्हती अन् माझ्या चेहऱ्यावर ती भाळेल हि गोष्टहि अशक्य कोटीतलीच होती'

हें सर्व टीकेचें वादळ संपल्यानंतर असोसिएटेड न्यूजपेपर्स लिमि० व पामर अॅन्ड सन्स या कंपनीनें ब्रॅडमन यांच्याशीं एक करार केला. या संस्थेचा संबंध नभोवाणीशीं निगडीत होता. त्यामुळें क्रिकेट खेळून क्रिकेटवर बोलण्याची अन् लिहिण्याची संधी त्यांना लाभणार होती. म्हणून या कराराला त्यांनी लागलीच संमती दिली.

१९३१–३२ सालच्या शेफिल्ड शील्ड सामन्यांत ब्रॅडमननीं व्हिक्टोरिया विरूद्ध दुसऱ्या डावांत १६७ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियांत त्यावर्षी आलेल्या दक्षिण अफ्रिकेच्या संघाविरूद्धहि त्यांनी दोन शतकें ( १३५ व २१९ ) काढलीं. नंतर दक्षिण अफ्रिकेच्या विरूद्ध कसोटी सामन्यांस सुरूवात झाली. या सामन्यांत पुनःश्च ब्रॅडमन यांचें तेज प्रकट झालें. दक्षिण अफ्रिकेचा संघ एक तर दुबळा होता व क्षेत्ररक्षणांत तर तो फारच कमकुवत होता. त्याचा फायदा ब्रॅडमननीं पुरेपूर उठविला.

पांचहि कसोटी सामन्यांत दक्षिण अफ्रिकेचा ऑस्ट्रेलियानें पूर्ण पराभव केला. ओळीने पांचहि कसोटी सामने ऑस्ट्रेलियानें जिंकले. ब्रॅडमननीं ४ टेस्ट्मध्यें ५ डावांत ८०६ धांवा केल्या व ४ शतकें केली. त्यांतली दोन द्विशतकें होती. त्यांच्या फलंदाजीची सरासरी २०१.५० अशी झाली.

चौथ्या कसोटी सामन्यांत त्यांनी २९९ धांवा केल्या अन् ते नाबाद राहिले. त्यावेळेपर्यंत व आजतागायत ऑस्ट्रेलियांत एवढ्या धांवा कुणीहि केलेल्या नाहींत. त्या दृष्टीनें त्यांचा हा विक्रम अजून अबाधित आहे.

या सुमारास ब्रॅडमन यांच्या गांवच्या मंडळींनी त्यांचा छोटासा सत्कार केला. त्यांनी त्याना एक सोन्याचें सुंदर घड्याळ त्यावेळीं दिलें. एका मोटर कंपनीने त्यांना एक ' स्पोर्ट कार ' नांवाची फक्कड मोटारहि दिली.

१९३१-३२ सालचा क्रिकेट हंगाम ब्रॅडमनना चांगला गेला. त्या हंगामात ते १३ डाव खेळले व त्यांनी १४०३ धांवा केल्या, ७ शतकें त्यांनीं काढलीं. त्यांतलीं ४ शतकें अन् ३ द्विशकें होती. त्यांच्या फलंदाजीची सरासरी ११६.९१ झाली. या हंगामांत एका दुय्यम सामन्यांत त्यांनी ३ षटकांत ( overs ) १०२ धांवा केल्या. त्यावेळीं त्यांनी २५६ धांवा केल्या. त्यांत १४ षटकार होते. १०२ धांवा तर त्यांनी अरठा मिनिटांत केल्या.

दक्षिण अफ्रिकेशीं टेस्ट सामने चालू असतांना क्वीन्सलंडमधल्या एका वृत्तपत्रानें आपल्या पत्रांत ब्रॅडमन यांच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध करून मोठीच खळबळ उडवून दिली: ती बातमी पुढील प्रमाणें होती.

' जगांतल्या अग्रगण्य फलंदाजाच्या मृत्युमुळें ऑस्ट्रेलिया आज शोकसागरांत बुडाला आहे. ब्रिस्बेन येथें ऑस्ट्रेलिया विरूद्ध दक्षिण अफ्रिका यांच्या मधील कसोटी सामना चालू असतांना डॉन ब्रॅडमन यांचें अमांशानें देहावसान झालें '

ब्रॅडमनना या वार्तेमुळें आश्चर्य वाटलें, क्षणभर त्यांना गंमत वाटली. अशा गमती जमती घडत होत्या, तरी त्यावेळीं ब्रॅडमनना ऑस्ट्रेलियांत अफाट लोकप्रियता लाभली होती. क्रिकेटप्रेमिक त्यांच्या खेळावर निहायत खुष होते. ते हमरस्त्यावरून चालू लागलें कीं बघ्यांची झुंबड त्यांच्या भोवतीं जमा होई. रेल्वेच्या प्रवासांत गाडी थांबली की क्रिकेटषौकिन त्यांचें अपूर्व स्वागत करीत असत. गर्दीला टाळणें त्यांना अशक्य होई.

अशा या ब्रॅडमनना स्वतःच्या मृत्युचीं बातमी वाचावयास मिळणें ही एक अपूर्व घटना म्हटली पाहिजे. ती बातमी खोटी असली तरी त्यांत भावि संकटाची सूचना होती यांत शंका नाहीं. त्यावर्षी हिवाळयात इंग्लंडचा एम्. सी. सी संघ ऑस्ट्रेलियांत येणार होता. ब्रॅडमन यांच्या धांवांना पायबंद घालण्यासाठी एम्. सी. सी. च्या नेत्यानें इतका अघोरी उपाय योजला कीं त्यांना ' दिसों लागे मृत्यू परि न भिववू तो मज शके ' अशा काव्यपंक्ती म्हणण्याची पाळीं आली जणुं. त्यांना मृत्युच्या सांपळयांत अडकविण्याच्या योजनेचा सूत्रधार होता डग्लस जार्डिन कौटिल्यांत कुशल असा एम्. सी. सी. चा कर्णधार !

# ७

# अजगराच्या विळख्यांत

दि. ३० एप्रिल १९३२ हा दिवस ब्रॅडमन यांच्या जीवनांतला अति भाग्याचा अन् संस्मरणीय. त्या दिवशीं त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचें नांव जेसी मेन्झीस. ती सिडने येथील बॅंकेत नोकरीस होती. तिचें घर त्यांच्या बौरल गांवापासून जवळच होते. शाळेंत असल्यापासून उभयतांची मैत्री होती. त्याची परिणती झाली विवाहांत. शाळेंत असतांना ज्या मिटगॉंग शाळेविरूद्ध त्यांनी पहिलें शतक काढलें तेंच गांव त्यांच्या पत्नीचें.

उभयतांचें लग्न क्रिकेटप्रेमिकानेंच लावलें. ज्या गोलंदाजाच्या गोलंदाजीवर ब्रॅडमननीं अगदीं थोड्या वेळांत २५६ धांवा केल्या होत्या तो बॉब निकोल्सन हा गोलंदाज लग्नाला उपस्थित होता. तो पट्टीचा गाणारा असल्यानें ब्रॅडमन यांची पत्नी त्यांना अंमळ विनोदानें म्हणाली: " आपल्या लग्नापेक्षां पाहुण्यांचें लक्ष त्याच्या गाण्यावरच खिळलें आहे " लग्नविधी करणारा गृहस्थ कॅनॉन ह्यूज हा व्हिक्टोरिया क्रिकेट असोसिएशनचा अध्यक्ष होता. ऑस्ट्रेलियांतले सर्व छोटे मोठे क्रिकेटपटु या लग्नाला उपस्थित होते.

ब्रॅडमन यांच्या पत्नीचा पायगुणहि मोठा भाग्याचा. कारण मधुचंद्रासाठीं त्यांना वेगळें ठिकाण शोधावें लागलें नाहीं. याच वेळीं त्यांना अमेरिकेच्या सफरीचें निमंत्रण ऑर्थर मेले या क्रिकेटपटुनें दिलें. या ऑस्ट्रेलियन गोलंदाजानें एक खाजगी क्रिकेट दौरा अमेरिकेला जाण्यासाठीं नियोजित केला. त्यानें घातली ब्रॅडमनना गळ. तेव्हां पत्नीला बरोबर घेण्याची सवलतहि त्यांनी त्याच्यापाशी मागितली. ती त्यानें लागलीच मान्य केली. अशा रितीनें सपत्नीक अमेरिकेचा प्रवास करण्याची संधी ब्रॅडमन पती–पत्नींना लाभली.

हा दौरा विनोदी स्वरूपाचाच झाला जणुं. ऑर्थर मेले हा स्वतः पडला अत्यंत विनोदी गृहस्थ. तेव्हां या दौऱ्यांत करमणुकीला ऊत आला तर नवल नव्हे. थाटाचे खाने काय झाले अन् हॉलीवूडला भेटी काय झाल्या त्याला सुमारच नाही. सगळें वातावरण होतें स्वास्थ्यप्रिय. खेळ बेताचा पण इतर गोष्टींवरच भर दिला गेला या दौऱ्यांत. सहा हजार मैलांचा फेरफटका झाला या सफरींत. अमेरिकेला क्रिकेटमध्यें विशेष दर्जा नाहीं. गंमत म्हणून ते क्रिकेट खेळतात, स्पर्धेच्या वृत्तीनें नव्हे. सामने प्रथम श्रेणीचे राहोच पण दुय्यम दर्जाचेहि नव्हते. त्यामुळें हा दौरा झाला अत्यंत खेळीमेळीचा. विनासायास ब्रॅडमन पती-पत्नींना अमेरिकेचे दर्शन घडले हा फायदा कांहीं थोडा नव्हे.

हा दौरा संपला अन् मग ब्रॅडमन परतले. सर्व वातावरण अगदीं शांत होतें. समृद्ध नि संपन्न देश त्यांना पहावयास मिळाला होता. नूतन पत्नीच्या सहवासांत त्यांचे दिवस आनंदांत, सुखांत चालले होतें; पण आतां त्याला गालबोट लागायचे होतें. १९३२ सालच्या हिंवाळ्यांत एम्. सी. सी. संघ आला ऑस्ट्रेलियांत. अन् मग आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें कधींहि न घडलेल्या भयंकर प्रकरणाला त्यांना तोंड द्यावें लागलें नि मग त्यांचें सारे सुख स्वास्थ्य कांहीं काळ नष्ट झालें.

१९३२ सालच्या हिंवाळ्यांत, ब्रॅडमनना बॉडीलाईनच्या अग्निदिव्यां-



शेवटच्या सफरींतील ' शिकंदर ' डॉन ब्रॅडमन ( १९४८ )

2 Holden St.
Kensington Park
South Australia
19/5/65

Dear Mr. Takke,

I am replying to your letter of May 10th.

You must be quite an enthusiast to write all those articles about cricketers & I am flattered to know I am one of the subjects.

Regarding the photos, I regret that with the passage of time I cannot trace the originals nor can I remember who took them.

However I, personally, would not object to you reproducing them, if you can do this from the work in your possession. And as Hodders don't mind, the only person who could object would be the original owner & it would seem you are not taking much risk.

Unfortunately I have no other photos I can send. You see it is 17 years since my last playing season & the old boys like me tend to go out of favour.

With best wishes

Yours faithfully

Don Bradman

ब्रॅडमननीं ग्रंथकारास धाडलेलें सदिच्छापत्र ( १९ मे १९६५ )

तून जावें लागलें. क्रिकेट इतिहासांत हें प्रकरण अतिशय गाजलेलें असून त्यांच्या जीवनाशीं या प्रकरणाचा निकट संबंध आहे. तसेंच तें अतिशय सुरस अन् रोमहर्षकहि आहे. त्यामुळें कांही काळ क्रीडांगणावरलें खेळीमेळीचें स्वरूप नष्ट होऊन, टेस्ट सामन्यांना एखाद्या रणक्षेत्राचें स्वरूप आलें.

१९३२ सालच्या हिवाळ्यांत इंग्लंडचा एम्. सी. सी. संघ ऑस्ट्रेलियांत यावयाचा होता. या संघाचें नेतृत्व डग्लस जार्डिन या पहिल्या प्रतीच्या कर्णधाराकडे होतें. हा एम्. सी. सी. संघ चांगला प्रबळ होता. पेंटर, हॅमंड, हर्बर्ट सटक्लिफ, लीलँड अन् पतौडीचें नबाब (मोठे) [१९१०-१९५२] हे पांच चांगल्यापैकीं फलंदाज या संघात होते. ॲलन, बौज, व्होज अन् लारवुड हे चार द्रुतगती गोलंदाज या संघात होते. टेट व व्हेरिटी सारखे मध्यमगती गोलंदाजहि या संघात होते. डकवर्थ नि एम्स हे दोन यष्टिरक्षकहि संघाच्या मदतीस होते. सटक्लिफच्या तोडीचा, आघाडीचा दुसरा फलंदाज या संघात नव्हता, हें एकच वैगुण्य या संघात दाखवितां येईल. या सर्व खेळाडूंचा नेता जार्डिन हा मोठा कुशल संघनायक असून क्रीडांगणावर जणूं कर्दनकाळच वाटायचा. अशा या क्रिकेटच्या सर्व शाखांत अग्रेसर असलेल्या संघाबरोबर ऑस्ट्रेलियाला मुकाबला करायचा होता.

स. १९३०च्या इंग्लंड सफरींत ब्रॅडमननीं एकट्याच्या बाहुबळाबर कसोटी सामन्यांत अतुलनीय पराक्रम केल्यानें इंग्लंडमधील कांहीं मंडळींच्या मनांत त्यांचें क्रिकेटशौर्य सलत होतें. ऑस्ट्रेलियाचा पराभव करावयाचा तर ब्रॅडमन यांच्या फलंदाजीला पायबंद घातला पाहिजे असे या मंडळींना वाटूं लागलें. सूक्तासुक्त मार्गानें त्यांचा कांटा काढून कसोटी सामने जिंकावयाचें, असें कारस्थान इंग्लंडमधल्या कांहीं क्रिकेटपटूंनीं रचलें. त्या कटाची कर्तुम अकर्तुम शक्ती म्हणजे डग्लस जार्डिन—एम्. सी. सी. चा संघनेता, ही होती. आपल्या संघात लारवूड, ॲलसन, व्होज

अन् बौज या चार वेगवान गोलंदाजांचा समावेश त्यानें केला अन् त्यांच्या सहाय्यानें ब्रॅडमन यांच्या कर्तृत्वाला खिंडार पाडण्याचा मनसुबा त्यानें रचला. बॉडीलाईन बोलिंगच्या अघोरी उपायांनी त्यांना निष्प्रभ करण्याचें त्यानें ठरविलें. बॉडीलाईनच्या ब्रह्मास्त्राचा प्रयोग त्यांच्या धांवांना पायबंद घालील अशी खात्री जार्डिनला वाटत होती. बॉडीलाईन गोलंदाजी क्रिकेटच्या नियमांत बसल्यानें पंचाना कोणतीहि हरकत त्या बोलिंगचें बाबतींत घेता येईना.

बॉडीलाईन बोलिंग म्हणजे शरीरवेधी गोलंदाजी. या गोलंदाजीत चेंडूचा वेग अतिशय असतो. चेंडूची फेंक करतांना त्याचा पल्ला थोडा कमी करून चेंडु फलंदाजाच्या मस्तकावर अगर खांद्यावर सरळ उडून आदळावा असा हेतु असतो. या गोलंदाजीत फलंदाजाच्या लेगच्या म्हणजे डाव्या बाजूला सहा ते आठ क्षेत्ररक्षकांचें कडें करण्यात येतें. ही गोलंदाजी फक्त द्रुतगती गोलंदाजच करूं शकतात. कांही वेळा फलंदाजाच्या मनांत भीति उत्पन्न व्हावी म्हणून चेंडूची फेंक आपटबारासारखी असते. (बंपर्स) अशा तऱ्हेचे चेंडु आले कीं कपाळमोक्ष होण्याची भिती असल्यानें फलंदाज केवळ भयानेंच बाद होतात. चेंडु लेगच्या बाजूला येत असल्यानें एखादा फटका फलंदाजाने मारलाच तर प्रतिपक्षाचें क्षेत्ररक्षक चेंडूचें टिपण साधावयास सज्ज असतात. इंग्लंडचा प्रख्यात फलंदाज हॅमंड याने बॉडीलाईन गोलंदाजीचें वर्णन पुढील प्रमाणें केले आहे :

१ ) अत्यंत वेगवान गोलंदाजच अशी बोलिंग करतात.

२ ) आपटबार ( बंपर्स ) असें केलें जातात कीं, चेंडू विकेटवरून उंच उडावा.

३ ) गोलंदाजीचा मारा फलंदाजावरच असतो.

४ ) या गोलंदाजीच्या वेळीं लेगच्या बाजूला सहा ते आठ क्षेत्ररक्षकांचें कडें असतें.

अशा तऱ्हेची अघोरी गोलंदाजी टाकून ब्रॅडमनना नेस्तनाबूत करण्याची

निर्दय क्लृप्ति जार्डिनच्या सुपीक डोक्यांतून निघाली. बॉडीलाईनचा निर्माता कोणीहि असो, त्या बोलिंगच्या पद्धतशीर योजनेचें जनकत्व जार्डिनला दिलें पाहिजे.

बॉडीलाईनच्या बनावाचा उगम लंडनच्या पिकॅडेली पथिकाश्रमांत झाला. जार्डिन, ऑर्थर कार, व्होज व लारवूड हे क्रिकेटपटु एकदां या उपहारगृहांत जमले अन् मग त्यांनीं बॉडीलाईनचें कारस्थान शिजविलें. पर्सी फेंडर या क्रिकेटपटूनें जार्डिनला म्हटलें : “ बाबारे, ब्रॅडमनच्या धांवांना आळा घालायचा असेल तर बॉडीलाईन हा एकच रामबाण उपाय मला दिसतो ” यानंतर जार्डिन विचारमग्न झाला. बुद्धीने तो कुशाग्र होता. फर्ग्युसन नांवाच्या स्कोअररनें ब्रॅडमन यांच्या फटक्यांच्या आकृतीचा आराखडा तयार केला होता. त्या आराखड्यावर जार्डिनची नजर भिरभिरत राहिली. त्यानें त्याचा चांगला अभ्यास केला. हें काम झाल्यावर तो सरळ एफ. आर. फॉस्टर या गृहस्थाकडे गेला अन् तिथें त्यानें क्षेत्ररक्षकांचा व्यूह कसा रचावयाचा त्याची चर्चा फॉस्टरपाशीं केली. एवढें झाल्यावर वेगवान गोलंदाजांचा तांडा बरोबर घेऊन, ब्रॅडमन यांचा पाडाव करण्याच्या महत्वाकांक्षेने जार्डिन ऑस्ट्रेलियांत येऊन थडकला. बॉडीलाईन प्रकरणाचा पूर्वरंग असा होता…

एम्. सी. सी. संघ ऑस्ट्रेलियांत आला तेव्हां ब्रॅडमन अमेरिकेंतून नुकतेच आले होते. त्यांचा सफरीचा शीण अजून गेला नव्हता अन् त्यांची प्रकृतिहि फारशी चांगली नव्हती. कराराप्रमाणें वृत्तपत्राच्या व नभोवाणीच्या कामावर रुजूं होणें त्यांना भाग होतें. पण ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळानें या करारावर आक्षेप घेतला. मंडळाच्या नियमाप्रमाणें टेस्टमध्यें खेळून वृत्तपत्रांत लिहिण्याची मुभा खेळाडूंना नव्हती. तेव्हां टेस्टमध्यें खेळण्यास मिळालें नाहीं तरी बेहेत्तर पण करार त्यांनीं पाळण्याचें ठरविलें. पण अखेरीस संपादकांनींच त्यांना करारांतून मुक्त केलें. त्यावेळीं लंडनच्या एका पत्रानें, कसोटी सामन्यांसंबंधीं लेखमाला लिहिण्यासाठीं त्यांना ३०००

पौंड देऊं केलें. परंतु टेस्ट सामन्यांत खेळण्याचें ठरविल्यानें त्यांनीं सदर पत्राला नकार दिला.

या सुमारास ऑक्टोबर ( १९३२ ) अखेरीस एम्. सी.सी. विरुद्ध ऑस्ट्रेलियन एलेवन असा एक सामना झाला. त्यावेळीं जार्डिनच्या ९८ धांवा झाल्या असतांना ब्रॅडमननीं त्यांची विकेट घेतली. त्यांचा खेळ मात्र दोन्ही डावांत अपेक्षेप्रमाणें झाला नाहीं. या सामन्यांत लारवूड वौज, अन् व्होज या तिन्ही वेगवान गोलंदाजांना जार्डिननें मुद्दाम वगळलें होतें. हेतु हा कीं आपल्या कारस्थानाचा सुगावा त्यावेळीं त्यांना न लागावा.

ब्रॅडमननीं व्हिक्टोरिया विरुद्ध झालेल्या सामन्यांत पहिल्या डावांत १९५ मिनिटांत २३८ धांवा केल्या. त्यावेळीं त्यांचा खेळ अप्रतिम झाला. दुसऱ्या डावांत त्यांनी नाबाद ५२ धांवा केल्या. हा सामना न्यू साऊथ वेल्सनें जिंकला.

नोव्हेंबरच्या ( १९३२ ) तिसऱ्या आठवड्यांत मेलबोर्न येथें एम्. सी. सी. चा ऑस्ट्रेलियन एलेवनशीं आणखी एक सामना झाला. त्यावेळीं एम्. सी. सी. संघांत ॲलन, लारवूड, व्होज नि बौज हे चौघेहि वेगवान गोलंदाज होते. जार्डिन मात्र या सामन्यांत नव्हता. बॉडीलाईनची पहिली चकमक याच सामन्यांत उडाली. लारवूड हा तुफान गोलंदाज त्यावेळीं बंपर्सचा मारा करीत होता. एकदां चेंडू वुडफूलच्या छातीला लागलाहि. ब्रॅडमन खेळावयास आले त्यावेळीं, बौज-व्होज हे गोलंदाजी करीत होते. त्यांची बॅट त्यावेळीं लटपटत होती. रे रॉबिनसन या ऑस्ट्रेलियन क्रिकेट समीक्षकानें आपल्या ‘ बिटविन् विकेट्स् ’ या ग्रंथांत त्यांच्या त्यावेळच्या खेळाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे : “ एखादा झाडलोट करणारा गडी जसा भराभर घरांतलीं जाजमें वगैरे साफ करीत असतो त्याप्रमाणें ब्रॅडमन यांचा खेळ चालू होता. ” नंतर लारवूड गोलंदाजी करूं लागला. दोन्ही डावांत त्यानें त्यांना बाद केलें. पहिल्या डावांत ३६ व दुसऱ्या डावांत १३ धांवा त्यांनीं केल्या. लारवूडशीं त्यांची पहिली सलामी अशी झाली.

पुढील भीषण प्रकारांची अटकळ ब्रॅडमननीं त्याच वेळीं केली. त्यांनीं आपले विचार ऑस्ट्रेलियन क्रिकेटमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलून दाखविले. पण त्याची दखल कुणीच घेतली नाही. नोव्हेंबर अखेरीस एम्. सी. सी. चा न्यू साऊथ वेल्सबरोबर एक सामना झाला. त्यांतहि ब्रॅडमन अपयशी झालें. पहिल्या डावांत १८ व दुसऱ्या डावांत २३ धांवा त्यांनीं केल्या. अशा रीतीनें एम्. सी. सी. विरुद्ध खेळलेल्या तिन्ही सामन्यांत त्यांना अपयश लाभल्यानें कसोटी सामन्यांतल्या त्यांच्या कामगिरीकडे लोकांचें लक्ष वेधलें.

प्रकृति ठीक नसल्यामुळें ब्रॅडमन पहिल्या टेस्ट सामन्यांत खेळले नाहींत. एका वृत्तपत्रानें ही महत्त्वाची बातमी आपल्या स्टॉप प्रेसच्या स्तंभांत पुढीलप्रमाणें सांगितली: "Bradman not fit–Sydney–No official announcement but doctor declared Bradman not fit to play to-morrow" या बातमीचा अर्थ असा–ब्रॅडमन यांची प्रकृति ठीक नाहीं. अजून अधिकृत घोषणा झालेली नाहीं, पण डॉक्टरांनीं, उद्यां खेळण्याइतपत ब्रॅडमन यांची प्रकृति ठीक नाहीं असें जाहीर केलें आहे.

पहिला कसोटी सामना डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत झाला. त्यांत इंग्लंडचा १० विकेट्स्नीं विजय झाला. लारवूडनें प्रत्येक डावांत ५ विकेट्स् घेतल्या. त्याची गोलंदाजी फारच मारक ठरली. ऑस्ट्रेलियाच्या मॅकेबनें पहिल्या डावांत नाबाद १८७ धांवा काढून आपल्या आयुष्यांतला सर्वोत्कृष्ट खेळ रसिकांना दाखविला.

या काळांत ब्रॅडमननीं १५ दिवस समुद्रकिनाऱ्यालगत वास्तव्य करून विश्रांति घेतली. तेव्हां त्यांची प्रकृति उत्तम झाली. व्हिक्टोरिया विरुद्ध शेफिल्ड शील्ड सामन्यांत त्यांनीं १५७ धांवा केल्या.

दुसरा कसोटी सामना ३० डिसेंबर १९३२ रोजीं सुरू झाला. चौथ्या अनुक्रमावर ब्रॅडमन खेळावयास निघाले, त्यावेळीं प्रेक्षकांनीं टाळ्यांनीं त्यांचें स्वागत केलें. तेव्हां जवळ उभ्या असलेल्या सटक्लिफला ते म्हणाले :

“ पण मी परत येईन, तेव्हां माझं स्वागत असंच होईल का ? ” त्यांच्या या सूचक प्रश्नाचा पडताळा लागलीच आला. कारण बौजने त्यांना बाद केलें होतें व तेंहि एकहि धांव काढूं न देतां. दुसऱ्या डावांत त्यांनीं १०३ धांवा केल्या. त्यांच्या ९० धांवा झाल्या तेव्हां ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज आयर्नमॉंगर हा शेवटचा खेळाडू खेळण्यास आला. त्यावेळीं एक मजेदार प्रसंग घडला.

आयर्नमॉंगर हा होता गोलंदाज. तो लौकर बाद होणार हें अगदीं ठरलेलें असे. तेवढ्यांत त्याला एका मित्राचा आला टेलिफोन. ‘ आयर्नमॉंगर खेळावयास गेला आहे ’ असें त्याला सांगण्यांत आलें. परंतु तो मित्र म्हणाला : “ बरंय्. तोंपर्यंत मी टेलिफोनवर थांबतों.” त्याच्या म्हणण्याचा आशय इतकाच कीं आयर्नमॉंगर लागलींच परतणार तेव्हां टेलिफोन बंद कशाला करा. फलंदाजीतील आयर्नमॉंगरची प्रगति अशी होती. पण त्यानें ब्रॅडमनना चांगलीच साथ दिली. ते शतकाच्या जवळ होते तेव्हां तो त्यांना म्हणाला, “ कांहीं फिकीर करू नकोस. मी तुला मुळींच दगा देणार नाहीं. ” आणि अखेरीस त्यानें आपले शब्द खरे केले. कारण त्यांना शतक लावतां आलें. ॲलन, लारवूड, बौज व व्होज या गोलंदाजांना त्यांनीं मुळींच दाद दिली नाहीं. बॉडीलाईनचें अरिष्ट पाहतां त्यावेळचें त्यांचे तें शतक सर्वोत्कृष्ट होय. हा सामना ऑस्ट्रेलियानें १११ धांवांनीं जिंकला. त्याचें श्रेय ब्रॅडमन यांना द्यावयास हवें. त्यांच्या दुसऱ्या डावांतल्या अत्युत्तम खेळावर खूष होऊन त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांच्या पत्नीला एक फक्कड पियानो बक्षीस दिला. या विजयानंतरहि ब्रॅडमननीं बॉडीलाईन बोलिंगच्या धोक्यासंबंधीं योग्य तो इशारा ऑस्ट्रेलियांतल्या क्रिकेटश्रेष्ठींना देऊन तशा प्रकारची गोलंदाजी बंद करण्याची विनंति त्यांना केली. परंतु क्रिकेटश्रेष्ठी बसले मूग गिळून !

तिसरा कसोटी सामना ॲडलेड येथें दि. १३ जानेवारी १९३३ रोजीं सुरू झाला. बॉडीलाईनची खरी ठिणगी या सामन्यांत पडली. ऑस्ट्रे-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ............ वि: ...... सर डोनॉल्ड ब्रॅडमन
क्रमांक ............ नों: दि: ..............

लियन खेळाडू जखमी झाल्यानें सर्व वातावरण अतिशय कडवट झालें. पहिल्या डावांत इंग्लंडच्या ३४१ धांवा झाल्या तर ऑस्ट्रेलियाच्या २२२ धांवा झाल्या. ब्रॅडमन अवघ्या ८ धांवांत लारवूडच्या गोलंदाजीवर बाद झाले. या सामन्यांत वुडफूलला मार बसला. यष्टिरक्षक ओल्डफिल्ड याचें लारवूडनें डोकें शेकलें. त्यामुळें त्याला डावांतून निवृत्त व्हावें लागलें. दुसऱ्या डावांत तो खेळला नाहीं. या प्रकारामुळें वातावरण बिघडलें व प्रेक्षकहि खवळले. दुसऱ्या डावांत इंग्लंडच्या ४१२ धांवा झाल्या. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत अवघ्या १९३ धांवा झाल्यानें इंग्लंडचा ३३८ धांवांनीं विजय झाला. ब्रॅडमननीं दुसऱ्या डावांत ६६ धांवा ७७ मिनिटांत केल्या. त्यांत १० चौकार व एक षट्काराचा फटका होता. त्यांची विकेट त्या वेळीं व्हेरिटीनें घेतली. ड्रेसिंगरूममध्यें आल्यावर त्यांना घाईनें खेळण्याचें कारण कांहीं मंडळींनीं विचारलें. तेव्हां ते म्हणाले: "दुसऱ्या कुणी गोलंदाजानें मला दुखापत करण्यापूर्वी एका तरी गोलंदाजाचा मला फडशा पाडायचा होता."

वुडफूल व ओल्डफिल्ड या ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंना दुखापती झाल्यानें या सामन्यांत अतिशय कडवट वातावरण निर्माण झालें. जार्डिन हा सर्वांच्या टीकेचें भक्ष्य बनला. लोकमत त्याच्या विरुद्ध एवढें खवळलें होतें कीं इंग्लिश खेळाडू नेट प्रॅक्टिस करीत तेव्हां प्रेक्षकांना मंडपांत ( स्टेडियम ) जाण्याची मनाई होती. लारवूडनें बॉडीलाईनचें दुधारी अस्त्र वापरण्यास प्रारंभ केला, तेव्हां प्रेक्षकांनीं एकच गिल्ला केला. ड्रेसिंगरूममध्यें उभय खेळाडूंमध्यें शाब्दिक चकमकी उडाल्या, परंतु जार्डिननें आपला हेका सोडला नाहीं. तो असामान्य धैर्याचा होता. प्रेक्षक त्याचा धिःकार करीत तरी तो सीमारेषेवर निर्भयपणें क्षेत्ररक्षण करण्यास कचरत नसे. एखाद्या धीरोदात्त सेनापतीप्रमाणें आपल्या संघाच्या विजयासाठीं तो झटला. त्याचे मार्ग पसंत नसूनहि ऑस्ट्रेलियन टीकाकारांनीं त्याच्या धैर्याची तारीफ केली.

या कसोटी सामन्याच्या (अॅडलेड)वेळीं दि. १८ जानेवारी १९३३ रोजीं ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळानें बॉडीलाईन बोलिंगसंबंधीं पहिली तार एम्. सी. सी. मंडळाला इंग्लंडांत धाडली. त्या तारेचा आशय असा—' बॉडीलाईन बोलिंगनें खेळाची रसहानि होत आहे, या प्रकारानें खेळाडूंमधल्या भावना दुखावल्या गेल्या असून, या अघोरी शस्त्राचा वापर थांबला नाहीं तर, इंग्लंड–ऑस्ट्रेलियाचे स्नेहसंबंध नष्ट होतील.' एम्. सी. सी. मंडळानें या तारेला उत्तर दिलें तें असें—' तुमच्या तारेबद्दल आम्हांला खेद वाटतो. आमच्या कर्णधारावर, संघावर अन् व्यवस्थापकावर आमचा पूर्ण विश्वास आहे. क्रिकेटच्या कायद्यांचा अगर खेळाचा रसभंग ते करणार नाहींत अशी आमची खात्री आहे...वुडफूल नि ओल्डफिल्ड यांच्या दुखापतीबद्दल आम्हांला खेद होतो....तुमच्या तारेंत सूचित केली आहे तेवढी परिस्थिति चिघळली आहे असें आम्हांला वाटत नाहीं. पण तुम्हांला जर त्यामुळें आपल्यांतील स्नेहसंबंध दुरावतील असें वाटत असेल व चालू दौरा तुम्हांला रद्द करावयाचा असेल तर त्यालाहि आमची तयारी आहे; पण त्याबद्दल आम्हांला अतीव दुःख होईल.' आणि अशा रीतीनें इंग्लंड–ऑस्ट्रेलियांतल्या क्रिकेट मंडळांची तारांच्या रूपानें सवाल जबाबांची खडाजंगी सुरू झाली.

चौथा कसोटी सामना दि. १० फेब्रुवारी १९३३ रोजीं ब्रिस्बेन येथें सुरू झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३४० व दुसऱ्या डावांत १७५ धांवा झाल्या. इंग्लंडच्या पहिल्या डावांत ३५६ व दुसऱ्या डावांत ४ खेळाडू बाद १६३ धांवा झाल्या. अर्थातच इंग्लंडचा ६ विकेट्सनीं विजय झाला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ७६ धांवा केल्या व दुसऱ्या डावांत ते २४ धांवा काढून बाद झाले. दोन्ही वेळां लारवूडनें त्यांना बाद केलें. आतांपर्यंत तीन कसोटी सामने इंग्लंडनें जिंकल्यानें कसोटीमालिका इंग्लंडनें जिंकली. त्यामुळें पांचव्या टेस्ट सामन्यांतली चुरस नाहींशी झाली.

पांचवा टेस्ट सामना दि. २३ फेब्रुवारी १९३३ रोजीं सिडने येथें सुरू झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४३५ धांवा झाल्या अन् दुसऱ्या डावांत १८२ धांवा झाल्या. इंग्लंडनें पहिल्या डावांत ४५४ धांवा केल्या व दुसऱ्या डावांत १६८ धांवा होऊन त्यांचे दोन गडी बाद झाले. त्यामुळें इंग्लंडचा ८ विकेट्सनीं विजय झाला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ४८ धांवा केल्या. पुन्हां त्यांना लारवूडनें बाद केलें. दुसऱ्या डावांत त्यांनीं ७१ धांवा केल्या. त्या खेपेस त्यांची विकेट घेतली व्हेरिटीनें.

लारवूड ऑस्ट्रेलियांत अतिशय अप्रिय झाला होता. १९३२-३३च्या टेस्ट मालिकेंत त्यानें ३३ विकेट्स घेतल्या तरी शेवटच्या टेस्ट सामन्यांत पहिल्या डावांत त्यानें ९८ धांवा केल्या तेव्हां सर्वांना त्याचें कौतुक वाटलें. तो शतक काढणार अशी सर्वांची अपेक्षा. पण ९८ धांवा काढून तो परतला तेव्हां सर्वांनी त्याचें स्वागत टाळ्यांनीं केलें. या चुरशींतली–कडवट वातावरणांतली खरी आनंदाची घटना होती ती ही. अशा रीतीनें बॉडीलाईनच्या ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून इंग्लडनें ॲशीस जिंकल्या.

एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, बॉडीलाईन बोलिंग ब्रॅडमन यांच्यासाठींच होती. बॉडीलाइन गोलंदाजी खेळलेला व सन १९३२-३३ च्या टेस्ट मालिकेंत ऑस्ट्रेलियातर्फे, खेळणारा अन् ब्रॅडमन यांचा एक कठोर टीकाकार म्हणून प्रसिद्ध असलेला सुप्रसिद्ध क्रिकेट समीक्षक जॅक फिंगल्टन यानें आपल्या ‘ क्रिकेट क्रायसिस ’ ( Cricket crisis ) या पुस्तकांत बॉडीलाईनसंबंधीं मत पुढीलप्रमाणें व्यक्त केलें आहे : ‘ब्रॅडमनचा उदय झाला नसता तर बॉडीलाईन बोलिंग अवतीर्ण झाली नसती. ही बोलिंग म्हणजे ब्रॅडमनच्या विरुद्ध केलेला कट होय. ’ यावरून बॉडीलाईनचा रोख ब्रॅडमन यांच्याविरुद्ध कसा होता त्याची कल्पना येते.

ब्रॅडमन यांच्यावर टीकेचे आसूड ओढणारा दुसरा टीकाकार म्हणजे ऑस्ट्रेलियन पत्रकार रे रॉबिनसन हा होय. पण त्यानेंहि आडवळणानें बॉडीलाईन बोलिंग ब्रॅडमन यांच्यासाठींच होती असें म्हटलें आहे.

आपल्या ‘ बिटविन् विकेट्स् ’ ( Between Wickets ) या ग्रंथांत या संबंधीं त्यानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत : ‘ बॉडीलाईन पद्धतीच्या बोलिंगचा मारा आपल्यावर होणार आहे हे ब्रॅडमनना पक्कें ठाऊक होतें. ’ यावरून जार्डिननें ब्रॅडमनना नामोहरम करण्यासाठींच बॉडी-लाईनचा प्रयोग केला ही गोष्ट स्पष्ट होते.

या बॉडीलाईन प्रकरणाचा इंग्लंडमध्यें पुढें अतिशय गवगवा झाल्यानें एम्. सी. सी. मंडळाला हें प्रकरण हातांत घेणें भाग पडलें. बॉडीलाईनचें हें अघोरी अस्त्र आपण बुमरॅंगप्रमाणें इंग्लंडवर उलटवूं अशी स्पष्ट धमकी ऑस्ट्रेलियानें दिल्यानें एम्. सी. सी. मंडळाचे म्होरके सुतासारखे मऊ आले. त्यांनीं कांहीं नियम लागलीच करून टाकले, व पंचांना त्या नियमांची अंमलबजावणी करण्याचें फर्मान सोडलें. आपण केलेले नियम पाळले जातात कीं नाहीं याकडे पंचांनीं दक्षतेनें लक्ष दिलें पाहिजे अशी सूचना त्यांना करण्यांत आली. एम्. सी. सी. मंडळानें केलेले नियम असे :

( १ ) बंपर्समुळें फलंदाजाला धोका उत्पन्न होतो का ?

( २ ) फलंदाज कोठेंहि पवित्रा घेऊन उभा असतांना त्याला इजा करण्याच्या हेतूनें गोलंदाजीचा वापर सतत केला जातो का ?

( ३ ) गोलंदाजीचा वेग कमालीचा तीव्र आहे का ?

( ४ ) मारक नि वेगवान गोलंदाजीला तोंड देतां येऊं नये म्हणून फलंदाजाच्या ‘ लेग ’च्या बाजूला क्षेत्ररक्षकांचें कडे रचलेलें आहे का ?

या सर्व प्रश्नांना होकारात्मक उत्तर मिळाल्यास तशा प्रकारची गोलंदाजी बंद करण्याचा अधिकार एम्. सी. सी. मंडळानें पंचांना दिला. लारवूडला मात्र या लोकक्षोभाचें प्रायश्चित भोगावें लागलें. ब्रॅडमन, वुडफूल प्रभृति बॉडीलाईननें जितके निष्प्रभ झाले नाहींत त्याच्यापेक्षां जास्त इंग्लंड-ऑस्ट्रेलियन टीकाकारांच्या टांकांच्या फेकीनें लारवूड गारद झाला.

नंतर कसोटी सामन्यांच्या आखाड्यांतून तो अकालीं निवृत्त झाला. बॉडीलाईन बोलिंगचें विराट् दर्शन त्यानें घडविलें असलें तरी त्या कारणामुळें त्याचा अकालीं अस्त झाला ही या खळबळजनक प्रकरणांतील मोठी शोकान्तिका म्हटली पाहिजे.

या दौऱ्यात एका थिएटरांत एका मुलीनें लारवूडला पाहिलें. तेव्हां ती लागलींच आपल्या आईला म्हणाली, "अग हा कांहीं खुनी माणसासारखा दिसत नाहीं. तुला काय वाटतं?" आईनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. लारवूडच्या वेगवान अन् शरीरवेधी बोलिंगमुळें प्रेक्षक नि सामान्य जनतेंत काय प्रतिक्रिया झाली होती त्याचें दर्शन या वरील प्रसंगांत घडतें. दुसऱ्या महायुद्धांत ज्या ईर्षेनें रशियन सैनिक, जर्मनांविरुद्ध लढले त्याच हिंमतीनें लारवूडनें कसोटी सामन्यांत ऑस्ट्रेलियाविरुद्ध चेंडूफेक केली.

बॉडीलाईनमुळें ब्रॅडमन यांच्या फलंदाजीवर काय परिणाम झाला तें पाहणें मनोरंजक आहे. त्या मालिकेंत ४ टेस्ट सामन्यांत ८ डावांत त्यांनीं ३९६ धांवा केल्या. एक वेळां ते नाबाद राहिले. त्यांची फलंदाजीची सरासरी झाली ५६·५७ ऑस्ट्रेलियन संघांतल्या सर्व खेळाडूंपेक्षां त्यांची सरासरी जास्त झाली. इंग्लंडच्या पेंटरची सरासरी ६१·३३ होती. पण तो फक्त ३ कसोटी सामने खेळला. त्याशिवाय हॅमंड ५५.००, सटक्लिफ ५५·०० व पतौडी ४०·६६ अशी या तिघा इंग्लंडच्या फलंदाजांची सरासरी होती. म्हणजे या सर्वांच्या तुलनेच्या मानानें, ब्रॅडमन यांचा खेळ काय दर्जाचा झाला त्याची कल्पना येते. बॉडीलाईनचा सर्व मारा त्यांच्यासाठींच असूनहि त्यांनीं बॅटिंगमध्यें पुष्कळच सातत्य ठेवलें. इंग्लंडच्या दौऱ्यांत (१९३०) टेस्ट मालिकेंत त्यांनीं केलेल्या ९७४ धांवा पहातां, त्या तुलनेनें त्यांची या मालिकेंतली धांवसंख्या फारच कमी भासते. पण त्याचें कारण बॉडीलाईनची अघोरी गोलंदाजी· त्यांच्या धांवांना आळा घालण्यासाठीं जार्डिनला बॉडीलाईनचें कारस्थान

करावें लागलें ही एकच गोष्ट त्यांचें बॅटिंगमधील कर्तृत्व सिद्ध करण्यास पुरी आहे.

ज्यानें हें बॉडीलाईन प्रकरण निर्माण करून ब्रॅडमन याच्या फलंदाजीचा निःपात करण्याचा विडा उचलला तो जार्डिन पहिल्या प्रतीचा कर्णधार होता ही गोष्ट सांगितली पाहिजे. बॉडीलाईनमुळें नि अव्वल दर्जाच्या नेतृत्वामुळें त्याचें नांव गाजलें, तसेंच औद्धत्य, हट्टीपणा नि मिजास या त्रिदोषांमुळेंहि गाजलें. याचा जन्म (१९००–१९५७) मुंबईचा. सन १९३२–३३ च्या मोहिमेच्या वेळीं कांहीं पत्रकारांनीं त्याला खेळाडूंच्या निवडीसंबंधीं विचारलें, तेव्हां हा म्हणाला, " मी इथं ॲशीस नेण्यासाठीं आलों आहे. तुमच्या पत्रांना खमंग व भडक बातम्या पुरविण्यासाठीं नव्हे." या उत्तरावरून याचा स्वभाव समजतो.

एकदां पतौडींच्या पाठीवर कांहीं टारगट प्रेक्षकांनीं संत्र्यांच्या साली फेंकल्या. तेव्हां जार्डिन निर्भयपणें त्यांच्या जागेवर जाऊन क्षेत्ररक्षण करूं लागला. धैर्याचा तो केवळ मेरुमणी होता. एकदां सामन्याच्या वेळीं खेळाडूंना सरबत देण्याचा कार्यक्रम होता, त्या वेळीं जार्डिननें ब्रॅडमन यांच्या हातांत भरलेलें पात्र दिलें. लागलींच एक प्रेक्षक मोठ्यानें ओरडला, ' ब्रॅडमन, त्याला आधीं त्या सरबताची चव घेण्यास सांग. ' ( ' Make him taste it first, Don ! ' ) परंतु जार्डिन मुळींच गोंधळला नाहीं. सन १९३४ मध्यें ' हा टेस्ट आखाड्यांतून अकालीं निवृत्त झाला.

ब्रॅडमन यांच्यासारखा प्रतापी व पराक्रमी फलंदाज ऑस्ट्रेलियन संघांत नसता तर जार्डिनला बॉडीलाईनचें अस्त्र भात्यांतून काढावें लागलें नसतें. बॉडीलाईनचा सांपळा त्यानें खास त्यांच्यासाठींच उभारला. तरीहि अशा प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं पन्नास टक्के यश मिळविलें याची ग्वाही त्यांच्या फलंदाजीचे आंकडे देतात.

जार्डिननें ॲशिस जिंकल्या तरी नैतिक विजय ब्रॅडमन यांचाच झाला.

बॉडीलाईन प्रकरणांत त्यांच्यावर कडाडून टीका करणाऱ्या रे रॉबिनसननें आपल्या ' बिटविन् विकेट्स ' या ग्रंथात पुढीलप्रमाणें टीका केली आहे ' त्याची तरवारीसारखी धारदार बॅट मासे पकडणाऱ्या गळासारखी थिटी भासूं लागली.'('His bat, so often described as a flashing-broadsword, was used more like a harpoon.') ही चरचरीत टीका कमी म्हणूनच कीं काय ' हा हंगाम म्हणजे ब्रॅडमन यांच्या बॅटिंगवरील कलंक होय ' असेंहि रॉबिनसननें कठोरपणें लिहिलें आहे. परंतु इतकें लिहूनहि या प्रकरणाचा समारोप त्यानें केला आहे तो इतका मार्मिक आहे कीं त्यावरून ब्रॅडमन यांच्या फलंदाजीची महती हमखास पटते. रॉबिनसननें म्हटलें आहे. ' या सगळ्या बाबी जमेस धरूनहि मी पाहिलेल्या फलंदाजांत ब्रॅडमन हा अग्रगण्य फलंदाज आहे.' ('Counting everything in, Bradman is the greatest batsman I ever saw.' अशा रीतीनें अतिशय गाजलेलें बॉडीलाईनचें हें प्रकरण समाप्त झालें.

इंग्लंडच्या ' विस्डेन ' वार्षिकानें आपल्या सन १९३४ च्या वार्षिकांत बॉडीलाईन प्रकरणाचा समारोप पुढीलप्रमाणें केला आहे :

( १ ) बॉडीलाईन बोलिंग धोक्याची आहे.

( २ ) दोन्ही संघामधील खेळीमेळीचें वातावरण तिच्यामुळें दूषित होतें.

( ३ ) क्रिकेटच्या महान् खेळावर तिचा परिणाम वाईट होतो.

( ४ ) फलंदाजीच्या सगळ्या सुंदर फटक्यांचा त्यामुळें सर्वनाश होतो.

( ५ ) खेळाचें स्वरूप बाजूला राहून त्याला लढाईचें स्वरूप येतें.

जार्डिन कंपूच्या बॉडीलाईन बोलिंगनें क्रिकेटला रणक्षेत्राचें स्वरूप देणाऱ्या कारवाईची कुळकथा अशी आहे. ब्रॅडमनना नामोहरम करण्या-साठीं बॉडीलाईनचा अघोरी उपाय यशस्वी करण्यासाठीं जार्डिनला वेगवान गोलंदाजांचा तांडा जवळ बाळगावा लागला. त्यावरून त्यांचें

फलंदाजींतील अद्वितीयत्व आपोआप सिद्ध होतें. बॉडीलाईनच्या या अग्निदिव्यांतून ते सुरक्षितपणें बाहेर पडलें अन् पुन्हां त्यांनीं नवीन विक्रम करून लोकांना चकित केलें. एकंदरींत बॉडीलाइनच्या सुरस प्रकरणांतले नायक ब्रॅडमन होते तर जार्डिनच्या वांट्याला मात्र खल-नायकाइतकी अप्रियता आली.

बॉडीलाईन प्रकरणासंबधीं लारवुडनें आपल्या 'दि लारवूड स्टोरी'(The Larwood Story) या ग्रंथात पुढीलप्रमाणें भाष्य केलें आहे: " एखादा गलथान चेंडू टाकला कीं ब्रॅडमननीं त्याचा फडशा पाडलाच असें समजा. नुसता वेगानें टाकलेला चेंडू इतर टेस्ट फलंदाज सहज काबूंत आणीत. पण असा चेंडू ब्रॅडमन बंदुकींतून सुटलेल्या गोळीप्रमाणें सीमारेषेच्या पार करीत...१९३० सालीं एकविशींत असलेल्या या बौरलच्या छोकऱ्यानें, आपल्या तुफान खेळानें साऱ्या जगाला थक्क केलें...त्या मालिकेंत मी खेळलेल्या तीन टेस्टपैकीं, दोन टेस्टमध्यें मला पिटण्यांत त्यानें मुळींच दया दाखविली नाहीं. बोटीवरून उतरल्यानंतर पहिल्याच सामन्यांत त्यानें २३६ धांवा केल्या. मे महिना अखेर हजार धांवा करणारा, दौऱ्यावरचा तो पहिला विक्रमपटु. लॉर्डसच्या आपल्या पहिल्याच टेस्टमध्यें २५४ अन् लीड्सवर उपहारापूर्वी १०५ नि दिवस अखेर ३०९ व शेवटी ३३४ धांवांचा उच्चतम पराक्रम त्यानें केला...त्या काळचा क्रिकेट खरा बादशाही थाटाचा होता...

" त्या जेरीस आणणाऱ्या १९३० च्या दौऱ्यामुळें इंग्लंडपुढें मोठी समस्या होती. ब्रॅडमनच्या पराक्रमाला लगाम घालण्यासाठीं कांहींतरी करणें भाग होतें. बॉडीलाईननें ती समस्या दूर केली."

" बॉडीलाईन हा एक कट होता. त्या कटांत प्राणांतिक मारा करून ब्रॅडमनच्या पराक्रमाला पायबंद घालण्याची कामगिरी माझ्याकडे होती ...ती मीं यशस्वीपणें पार पाडली...ऑस्ट्रेलियांत मला ' जार्डिनची कुऱ्हाड ' ( Jardine's Hatchet Man ) असें कुत्सितपणें म्हणत.

त्यावेळी व्हिक्टोरिया स्ट्रीटवरील जे पेने नामक गृहस्थानें एक पत्र प्रसिद्ध केलें होतें. त्यांत त्यानें माझ्याबद्दल लिहिलें होतें : ' या मांगाचें नांव आहे लारवूड ' (‚The Hangmans Name is Larwood ) " बॉडीलाईनचें अस्त्र किती भयंकर होतें अन् तें केवळ ब्रॅडमनसाठींच उपयोगांत आणलें गेलें हें स्पष्ट करण्यास खुद्द लारवूडनें स्वमुखानें सांगितलेला पुरावा हा वस्त आहे.

१९३२–३३ सालची इंग्लंड ऑस्ट्रेलियाची मालिका अशी प्रक्षोभक अन् खेळाडूंमधील स्नेहसंबंध दुरावण्यासारखी झाली. खेळाला लढाईचें स्वरूप आलें. सबंध दौरा कडवट वातावरणांत पार पडला. याला अपवाद म्हणून एक दोन प्रसंग घडले तें सांगण्यासारखे आहेत. पतौडींना ऑस्ट्रेलियन प्रेक्षक ' Patatoes ' ( बटाटा ) या नांवानें संबोधीत. ते भारतीय असल्यानें एक प्रेक्षक त्यांना थट्टेनें म्हणाला : " ए गांधी, तुझी शेळी कुठं आहे " त्यावर पतौडी लागलीच म्हणाले : " एक दोरी दे, म्हणजे दाखवतों तुला शेळी. " जार्डिन मोठा कुर्रेबाज अन् मग्रूर असल्यानें एका प्रेक्षकानें त्याला मोठ्यानें विचारलें : " तुझी बॅट घेण्यास तुझ्याबरोबर बटलर कसा नाहीं ? " हे दोन प्रसंग सोडल्यास इतर सर्व प्रसंग हमरीतुमरीचे झाले. अत्यंत भयानक अन रोमहर्षक अशा या बॉडीलाईनरूपी अजगराच्या विळख्यांतून ब्रॅडमन सहीसलामतपणें बाहेर पडले. त्यांचा जणुं पुनर्जन्मच झाला, अन् मग तीस सालच्या पराक्रमाची पुनरावृत्ती त्यांनीं पुनश्च इंग्लंडांत केली !

फलंदाजींतील अद्वितीयत्व आपोआप सिद्ध होतें. बॉडीलाईनच्या या अग्निदिव्यांतून ते सुरक्षितपणें बाहेर पडले अन् पुन्हां त्यांनीं नवीन विक्रम करून लोकांना चकित केलें. एकंदरींत बॉडीलाईनच्या सुरस प्रकरणांतले नायक ब्रॅडमन होते तर जार्डिनच्या वांट्याला मात्र खल-नायकाइतकी अप्रियता आली.

बॉडीलाईन प्रकरणासंबधीं लारवुडनें आपल्या 'दि लारवूड स्टोरी'(The Larwood Story) या ग्रंथात पुढीलप्रमाणें भाष्य केलें आहे:" एखादा गलथान चेंडू टाकला कीं ब्रॅडमननीं त्याचा फडशा पाडलाच असें समजा. नुसता वेगानें टाकलेला चेंडू इतर टेस्ट फलंदाज सहज काबूंत आणीत. पण असा चेंडू ब्रॅडमन बंदुकींतून सुटलेल्या गोळीप्रमाणें सीमारेषेच्या पार करीत...१९३० सालीं एकविशींत असलेल्या या बौरलच्या छोकऱ्यानें, आपल्या तुफान खेळानें साऱ्या जगाला थक्क केलें...त्या मालिकेंत मी खेळलेल्या तीन टेस्टपैकीं, दोन टेस्टमध्यें मला पिटण्यांत त्यानें मुळींच दया दाखविली नाहीं. बोटीवरून उतरल्यानंतर पहिल्याच सामन्यांत त्यानें २३६ धांवा केल्या. मे महिना अखेर हजार धांवा करणारा, दौऱ्यावरचा तो पहिला विक्रमपटु. लॉर्डसच्या आपल्या पहिल्याच टेस्टमध्यें २५४ अन् लीड्सवर उपहारापूर्वी १०५ नि दिवस अखेर ३०९ व शेवटी ३३४ धांवांचा उच्चतम पराक्रम त्यानें केला...त्या काळचा क्रिकेट खरा बादशाही थाटाचा होता...

" त्या जेरीस आणणाऱ्या १९३० च्या दौऱ्यामुळें इंग्लंडपुढें मोठी समस्या होती. ब्रॅडमनच्या पराक्रमाला लगाम घालण्यासाठीं कांहींतरी करणें भाग होतें. बॉडीलाईननें ती समस्या दूर केली."

" बॉडीलाईन हा एक कट होता. त्या कटांत प्राणांतिक मारा करून ब्रॅडमनच्या पराक्रमाला पायबंद घालण्याची कामगिरी माझ्याकडे होती ...ती मीं यशस्वीपणें पार पाडली...ऑस्ट्रेलियांत मला ' जार्डिनची कुऱ्हाड ' ( Jardine's Hatchet Man ) असें कुत्सितपणें म्हणत.

त्यावेळीं व्हिक्टोरिया स्ट्रीटवरील जे पेने नामक गृहस्थानें एक पत्र प्रसिद्ध केलें होतें. त्यांत त्यानें माझ्याबद्दल लिहिलें होतें : ' या मांगाचें नांव आहे लारवूड ' ("The Hangmans Name is Larwood)" बॉडीलाईनचें अस्त्र किती भयंकर होतें अन् तें केवळ ब्रॅडमनसाठींच उपयोगांत आणलें गेलें हें स्पष्ट करण्यास खुद्द लारवूडनें स्वमुखानें सांगितलेला पुरावा हा बस्स आहे.

१९३२–३३ सालची इंग्लंड ऑस्ट्रेलियाची मालिका अशी प्रक्षोभक अन् खेळाडूंमधील स्नेहसंबंध दुरावण्यासारखी झाली. खेळाला लढाईचें स्वरूप आलें. सबंध दौरा कडवट वातावरणांत पार पडला. याला अपवाद म्हणून एक दोन प्रसंग घडले तें सांगण्यासारखे आहेत. पतौडींना ऑस्ट्रेलियन प्रेक्षक ' Patatoes ' ( बटाटा ) या नांवानें संबोधीत. ते भारतीय असल्यानें एक प्रेक्षक त्यांना थट्टेनें म्हणाला : " ए गांधी, तुझी शेळी कुठं आहे " त्यावर पतौडी लागलीच म्हणाले : " एक दोरी दे, म्हणजे दाखवतों तुला शेळी. " जार्डिन मोठा कुर्रेबाज अन् मग्रूर असल्यानें एका प्रेक्षकानें त्याला मोठ्यानें विचारलें : " तुझी बॅट घेण्यास तुझ्याबरोबर बटलर कसा नाहीं ? " हे दोन प्रसंग सोडल्यास इतर सर्व प्रसंग हमरीतुमरीचे झाले. अत्यंत भयानक अन रोमहर्षक अशा या बॉडीलाईनरूपी अजगराच्या विळख्यांतून ब्रॅडमन सहीसलामतपणें बाहेर पडले. त्यांचा जणुं पुनर्जन्मच झाला, अन् मग तीस सालच्या पराक्रमाची पुनरावृत्ती त्यांनीं पुनश्च इंग्लंडांत केली !

# ८

## "उद्या द्विशतकच काढायला हवं!"

बॉडीलाईन प्रकरणावर पडदा पडल्यानंतर क्रिकेटमधल्या सर्व नियमांचें अन् कायदेकानूचें अद्ययावत् ज्ञान असावें म्हणून सन १९३३-३४ च्या क्रिकेट हंगामाच्या वेळीं ब्रॅडमन पंचाच्या परिक्षेंत ( Umpires Examination ) उत्तीर्ण झाले. प्रत्येक क्रिकेटपटूला खेळांतल्या सर्व बारीक सारीक नियमांची तपशीलवार माहिती असणें आवश्यक आहे, असें त्यांचें मत आहे. विशेषतः संघनायकाला क्रिकेटचे सर्व नियम मुखोद्गत असणें हितावह असतें. त्यांनीं पंचाची परीक्षा दिल्यानें ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व त्यांच्याकडे आल्यावर ती परीक्षा त्यांना फलदायी ठरली.

सन १९३३-३४ च्या ऑस्ट्रेलियन हंगामांत ब्रॅडमननीं एकूण ११९२ धांवा केल्या व पांच शतकें काढलीं. त्यांतलीं दोन द्विशतकें होतीं. त्यांच्या फलंदाजीची सरासरी १३२·४४ अशी झाली.

या सुमारास ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळांतल्या एका सदस्यानें आपल्या शेअर्सचा धंदा करणाऱ्या ॲडलेड येथील संस्थेंत ब्रॅडमनना नोकरी दिली.

इंग्लंडच्या दौऱ्यावरून परत आल्यानंतर त्यांना नोकरीवर रुजू व्हावयाचें होतें. आतांपर्यंत ते सिडने येथें रहात. त्यांच्या पत्नीचा सल्लाहि त्या नोकरीबाबत अनुकूल पडल्यानें फब्रुवारी सन १९३४ मध्यें ते ॲडिलेड येथें रहावयास गेले. त्या वेळीं त्यांची प्रकृती पुन्हां बिघडली. तेव्हां त्यांनी पूर्ण विश्रांती घेण्याचें ठरविलें. नंतर सन १९३४ च्या उन्हाळ्यांत ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला जाणार होता. त्यासाठीं उपसंघनायक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या वेळीं संघनायक वुडफूल होता. पॉन्सफोर्ड, किपॅक्स, मॅकेब, ओल्डफिल्ड, ओरिली व ग्रिमेट इत्यादि खेळाडू या ऑस्ट्रेलियन संघांत होते.

बॉडिलाईनच्या अप्रिय प्रकरणानंतर इंग्लंडांत ऑस्ट्रेलियन संघाचें स्वागत कसें काय होतें याबद्दल ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूंना काळजी वाटत होती. पण त्यांचे स्वागत त्यांच्या कल्पनेपेक्षांहि टोलेजंग अन् उत्साहि वातावरणांत झालें. इंग्लंडचा पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड [ १८६६–१९३७ ] त्यांच्या स्वागतासाठीं उपस्थित होता.

पहिल्या सामन्यांत वूस्टर विरुद्ध ब्रॅडमननीं द्विशतक काढलें. (२०६) ते या सामन्यांत खेळणार नव्हते. कारण त्यांची प्रकृति ठीक नव्हती. पण पहिल्या सामन्यांत ते खेळले नसेन तर त्यांच्या प्रकृतीची चर्चा सुरू होऊन, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या उलटसुलट बातम्यांचा दौऱ्यावर प्रतिकूल परिणाम होईल, म्हणून वुडफूलच्या आग्रहावरून ते या सामन्यांत खेळले. मात्र त्यानंतर त्यांना इतका शीण आला कीं, त्याचा परिणाम त्यांच्या पुढील सामन्यांवर झाला. पुढील पांच सामन्यांत त्यांचा प्रभाव अजिबात पडला नाही. त्यांच्या खेळाला उतरती कळा लागली कीं काय, अशी शंका अनेकांनी प्रकट केली. परंतु नंतर झालेल्या मिडलसेक्स विरुद्ध त्यांनी १६० धांवा अवघ्या १२० मिनिटांत केल्या. तेव्हां टीकाकारांचीं तोंडें बंद झालीं. सरे विरूद्ध झालेल्या सामन्यांत त्यांनीं ७७ धांवा केल्या.

पहिला कसोटी सामना ८ जून १९३४ रोजीं नॉटिंगहॅम येथें सुरू झाला. त्या वेळीं इंग्लंडच्या संघाचें नेतृत्व सिरील वॉल्टर्स याच्याकडे होतें. हा सामना ऑस्ट्रेलियानें २३८ धांवांनीं जिंकला. पण ब्रॅडमन यांचा खेळ मात्र साफ पडला. पहिल्या डावांत २९ व दुसऱ्या डावांत २५ धांवा त्यांनीं केल्या. दुसरा टेस्ट सामना दि. २२ जून १९३४ रोजीं लॉर्डस क्रीडांगणावर झाला. हा सामना इंग्लंडनें १ डाव अन् ३८ धांवांनीं जिंकला. ओलसर हिरवळीचा फायदा इंग्लंडच्या व्हेरिटीला [ १९०५–१९४३ ] मिळाला. पहिल्या डावांत ७ व दुसऱ्या डावांत ८ विकेटस् त्यानें घेतल्यानें ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ३६ व दुसऱ्या डावांत १३ धांवा केल्या. दोन्ही टेस्ट सामन्यांत ब्रॅडमन अयशस्वी झाल्यानें टीकाकारांच्या लेखण्या पुन्हां फुरफुरूं लागल्या.

सॉमरसेटविरुद्ध ब्रॅडमननीं १७ धांवा केल्या. त्या वेळीं जून महिना संपत आला होता. सन १९३० मध्यें त्यांनीं मे महिन्याच्या अखेरीस दौऱ्यांत १००० धांवा पूर्ण केल्या होत्या. या खेपेस जून अखेरपर्यंत त्यांच्या फक्त ७६० धांवा झाल्या. सन १९३० च्या सफरींत त्यांनीं शतकांचा अन् द्विशतकांचा धूमधडाका उडविला होता. या दौऱ्यांत जून अखेरपर्यंत त्यांनीं फक्त २ शतकें काढलीं होतीं. प्रकृती फारशी चांगली नसल्यानें या सफरींत त्यांचें तेज पडणार नाहीं असे त्यांच्या जून अखेरपर्यंतच्या खेळापर्यंत वाटत होतें. सरेविरुद्ध झालेल्या परतीच्या सामन्यांत त्यांनीं २७ व ६१ ( नाबाद ) धांवा केल्या. आतां तिसऱ्या कसोटी सामन्यांत तरी तें आपलें मागचें अपयश धुऊन काढतात कीं नाहीं या घटनेकडे क्रिकेटरसिकांचें लक्ष खिळलें होतें.

तिसरा टेस्ट सामना दि. १० जुलै १९३४ रोजीं मँचेस्टर येथें सुरू झाला. हा सामना अनिर्णित राहिला. पहिल्या डावांत ब्रॅडमननीं ३० धांवा केल्या. दुसऱ्या डावांत खेळण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही. या सामन्यांतहि ते पुन्हां अयशस्वी झाल्यामुळें क्रिकेट रसिकांची

घनघोर निराशा झाली. ज्यांनीं त्यांचा १९३० मधला झंझावाती खेळ पहिला होता त्यांना अजूनहि त्यांच्याबद्दल आशा वाटत होती –अपेक्षा वाटत होतीं कीं, पुन्हां एकदां ते आपल्या बॅटीचें पाणी दाखवतील म्हणून ! पण त्यांच्याहि पदरीं निराशाच आली.

या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या वेळीं त्यांना आजारी असतांना खेळावें लागलें. घटसर्प होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. पण डॉक्टरांनीं त्यांना लगेच तपासलें तेव्हां तपासणींत तसें कांहीं आढळलें नाहीं.

सन १९३० च्या इंग्लंड-सफरींत त्यांनीं पहिले ३ कसोटी सामने मिळून ७२८ धांवा केल्या होत्या. त्यांत १ शतक, १ द्विशतक अन् १ त्रिशतक होतें. या दौऱ्यांत ३ कसोटी सामने मिळून त्यांच्या फक्त १३३ धांवा झाल्या होत्या, व त्यांत त्यांचें एकहि शतक नव्हतें. तरीहि उरलेल्या दोन्ही टेस्ट सामन्यात ते आपले मागचे सर्व अपयश धुऊन काढतील असा विश्वास त्यांच्या असंख्य चहात्यांना वाटत होता. अन् अखेरीस त्यांचें भाकीत खरें ठरलें. पुढील दोन कसोटी सामन्यांत ब्रॅडमननीं प्रेक्षकांना आपल्या आगळ्या खेळाची चमचमीत मेजवानी दिली...

चौथ्या कसोटी सामन्यापूर्वी झालेल्या यॉर्कशायरविरुद्ध सामन्यांत ब्रॅडमननीं १४० धांवा अवघ्या ११५ मिनिटांत केल्या. त्यांच्या या दौऱ्यावरची खरी सुरुवात या सामन्यापासून झाली. तीन कसोटी सामन्यांत उभय संघांनीं एक एक सामना जिंकला होता, अन् एक सामना अनिर्णित राहिला होता. त्यामुळें चौथ्या कसोटी सामन्याच्या वेळीं ब्रॅडमन यांच्या खेळावर सगळ्यांचें लक्ष खिळलें होतें. सन १९३० मध्यें लीड्स क्रीडांगणावर त्यांनी ३३४ धांवा केल्या होत्या. आंता चौथा टेस्ट सामना लीड्स येथें होणार होता. ३० सालची ते पुनरावृत्ती करतात कीं काय याकडे क्रिकेटशौकिनांचें लक्ष लागलें होतें. अन् मग त्यानीं कल्पनेबाहेर सर्वांची अपेक्षा पूर्ण केली.

चौथा टेस्ट सामना लीड्स येथें दि. २० जुलै १९३४ रोजीं सुरू झाला. पहिल्या दिवशीं इंग्लंडचा डाव २०० धांवांत संपला. त्या दिवशीं ऑस्ट्रेलियाचे तीन गडी बाद होऊन ३९ धांवा झाल्या होत्या. ब्राऊन, वुडफूल अन् ओल्डफिल्ड हे तीन खेळाडू बाद झाले होते. पॉन्सफोर्ड टिकून होता. ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी झाल्यामुळें ब्रॅडमन दुसरें दिवशीं काय बहादुरी दाखवितात याबद्दल चर्चा करीत प्रेक्षक घरीं गेले.

शनिवारी दि. २१ रोजीं ( १९३४ ) ब्रॅडमन खेळण्यास आले. पॉन्सफोर्ड बरोबर ते जे एकदां टिकले ते बादच होईनात. संध्याकाळीं १८१ धांवा काढून पॉन्सफोर्ड बाद झाला. ४ थ्या विकेटसाठीं या दोघांनी ३८८ धांवांची भागीदारी केली होती. त्या काळीं चौथ्या विकेटचा हा जागतिक विक्रम होता. खेळ संपतांना, दिवसअखेरीस ब्रॅडमन यांच्या २७१ धांवा झाल्या होत्या.

सोमवारीं ३०४ धांवा काढून ब्रॅडमन बाद झाले. ३०४ धांवा त्यांनीं ४१५ मिनिटांत ( ६ तास ५५ मिनिटें ) केल्या. ७१ व २८० धांवा असतांना ते बाद व्हायचे पण वांचले. या खेपेस त्यांनी २ षटकार, ४३ चौकार, १ त्रिकार १५ दुकार व ८७ एकेरी धांवा काढल्या. कसोटी सामन्यांत ३०० च्या वर धांवा दोन वेळा काढणारे ते एकच क्रिकेटपटु आहेत. ३०४ धांवा काढून त्यांनी सामन्यांत चैतन्य ओतलें, पण पावसानें हा सामना अनिर्णीत ठेवला. या सामन्यांत क्षेत्ररक्षण करीत असतांना पायाला दुखापत झाल्यानें पांचव्या कसोटी सामन्यापर्यंत कुठल्याहि प्रथम श्रेणीच्या सामन्यांत ब्रॅडमन खेळले नाहींत.

पांचवा कसोटी सामना ओव्हल येथें दि. १८ ऑगस्ट १९३४ रोजीं सुरू झाला. हा सामना ऑस्ट्रेलियानें ५६२ धांवांनीं जिंकला. या सामन्यांत पॉन्सफोर्ड-ब्रॅडमननीं २ ऱ्या विकेटसाठीं ४५१ धांवांची भागीदारी करून एक जागतिक विक्रम केला. स. १९५८ मध्यें गारफिल्ड सोबर्स व हंट या वेस्ट इंडीज खेळाडूंनी पाकिस्तान विरुद्ध टेस्ट सामन्यांत २ ऱ्या विकेट

साठीं ४४६ धांवांची भागीदारी केली. ६ धांवा कमी पडल्यानें ब्रॅडमन-पॉन्सफोर्ड यांचा ४५१ धांवांचा विक्रम त्यांना मोडता आला नाहीं.

ओव्हलच्या या अखेरच्या टेस्ट सामन्यांत ब्रॅडमननीं २४४ धांवा ३१६ मिनिटांत केल्या. पॉन्सफोर्डनें २६६ धांवा ४६० मिनिटांत केल्या. ऑस्ट्रेलियाने दोन सामनें जिंकल्यानें मालिका ऑस्ट्रेलियाने जिंकली.

पहिल्या तीन कसोटी सामन्यांत ब्रॅडमन यांचा खेळ साफ पडला होता. परंतु उरलेल्या दोन कसोटी सामन्यांत भरपूर धांवा करून त्यांनीं आपला कीर्तिसूर्य पुन्हां तळपत ठेवला. ५ कसोटी सामन्यांत ८ डावांत त्यांनीं ७५८ धांवा केल्या. त्यांत एक त्रिशतक अन् एक द्विशतक होतें. टेस्ट मालिकेंतील त्यांची सरासरी झाली ९४·७५. पॉन्सफोर्डची सरासरी झाली ९४·८३. पांचव्या कसोटी सामन्यानंतर ब्रॅडमननीं इंग्लिश एलेवन विरुद्ध १४९ ( नाबाद ) व लेव्हेसन-गोव्हर संघाविरुद्ध १३२ अशीं दोन शतकें काढलीं. सन १९३० प्रमाणें हा सन १९३४ चा दौराहि त्यांच्या यशांत भर घालणारा ठरला. सन १९३० प्रमाणें याहि खेपेस प्रथम श्रेणी सामन्यांत दोन हजारांपेक्षां जास्त धांवा ( २०२० ) त्यांनीं केल्या. त्यांनीं शतकें काढलीं ७. पैकीं दोन कसोटी सामन्यांतली होती. प्रथमश्रेणी सामन्यांतली त्यांची सरासरी ८४.१६ झाली.

ओव्हलचा कसोटी सामना संपल्यानंतर ब्रॅडमन अतिशय आजारी झाले. त्यांना पोटाचा विकार झाला होता. लंगलीच लंडनमध्यें असलेल्या डग्लस शिल्ड या प्रसिद्ध ऑस्ट्रेलियन डॉक्टरनीं त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली. ऑस्ट्रेलियांत त्यांच्याबद्दल प्रार्थना सुरू झाल्या, तर कांहीं वात्रट लोकांनी 'ब्रॅडमन निवर्तले' अशा भुमकाहि उठविल्या. तेव्हां त्यांची पत्नी बोटीनें इंग्लंडला येण्यास निघाली. तिला कुणीतरी म्हटलें. "तूं जाशील तिथपर्यंत तो जिवंत असेल कीं नाहीं याची शंकाच आहे." तेव्हां ती ताबडतोब म्हणाली; "मी जाणारच." अन् ती निघालीहि....

ब्रॅडमन रुग्णालयांत असतांना एक विनोदी घटना घडली. एकदां

परिचारिकेनें त्यांचा ताप थर्मामीटरनें पाहिला. तेव्हां त्यांनी तिला अंमळ विनोदानें विचारलें, "स्कोअर किती आहे? शंभरच्या वर कां?" ("What is the score? Over Hundred?") त्यांना विचारायचा होता ताप. तो त्यांनी क्रिकेटच्या परिभाषेंत विचारला.

ब्रॅडमन यांची पत्नी इंग्लंडात येण्यापूर्वी एक दिवस आधीं त्यांची रुग्णालयांतून मुक्तता करण्यांत आली. ते आजारी असतांना रुग्णालयांत मिनिटा मिनिटांनीं लंडनमधून अनेक लोक दूरध्वनीनें त्यांच्या प्रकृतीची चौकशी करीत होते. तारांचा तर खच पडला होता. इंग्लंडच्या राजा-राणींनी देखील पत्रद्वारें त्यांचे कुशल विचारलें. या घटनांवरुन त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना येईल. वास्तविक हें दुखणें त्यांच्या जीवावरचें. परंतु दैव थोर म्हणून ते सुखरूपपणें शस्त्रक्रियेंतून वांचले. बरें वाटल्यावर सपत्नीक त्यांनी कांहीं दिवस स्कॉटलंड व दक्षिण फ्रान्समध्यें मजेंत घालविले. तेथून परतल्यावर कांहीं दिवस त्यांनीं आपल्या बौरल गांवीं घालविले. तेथील निसर्गरम्य वातावरणांत त्यांची प्रकृती झपाट्यानें सुधारली.

ब्रॅडमनना आपल्या खेळाबद्दल जबर आत्मविश्वास कसा अन् कितीअसे त्याचा या सफरीतील एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. या दौऱ्यांत ४ थ्या टेस्टच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा ३ गडी बाद ३९ असा धांव-फलक होता. त्या दिवशीं रात्रीं ब्रॅडमनना एके ठिकाणीं मेजवानीचें निमंत्रण होतें. इंग्लंडचा प्रसिद्ध क्रिकेट समीक्षक नेव्हील कार्डस् त्यांना त्यावेळीं सहज भेटला. मेजवानीला चलण्याचा त्यानें त्यांना आग्रह केला. परंतु ब्रॅडमननीं त्याला नकार दिला. शय्यागृहाकडे जातां जातां ते त्याला म्हणाले, "मला उद्यां द्विशतकच काढायला हवं!" अन् खरोखरीच त्यांनीं आपले बोल खरे केले. त्यांनीं दोनशेंच काय चांगल्या तीनशेंहून जास्त धांवा त्या सामन्यांत काढल्या. क्रिकेटचा खेळ बेभरवंशाचा हें खरें. पण त्यांच्याइतका जबर आत्मविश्वास असलेला फलंदाज विरळा.

वॉडिलाईनच्या वेळीं त्याची प्रचीति आलीच अन् ते पुढे कर्णधार झाले त्यावेळीहि त्यांचा तो गुण पुनश्च दिसून आला. या दौऱ्याचे वेळीं ते उप-कप्तान होते. या दौऱ्यानंतर वुडफूल [ १८९७–१९६५ ] निवृत्त झाला. नंतर संघनायकत्वाची सुमनमाला ब्रॅडमन यांच्या गळ्यांत पडली. तेव्हां नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारून आपल्या कर्तृत्वाचा आणखी एक पैलू त्यांनीं रसिकांना दाखविला.

# ६

## ना खेद ना खंत !

इंग्लंडच्या दौऱ्याहून स्वगृहीं परतल्यावर कांहीं काळ ब्रॅडमननीं पूर्ण विश्रांति घेतली. डॉक्टरांची त्यांना तशी आज्ञाच होती. तिचें पालन करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं, कारण शिस्तीचे ते भोक्ते होते. १९३४-३५ सालच्या शेफील्ड ढालीच्या सामन्यांत त्यांनीं भाग घेतला नाहीं. १९३५–३६ मध्यें ऑस्ट्रेलियन संघ दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला. प्रकृति-अस्वास्थ्यामुळें डॉक्टरांनी ब्रॅडमनना त्या दौऱ्यावर जाण्याची परवानगी दिली नाही. त्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. वुडफूल निवृत्त झाल्यामुळें ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व रिचर्डसनला देण्यांत आलें. त्याच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रेलियानें दक्षिण अफ्रिकेचा चार टेस्ट सामन्यांत पराभव केला, एक सामना अनिर्णित राहिला. दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर ब्रॅडमन जाऊं शकले नाहींत, त्यामुळें एका नव्या देशांत खेळण्याच्या संधीला त्यांना मुकावें लागलें.

१९३५–३६ सालचा क्रिकेट हंगाम ब्रॅडमननीं चांगला गाजविला.

जरी ते दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले नाहींत तरी त्यांनीं शेफील्ड ढालीच्या सामन्यांत जोमानें अन् उत्साहानें भाग घेतला. ते आतां ॲडलेड येथें स्थायिक झाल्यामुळें दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे खेळूं लागले. रिचर्डसन दक्षिण अफ्रिकेला गेला असल्यानें दक्षिण ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व ब्रॅडमनना देण्यांत आलें. आतांपर्यंत फलंदाजींत यश संपादणें एवढेंच त्यांचें ब्रीद असे. आतां त्यांच्यावर नेतृत्वाची जबाबदारी टाकण्यांत आली. आत्मविश्वास हा त्यांचा प्रमुख गुण असल्यानें नेतृत्वाची जबाबदारीहि त्यांनीं उत्तम प्रकारें पेलली.

१९३५–३६ च्या हंगामांत ब्रॅडमननीं न्यू साऊथ वेल्स विरुद्ध ११७, क्विन्सलंड विरुद्ध २३३, व्हिक्टोरिया विरुद्ध ३५७ अन् टास्मानिया विरुद्ध ३६९ धांवा केल्या. ९ डावांत त्यांनीं ११७३ धांवा केल्या. त्यांची सरासरी भरली १३०-३३. टास्मानिया विरुद्ध त्यांनी अवघ्या २३३ मिनिटांत ३६९ धांवा केल्या. फलंदाजीत जसें त्यांनीं यश मिळविलें तसेंच नेतृत्वाची धुराहि त्यांनीं उत्तम प्रकारें पेलली. त्यावर्षींच्या शेफील्ड ढालीच्या सामन्यांत दक्षिण ऑस्ट्रेलियाचा संघ विजेता ठरला. ह्यावरून त्यांनीं कर्णधार म्हणूनहि कर्तृत्व कसें दाखविलें तें समजतें. त्यांच्या या कर्तबगारीबद्दल दक्षिण ऑस्ट्रेलियन मंडळाच्या अध्यक्षानें पत्र पाठवून त्यांना शाबासकी दिली. कप्तानपदाच्या पहिल्या फेरींत ब्रॅडमन यशस्वी झाले. त्यांच्या यशाचें पाऊल पुढें पुढेंच पडत चाललें होतें.

१९३६–३७ साल ब्रॅडमन यांच्या परमोत्कर्षाचें मानलें पाहिजें. या वर्षीं ऑस्ट्रेलियन संघाचे कर्णधार म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्याबरोबरच ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळाच्या निवड समितीवरहि त्यांना नियुक्त करण्यांत आले. एवढ्यांत गबी ॲलनच्या नेतृत्वाखालीं इंग्लंड-हून निघालेला एम्. सी. सी. चा संघहि ऑस्ट्रेलियांत येऊन थडकला. पुन्हां टेस्ट सामन्यांची झुंज सुरू झाली अन् मग ब्रॅडमनना टीकेचे घाव सोसावे लागले.

एम्. सी. सी. विरुद्ध झालेल्या पहिल्या दोन टेस्ट सामन्यांत ब्रॅडमननीं पुढीलप्रमाणें धांवा केल्या — ३८, ०, ०, ८२. पहिल्या दोन्ही टेस्ट सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा दणकून पराभव झाला. पत्रकारांनी ब्रॅडमन यांच्या नेतृत्वावर टीकेच्या तोफा डागल्या. इतर सहकारी त्यांना योग्य तें सहकार्य देत नाहींत अशाहि भुमका उठल्या. नेतृत्वाच्या ओझ्यामुळें त्यांची फलंदाजी फिक्की पडली अशीहि कुणी मीमांसा केली. कांहीं पत्रांनीं रिचर्डसनला संघनायकत्व द्यावें असा सूर धरला. पण ब्रॅडमन शांत होते...

पहिल्या दोन्ही टेस्ट सामन्यांत पावसामुळें ओल्या विकेटवर ऑस्ट्रेलियाला खेळणें भाग पडलें, या वस्तुस्थितीकडे टीकाकारांनीं जाणुनबुजून कानाडोळा केला. त्यामुळें ब्रॅडमन हें त्यांच्या टीकेचें भक्ष्य बनलें.

तिसरा टेस्ट सामना मेलबोर्न येथें दि. १ जानेवारी १९३७ रोजीं सुरू झाला. पहिल्या दोन्ही कसोटी सामन्यांत नाण्यानें ब्रॅडमन यांच्या बाजूनें कौल दिला नाहीं. यावेळीं नाण्याचें दान त्यांना अनुकूल पडलें अन् तें शकुनाचें ठरलें. विकेट उत्तम असूनहि ऑस्ट्रेलियन खेळाडू फार धांवा काढूं शकले नाहींत. ब्रॅडमन १३ धांवा काढून बाद झाले. सहा बाद १८१ धांवा झाल्या तेव्हां पाऊस आला. तो ऑस्ट्रेलियाला लाभदायक ठरला. ब्रॅडमनना आपल्या नेतृत्वाची परीक्षा देण्यास— डावपेंच लढविण्यास चांगली संधि मिळणार होती. त्यांनी तिचा उपयोग पुरेपूर करून घेतला.

२०० धांवा ऑस्ट्रेलियाच्या झाल्या तेव्हां त्यांचे ९ गडी बाद झाले होते. ब्रॅडमननीं डाव पुरा झाल्याचें घोषित करून इंग्लंडला ओल्या विकेटवर खेळण्यास भाग पाडलें अन् मग इंग्लंडची मोहरीहि पटापट गारद होऊं लागलीं. अवघ्या ७६ धांवांत त्यांचे नऊ खेळाडू बाद झाले होते. अॅलननें डाव पुरा केला अन् ऑस्ट्रेलियाला खेळावयास दिलें. डावपेंचांत त्याला ब्रॅडमन यांच्यावर मात करायची होती. पण आतां फार उशीर

झाला होता—धोक्याची वेळ टळून गेली होती...

ब्रॅडमननीं फ्लीटवूड-स्मिथ अन् ओरिली या आपल्या गोलंदाजांना आघाडीला खेळण्यास धाडलें. ओरिली पहिल्याच चेंडूवर बाद झाला. ब्रॅडमनना, आपला डावपेचाचा व्यूह ढासळतो कीं, काय अशी धास्ती वाटू लागली. पण वॉर्ड या खेळाडूनें दमदार खेळखेळून त्यांची भीति खोटी ठरविली. पण तरी ५ बाद ९७ धांवा असाच ऑस्ट्रेलियाचा धांवफलक होता. फिंगल्टन खेळत होता. ५ गडी बाद झाल्यावर त्याच्या मदतीला ब्रॅडमन आले अन् मग दोघांनी सहाव्या विकेटसाठीं ३४६ धांवाची भागिदारी केली. फिंगल्टननें १३६ धांवा काढल्या. ब्रॅडमननीं २७० धांवा ४५८ मिनिटांत केल्या. त्यावेळीं हिंवतापानें त्यांचें अंग थोडें तापलें होतें. पण त्यांनीं त्याची फिकीर केली नाहीं. कप्तानपदाच्या ओझ्याखालीं त्यांचा खेळ पडतो या टीकाकारांच्या प्रचाराला त्यांनीं आपल्या पराक्रमानें चांगलीच थप्पड दिली. टीकेचा समंध शांत झाला. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावांत ५६४ धांवा झाल्या.

सामना जिंकावयाचा तर इंग्लंडला ६८९ धांवा करणें भाग होतें. एवढ्या पर्वतप्राय धांवा जमविणें इंग्लंडला शक्य झालें नाहीं. लीलँडने १११ धांवा केल्या पण अखेरीस इंग्लंडचा संघ ३२३ धांवांत उखडल्यानें ऑस्ट्रेलियाचा ३६५ धांवांनीं घसघशीत विजय झाला. टेस्टमधल्या नेतृत्वाच्या झटापटींत, डावपेचांच्या कौशल्याने चांगला हात दिल्यानें ब्रॅडमनना कमालीचा हुरूप आला. आनंदानें त्यांची मुखश्री टवटवली...

चौथा टेस्ट सामना ॲडलेड येथें सुरू झाला. हा सामन ऑस्ट्रेलियानें १४८ धांवांनीं जिंकला. पहिल्या डावांत ब्रॅडमननीं २६ धांवा केल्या पण दुसऱ्या डावांत त्यांनी २१२ धावा केल्या. यावेळीं या धांवा काढण्यास त्यांना ४३७ मिनिटें लागली. त्यांच्या खेळावर संघाची इभ्रत असल्यानें त्यांना जपून खेळणें भाग होते. शिवाय हा सामना गमावला असता तर मालिका इंग्लंडनें जिंकली असती कारण पहिले दोन टेस्ट सामने इंग्लंडनें

जिंकले होते. हा सामना ऑस्ट्रेलियानें जिंकल्यानें शेवटच्या मेलबोर्न येथील सामन्यांत कमालीची चुरस उत्पन्न होणार होती.

दोन सामने इंग्लंडनें जिंकले होते अन् दोन ऑस्ट्रेलियानें. शेवटच्या सामन्यांत मालिकेचा निर्णय लागायचा होता. हा सामना दि. २६ फेब्रुवारी १९३७ रोजीं मेलबोर्न येथें सुरू झाला. याखेपेसहि ब्रॅडमनना नाण्यानें हात दिला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ६०४ धांवा झाल्या. ब्रॅडमननीं या वेळेस १६९ धांवा २२३ मिनिटांत केल्या. मॅकेब व बॅडकॉक या उभयतांनीहि या सामन्यांत शतकें काढलीं. इंग्लंडच्या पहिल्या डावांत २३९ अन् दुसऱ्या डावांत १६५ धांवा झाल्यानें ऑस्ट्रेलियानें हा सामना १ डाव २०० धांवांनीं जिंकून मालिकाहि जिंकली.

संघाचें नेतृत्व स्वीकारल्यावर ब्रॅडमन यांच्या फलंदाजीचा प्रभाव यत्किंचितहि कमी झाला नाही ही गोष्ट या मालिकेंत सिद्ध झाली. टीकाकारांच्या लेखण्या बोथट झाल्या अन् पत्रकारांना ब्रॅडमन यांची प्रशंसा नाक मुठींत धरून करावी लागली. या मालिकेंत त्यांनीं ९ डावांत ८१० धांवा केल्या. दोन द्विशतकें काढलीं अन् एक शतक झळकविलें. त्यांनीं ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व स्वीकारलें तेव्हां अतिशय कडवट टीका त्यांच्यावर झाली खरी पण, सगळयाचा शेवट गोड झाला. कप्तानपद त्यांच्या फलंदाजीला मारक ठरत नाहीं हें त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें सर्वांना पटवून दिलें. संघनायकपदावर झालेली त्यांची निवड योग्य होती याचा पडताळा ऑस्ट्रेलियन क्रिकेटनियंत्रक मंडळालाहि आला.

टेस्ट सामन्यानंतर शेफिल्ड ढालीच्या सामन्यांतहि ब्रॅडमननीं दोन शतकें काढलीं. व्हिक्टोरियाविरुद्ध १९२ व क्वीन्सलंडविरुद्ध १२३ धांवा त्यांनीं केल्या. १९३६-३७ च्या या हंगामात त्यांनीं १५५२ धांवा केल्या, अन् सहा शतकें काढलीं. त्यांपैकीं दोन द्विशतकें अन् एक शतक त्यांनीं टेस्ट सामन्यांत काढलें. पुढच्या १९३७–३८ चा हंगामहि त्यांनीं चांगला गाजवला. त्या हंगामांत त्यांनीं सात शतकें काढलीं अन्

१४३७ धांवा केल्या. फलंदाजीतील सातत्य त्यांनीं सतत अबाधित राखलें ही गोष्ट वरील आंकड्यांवरून समजून येईल.

गुलाबाला कांटे असतात अन् सुखाला नेहमी दुःखाची सोबत असते. ब्रॅडमन तरी त्याला अपवाद कसे ठरावेत? १९३६–३७ सालीं एम्. सी. सी. संघ ऑस्ट्रेलियांत आला त्यावेळीं ब्रॅडमनना पितृपद प्राप्त झालें. त्यांना मुलगा झाला होता. ही गोड बातमी सर्वत्र पसरल्यावर त्यांच्यावर अभिनंदनांचा वर्षाव झाला. तोंड बांधून नाइलाजानें त्यांना या उत्स्फूर्त अभिनंदनाचा स्वीकार करावा लागत होता. कारण मूल जगणार नाही असा इषारा डॉक्टरांनीं त्यांना दिला होता. चहात्यांना त्याची कल्पना मुळींच नव्हती. अन् म्हणून त्यांच्या उत्साहाला उधाण आलें होतें...

डॉक्टरांची भविष्यवाणी खरी ठरली अन् मूल दगावलें...पण खेळाडूंना, कलावंतांना खाजगी दुःखें गिळावीं लागतात याची जाणीव ब्रॅडमनना होती......

बालगंधर्वांचें मूल गेलें तेव्हांहि त्यांनीं नाटकांत काम करून आपल्या कलावंताच्या कर्तव्याचा विसर स्वतःला पडूं दिला नाहीं. ब्रॅडमननीं तोच कित्ता गिरविला. सर्व दुःख त्यांनी गिळलें. नेतृत्वाची जबाबदारी त्यांनीं स्वीकारली. पहिल्या दोन टेस्ट सामन्यांत त्यांना अपयशाचे धनी व्हावें लागलें. टीकाकारांनींहि तेव्हां त्यांना धारेवर धरलें. पण ब्रॅडमननीं संयम सोडला नाही अन् त्यांचा विवेक ढळला नाहीं. संघनायकाला आवश्यक असलेली समयज्ञता त्यांच्या अंगीं होती, तशीच थोर पुरुषाला शोभणारी स्थितप्रज्ञताहि त्यांच्या स्वभावांत होती. कुणी कांहीं बोलो–लिहो, त्याचा त्यांना ना खेद ना खंत. त्यांच्या अशा वृत्तीमुळेंच संघनायक झाल्यावर, पराक्रमांत त्यांचें पाऊल अधिकाधिक पुढेंच पडत गेलें!!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ......................
क्रमांक ........................ नोंद दि ......................

# १०

## सिंहाला शह !

संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी पडली कीं, कांहीं फलंदाजांच्या बॅटिंगचा बहर अचानक ओसरतो. संघनायकत्वाची अवघड जबाबदारी कौशल्यानें पेलून, फलंदाजीतहि सतत विक्रम करणारे अगर त्यांत सातत्य राखणारे क्रिकेटपटु फारच थोडे आढळतात. ब्रॅडमननीं नेतृत्वाची कठीण धुरा सहजतेनें शिरावर घेतली अन् फलंदाजीतहि असामान्य यश संपादन केलें. टीकेनें त्यांचें धैर्य खचलें नाहीं अगर यशानें ते हुरळले नाहींत. त्यांच्या नेतृत्वाचा खरा कस इंग्लंडमध्यें लागायचा होता. त्यामुळें ते अगदीं शांत होते. पण इंग्लंडमध्येंहि यश त्यांच्याकडे चालून आलें...

दि. २५ फेब्रुवारी १९३८ रोजीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला जावयास बोटीनें निघाला. ब्रॅडमननीं आपल्या नेतृत्वाची चुणूक ऑस्ट्रेलियांत दाखविली होती. इंग्लंडमध्येंहि तसाच प्रभाव त्यांना दाखवायचा होता. १९३४ सालीं ते इंग्लंडला गेले ते उपकप्तान म्हणून. या खेपेस ते कर्णधार म्हणून जात होते. फलंदाजीत मिळविलेला लौकिक त्यांना टिकवायचा होता अन्

इंग्लंड मधला नेतृत्वाचा अनुभव पदरीं पाडायचा होता. फिंगल्टन, ब्राऊन, मॅकेब, हॅसेट, बार्नेट, बॅडकॉक, ओरीली, मॅकॉर्मिक नि फ्लिटवूड स्मिथ वगैरे खेळाडू त्यांच्या मदतीस होते. पण त्या वेळचें वातावरण तंग होतें. युरोपवर युद्धाची छाया पडलेली होती. जगावर पुन्हां प्रलय होतो कीं काय अशी होती आंतरराष्ट्रीय परिस्थिती. याचेच पडसाद ब्रॅडमननीं आपल्या ॲडलेड येथील मित्राला लिहिलेल्या पत्रांत स्वच्छपणें दिसून आलें. त्यांनीं मित्राला लिहिलें. 'बोटीच्या वरच्या मजल्यावरून आम्हीं ३६ विनाशिका, ८ युद्धनौका अन् ७२ पाणबुड्या मोजल्या. त्या नुसत्या गंजून जाण्यासाठी खास बांधलेल्या नाहींत असा माझा तर्क आहे.' अशा गंभीर अन् युद्धमय वातावरणांत ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडांत उतरला.

आपल्या नेहमीच्या प्रघाताप्रमाणें याहि खेपेस ब्रॅडमननीं वुर्सेस्टरशायरविरुद्ध द्विशतक (२५८) काढलें. १९३० नि १९३४ च्या इंग्लंड दौऱ्यांतहि त्यांनीं वुर्सेस्टरशायरविरुद्ध द्विशतक काढलें होतें. पण या वेळचें त्यांचें द्विशतक पूर्वीच्या दौऱ्यावरील द्विशतकांपेक्षां जास्त चमकदार होतें असें मत ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत व्यक्त केलें आहे. यानंतर केम्ब्रिज विरुद्ध १३७, एम. सी. सी. विरुद्ध २७८, सरेविरुद्ध १४३ अन् हॅम्पशायरविरुद्ध १४५ अशीं शतकें अन् द्विशतकें त्यांनीं धडाक्यानें केलीं. मे महिना संपण्यापूर्वींच दौऱ्यातर त्यांनी हजार धांवा केल्या. तीस सालींहि त्यांनी मे महिना संपण्यापूर्वींच हजार धांवा केल्या होत्या. त्याचीच पुनरावृत्ति त्यांनीं या खेपेस केली. असा विक्रम त्यांनीं दोन वेळा केला त्यावरून त्यांच्या धांवा काढण्याच्या वेगाची कल्पना सहज येते. यासंबंधीं त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत : "माझ्या सुरुवातीच्या फलंदाजींतील यशामुळें मे महिना संपण्यापूर्वी हजार धांवा करण्याची संधी मला मिळाली. एकाहि ऑस्ट्रेलियन खेळाडूला असा विक्रम करता आलेला नाही नि इंग्लिश खेळाडूलाहि असा विक्रम एकापेक्षा जास्त वेळां करतां आलेला नाही.

मी मात्र असा विक्रम करून १९३० ची पुनरावृत्ति केली."

पहिला कसोटी सामना नॉटिंगहॅम येथें १० जून पासून सुरू झाला. इंग्लंडचा डाव ६५८ धांवा झाल्यावर पुरा झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४११ धांवा झाल्या. ब्रॅडमननीं त्या वेळीं ५१ धांवा केल्या. ते नाबाद राहिले. दुसऱ्या डावांत ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद ४२७ धांवा झाल्या. ब्रॅडमननीं १४४ धांवा काढल्या. सामना अखेरीस अनिर्णीतच राहिला.

या सामन्यांत इंग्लंडच्या लेन हटन अन् डेनिस कॉम्पटन या दोघा फलंदाजांनीं शतकें काढली. ऑस्ट्रेलिया विरुद्ध टेस्ट सामन्यांत ते प्रथमच खेळत होतें. बार्नेट या इंग्लिश फलंदाजानें या वेळीं उपहारापूर्वीं ९९ धांवा केल्या. एक धांव त्याला मिळाली असती तर ट्रंपर, मॅकार्टने नि ब्रॅडमन या ऑस्ट्रेलियन फलंदाजांप्रमाणेंच टेस्टमध्यें उपहारापूर्वीं शतक काढण्याचा बहुमान त्याला लाभला असता. पण त्या एका धांवेनेंच त्याला दगा दिला.

या सामन्यांत पहिल्या डावांत ५१ धांवा करून ब्रॅडमन बाद झाले तेव्हांची एक उल्लेखनीय घटना सांगण्यासारखी आहे. यावेळीं पंचाने दिलेला निर्णय जगभर गाजला अन् पंचाच्या हुशारीची सर्वत्र वाहवा झाली. त्या वेळीं यष्टिरक्षक होता लेस्ली एम्स अन् गोलंदाज होता सिनफिल्ड. गोलंदाजानें टाकलेला चेंडू ऑफकडून वळला. ब्रॅडमन यांच्या बॅटीला त्याचा स्पर्श झाला तो अगदीं पुसट. मग त्यांच्या पॅडला लागून चेंडू स्टंपवरून गेला न गेला तोंच एम्सनें तो झेलला अन् त्यानें बेल्स उडविल्याहि. पंचाकडे त्यानें निर्णयासाठीं केलें अपिल. सगळ्यांची समजूत ब्रॅडमन पायचीत झाले. कांहींना वाटले ते 'स्टंप्ड' बाद झाले. पण पंचाने शांत डोक्यानें, अगदीं विचारपूर्वक झेलबाद असा निर्णय दिला. तोच निर्णय बरोबर होता. यासंबंधी ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत: "इतकी अलौकिक

समयज्ञता पाहिल्यावर चेस्टर हा सर्वश्रेष्ठ पंच आहे याबद्दल माझी खात्री झाली. ''

ब्रॅडमनच्या बॅटीला चेंडूचा ओझरता स्पर्श झाला होता ही घटना चेस्टरच्या डोळ्यांनीं अचूकपणें टिपली होती, म्हणूनच तो वरील निर्णय बिनचूकपणें देऊं शकला. कोण होता हा चेस्टर? त्याच्या जीवनाची कथा चटका लावील अशी आहे. हा खरा क्रिकेटपटूच व्हावयाचा. पण प्रारब्ध त्याच्या आड आलें. १९१३ सालीं वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी वुर्सेस्टरशायरतर्फे खेळून त्यानें काऊन्टी सामन्यांत तीन चमकदार शतकें काढली होतीं. क्रिकेट क्षितिजावर उगवलेला एक नवा तारा, असा त्याचा बोलबाला क्रिकेटक्षेत्रांत पसरलाहि. पण दैवगति विचित्र अन् विपरीत त्याला तो काय करणार! पहिल्या महायुद्धाचें वेळीं त्याला लढाईवर जावें लागलें. तिथें त्याचा एक हात जायबंदी झाला. तेव्हां रणभूमीवरून त्याला घरीं परतावें लागलें. दुसरा एखादा माणूस असता तर अपंग म्हणून कुठें तरी चार तुकडे मोडत बसला असता, पण चेस्टर मोठा जिद्दीचा अन् त्याचें क्रिकेटचें प्रेमहि तसेंच जबर.

निराशा चेस्टरच्या मनाला शिवली नाहीं. पंचाच्या ( Umpiring ) पद्धतशीर अभ्यासाला त्यानें केली सुरुवात अन् कांहीं काळानें तो जगांतला नामवंत अंपायर झाला. त्यानें पंचाच्या व्यवसायाला एक नवीनच स्थान प्राप्त करून दिलें. पंचाच्या व्यवसायांत त्यानें पदार्पण केलें, तेव्हां तो अगदीं तरुण होता. त्या काळीं बरेचसे पंच वृद्ध असत, तर कांहीं अति मंद अन् निष्काळजी असत. पण चेस्टर अति चलाख. कितीहि वेगवान गोलंदाज असला तरी त्याची नजर चेंडूपासून फलंदाजाच्या बॅटीपर्यंत एकसारखी भिरभिरत असे. त्याला फसविणें अथवा त्याला भेडसावून हवा तसा अनुकूल निर्णय करून घेणें खेळाडूंच्या आवाक्याबाहेर असे. क्रिकेटबद्दल त्याला कमालीची कळकळ असल्यानें अन् अंपायरिंगचा त्याचा अभ्यास शास्त्रशुद्ध असल्यानें त्याच्या निर्णयांत

कधींहि चूक होत नसे. दोन्ही पक्षांतील कुणाहि खेळाडूकडून त्याच्या-विषयीं कसलीहि तक्रार केली जात नसे, आक्षेप घेतला जात नसे. १९४८ सालीं त्याच्या अजोड क्रिकेट सेवेबद्दल गुणग्राहकता अन् कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं म्हणून इंग्लंडमधील क्रिकेट-रसिकांनी एक छोटीशी थैली त्याला दिली. या थोर पंचाला, ब्रॅडमननीं आपल्या 'फअरवेल टू क्रिकेट' या ग्रंथात पुढीलप्रमाणें आदरांजलि वाहिली आहे : 'माझ्या मतानं फ्रँक चेस्टर हा जगांतला श्रेष्ठ अंपायर आहे. क्रिकेट खेळाचा तो अलंकारच आहे जणुं. क्रिकेटची त्यानें केलेली सेवा अजोड आहे.' असा हा थोर अंपायर चेस्टर अलीकडेच निवर्तला ( मृ. १९५७ ).

दुसरा कसोटी सामना दि. २४ जून १९३८ रोजीं लॉर्डस मैदानावर झाला. हा सामनाहि अनिर्णीत राहिला. इंग्लंडच्या हॅमंडने पहिल्या डावांत २४० धांवा केल्या, तर ऑस्ट्रेलियाच्या ब्राऊननें पहिल्या डावांत नाबाद २०६ धांवा केल्या. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत १८ नि दुसऱ्या डावांत नाबाद १०२ धांवा काढल्या. हॅमंडचा खेळ ब्रॅडमन यांना अतिशय आवडला. त्याच्या बॅटिंगमधील विविधतेमुळें ते खूष झाले.

मँचेस्टर येथील तिसरा कसोटी सामना पावसामुळें रद्द झाला. आतांपर्यंतच्या तीन कसोटी सामन्यांत जय-पराजयाचा निर्णय न लागल्यामुळें चौथ्या लीड्स येथील कसोटी सामन्याबद्दल रसिकांत अतिशय आतुरता निर्माण झाली होती. हा सामना खरोखरीच खळबळजनक झाला– क्रिकेटचें खरें अन् वास्तव दर्शन प्रेक्षकांना घडलें.

हा कसोटी सामना लीड्स येथें दि. २२ जुलै १९३८ रोजीं सुरू झाला. इंग्लंडचा डाव अवघ्या २२३ धावांत संपुष्टात आला. ऑस्ट्रेलियाच्या डावास सुरुवात झाली तेव्हां पावसाची चिन्हें भासत होतीं. प्रकाश अंधुक झाला होता. पत्रकारांना खेळाचा मजकूर लिहिणेंहि जड जात होतें. त्या तशा प्रकाशांत ब्रॅडमननीं ३ तास खेळून १०३ धांवा केल्या. स्वच्छ प्रकाशांतील ओल्या हिरवळीवर धांवा काढण्यापेक्षां अंधुक प्रकाशांतल्या

पक्क्या विकेटवर धांवा काढणें सोपें जाईल अशी होती त्यांची कल्पना अन् ती बरोबरहि होती. ऑस्ट्रेलियन संघ २४२ धांवांत उडाला. इंग्लंडच्या दुसऱ्या डावांत अवघ्या १२३ धांवा झाल्या. आतां सामना ऑस्ट्रेलियन संघाच्या अगदीं हातांत होता. विजय मिळविण्यास त्यांना अवघ्या १०५ धांवांची गरज होती.

पण ऑस्ट्रेलियन संघाच्या विकेट्सहिं धडाधड कोसळूं लागल्या. ब्रॅडमन अवघ्या १६ धांवांत बाद झाले. पांच गडी बाद होऊन ऑस्ट्रेलियाच्या अवघ्या ९१ धांवा झाल्या. सामना हातचा जाणार कीं काय अशी भीति ब्रॅडमननाहि वाटूं लागली. ते अस्वस्थ झाले. सामना पहाण्याऐवजीं पाव-मुरंबा खात खात चहा ढोसण्यास त्यांनीं सुरवात केली. त्यांचे सहकारी त्यांना खेळाचा वृत्तान्त कथन करीत होते. ऑस्ट्रेलियन संघाचा व्यवस्थापकहि कमालीचा अस्वस्थ झाला होता. बाहेर जाऊन तो शतपावली करीत बसला. प्रेक्षकांचा जीव मात्र टांगणीला लागला होता. सामन्याच्या निकालाची त्यांना विलक्षण आतुरता लागली होती.

अन् मग हॅसेटने धडाक्यानें खेळून सामना जिंकला. या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा पांच विकेट्सनी विजय झाला. 'माझ्या माहितीतला आधुनिक काळामधला हा अत्यन्त रोमहर्षक सामना होता' असें मत या सामन्याविषयीं आपल्या आत्मचरित्रात ब्रॅडमननीं नमूद केलें आहे. पांचवा कसोटी सामनाहि रोमांचकारी झाला. तो सामना गाजविला इंग्लंडच्या लेन हटननें. चौथ्या कसोटी सामन्यांतल्या पराभवाचें उट्टें इंग्लंडनें पांचव्या टेस्ट सामन्यांत पुरेपूर काढलें. हा सामना अविस्मरणीय झाला.

या मालिकेंत पहिले दोन टेस्ट सामने अनिर्णीत राहिले होते. तिसरा पावसामुळें रद्द झाला अन् चौथा ऑस्ट्रेलियानें जिंकला होता. टेस्ट मालिका ( series ) बरोबरीनें सोडवायची तर इंग्लंडला हा पांचवा टेस्ट सामना जिंकणें आवश्यक होतें. इंग्लिश संघानें दुर्दम्य महत्त्वाकांक्षा बाळगली

अन् मग हा पांचवा टेस्ट सामना ओव्हलवर दि. २० ऑगस्ट १९३८ रोजीं सुरू झाला. इंग्लंडच्या संघाचें नेतृत्व वली हॅमंडकडे असून त्याच्या मदतीस लीलँड पेन्टर, एड्रीच, हस्टन, हार्डस्टाफ, कॉम्पटन नि व्हेरिटी इत्यादि खेळाडू होते. ऑस्टेलियाचें नेतृत्व ब्रॅडमन यांच्याकडे होतें. मॅकेब, हॅसेट, ब्राऊन, बार्न्स, फिंगल्टन, ओरिली अन् फ्लीटवूड-स्मिथ इत्यादी क्रिकेटपटु ऑस्ट्रेलियन संघात होते. दोन्ही संघ तुल्यबळ असल्यानें सामना चुरशीचा होईल अशी अपेक्षा होती. निर्णयाबद्दल क्रिकेट-शौकिनांत पैजाहि झडत होत्या. या सामन्यांचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं, या सामन्याला वेळेचें बंधन नव्हतें. दोन्ही संघांचे दोन्ही डाव संपेपर्यंत हा सामना ( Timeless Test ) खेळला जाणार होता.

तो शनिवार होता. दोन अग्रगण्य कप्तान मंदमंद पावलें टाकीत पॅव्हेलियनच्या बाहेर पडत होते. एकाचें नाव हॅमंड, दुसरे होते ब्रॅडमन. हॅमंडने शुभ्र पॅंट अन् त्यावर ब्लेझरचा कोट परिधान केला होता. ब्रॅडमन नेहमीच्या पांढऱ्या पोशाखांत होते. अखेरीस नाण्याचें दान हॅमंडच्या बाजूनें पडल्यानें इंग्लंडनें बॅटिंग स्वीकारलें अन् ब्रॅडमन यांचा संघ क्षेत्ररक्षणासाठीं बाहेर पडला.

कसेंहि करून हा सामना जिंकणें इंग्लंडला आवश्यक असल्यानें हॅमंडनें आपल्या सर्व खेळाडूंना सावधगिरीनें खेळण्याचा इशारा दिला होता.

इंग्लंडच्या आघाडीच्या फलंदाजानें-एड्रीचनें, आपल्या साथीदाराला, लेन हटनला विचारलें :

" तयारी झाली ? "

" झाली. " हटन उत्तरला.

दोघेजण खेळण्यासाठीं क्रीडांगणावर आले. एड्रीच अतिशय निरुत्साही दिसत होता. पूर्वीच्या कसोटी सामन्यांत त्याचें कांहींच तेज न पडल्यानें त्याच्यावर वृत्तपत्रांत टीकेची झोड उठली होती. अखेर व्हायचें

तेंच झालें. इंग्लंडच्या २९ धांवा झाल्यावर एड्रीच पायचित झाला. हटन सावधगिरीनें खेळत होता. तिसऱ्या क्रमांकाला लीलँड आला. त्यानें हटनला धीर देऊन म्हटलें; "गड्या, गलीतधैर्य होऊन गारद होऊं नकोस." अन् मग ते उभयतां जोमानें खेळू लागले.

हटनच्या चाळीस धांवा झाल्या तेव्हां त्याचा बळी जायचा, पण तो निभावला. मग मात्र संध्याकाळपर्यंत दोघे खेळतच राहिले. संध्याकाळीं डाव संपतांना इंग्लंडच्या एक बाद ३४७ धांवा झाल्या होत्या, त्यांत हटनच्या १६० होत्या व लीलँडच्या १५६ होत्या. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज ओरीली थकून गेला. पण हटन अन् लीलँड कांहीं केल्या बाद होईनात. तेव्हां ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार वुडफूल पत्रकारांच्या तंबूत बसला होता. तो चिडून म्हणाला : "या दोघा फलंदाजांपैकीं एकानें आत्महत्या केली तरच एखादा गडी बाद होईल." वुडफूलच्या या उद्गारांवरून हटन-लीलँड किती ईर्ष्येनें, अटीतटीनें अन् चिवटपणानें खेळत होते त्याची कल्पना येईल.

रविवारीं सामना बंद होता. सोमवारीं पुन्हा हटन अन् लीलँड फलंदाजीला निघाले. दुपार झाली तरी ते बाद होण्याची चिन्हे दिसेनात. पण अखेरीस लीलँड १८७ धांवा काढून बाद झाला. हटननें नि त्यानें दुसऱ्या विकेटसाठीं ३८२ धांवांची भागीदारी केली.

हटनच्या जोडीला इंग्लंडचा संघनायक हॅमंड आला. उपहाराच्या वेळीं इंग्लंडच्या ४३४ धांवा झाल्या होत्या. हटनच्या १९१ धांवा झाल्या होत्या अन् तो द्विशतकाच्या मार्गावर होता. उपहारानंतर हटन-हॅमंडनीं इंग्लंडच्या धांवांचा आंकडा ५४६ वर नेऊन ठेवला. सव्वाचार वाजतां ही जोडी फुटली. हॅमंड ५९ धांवा काढून बाद झाला. त्यावेळीं हटननें २५० धांवांची सीमा ओलांडली होती.

चहापानानंतर हटन तीनशेंच्या घरांत आला होता. त्यानें २८७ धांवांची सीमा ओलांडल्यावर त्याला एका वृद्धेची तार आली. तिचा मुलगा आर

ई फॉस्टर [ १८७८–१९१४ ] यानें १९०३–०४ सालीं ऑस्ट्रेलिया विरुद्ध २८७ धांवांचा उच्चांक केला होता. तो उच्चांक हटननें मोडला असल्यामुळें तिनें प्रेमानें त्याला अभिनंदनाची तार धाडली होती तिचा मुलगा त्या वेळीं हयात नव्हता, तरीही कर्तव्य करण्यांत त्या वृद्धेनें मुळींच कसूर केली नाही. 'वॉटर्लूची लढाई आम्ही क्रिकेटच्या रणांगणावर जिंकली' असें इंग्रज लोक अभिमानानें सांगतात. इंग्रजांच्या या उद्गारात सत्याचा अंश बराच आहे याची प्रचीति हटनला आलेल्या तारेवरून येते.

नंतर इंग्लंडचे दोन खेळाडू पेन्टर व कॉम्पटन लौकर बाद झाले. पुन्हा ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या आशेला पालवी फुटली. आतां आपण इंग्लंडला लौकर उखडून टाकूं अशी उमेद त्यांना वाटूं लागली. पण ती फोल ठरली. हटनच्या जोडीला आलेल्या हार्डस्टाफनें त्याला उत्तम साथ दिल्यानें ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या उत्साहावर विरजण पडलें. त्या दिवशींचा खेळ संपतांना हार्डस्टाफच्या ४० धांवा झाल्या होत्या अन् हटननें ३०० धांवा केल्या होत्या. इंग्लंडचा धांवफलक ५ गडी बाद ६३४ असा होता.

मंगळवारीं सामना सुरू होतांना हटनचे असंख्य चाहते, वृत्तपत्रकार अन् मित्र वगैरे मंडळींनीं त्यानें ब्रॅडमन यांचा ३३४ धांवांचा उच्चांक मोडावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती. अशी संधी पुन्हां येणार नाहीं अशी जाणीव खुद्द त्यालाहि होती. त्या वर्षीच्या क्रिकेट हंगामांत त्याची, अन् ब्रॅडमन यांची गांठ पडली तेव्हां तो त्यांना म्हणाला; "आठ वर्षांपूर्वी तुम्ही केलेला ३३४ चा उच्चांक पाहण्यास मी उपस्थित होतो." त्या वेळीं त्यांचा विक्रम मोडण्याची संधी आपल्याला याच वर्षी मिळणार आहे याची त्याला कशी कल्पना असणार? पण ती संधी आतां अगदी जवळ येऊन ठेपली होती.

तिसऱ्या दिवशीं ( मंगळवार ) पॅव्हेलिअनमधून बाहेर पडतांना हार्डस्टाफनें हटनपाशीं आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. सामना

सुरू झाला.

पहिली ७० मिनिटें प्रेक्षकांत स्मशानशांतता होती. सामना जिंकतो कोण यापेक्षां हटन, ब्रॅडमन यांचा उच्चांक मोडतो कीं नाहीं याच घटनेवर प्रेक्षकांची नजर खिळली होती. आतां हटनच्या ३२८ धांवा झाल्या...

ब्रॅडमन स्वतः सिली मिड–ऑफवर म्हणजे हटनच्या बॅटीपासून थोड्याच अंतरावर उभे राहून क्षेत्ररक्षण करूं लागले. ओरिलीची गोलंदाजी दोन्ही दिवसांप्रमाणें अचूक अन् पल्लेदार पडत होती. पण त्याला यश लाभत नव्हतें. हटनचें चित्त आतां एकाग्र झालें होतें. एक एक धांव तो टिपत होता. होतां होतां त्याच्या ३३१ धांवा झाल्या. ब्रॅडमन यांचा उच्चांक मोडण्यास त्याला फक्त ४ धांवा हव्या होत्या अन् तशी संधि त्याला मिळालीहि.

बरोबर पाऊण वाजतां फ्लीटवुड-स्मिथच्या गोलंदाजीवर एक चौकार मारून त्यानें ब्रॅडमन यांचा ३३४ धांवांचा उच्चांक मोडला. त्याचें प्रथम अभिनंदन ब्रॅडमननींच केलें.

अडीच वाजतां हॅसेटच्या हातांत झेल देऊन हटन ३६४ धांवा काढून बाद झाला. त्या अवधींत त्यानें ३५ चौकार मारले, १५ तीनचे फटके लगावले. त्याच्या दुहेरी धांवा १८ होत्या तर एकेरी धांवा १४३ होत्या. तो १३ तास २० मिनिटें खेळला. टेस्टमध्यें, जास्तींत जास्त वेळ खेळण्याचा त्यावेळीं तो उच्चांक होता. हटननें लीलँडबरोबर ३८२ धांवांची व हार्डस्टाफ बरोबर २१५ धांवांची भागीदारी केली. तो बाद झाला तेव्हां इंग्लंडचे सहा खेळाडू बाद होऊन ७७० धांवा झाल्या होत्या. ७ गडी बाद होऊन ९०३ धांवा झाल्यावर हॅमंडने डाव पुरा झाल्याचें घोषित करून ऑस्ट्रेलियाला खेळण्यास दिलें.

इंग्लंडच्या डावाच्या वेळीं ऑस्ट्रेलियाच्या थकलेल्या गोलंदाजांना थोडी विश्रांति मिळावी म्हणून ब्रॅडमननीं स्वतः गोलंदाजी टाकण्यास सुरूवात केली. गोलंदाजी टाकीत असतांना त्यांचा पाय दुखावला, पायाचें हाड

ई फॉस्टर [ १८७८–१९१४ ] यानें १९०३–०४ सालीं ऑस्ट्रेलिया विरुद्ध २८७ धांवांचा उच्चांक केला होता. तो उच्चांक हटननें मोडला असल्यामुळें तिनें प्रेमानें त्याला अभिनंदनाची तार धाडली होती तिचा मुलगा त्या वेळीं हयात नव्हता, तरीही कर्तव्य करण्यांत त्या वृद्धेनें मुळींच कसूर केली नाही. ' वॉटर्लूची लढाई आम्ही क्रिकेटच्या रणांगणावर जिंकली ' असें इंग्रज लोक अभिमानानें सांगतात. इंग्रजांच्या या उद्गारात सत्याचा अंश बराच आहे याची प्रचीति हटनला आलेल्या तारेवरून येते.

नंतर इंग्लंडचे दोन खेळाडू पेन्टर व कॉम्पटन लौकर बाद झाले. पुन्हा ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या आशेला पालवी फुटली. आतां आपण इंग्लंडला लौकर उखडून टाकूं अशी उमेद त्यांना वाटूं लागली. पण ती फोल ठरली. हटनच्या जोडीला आलेल्या हार्डस्टाफनें त्याला उत्तम साथ दिल्यानें ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या उत्साहावर विरजण पडलें. त्या दिवशींचा खेळ संपतांना हार्डस्टाफच्या ४० धांवा झाल्या होत्या अन् हटननें ३०० धांवा केल्या होत्या. इंग्लंडचा धांवफलक ५ गडी बाद ६३४ असा होता.

मंगळवारीं सामना सुरू होतांना हटनचे असंख्य चाहते, वृत्तपत्रकार अन् मित्र वगैरे मंडळींनीं त्यानें ब्रॅडमन यांचा ३३४ धांवांचा उच्चांक मोडावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती. अशी संधी पुन्हां येणार नाहीं अशी जाणीव खुद्द त्यालाहि होती. त्या वर्षीच्या क्रिकेट हंगामांत त्याची, अन् ब्रॅडमन यांची गांठ पडली तेव्हां तो त्यांना म्हणाला; " आठ वर्षांपूर्वीं तुम्ही केलेला ३३४ चा उच्चांक पाहण्यास मी उपस्थित होतो. " त्या वेळीं त्यांचा विक्रम मोडण्याची संधी आपल्याला याच वर्षीं मिळणार आहे याची त्याला कशी कल्पना असणार ? पण ती संधी आतां अगदी जवळ येऊन ठेपली होती.

तिसऱ्या दिवशीं ( मंगळवार ) पॅव्हेलिअनमधून बाहेर पडतांना हार्डस्टाफनें हटनपाशीं आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. सामना

सुरू झाला.

पहिली ७० मिनिटें प्रेक्षकांत स्मशानशांतता होती. सामना जिंकतो कोण यापेक्षां हटन, ब्रॅडमन यांचा उच्चांक मोडतो कीं नाहीं याच घटनेवर प्रेक्षकांची नजर खिळली होती. आतां हटनच्या ३२८ धांवा झाल्या...

ब्रॅडमन स्वतः सिली मिड–ऑफवर म्हणजे हटनच्या बॅटीपासून थोड्याच अंतरावर उभे राहून क्षेत्ररक्षण करूं लागले. ओरिलीची गोलंदाजी दोन्ही दिवसांप्रमाणें अचूक अन् पल्लेदार पडत होती. पण त्याला यश लाभत नव्हतें. हटनचें चित्त आतां एकाग्र झालें होतें. एक एक धांव तो टिपत होता. होतां होतां त्याच्या ३३१ धांवा झाल्या. ब्रॅडमन यांचा उच्चांक मोडण्यास त्याला फक्त ४ धांवा हव्या होत्या अन् तशी संधि त्याला मिळालीहि.

बरोबर पाऊण वाजतां फ्लीटवुड-स्मिथच्या गोलंदाजीवर एक चौकार मारून त्यानें ब्रॅडमन यांचा ३३४ धांवांचा उच्चांक मोडला. त्याचें प्रथम अभिनंदन ब्रॅडमननींच केलें.

अडीच वाजतां हॅसेटच्या हातांत झेल देऊन हटन ३६४ धांवा काढून बाद झाला. त्या अवधींत त्याने ३५ चौकार मारले, १५ तीनचे फटके लगावले. त्याच्या दुहेरी धांवा १८ होत्या तर एकेरी धांवा १४३ होत्या. तो १३ तास २० मिनिटें खेळला. टेस्टमध्यें, जास्तींत जास्त वेळ खेळ-ण्याचा त्यावेळीं तो उच्चांक होता. हटननें लीलँडबरोबर ३८२ धांवांची व हार्डस्टाफ बरोबर २१५ धांवांची भागीदारी केली. तो बाद झाला तेव्हां इंग्लंडचे सहा खेळाडू बाद होऊन ७७० धांवा झाल्या होत्या. ७ गडी बाद होऊन ९०३ धांवा झाल्यावर हॅमंडने डाव पुरा झाल्याचें घोषित करून ऑस्ट्रेलियाला खेळण्यास दिलें.

इंग्लंडच्या डावाच्या वेळीं ऑस्ट्रेलियाच्या थकलेल्या गोलंदाजांना थोडी विश्रांति मिळावी म्हणून ब्रॅडमननीं स्वतः गोलंदाजी टाकण्यास सुरूवात केली. गोलंदाजी टाकीत असतांना त्यांचा पाय दुखावला, पायाचें हाड

मोडलें. त्यामुळें या सामन्यांतच नव्हे तर त्या दौऱ्यावरील पुढील सामन्यांतहि त्यांना भाग घेतां आला नाहीं.

ब्रॅडमनना इजा झाल्यामुळें ऑस्ट्रेलियन संघाच्या शिडांतलें वारें निघून गेलें. फिंगल्टनहि खेळणार नव्हता. ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २०१ धांवांत आटोपला अन् दुसऱ्या डावांत अवघ्या, १२३ धांवांतच सगळा संघ गारद झाला. अशा रीतीनें इंग्लंडने हा सामना १ डाव ५७९ धांवांनीं जिंकला.

या टेस्ट सामन्याला वेळेचे बंधन नसूनहि तो चार दिवसांत आटोपला याचें कारण ऑस्ट्रेलियाची दोन्ही डावांत झालेली घसरगुंडी. इजा न होतां, ब्रॅडमन जर दोन्ही डावांत खेळते तर सामन्याला निराळीच कलाटणी मिळाली असती, अन् सामन्याची चुरस कमालीची वाढली असती. चार दिवस मैदानावर अपूर्व शांतता होती. शेवटच्या क्षणाला या शांततेला तडा गेला अन् प्रेक्षक मनापासून खळखळून हंसले. ओरिलीनें व्हेरिटीच्या बोलिंगवर एक फटका मारला तेव्हां हार्डस्टाफ चेंडू निश्चित झेलणार असें वाटल्यानें, सामना संपला असें समजून इंग्लंडच्या क्षेत्ररक्षकांनीं स्टंप्स उखडले...पण हार्डस्टाफच्या हातून चेंडू निसटला तेव्हां यष्टि व्यवस्थित ठेवून पुन्हां थोडा वेळ खेळावें लागलें. याच प्रसंगीं प्रेक्षकांनीं कडकडून टाळ्या वाजविल्या.

या अभूतपूर्व सामन्याला सुमारें ९४२१२ प्रेक्षक हजर होते. सामन्याचें उत्पन्न १९१७६ पौंड इतकें आलें. १९३० चा लीड्सचा टेस्ट सामना 'ब्रॅडमनचा सामना' म्हणून क्रिकेट इतिहासांत जसा सुवर्णाक्षरांनी लिहिलेला आढळतो त्याप्रमाणेंच १९३८ चा हा ओव्हलचा टेस्ट सामना 'हटनचा सामना' म्हणून क्रिकेट इतिहासांत अजरामर ठरलेला आहे. हटनचा ३६४ चा उच्चांक पुढें वेस्ट इंडिजच्या गॅरफील्ड सोबर्सनें मोडला व आणखीहि कांहीं फलंदाजांनीं टेस्टमध्यें तीनशेंहून जास्त धांवा केल्या. पण ब्रॅडमननीं ३३४ धांवा अतिशय वेगानें अन् अगदीं

कमींत कमी वेळांत केल्या ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. म्हणून टेस्टमध्यें तीनशें धांवा कुणी, केव्हां व कशा केल्या त्याची माहिती देणें इष्ट वाटतें. कसोटी सामन्यांत तीनशें पेक्षां जास्त धांवा काढणाऱ्या विक्रम वीरांची माहिती पुढीलप्रमाणें आहे :

( १ ) इंग्लंडच्या संडहॅमनें स. १९२९-३० मध्यें वेस्ट इंडिज विरुद्ध खेळून ३२५ धांवा ६०० मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय चाळीस होतें.

( २ ) ब्रॅडमननीं स. १९३० मध्यें इंग्लंड विरुद्ध खेळून ३३४ धांवा ३७५ मिनिटांत केल्या. त्यावेळी त्यांचें वय एकवीस होतें.

( ३ ) इंग्लंडच्या हॅमंडनें स. १९३२-३३ मध्यें न्यूझीलंड विरुद्ध खेळून ३३६ नाबाद धांवा ३१५ मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय तीस होतें.

( ४ ) ब्रॅडमननीं स. १९३४ मध्यें इंग्लंडविरुद्ध खेळून ३०४ धांवा ४१५ मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्यांचें वय सव्वीस होतें.

( ५ ) इंग्लंडच्या लेन हटननें स. १९३८ मध्यें ऑस्ट्रेलिया विरुद्ध खेळून ३६४ धांवा ८०० मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय बावीस होतें.

( ६ ) पाकिस्तानच्या हनीफ महंमदनें स. १९५८ मध्यें वेस्ट इंडिज विरुद्ध खेळून ३३७ धांवा ९७३ मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय चोवीस होतें.

( ७ ) वेस्ट इंडिज च्या गॅरफील्ड सोबर्सनें स. १९५८ मध्यें पाकिस्तान विरुद्ध खेळून ३६५ नाबाद धांवा ६०८ मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय एकवीस होतें. सध्यां टेस्टमधील या वैयक्तिक उच्चांक धांवा आहेत.

( ८ ) ऑस्ट्रेलियाच्या बॉबी सिंपसननें स. १९६४ मध्यें इंग्लंड विरुद्ध खेळून ३११ धांवा ७६२ मिनिटांत केल्या. त्यावेळीं त्याचें वय अठ्ठावीस होतें.

( ९ ) इंग्लंडच्या जॉन एड्रिचनें यंदा ( १९६५ ) न्यूझीलंड विरुद्ध

लीड्स येथील तिसऱ्या कसोटी सामन्यांत ३१० नाबाद धांवा ५३२ मिनिटांत केल्या. त्यावेळी त्याचें वय अठ्ठावीस होतें.

वरील सर्व विक्रम पाहतां एक गोष्ट स्पष्ट दिसून येईल कीं सर्वांपेक्षां ब्रॅडमननीं फारच थोड्या वेळांत ३०० धांवा कसोटी सामन्यांत केल्या आहेत. हॅमंडनें ३३६ धांवा न्यूझीलंडविरुद्ध ३१५ मिनिटांत केल्या असल्या तरी न्युझीलंड संघाचा दर्जा पाहतां त्या विक्रमाला फारसें महत्त्व नाहीं. १९३० सालीं ब्रॅडमननीं टेस्ट सामन्यांत ३०९ धांवा एकाच दिवसांत केल्या, व त्याहि इंग्लंड सारख्या प्रबळ संघाविरुद्ध. असा तेजस्वी विक्रम आजतागायत कुणासहि करतां आलेला नाहीं. म्हणून टेस्टमध्यें तीनशें धांवा करणाऱ्या इतर फलंदाजांच्या विक्रमाची तुलना ब्रॅडमन यांच्या १९३० च्या ३३४ च्या उच्चांकाशीं करतां येणार नाहीं.

इजा झाल्यामुळें दौऱ्यावरील पुढील सामन्यांत भाग न घेतां ब्रॅडमननीं पूर्ण विश्रांति घेतली. पत्ते खेळणें अन् पियानो वाजविणें या दोन उद्योगांत त्यांना वेळ घालविणें भाग पडलें. १९३० व १९३४ प्रमाणें याहि दौऱ्यांत त्यांनीं दोन हजारांपेक्षां जास्त धांवा ( २४२९ ) केल्या. त्यांनीं १३ शतकें केलीं त्यांत तीन द्विशतकें होतीं. त्यांची बॅटिंग सरासरी ११५·६६ अशी होती. कसोटी सामन्यांत सहा डावांत त्यांनीं ४३८ धांवा केल्या अन् तीन शतकें काढलीं.

आतांपर्यंत १९३०, १९३४ व १९३८ या तिन्हीं इंग्लंड दौऱ्यात ब्रॅडमन यांचा पराक्रम सिंहासारखा भासला. ऑस्ट्रेलियन संघाच्या विजयांत सिंहाचा वांटा नेहमीं त्यांचाच असे. या वेळीं या पराक्रमी सिंहाला-डॉन ब्रॅडमनना, ३६४ धांवांचा नवा विक्रम करून लेन हटननें चांगलाच शह दिला. ब्रॅडमनना त्याबद्दल बिलकुल विषाद वाटला नाहीं. ते आनंदात होते. युद्धाचे वारे वहात असतांनाहि त्यांनीं सपत्नीक युरोपचा प्रवास मोठ्या धाडसानें केला. हा आपला शेवटचाच इंग्लंड दौरा आहे असें त्यांना वाटत होतें. पण भवितव्यता तशी नव्हती—विधिलिखित तसें नव्हतें.

# ११

## जिंकू किंवा मरूं !

इंग्लंडच्या दौऱ्यावरून ब्रॅडमन स्वगृहीं आले अन् मग पुन्हां शेफिल्ड ढालीचे सामने सुरू झाले. १९३८–३९ च्या हंगामात त्यांनीं आणखी एक नवा विक्रम केला.

ब्रॅडमन यांच्या बॅटीला यावेळीं जणुं विलक्षण धार चढली होती. दक्षिण ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व त्यांच्याकडे होतें. एकोणीसशें अडतीसच्या अखेरीस एम्. सी. सी. च्या शतसांवत्सरीनिमित्त ऑस्ट्रेलियांत झालेल्या सामन्यांत त्यांनीं ११८ धांवा केल्या, तर न्यू साऊथ वेल्स विरुद्ध त्यांनीं १४३ धांवा केल्या. क्विन्सलंड विरुद्ध त्यांनीं द्विशतक काढलें. व्हिक्टोरिया विरुद्ध १०७, क्विन्सलंड विरुद्ध परतीच्या सामन्यांत १८६ अन् न्यू साऊथ वेल्स विरुद्ध परतीच्या सामन्यांत १३५ अशीं शतकें त्यांनीं या हंगामात केलीं. लागोपाठ सहा शतकें काढण्याचा विक्रम त्यांनीं या हंगामात केला. असा विक्रम इंग्लंडच्या चार्लस फ्रायनेंहि केला होता. सातवें शतक काढून फ्रायचा विक्रम मोडण्याची मनीषा ब्रॅडमनना होती. व्हिक्टोरिया

विरुद्ध झालेल्या परतीच्या सामन्यांत त्यांनीं सातवें शतक काढण्याचा निर्धार केला. पण दैव त्यांना अनुकूल नव्हतें... ते फक्त पांच धांवा काढून बाद झाले. क्षेत्ररक्षणांत फारशा चपळ नसलेल्या फ्लिटवूड स्मिथनें त्यांचा झेल अचूकपणें टिपला होता. हा हंगाम संपला तेव्हां सात डावांत त्यांनीं ९१९ धांवा केल्या होत्या अन् सहा शतकें केलीं होतीं.

ब्रॅडमन यांचा हा विक्रम झाला, त्यावेळीं युरोपांत युद्धाचे वारे वहात होते. जर्मनीच्या हिटलरची भूक प्रतिदिनीं वाढत होती. पण इंग्लंडचे तेव्हांचे पंतप्रधान नेव्हिल चेंबरलेन शांततापूजक होते. त्यांनीं युद्ध थोपविण्यासाठीं हिटलरबरोबर २९ सप्टेंबर १९३८ रोजीं 'म्युनिक' करार केला. त्यावेळीं त्या करारासंबंधीं त्यांनीं पत्रकारांसमोर उद्गार काढले ते असे : "आपल्या हयातींत आतां युद्ध होणार नाहीं."

चेंबरलेन यांचें हें कृत्य विन्स्टन चर्चिलना अजिबात आवडलें नाहीं असल्या शांतिपाठांनीं युद्ध टळेल असें त्यांना बिलकूल वाटत नव्हतें. 'म्युनिक' कराराबद्दल ते म्हणाले : "युद्ध केल्याशिवाय आमचा संपूर्ण पराजय झाला आहे." या उद्गारांमुळें लोकसभेच्या सभासदांनीं त्यांचा धिःकार केला. पण त्यांनीं भीडभाड न ठेवतां पुन्हां ठांसून म्हटलें : "आक्रमकांचा अनुनय करून ते संतुष्ट झाले आहेत किंवा त्यांची क्षुधा अधिक प्रज्वलित झाली आहे, हें आपल्याला एका वर्षाच्या आंत समजेल." त्यांची भविष्यवाणी वर्षानें खरी ठरायची होती.

याच सुमारास ब्रॅडमन यांच्या जीवनांत एक आनंदाची घटना घडली. त्यांना मुलगा झाला. त्याचें नांव त्यांनीं जॉन ठेवलें.

विरंगुळा म्हणून ब्रॅडमननीं स्क्वॅश खेळण्यास सुरुवात केली होती. त्यांत त्यांनीं इतकी प्रगती केली कीं त्या खेळांतला ऑस्ट्रेलियाचा प्रख्यात खेळाडू डॉन टर्नबुल याचाहि त्यांनीं अंतिम सामन्यांत पराभव केला. पण एका तासाच्या या खेळांत त्यांची पुरी दमछाक होत असे.

त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या क्रिकेटवरहि होई. त्यांच्या डॉक्टरांनीहि तो खेळ अर्ध्या तासापेक्षां न खेळण्याचा सल्ला त्यांना दिला. तेव्हां मग त्यांनीं स्क्वॅशच्या चुरशीच्या सामन्यांत भाग घेण्याचें सोडून दिलें.

१ सप्टेंबर १९३९ रोजीं हिटलरनें पोलंडवर हल्ला चढवला अन् मग इंग्लंड नि फ्रान्सनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. जागतिक महायुद्धाचा प्रारंभ झाला होता...चर्चिल यांचें भाकीत खरें ठरलें होतें.

या सुमारास ऑस्ट्रेलियांत १९३९–४० सालच्या शेफिल्ड ढालीच्या सामन्यांची सुरुवात झाली होती. त्यावर युद्धाचें सांवट पडलें होतें... पण सरकारी अधिकाऱ्यांच्या आज्ञेवरून सामने चालू ठेवण्यांत आले होते. लोकांचें नीतिधैर्य वाढविण्याच्या दृष्टीनें अधिकाऱ्यांचा हा सल्ला स्तुत्य होता. युद्धफंडाला मदत म्हणूनहि कांहीं क्रिकेट सामने खेळण्यांत आले. एका सामन्याचें उत्पन्न तर चोवीस हजार रुपये ( १५०० पौंड ) आलें. पण युद्धकाळांत टेस्ट सामन्यांना तिलांजली देण्यांत आली होती.

सन १९३९–४० सालच्या हंगामात ब्रॅडमननीं १५ डावांत १४७५ धांवा केल्या अन् पांच शतकें काढलीं. त्यांत तीन द्विशकें होती. पुढील वर्षींच्या ( १९४०–४१ ) हंगामात त्यांनीं फक्त दोनच सामन्यांत भाग घेतला. एकदां ते व्हिक्टोरिया विरुद्ध खेळले अन् दुसऱ्यांदा युद्ध फंडासाठीं झालेल्या एका सामन्यांत त्यांनीं भाग घेतला. पुढें युद्ध संपेपर्यंत त्यांनी शेफिल्ड शील्ड सामन्यांना रामराम ठोकला.

युद्धाचें स्वरूप प्रतिदिनीं अधिकाधिक वाढत चाललें होतें. अनेक जवान देशरक्षणासाठीं सैनिकाचा पेशा स्वीकारीत होते. त्याचा परिणाम ब्रॅडमन यांच्या मनावर झाल्याखेरीज राहिला नाहीं. त्यांनीं आपलें नांव वैमानिक दलांत नोंदविलें. त्यांचें त्यावेळीं वय होतें बत्तीस. त्यांची उमर वैमानिक पेशाला ठरविलेल्या कमाल मर्यादेपर्यंत गेलेली होती. दुसरें म्हणजे विमानांचा होता तुटवडा अन् त्यासाठीं नांवें नोंदविलेल्यांची संख्या होती अगणित. त्यामुळें ब्रॅडमन यांची योजना दुसऱ्या

कामावर करण्यांत आली. तेव्हां लष्करांतील सैनिकांना खास शारीरिक शिक्षण देण्यासाठीं, शिक्षक म्हणून त्यांना नेमण्यांत आलें. लेफ्टनंटचा हुद्दा त्यांना देण्यांत आला.

१९४०-४१ च्या हंगामांत ब्रॅडमन दोन सामन्यांत खेळल्याचा उल्लेख वर येऊन गेलाच आहे. यावेळीं त्यांची प्रकृति बिघडलेली होती. त्यांची पाठ दुखत होती. डोळेहि दुखत होते. चेंडूहि त्यांना दिसत नव्हता अन् वाचण्यासहि त्यांना अतिशय जड जात होतें. त्यांचे डोळे बिघडले होते. त्यांनीं या दुखण्यासंबंधीं वाच्यता कुणाजवळच केली नाही. पण योगायोगानें एका नेत्रविशारदाला त्यांचे डोळे तपासण्याची बुद्धि झाली. हा डॉक्टर दृष्टिविषयक, खास संशोधन करीत होता. अत्यंत तीक्ष्ण नजरेमुळें ब्रॅडमन धांवांचा डोंगर रचूं शकतात अशी होती त्याची कल्पना. पण तपासणींत भलताच प्रकार उघडकीस आला. त्यांची प्रकृति अतिशय बिघडल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्यांना असलेल्या अपचन अन् संधिवाताच्या विकारानें आतां उग्र स्वरूप धारण केलें होतें. अर्थातच त्यांची रवानगी रुग्णालयांत करण्यांत आली. तिथें तज्ज्ञांकडून त्यांची तपासणी करण्यांत आली. लष्करी पेशाला आवश्यक असलेलें उत्तम आरोग्य त्यांना लाभलेलें नाहीं असा निर्णय तज्ज्ञ डॉक्टरांनीं घेतला अन् लष्करी पेशांतून त्यांना मुक्त करण्यांत आलें. देशसेवेनें प्रेरित होऊन त्यांनीं सैनिक पेशा पत्करला खरा पण या अकस्मात् उद्भवलेल्या दुखण्यानें त्यांच्या उत्साहावर, आनंदावर विरजण पडलें.

दिवसेंदिवस ब्रॅडमन यांची प्रकृति जास्तच बिघडत गेली. त्यांचा उजवा हात त्यांना वर उचलतां येईना अन् केसाचा भांग पाडणेंहि त्यांना दुर्घट होऊन बसलें. दाढी करणेहि त्यांना अशक्य होऊन बसलें. यावेळीं त्यांच्या पत्नीनें त्यांची जिवापाड शुश्रूषा केली.

संकटें येऊं लागलीं कीं एका पाठोपाठ येतात. ब्रॅडमन यांची पत्नी या वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. तिचें नांव शिलें. जन्मतःच

ती अत्यन्त अशक्त होती. त्यामुळें ब्रॅडमन यांच्या दुःखांत आणखी भर पडली.

दिवस असे चालले होते...अन् मग १९४५ सालीं युद्ध आटोपलें. दोस्तांचा विजय झाला. जर्मनीचा निःपात झाला. पण त्यावेळीं ज्या कंपनींत ब्रॅडमन नोकरीस होतें तिचेंहि दिवाळें निघालें. तेव्हां त्यांनीं स्वतःचाच शेअर्सचा व्यवसाय सुरू केला. थोड्याच काळांत या नव्या व्यवसायांतहि त्यांचा उत्तम जम बसला.

युद्ध संपलें होतें. क्रिकेट सामने जोमानें खेळण्याची तीव्र इच्छा तरुणांत उत्पन्न झाली होती. युद्धकाळांत ब्रॅडमन जरी क्रिकेट खेळले नाहींत तरी ऑस्ट्रेलियांत क्रिकेट चालूंच होतें. हॅसेटच्या नेतृत्वाखालच्या सैनिकी संघाविरुद्ध ब्रॅडमन खेळले. तत्पूर्वी सराव व्हावा म्हणून ते दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे क्विन्सलंड विरुद्ध खेळले, त्यावेळीं पहिल्या डावांत ६८ व दुसऱ्या डावांत नाबाद ५२ धांवा त्यांनीं केल्या. त्यांचा आत्मविश्वास वाढला. सराव नसला तरी सैनिकी संघाविरुद्ध आपण खेळू शकू अशी खात्री त्यांना वाटूं लागली. अन् मग सैनिकी संघाविरुद्ध खेळून त्यांनीं ११२ धांवा केल्या. नंतर ऑस्ट्रेलियन संघ न्यूझीलंडच्या सफरीवर गेला. ब्रॅडमननाहि त्या दौऱ्यावर जाण्याची अतोनात इच्छा होती. पण त्यांच्या प्रकृतीनें त्यांना दगा दिला.

संधिवाताच्या दुखण्यानें पुन्हां उग्र स्वरूप धारण केलें. एका मित्रानें त्यांना प्रसिद्ध मसाजतज्ञ अर्न सॉन्डर्स यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला, तो त्यांनी शिरसावंद्य मानला. सॉन्डर्सनें त्यांच्या रोगाचें निदान अचूकपणें केलें अन् आपल्या मसाज विद्येच्या सहाय्यानें त्यांना जणुं पुनर्जन्मच दिला. त्यांची प्रकृति पूर्ववत् झाली. युद्धकाळांत जगांत उलथापालथ झाली. रावाचे रंक झाले अन् रंकाचे राव झाले. हिट-लरचा निःपात करण्यासाठीं युरोप, अमेरिका अन् रशियामधले सैनिक जिंकूं किंवा मरूं अशा त्वेषानें लढले. ब्रॅडमनना हा काळ अस्वस्थतेचा

गेला. प्रकृति अन् आरोग्य त्यांना सारखें दगा देत होतें. संधिवाताचें दुखणें, त्यांना क्रिकेटचा कायमचा निरोप घ्यावयास लावतें कीं काय अशी भीति त्यांना वाटत होती. पण सॉन्डर्स सारख्या देवदूतानें त्यांना सर्व चिंतेंतून मुक्त केलें. क्रिकेटमध्यें भाग घेण्यास आवश्यक असलेलें मनःस्वास्थ्य त्यांना लाभलें. युद्धकाळांत स्थगित झालेल्या टेस्ट झुंजी परत अटीतटीनें लढल्या जाऊं लागल्या. जिंकूं अथवा धारातीर्थी मरून जाऊं या त्वेषानें हिटलर विरुद्ध युरोपियन देश लढले. हा जिंकूं किंवा मरूंचा मंत्र ब्रॅडमन विसरले नाहींत. पुढील टेस्ट झुंजींत त्यांनीं तो मंत्र आपल्या हृदयांत कोरून ठेवला अन् मग त्यांनीं इतर देशांविरुद्ध कसोटी सामन्यांत ऑस्ट्रेलियाला एकामागून एक विजय मिळवून दिले. त्यांच्या नेतृत्वाखालीं युद्धानंतर झालेल्या टेस्टमध्यें ऑस्ट्रेलियाचा पराभव कधींहि झाला नाहीं.

# १२

# नवी घडी, नवें जग

युद्ध आटोपलें होतें. क्रिकेट रसिक, कसोटी सामने पहाण्यास आसुसले होते–उत्सुक झाले होते. युद्धामुळें कसोटी सामन्यांच्या मालिकेंत खंड पडला होता. बॉंबहल्ल्यामुळें इंग्लंडचा बराचसा भाग बेचिराख झाला होता. पण इंग्लिश लोकांना क्रिकेटचें प्रेम जबर. त्यांचा तो राष्ट्रीय खेळ. युद्ध संपलें न संपलें तोंच टेस्ट सामन्यांचे उरूस सुरू करण्याच्या घोषणा होऊं लागल्या. महायुद्धाच्या काळांत इंग्लिश क्रिकेटची कमालीची हानि झाली होती. व्हेरिटीसारखे त्यांचे खेळाडू धारातीर्थीं पतन पावले होते. पण एम्. सी. सी. बोर्डानें हिंमत बांधली अन् हॅमंडच्या नेतृत्वाखालीं एम्. सी. सी. संघ ऑस्ट्रेलियाला पाठविण्याचें ठरविलें. या संघात हटन, कॉम्पटन, वॉशब्रुक, एड्रीच, यार्डले, इव्हान्स, बेडसर, व्होस, राईट इत्यादि खेळाडू होते. एकोणिसशें शेहेचाळीसच्या हिंवाळ्यांत हा संघ ऑस्ट्रेलियांत येऊन थडकला.

ब्रॅडमन एम्. सी. सी. विरुद्ध कसोटी सामन्यांत खेळणार कीं नाहीं

ह्या यक्षप्रश्नाची चर्चा ऑस्ट्रेलियांत या वेळीं जिथें तिथें चालू होती.

ब्रॅडमन यांची मनस्थितीहि खेळावें कां न खेळावें अशीच होती. ऑस्ट्रेलियाला त्यांची गरज आहे याची जाणीव त्यांना होती. पण स्वतःच्या प्रकृतीबद्दल त्यांना तितकासा विश्वास वाटत नव्हता. पण त्यांच्या पत्नीनें त्यांना प्रोत्साहन दिलें. ती त्यांना म्हणाली : " आपल्या जॉननें जर तुम्हांला कसोटी सामन्यांत खेळतांना पाहिलें नाहीं तर ती एक मोठी शोकान्तिकाच होईल. " अनेक दुःखद प्रसंगांत तिनें त्यांना धीर दिला होता. त्यांच्या सुखांत जशी तिनें त्यांची सोबत केली होती तशी त्यांच्या दुःखांतहि ती सहभागी झालेली होती. ती कित्येक प्रसंगीं त्यांची स्फूर्तिदात्री ठरली होती. तिचें मन त्यांना मोडवेना. त्यांच्या मनांतहि जिद्द उत्पन्न झाली.

पण संकल्प अन् सिद्धि यांत परमेश्वर नेहमींच उभा असतो. हंगामाला प्रारंभ होण्यापूर्वी ब्रॅडमन ऑस्ट्रेलियन क्रिकेट मंडळाच्या सभेला हजर रहाण्यासाठीं सिडनेला गेले होते. येतांना त्यांची प्रकृति इतकी बिघडली कीं ॲडलेडला आल्यावर रुग्णालयांत जाऊन त्यांना शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. नशीब त्यांना झुकांडी देत होतें.

डॉक्टरांनीं ब्रॅडमनना खेळण्याची बंदी केली. खेळल्यास फारसा प्रभाव पडणार नाही असें त्यांनीं त्यांना स्पष्टपणें सांगितलें. पत्नीचा सल्ला खेळावें असा पडला. शेवटीं प्रारंभींच्या सामन्यांत तरी खेळून पहावें असा निर्णय त्यांनीं स्वतःशीं घेतला अन् दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे एम्. सी. सी. विरुद्ध ते खेळले. पहिल्या डावांत त्यांनीं ७६ धांवा केल्या तर दुसऱ्या डावांत अवघ्या ३ धांवांत ते बाद झाले. त्यांच्या त्यावेळच्या खेळांत आकर्षकताहि नव्हती, अन् चमकहि नव्हती. त्यांच्या त्यावेळच्या खेळाचें वर्णन एका पत्रकारानें पुढीलप्रमाणें केलें : " आज एका महान् क्रिकेटपटूचें भूत क्रीडांगणावर खेळतांना मीं पाहिलें आणि भूतांना पुनर्जीवन क्वचितच प्राप्त होतें " ( " I have to-day seen

अनुक्रमांक ७०९०९ दि: ५।८।२१
क्रमांक ९२६९३ नों. दि: २८।५।५४


the ghost of a great cricketer and ghosts seldom came back to life. ") पण ब्रॅडमन स्तुतीनें चढून जात नसत अन् टीकेनें त्यांच्या आत्मविश्वासाला कधीं तडा जात नसे. ते दुर्दम्य आशावादी होते. निराशा कधीं त्यांना शिवली नाहीं.

पुढील सामन्यांत ब्रॅडमन ऑस्ट्रेलियन एलेवन तर्फे एम्. सी. सी. विरुद्ध खेळले अन् १०६ धांवा त्यांनीं काढल्या. व्हिक्टोरिया विरुद्ध झालेल्या सामन्यांत त्यांनीं पहिल्या डावांत ४३ तर दुसऱ्या डावांत ११९ धांवा केल्या. लागोपाठ दोन शतकें काढल्यामुळें त्यांना आपल्या फॉर्मचा विश्वास वाटूं लागला. ओरिली सारखा पहिल्या प्रतीचा गोलंदाज या सुमारास निवृत्त झाल्यानें ऑस्ट्रेलियाची गोलंदाजीची बाजू कमकुवत् झाली होती. ऑस्ट्रेलियन संघाला ब्रॅडमन यांच्या सारख्या पहिल्या प्रतीच्या फलंदाजाची गरज अतिशय होती. यावेळीं आपणहि आपल्या कर्तव्यांत कसूर करतां कामा नये याची जाणीव ब्रॅडमनना पुरेपूर होती. आणि म्हणून आपल्या प्रकृतीचा फारसा विचार न करतां ब्रिस्बेन येथें होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यांत खेळण्याचें त्यांनीं ठरविलें.

पहिला टेस्ट सामना ब्रिस्बेन येथें २९ नोव्हेंबर १९४६ रोजीं सुरू झाला. टॉस जिंकून ब्रॅडमननीं फलंदाजी स्वीकारली. पहिला खेळाडू मॉरीस बाद झाल्यावर ब्रॅडमन तिसऱ्या अनुक्रमावर खेळण्यास आले. त्यांच्या अठ्ठावीस धांवा झाल्यावर ते बाद व्हायचे. स्लीपच्या बाजूनें चेंडू टोलवितांना त्यांनीं तो बॅटीनें दाबला. तो झेल समजून इंग्लंडच्या आयकिननें झेलला. सर्वांच्या नजरा पंचाकडे लागल्या. पण पंचानें नाबाद असा निकाल दिला. वास्तविक तो बंप बॉल होता. या निर्णयावर बरेंच रण माजलें. हॅमंड तर अगदीं नाराज झाला. ब्रॅडमन यांच्या जवळून जातांना तो खवचटपणें त्यांना म्हणाला : " छान ! टेस्ट सामन्यांत पदार्पण करण्याची ही पद्धत फारच चांगली आहे. " नंतर ब्रॅडमन १८७ धांवा काढून बाद झाले. इंग्लंड विरुद्ध लागोपाठ काढलेलें तें त्यांचें

सातवें शतक होतें. १९३६–३७ सालच्या मालिकेंत त्यांनीं अखेरच्या तिन्ही टेस्ट सामन्यांत इंग्लंड विरुद्ध लागोपाठ शतकें काढलीं. १९३८ सालीं इंग्लंडमध्येंहि पहिल्या तीन टेस्ट सामन्यांत त्यांनीं इंग्लंडविरुद्ध लागोपाठ तीन शतकें काढलीं होतीं. तेव्हां आतांचें हें इंग्लंडविरुद्ध लागोपाठ केलेलें सातवें शतक होतें. मात्र या वेळीं त्यांच्या २८ धांवा झाल्या तेव्हां अनवधानानें अथवा गफलतीनें पंचानें 'बाद' असा निर्णय दिला असतां तर त्यांच्या तेजस्वी टेस्ट कारकीर्दीचा शेवट त्याच सामन्यांत झाला असता. पण अजून त्यांना पराक्रम करायचे होते.

ब्रिस्बेन सामन्यांत ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ६४५ धांवा झाल्या. हॅसेटनेंहि शतक काढलें. इंग्लंडच्या पहिल्या डावांत १४१ नि दुसऱ्या डावांत १७२ धांवा झाल्यानें ऑस्ट्रेलियाचा १ डाव नि ३३२ धांवांनीं विजय झाला. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज रे लिंडवाल याला कांजण्या आल्यामुळें या व पुढच्या कसोटी सामन्यांतहि तो खेळू शकला नाहीं.

सिडने येथील दुसऱ्या कसोटी सामन्यांत ब्रॅडमननीं ३९१ मिनिटांत २३४ धांवा केल्या. त्यावेळीं ऑस्ट्रेलियाच्या सिड् बार्न्स बरोबर पांचव्या विकेटसाठीं त्यांनीं ४०५ धांवांची भागिदारी केली. बार्न्सनेंहि २३४ धांवा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ८ गडी बाद होऊन ६४५ धांवा झाल्या. इंग्लंडच्या पहिल्या डावांत २५५ अन् दुसऱ्या डावात ३७१ धांवा झाल्या. त्यामुळें ऑस्ट्रेलियाचा एक डाव नि ३३ धांवांनीं विजय झाला.

तिसरा कसोटी सामना १ जानेवारी १९४७ रोजीं मेलबोर्न येथें सुरू झाला. हा सामना अनिर्णित राहिला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ७९ अन् दुसऱ्या डावांत ४९ धांवा काढल्या. मेलबोर्न क्रीडांगणावर त्यांनीं शतक काढलें नाहीं अशी ही पहिलीच टेस्ट होय. ऑस्ट्रेलियांत कसोटी सामने पूर्वीं निकाली होत. १९४६–४७ सालापासून सामने सहा दिवसांत

आठ असावेत अशी मर्यादा घालण्यांत आली.

चौथा कसोटी सामना २१ जानेवारी १९४७ रोजीं अॅडलेड येथें सुरू झाला. हा सामनाहि अनिर्णित राहिला. ब्रॅडमनना पहिल्या डावांत एकहि धांव इंग्लंडच्या अॅलेक बेडसरनें काढूं दिली नाहीं. बेडसर हा युद्धानंतरच्या काळांतला इंग्लंडचा सर्वोत्कृष्ट गोलंदाज होता. दुसऱ्या डावांत ब्रॅडमननीं नाबाद ५६ धांवा केल्या. इंग्लंडच्या डेनिस कॉम्पटननें अन् ऑस्ट्रेलियाच्या आर्थर मॉरीसनें या सामन्यांत दोन्ही डावांत शतकें केलीं.

पांचवा कसोटी सामना पुन्हां सिडने येथें २८ फेब्रुवारी १९४७ रोजीं सुरू झाला. हा सामना ऑस्ट्रेलियानें ५ विकेट्सनीं जिंकला. पहिल्या डावांत ब्रॅडमननीं फक्त १२ धांवा केल्या तर दुसऱ्या डावांत त्यांनीं ६३ धांवा केल्या. पांच कसोटी सामन्यांपैकीं तीन ऑस्ट्रेलियानें जिंकले अन् दोन अनिर्णित राहिले. त्यामुळें मालिका ऑस्ट्रेलियानें जिंकली.

महायुद्धामुळें क्रिकेट सरावांत पडलेला खंड अन् प्रकृतीहि फारशी चांगली नसतांना इंग्लंडविरुद्ध या टेस्ट मालिकेंत ब्रॅडमननीं आठ डावांत ६८० धांवा केल्या. दोन शतकें त्यांनीं काढलीं. त्यांतलें एक द्विशतक होतें. त्यांची फलंदाजीची सरासरी ९७ भरली. त्यावेळीं त्यांचें वय ३९ होतें तरी त्यांच्या फलंदाजीची भरारी अन् उभारी यत्किंचितहि कमी झाली नव्हती. आपल्या उत्कृष्ट फॉर्मनें त्यांनीं टीकाकारांना चांगला धडा शिकविला. टेस्ट सामन्यांत आठ वर्षांचा खंड पडूनहि त्यांचा कस कमी झाला नव्हता.

याच मालिकेंत ऑस्ट्रेलियाचे बार्न्स, मॉरिस, मिलर, हॅसेट अन् लिंडवॉल प्रसिद्धीला आले. मॉरिसनें आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेंत ५०३ धांवा केल्या. त्यानें तीन शतकें केलीं. त्यांतलीं दोन त्यानें एकाच सामन्यांत ( अॅडलेड ) केलीं. या कसोटी मालिकेनंतर इंग्लंडचा कर्णधार अन् प्रख्यात फलंदाज वली हॅमंड निवृत्त झाला. या

वेळीं तो ४४ वर्षांचा होता. या मालिकेंत फलंदाजींत त्याचें तेज मुळींच पडलें नाहीं. ब्रॅडमन अन् हॅमंड या दोन क्रिकेटपटूंत दोन तपें श्रेष्ठते-बद्दलची स्पर्धा चालू होती. अखेरीस ब्रॅडमननीं त्याच्यावर मात केली. अष्टपैलू क्रिकेटपटु म्हणून हॅमंड अद्वितीय होता. तो ब्रॅडमन यांचा समकालीन असल्यानें त्याच्या योग्यतेची चर्चा पुढें स्वतंत्र प्रकरणांत होईलच.

१९४६–४७ सालच्या कसोटी सामन्यांचें स्वागत ऑस्ट्रेलियांत अमाप झालें. सुमारें ८,५०,००० लोकांनीं टेस्ट सामने पाहिले. युद्धा-मुळें होरपळून गेलेल्या जीवनाचा सर्वांना कंटाळा आला होता. क्रिके-टचा खेळ दुःखावर उत्तम उतारा होता, याची कल्पना या मालिकेच्या वेळीं आली. अपेक्षेपेक्षां जास्त यश लाभल्यानें ब्रॅडमनहि खुशींत होते.

युद्ध संपलें होतें. नवें जग निर्माण होत होतें. नवी घडी स्वास्थ्यमय होत चालली होती. तरुण अन् नव्या उमेदीचे खेळाडु पुढे येत चालले होते. साहसी वृत्ति वाढीस लागलेली होती. भारतीय संघाचा पहिलाच दौरा ऑस्ट्रेलियांत होणार होता. तेव्हां आणखी एक हंगाम आपण सहज खेळूं असें ब्रॅडमनना वाटत होतें. इंग्लंडच्या दौऱ्यावर जायचें कीं नाहीं याचा निर्णय त्यांनीं अजून घेतला नव्हता. पण भारतीय संघा-विरुद्ध त्यांच्या खेळाची घडी उत्तम बसली अन् मग विश्वामित्रानें निर्माण केलेल्या नव्या सृष्टीप्रमाणें त्यांनीं इंग्लंडला जाऊन क्रिकेट क्षेत्रांत एका नव्याच जगाची निर्मिति केली.

# १३

## " मरावें पण ब्रॅडमनना खेळतांना पाहून ! "

आतांपर्यंत ब्रॅडमननीं, इंग्लंड, दक्षिण अफ्रिका अन् वेस्ट इंडिज वगैरे देशांविरुद्ध क्रिकेट सामन्यांत भाग घेतलेला होता. पण भारतीय क्रिकेट संघाविरुद्ध त्यांना खेळण्याची संधी कधीं लाभली नाहीं. तो योग आतां आला होता.

भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर अनेकदां गेला होता. पण ऑस्ट्रेलियाचा दौरा भारतीय संघानें पूर्वी कधीं केलेला नव्हता. १९४६ सालीं इंग्लंडच्या दौऱ्यावर जाऊन आल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा दौरा करण्याचें ठरलें. भारतीय संघाची निवड, सी. के. नायडू ( अध्यक्ष ), दि. ब. देवधर, पिलु पालिया व जहांगीरखान यांच्या समितीनें, मार्च १९४७ सालीं केली. संघाची निवड झाली मार्चमध्यें अन् संघ ऑस्ट्रेलियांत जावयास निघाला ७ ऑक्टोबर १९४७ रोजीं. या मधल्या काळांत भारतांत क्रिकेट सामने खेळले गेले नाहींत. त्यामुळें निवड झाली तेव्हांचा अन् प्रत्यक्ष ऑस्ट्रेलियांत खेळतांना आमच्या खेळाडूंचा फॉर्म, यांत

बरेंच अंतर पडलें-तफावत पडली. संघनायक म्हणून विजय मर्चंट यांची निवड करण्यांत आली होती. पण त्यांच्या मांडीच्या सांध्याला दुखापत झाली असल्यानें ते या दौऱ्यावर जाऊं शकले नाहींत. त्यांच्या जागीं लाला अमरनाथ यांची संघनायक म्हणून नेमणूक झाली. ऑस्ट्रेलियाला गेलेल्या संघांत पुढील खेळाडू होते—

लाला अमरनाथ, विजय हजारे, विनू मन्कड, सी. एस्. नायडू, श्रीरंग सोहनी, खंडेराव रांगणेकर, फडकर, अमिर इलाही, गुल महमद, किशनचंद, इराणी, हेमू अधिकारी, सेन, चंदू सरवटे, रंगाचारी, रणवीरसिंहजी अन् रायसिंग. मुस्ताकअल्ली, रुसी मोदी, फजल महंमद हे तिघे अन् मर्चंट दौऱ्यावर जाऊं न शकल्यामुळें, सरवटे, रणवीरसिंहजी, रायसिंग व रंगाचारी या चार खेळाडूंची निवड करण्यांत आली होती. उपनेता म्हणून विजय हजारे यांची निवड करण्यांत आली.

भारतीय संघ ऑस्ट्रेलियांत येण्यापूर्वीं ४ सप्टेंबर १९४७ रोजीं 'साऊथ ऑस्ट्रेलियन क्रिकेट असोसिएशननें' ब्रडमनना त्यांच्या मंडळाचें आजन्म सदस्यत्व बहाल केलें. त्यांचा हा गौरव अपूर्व होता.

भारतीय संघाविरुद्ध चांगली लढत द्यायची असें ब्रॅडमननीं ठरविलें होतें. पुढील वर्षीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार असल्यानें अन् युद्धानंतरचा तो पहिलाच दौरा असल्यानें भारतीय संघाविरुद्ध जेवढी प्रॅक्टिस, सराव मिळेल तेवढा ब्रॅडमनना हवा होता.

ॲडलेड येथें ब्रॅडमननीं भारतीय संघाचें स्वतः स्वागत केलें. भारतीय खेळाडूंची त्यांच्याशीं ओळख करुन देण्यांत आली. १२०० मैलांचा प्रवास करून भारतीय संघ ॲडलेड येथें आला होता. या दौऱ्यावर गेलेल्या श्री. श्रीरंग सोहनींनीं 'माझा ऑस्ट्रेलियन दौरा' या प्रवासवर्णनांत (आनंदवन मासिक–डिसेंबर १९५९– जानेवारी १९६०– संयुक्त क्रिकेट विशेषांक) भारतीय संघ ॲडलेडला आला त्यावेळचें सुंदर वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे: "पर्थहून ॲडलेड जवळ जवळ बाराशें मैल दूर आहे... ॲडलेडला ब्रॅडमन मुद्दाम टीमला भेटण्यास

येणार होता. ही बातमी आम्हांला पंकज गुप्तानें विमानांतच सांगितली होती. प्रत्येकाला आतांपर्यंत ब्रॅडमनविषयीं, त्याच्या खेळाविषयीं व त्याच्या टेस्ट रेकॉर्डसविषयीं खूप ऐकायला व वाचायला मिळालें होतें. माझा आनंद तर गगनांत मावेना. अगदीं लहानपणीं शाळेंत खेळतांना ब्रॅडमनच्या मोठमोठ्या धांवांच्या डोंगरा विषयीं मोठ्यांच्या तोंडून ऐकले होते. अन् आतां थोड्याच तासानंतर खुद्द त्याचें दर्शन मिळणार होतें ! त्याच्याशीं एकदोन शब्द बोलण्याची सुवर्णसंधीहि मिळणार होती ! ...विमानांतून उतरतांना कांहीं जाडजाड गरम कोट घातलेलीं माणसें आमच्याकडे चालत येतांना दिसलीं त्यांत ब्रॅडमनहि होता. प्रथम सर्वांची ओळख व्हावी म्हणून आम्ही सर्व एका ओळींत उभे राहिलों. ब्रॅडमन हंसऱ्या चेहऱ्यानें व लबाड डोळ्यांनीं प्रत्येकाशीं थोडें थोडें बोलत हस्तांदोलन करीत होता. लाला अमरनाथनें नेहमींच्या रिवाजाप्रमाणें इतरांप्रमाणें माझीहि ओळख करून दिली. त्यांच्याशीं हस्तांदोलन करतांना मला माझी महत्त्वाकांक्षा सफल झाल्यासारखें वाटत होतें. ज्या माणसाकडे त्याच्या क्रिकेटमधील पराक्रमामुळें जगांतील हजारों लोकांचें लक्ष लागलें होतें, ज्या माणसाविषयीं हजारोंना कुतूहल व प्रेम वाटत होते, ज्याच्या मर्दुमकीबद्दल हजारों लेखकांनीं आपल्या कुशल लेखणीनें गुणवर्णनें करण्याचा प्रयत्न केला होता, त्या ब्रॅडमनला भेटण्याची संधि मिळून त्याच्याशीं दोन शब्द बोलण्यास मिळाले म्हणून मला त्यावेळीं नुसताच अभिमान नव्हे तर थोडा गर्वहि वाटला. ब्रॅडमन दिसण्यात लहान म्हणजे उंचाला पांच फूट चार इंच, पण शरीरप्रकृतीनें अगदीं मजबूत होता. त्याच्या पराक्रमाची अपूर्व शक्ति त्याच्याशीं हस्तांदोलन करतांना त्याच्या स्पर्शांतूनच जाणवत होती. त्याच्या गुणांचें तेज त्याच्या डोळ्यांत प्रत्यक्ष दिसत होतें. ”

दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे खेळून ब्रॅडमननीं भारतीय संघाविरुद्ध १५६ धांवा केल्या. भारतीय संघांत नामांकित द्रुतगति गोलंदाज नव्हता,

अप्रतिम फिरकी गोलंदाजाची संघांत वाण होती अन् क्षेत्ररक्षण तर अगदीं गचाळ होतें. त्यामुळें कसोटी सामन्यांत धांवांचे डोंगर आपल्याला सहज रचतां येतील अशी कल्पना त्यांना पहिल्याच सामन्यांत आली अन् ती खरी ठरली. या सामन्यांत अमरनाथनीं पहिल्या डावांत १४४ नि दुसऱ्या डावांत ९४ धांवा केल्यानें हा सामना अनिर्णित राहिला. विनू मन्कडनेंहि या सामन्यांत दुसऱ्या डावांत शतक काढलें. भारतीय संघाचें भिकार अन् गचाळ क्षेत्ररक्षण पाहून ब्रॅडमनना आश्चर्य वाटलें. सी. एस्. नायडूनें ब्रॅडमन यांचा झेल त्यांच्या २३ धांवा झाल्या तेव्हां टिपला असता तर सामन्याचा शेवट वेगळा झाला असता. उत्तम क्षेत्र-रक्षक म्हणून लौकिक मिळविलेल्या सी. एस् नें पुढें जास्तींत जास्त झेल या दौऱ्यांत सोडून स्वतःचा दुर्लौकिक केला. त्याची सुरुवात त्यानें या पहिल्याच सामन्यांत केली. सोहनींनीं आपल्या प्रवासवर्णनांत ब्रॅडमन यांच्या तेव्हांच्या खेळाचें वर्णन पुढील प्रमाणें केलें आहे: “ ब्रॅडमननें तर आम्हांला हैराण केलें. इतका तो तडफदार खेळला कीं त्याच्या टोलेबाजीचें तर वर्णनच करतां येणार नाहीं. लागोपाठ चारपांच चौकार मारण्यांत तर तो पटाईतच आहे. पहिल्या दहा वीस धांवा करीपर्यंत तो खूप धीमेपणानें खेळतो. प्रत्येक नवा गोलंदाज किती तऱ्हेनें बॉल टाकूं शकतो, तें तो आधीं पाहून घेतो व एकदां सर्व गोलंदाजांचा अंदाज घेतला कीं, आपली फलंदाजीची टोलेबाजी सुरू करतो. त्यानें हां हां म्हणतां आपल्या १५६ धांवा केल्या.”

ब्रॅडमन दुसरा सामना ऑस्ट्रेलियन एलेवन तर्फे भारतीय संघाविरुद्ध खेळले. हा सामना सिडने येथें दि. १४ नोव्हेंबर १९४७ रोजीं सुरू झाला. या सामन्यापूर्वीं पहिल्या दर्जाच्या सामन्यांत ब्रॅडमननीं ९९ शतकें काढलीं होतीं. या सामन्यांत शंभरावें शतक काढण्याची महत्त्वाकांक्षा ते बाळगून होते.

सिडनेचें वर्णन श्री. सोहनींनीं पुढीलप्रमाणें केलें आहे : “ सिडने हें

शहर जगांत तीन वस्तूंविषयीं प्रसिद्ध आहे. " It is wellknown for three B's in the world " एक म्हणजे सिडने ब्रिज, दुसरी सिडने बोर्ड व तिसरा ब्रॅडमन. पूर्वी ब्रॅडमन ॲडलेडला असे पण आतां तो सिडनेला स्थायिक झाला होता."

भारतीय संघानें पहिल्या डावांत ३२६ धांवा केल्या...ऑस्ट्रेलियाची पहिली विकेट गेली अन् मग ब्रॅडमन खेळण्यास आले...ते आज शंभरावें शतक करणार म्हणून या सामन्याला प्रचंड गर्दी झाली होती. ४०००० प्रेक्षक या सामन्यास उपस्थित होते. होतां होतां ब्रॅडमन ९० च्या घरांत आले. आणखी दहा धांवा मिळाल्यावर त्यांचें शंभरावें शतक झळकणार होतें. आतां त्यांच्या ९९ धांवा झाल्या. टेस्टमध्येंहि जेवढी उत्सुकता नसेल तितकें रोमहर्षक वातावरण या सामन्यांत होतें. अमरनाथनें किशनचंदच्या हातांत चेंडू दिला. तो कांहीं सराईत गोलंदाज नव्हे. पण ब्रॅडमनना गोंधळून टाकून त्यांना शंभरच्या आंत बाद करण्याचा अमरनाथचा डाव होता. क्षणभर ब्रॅडमन बिचकले...अन् मग एक धांव घेऊन त्यांनीं अव्वल दर्जाच्या सामन्यांतील आपलें शंभरावें शतक पुरें केलें. तेव्हां भारतीय खेळाडूंनीं त्यांचें अभिनंदन केलें. ब्रॅडमन यांचा त्यावेळचा खेळ प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रो. दि. ब. देवधरांनीं 'उत्तम क्रिकेट कसें खेळाल ?' या आपल्या ग्रंथात त्या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे : " १९४७ सालीं भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या सफरीवर गेला असतांना आम्हांला आमच्या संघाविरुद्ध त्याचें 'शतकांचें शतक' होण्याचा अपूर्व योग पाहतां आला. तो लवकरच निवृत्त होणार असल्यानें आपलें शंभरावें शतक काढण्यास स्वतः ब्रॅडमन व तें पाहण्यास प्रेक्षक अत्यंत उत्सुक झाले होते. त्याच्या ज्या वेळीं ९९ धांवा झाल्या, त्यावेळीं भारतीय नेत्यानें गंमत म्हणून पूर्वी कधींहि गोलंदाजी न केलेल्या 'किशनचंद' याच्या हातांत मुद्दाम चेंडू दिला. ब्रॅडमनला तो गोलंदाज अगदींच नवीन असल्यानें त्याच्या मनाची चलबिचल व गोंधळ

पाहण्यासारखा होता. त्यानें अर्थातच फार जपून खेळून अत्यंत काळजीनें शतक पुरें करून संकटाबाहेर पडल्याचा जो सुस्कारा सोडला, तो विनोदी प्रसंग आठवणींत राहाण्याजोगा होता."

१७२ धांवा काढून ब्रॅडमन बाद झाले. या धांवा त्यांनीं १७७ मिनिटांत केल्या. त्यांची विकेट हजारेंनीं घेतली. अव्वल दर्जाच्या सामन्यांत जास्तींत जास्त शतकें जॅक हॉब्सनें केलीं आहेत. १९७ शतकें त्यानें १३१५ डावांत केलीं. ब्रॅडमननीं १०० शतकें २९५ डावांत केलीं, ही गोष्टहि फलंदाजींतलें त्यांचें अद्वितीयत्व सिद्ध करण्यास पुरे आहे. अखेरीस हा सामना भारतीय संघानें ४७ धांवांनी जिंकला.

पहिला कसोटी सामना ब्रिस्बेन येथें दि. २८ नोव्हेंबर १९४७ रोजीं सुरू झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३८२ धांवा होऊन ८ गडी बाद झाल्यावर ब्रॅडमननीं डाव पुरा झाल्याचें घोषित केलें. त्यांनीं १८५ धांवा केल्या. रात्रीं पाऊस पडून भारतीय संघाला चिकट हिरवळीवर ( Sticky ) खेळावें लागलें. पहिल्या डावांत ५८ नि दुसऱ्या डावांत ९८ धांवा भारतीय संघानें केल्यावर ऑस्ट्रेलियाकडून एक डाव २२६ धांवांचा मार त्यानें खाल्ला.

सिडनेचा दुसरा कसोटी सामना पावसामुळें अनिर्णित राहिला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत १०७ धांवा झाल्या. भारतीय संघाच्या पहिल्या डावांत १८८ व दुसऱ्या डावांत ७ गडी बाद होऊन ६१ धांवा झाल्या. ब्रडमन १३ धांवा काढून बाद झाले. त्यांची विकेट हजारेंनीं घेतली. भारतीय संघाला चिकट हिरवळीवर खेळावें लागणार याची कल्पना ब्रॅडमनना होती. म्हणून ड्रेसिंगरूममध्यें जाऊन ते भारतीय खेळाडूंना म्हणत : "वाईट वाटतं गड्यांनो. पण पाऊस अजून थांबला नाहीं" ( "Sorry Boys, Rain has not stopped yet" ) पण चिकट हिरवळीवर भारतीय संघाचा धुव्वा उडेल याचीहि कल्पना त्यांना होतीच.

तिसरा कसोटी सामना मेलबोर्नं येथें दि. १ जानेवारी १९४८ रोजीं सुरू झाला. हा सामना ऑस्ट्रेलियानें २३३ धांवांनीं जिंकला. या खेपेस ब्रॅडमननीं टेस्टमध्यें दोन्हीं डावांत शतकें ( १३२ नाबाद व १२७ ) काढण्याचा अपूर्व विक्रम केला. विनू मन्कडनेंहि पहिल्या डावांत शतक ( ११६ ) केलें.

चौथा कसोटी सामना दि. २३ जानेवारी १९४८ रोजीं अॅडलेड येथें सुरू झाला. या सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा १ डाव नि १६ धांवांनी विजय झाला. ब्रॅडमननीं यावेळीं २०१ धांवा केल्या. हें त्यांचें ३७ वें द्विशतक. हॅमंडचा ३६ द्विशतकांचा विक्रम त्यांनीं यावेळीं मोडला. ब्रॅडमन यांच्या त्यावेळच्या खेळाचें वर्णन सोहनींनीं आपल्या प्रवासवर्णनांत पुढीलप्रमाणें केलें आहे : " ब्रॅडमननें पहिल्या तीन कसोटी सामन्यांच्या चार डावांत तीन शतकें लावलीं होतींच. तो इतक्या धांवा करून शांत-तृप्त झाला असेल असें कुणालाहि साहजिक वाटलें असतें. पण ब्रॅडमन धांवांचे डोंगर रचण्यास हपापलेला होता. त्याची तृप्ति कधींच होत नसे. आपल्या निर्दय फटकेबाजींत ( merciless batting ) त्याला अत्यंत आनंद मिळावयाचा हें त्यानें ह्या सामन्यांत सिद्ध केलें. स्वतःच्या २०१ धांवा झाल्यावर, थकून जाऊन त्यानें अक्षरशः पुढें येऊन हजारेंच्या गोलंदाजीवर बॅट भिरकावली व तो बोल्ड झाला. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ६७४ धांवा झाल्या भारताच्या पहिल्या डावांत ३८१ व दुसऱ्या डावांत २७७ धांवा झाल्या " हजारेंनीं या वेळीं टेस्टमध्यें दोन्हीं डावांत शतकें ( ११६ व १४५ ) करण्याचा अपूर्व विक्रम केला. असा विक्रम करणारे हजारे हे एकमेव भारतीय फलंदाज आहेत. दुसऱ्या डावांतहि पुन्हां शतक काढल्यावर या अपूर्व विक्रमाबद्दल ब्रॅडमननीं प्रेमभरानें त्यांचा हात दाबून अभिनंदन केलें. या सामन्यांत फडकरनेंहि शतक काढलें. पण विजय ऑस्ट्रेलियाच्याच पदरांत पडला.

पांचव्या कसोटी सामन्यांतहि ( मेलबोर्न ) भारतीय संघाचा १ डाव

१७७ धावांनी पराभव झाला. या सामन्यांत खेळतांना लचक भरल्याने ब्रॅडमन ५७ धांवा काढून डाव सोडून परतले. त्या सामन्यात विनू मन्कडनें दुसरें शतक काढलें. निल हार्वेचें पहिलें शतक (१५३) याच सामन्यांत लागलें. ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ५७५ धांवा झाल्या. ८ गडी बाद झाल्यावर ऑस्ट्रेलियानें डाव पुरा झाल्याचें जाहीर करून भारतास खेळण्यास दिलें. भारताच्या पहिल्या डावांत ३३१ धांवा झाल्या, दुसऱ्या डावांत अवघ्या ६७ धांवा झाल्या. अशा रीतीनें चार कसोटी सामन्यांत ऑस्ट्रेलियाचा विजय झाला अन् एक सामना अनिर्णित राहिला. अमरनाथ यांचा खेळ कसोटी सामन्यांत साफ पडला. हजारे, मन्कड अन् फडकर हे कसोटी सामन्यांत चांगले चमकले.

या मालिकेंत ब्रॅडमननीं पांच टेस्टमध्यें सहा डावांत ७१५ धांवा केल्या—चार शतकें काढलीं. त्यांत एक द्विशतक होतें. दोन वेळां ते नाबाद होते. त्यांच्या बॅटिंगची सरासरी १७८·७५ अशी झाली. हा पराक्रम त्यांच्या इंग्लंड दौऱ्याला प्रोत्साहक ठरला.

पांचव्या टेस्ट सामन्यापूर्वी ब्रॅडमननीं पत्रकारांपुढें पुढील निवेदन केलें: " निवड समितीवरील माझ्या सहकाऱ्यांना मी इंग्लंडच्या दौऱ्यावर जाण्यास तयार आहें असें कळविलें आहे. त्याबरोबरच मी हेंहि सांगूं इच्छितों कीं भारताबरोबरचा मी खेळणारा सामना ऑस्ट्रेलियांतला माझा शेवटचाच पहिल्या दर्जाचा सामना समजावा. "

ब्रॅडमन यांच्या या वक्तव्यानें अनेकांना दुःख झालें. पण इंग्लंडच्या दौऱ्यावर ते हमखास जाणार आहेत या बातमीनें अनेकांनीं समाधान व्यक्त केलें.

ब्रॅडमन आतां चाळिशीच्या घरांत होते. त्यांचें मन टवटवीत असलें तरी शरीर थकत होतें. शिवाय योग्य वेळीं निवृत्त होण्याचें तारतम्यहि त्यांच्या ठायीं होतें. १०० शतकें करण्याचें भाग्य एकाहि ऑस्ट्रेलियन फलंदाजाला लाभलें नव्हतें. तो बहुमान मात्र त्यांना

मिळाला होता. शंभरावें शतक हा त्यांच्या आयुष्यांतला महान् क्षण होता. त्या वेळच्या त्यांच्या खेळाचें बहारदार वर्णन आपल्या प्रवासवर्णनांत सोहनींनीं पुढीलप्रमाणें केलें आहे : " सिडनेला झालेली मॅच फारच महत्त्वाची झाली. कारण ह्यांत पुन्हां ब्रॅडमन खेळणार होता व वैशिष्ट्य असें होतें कीं, त्याची आतांपर्यंत पहिल्या दर्जाच्या सामन्यांत ९९ शतकें झालीं होतीं व तो ह्या सामन्यांत शंभरावें शतक करतो कीं काय याकडे सर्व क्रिकेट–विश्वाचें लक्ष लागलें होतें. या सामन्यांत मला खेळण्याची संधि मिळाली. मॅचला दररोज ४०००० प्रेक्षक हजर होते. ब्रॅडमन खुषींत दिसत होता. त्यानें १०० वी धांव अगदीं काळजीपूर्वक घेतली व लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. हा विक्रम 'याचि देहीं याचि डोळां' पहाण्याचा लाभ ज्यांना मिळाला ते प्रेक्षक खरे भाग्यवान्! आमची गोलंदाजी ब्रॅडमननें खूप पिटली. फटका मारल्यावर बंदुकीसारखा आवाज व चेंडू गोळीसारखा सीमेवर. 'नेपल्स पहावें व मरावें', अशी म्हण सुंदर इटालियन शहराबद्दल प्रसिद्धच आहे. तसेंच प्रत्येक क्रिकेट-प्रेमी माणसानें 'ब्रॅडमनला खेळतांना पहावें व मरावें' असेंच मला म्हणावेसें वाटतें. "

ब्रॅडमन यांच्या खेळाचें सोहनीकृत वरील वर्णन यथातथ्य आहे. त्यांच्या कारकीर्दीत क्रिकेट प्रेमिकांना, ब्रॅडमन यांची बॅटिंग पाहून मगच मरावें असें वाटणें साहजिक होतें. त्यांचे विक्रमच तसे अद्‌भुत होते, आश्चर्यकारक होते. असे हे दिग्विजयी डॉन ब्रॅडमन इंग्लंडच्या शेवटच्या ज्या सफरीवर निघणार होते, ती शिकंदरची स्वारी होती!

# १४

## शिकंदरची स्वारी

युद्ध संपून तीन वर्षें लोटलीं होतीं. युद्धामुळें इंग्लंडांत बरीच नासधूस झाली होती. मनुष्यहानीचा आंकडाहि बराच होता. युद्धकाळांतल्या शिस्तबद्ध जीवनाचा, ठराविक चाकोरीचा इंग्लिश जनतेला वीट आला होता. हंसावें, खेळावें, जीवनांतले सुखोपभोग घ्यावेत अन् जीवन स्वास्थ्य-प्रियतेंत घालावें अशी प्रबळ इच्छा इंग्लंडमधील जनतेच्या मनांत वास करीत होती. इंग्लिश लोक आपल्या राजाचा, बादशहाचा जेवढा आदर ठेवतात तितकाच मान ते आपल्या खेळाच्या बादशहाला – क्रिकेटला देतात. क्रिकेट त्यांच्या रोमरोमांत भिनलेला आहे. क्रिकेट खेळांतली खेळाडु वृत्ति त्यांच्या दैनंदिन जीवनांतहि दिसून येते. विसाव्या शत-काच्या सुरुवातीला इंग्लंडमध्यें अत्यंत लोकप्रिय असलेल्या डॉ. ग्रेसचा जन्मशताब्दि उत्सव १९४८ सालीं इंग्लंडांत मोठ्या थाटांत होणार होता. अन् त्याच वर्षी आपल्या इंग्लंडच्या अखेरच्या दौऱ्यासाठीं, क्रिकेटचे जणुं बादशहा ठरलेले ब्रॅडमन, ऑस्ट्रेलियन संघ घेऊन इंग्लंडांत येणार

होते. त्यांचा तो शेवटचा दौरा होता. खेळाडु म्हणून-क्रिकेटपटु म्हणून इंग्लंडला ते पुन्हां येणार नव्हते. अन् म्हणून इंग्लंडमधले क्रिकेट प्रेमिक, त्यांच्या आगमनाकडे डोळे लावून बसले होते. १९३०, १९३४ अन् १९३८ सालचे दौरे गाजविणाऱ्या ब्रॅडमन यांच्यावर इंग्लंडमधल्या क्रिकेटषौकिनांचें अपार प्रेम होतें.

१९३८ सालीं ब्रॅडमन यांच्या नेतृत्वाखालीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडात आला होता. आतां पुनरपि दहा वर्षांनंतर ब्रॅडमन यांचे पाय इंग्लंडच्या भूमीला लागले होते. अडतीस सालीं ब्रॅडमन ऐन उमेदींत–अगदीं तिशीच्या घरांत होतें. आतां त्यांचा उमेदीचा काळ ओसरला होता. चाळिशीच्या उंबरठ्यावर त्यांनीं पदार्पण केलें होतें. पण त्यांच्या बॅटिंगला, फलंदाजीला उतरती कळा लागलेली नव्हती. त्याला अनुभवाची जोड मिळालेली होती. संघनायक म्हणूनहि त्यांनीं मोटा लौकिक मिळविला होता. १९२८ सालीं त्यांनीं टेस्ट सामन्यांत पदार्पण केलें. नंतर त्यांनीं इंग्लंडच्या तीन सफरी केल्या. त्यांच्या त्यावेळच्या बरोबरीच्या खेळाडूंपैकीं आतां ऑस्ट्रेलियन संघांत कुणी नव्हतें. अठ्ठावीस सालच्या ऑस्ट्रेलियन संघांत निवड झालेले ब्रॅडमन १९४८ सालीं त्या संघाचें नेतृत्व स्वीकारून इंग्लंडात येणार होते. या दौऱ्यानंतर कसोटी सामन्यांचा ते कायमचा निरोप घेणार होते, तसाच खेळाडू म्हणून इंग्लंडचाहि ते निरोप घेणार होते. ही ताटातूट अस्वस्थ करणारी होती अन् म्हणून त्यांचें इंग्लंडात अपूर्व असें स्वागत होणार होतें. दहा वर्षांनंतर पुन्हां इंग्लंड–ऑस्ट्रेलिया टेस्ट सामन्यांचें दर्शन घडणार होतें अन् त्यांच्या झंझावाती खेळांचें प्रात्यक्षिकहि इंग्लिश जनतेला पहावयास मिळणार होतें. त्यामुळें या दौऱ्याबद्दल इंग्लंडात अपार उत्सुकता अन् अपेक्षा निर्माण झाली होती.

दि. १९ मार्च १९४८ रोजीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडला जाण्यासाठीं निघाला. या संघात पुढील खेळाडु होते :

ब्रॅडमन, ( संघनायक ) सिड् बार्न्स, ऑर्थर मॉरीस, बिल ब्राऊन, हॅसेट, हॅमेन्स, हार्वे हे सर्व फलंदाज होते. कीथ मिलर व लॉक्स्टन हे अष्टपैलु खेळाडु होते. इयान जॉन्सन, कॉलीन मॅकुल, रे लिंडवॉल. डग्लस रिंग, बिल जॉन्स्टन अन् टोशॅक या सहा गोलंदाजांचा समावेश करण्यांत आला होता. यष्टिरक्षक म्हणून डॉन टॅलन नि सॅगर्स या खेळाडूंना घेण्यांत आलें.

ब्रॅडमन यांच्याहून हे सर्व खेळाडु तरुण होते अन् त्यांना त्यांच्या-बद्दल कमालीचा आदर वाटत होता. शिवाय त्यांच्यासारखा डावपेचांत मुरलेला अन् धूर्त नेता लाभल्यामुळें खेळाडूंना विजयाची खात्री वाटत होती, आत्मविश्वास वाटत होता.

इंग्लंडला जातांना कोलंबो येथें एक सामना खेळण्यांत आला. कडक उन्हामुळें सिड् बार्न्स आजारी पडला अन् ब्रॅडमन यांची प्रकृतीहि बिघडली. बोट मुंबई बंदराला लागली तेव्हां बराच मोठा समुदाय बाहेर जमा झाला होता अन् ' ब्रॅडमन बाहेर या ' या घोषणांनीं सारें बंदर दुमदुमून गेलें होतें. प्रकृति अस्वाथ्यामुळें ब्रॅडमन बाहेर येण्यास तयार नव्हते. अनेकांच्या विनंत्या त्यांनीं त्यावेळीं धुडकावून लावल्या. तेव्हांचे क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष डिमेलो यांनीं या संघाचा बोटीवर छोटासा सत्कारहि केला. पंकज गुप्ता, विजय मर्चंट अन् अॅन्थनी डिमेलो प्रभृतींनीं त्या प्रसंगीं समयोचित भाषणें केलीं. संघांतल्या सर्व खेळाडूंना भारतीय चिन्ह कोरलेले नेकटाय देण्यात आले नि ब्रॅडमनना भारतीय चिन्हांकीत असा ब्लेझरचा कोट देण्यांत आला.

१६ एप्रिल १९४८ रोजीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडात उतरला. ब्रॅडमन यांची ही अखेरची सफर असल्यानें इंग्लंडमधल्या त्यांच्या सत्कार-समारंभाना ऊत आला होता. स्वाक्षरी घेणाऱ्यांची झुंबड त्यांच्यामागें सदोदित होती. दररोज खाजगी शंभर पत्रें त्यांना येत. लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर असतांना आपल्या तरुण खेळाडूंसह ते वुर्सेस्टरशायर

येथें पहिला सामना खेळण्यास आले.

१९३०, १९३४ अन् १९३८ च्या इंग्लंड दौऱ्यांत प्रत्येक खेपेस ब्रॅडमननीं वुर्सेस्टरशायर विरुद्ध द्विशतक काढलें होतें. यावेळीं १०७ धांवा काढून ते बाद झाले, त्यावेळीं सर्वांना अचंबा वाटला, आश्चर्य वाटलें. या खेपेसहि ते द्विशतक लावतील अशी अनेकांची अपेक्षा होती. पण तरुण सहकाऱ्यांना जास्त वाव मिळावा या हेतूनें त्यांनीं जाणून बुजून आपली विकेट दिली. पण योगायोग असा कीं यापूर्वी त्यांनीं इंग्लंडांत अनेक द्विशतकें केलीं होती, तरी या खेपेस त्यांना एकहि द्विशतक काढतां आलें नाहीं. शतकें मात्र त्यांनीं बरींच काढलीं. इसेक्स विरुद्ध द्विशतकाच्या मार्गावर असतांना फक्त १३ धांवा कमी पडून ते बाद झाले.

लॉर्डस् येथें ब्रॅडमन यांचा खेळ पाहून एक गृहस्थ इतके खूष झाले कीं यांनीं लागलीच दहा पौंडाचा चेक ब्रॅडमनना धाडून लिहिलें : " तुम्हीं मला आनंद अन् समाधान मिळवून दिल्याबद्दल आभार. हे पैसे तुम्हीं कुणालाहि देणगी म्हणून द्यावेत. " ब्रॅडमननीं ते पैसे ॲडलेड येथील अपंग रुग्णांना पाठविले.

सरे विरुद्ध ब्रॅडमननीं १४६ धांवा काढल्यावर बेडसरनें त्यांची विकेट घेतली. त्याची गोलंदाजी अत्युत्तम असल्याचा अभिप्राय ब्रॅडमननीं या वेळीं दिला अन् कसोटी सामन्यांत त्याच्या गोलंदाजीवर ऑस्ट्रेलियन खेळाडूंना अतिशय जपून खेळावें लागेल अशी भीतीहि त्यांनीं व्यक्त केली.

इसेक्स विरुद्ध ऑस्ट्रेलियन संघानें एका दिवसांत ७२१ धांवा केल्या. एका दिवसांत इतक्या धांवा करण्याचा हा एक उच्चांक होता. पूर्वी कुठल्याहि संघानें एवढ्या धांवा एका दिवसांत केलेल्या नव्हत्या. ब्रॅडमननीं या सामन्यांत १८७ धांवा केल्या. ब्राऊन, लॉक्स्टन अन् सॅगर्स यांनींहि या सामन्यांत शतकें काढलीं. आपल्या संघाच्या साम-

ब्रॅडमन, ( संघनायक ) सिड् बार्न्स, ऑर्थर मॉरीस, बिल ब्राऊन, हॅसेट, हॅमेन्स, हार्वे हे सर्व फलंदाज होते. कीथ मिलर व लॉक्स्टन हे अष्टपैलु खेळाडु होते. इयान जॉन्सन, कॉलीन मॅकुल, रे लिंडवॉल, डग्लस रिंग, बिल जॉन्स्टन अन् टोशॅक या सहा गोलंदाजांचा समावेश करण्यांत आला होता. यष्टिरक्षक म्हणून डॉन टॅलन नि सॅगर्स या खेळाडूंना घेण्यांत आलें.

ब्रॅडमन यांच्याहून हे सर्व खेळाडु तरुण होते अन् त्यांना त्यांच्या-बद्दल कमालीचा आदर वाटत होता. शिवाय त्यांच्यासारखा डावपेचांत मुरलेला अन् धूर्त नेता लाभल्यामुळें खेळाडूंना विजयाची खात्री वाटत होती, आत्मविश्वास वाटत होता.

इंग्लंडला जातांना कोलंबो येथें एक सामना खेळण्यांत आला. कडक उन्हामुळें सिड् बार्न्स आजारी पडला अन् ब्रॅडमन यांची प्रकृतीहि बिघडली. बोट मुंबई बंदराला लागली तेव्हां बराच मोठा समुदाय बाहेर जमा झाला होता अन् ‘ ब्रॅडमन बाहेर या ’ या घोषणांनीं सारें बंदर दुमदुमून गेलें होतें. प्रकृति अस्वाथ्यामुळें ब्रॅडमन बाहेर येण्यास तयार नव्हते. अनेकांच्या विनंत्या त्यांनीं त्यावेळीं धुडकावून लावल्या. तेव्हांचे क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष डिमेलो यांनीं या संघाचा बोटीवर छोटासा सत्कारहि केला. पंकज गुप्ता, विजय मर्चंट अन् ॲन्थनी डिमेलो प्रभृतींनीं त्या प्रसंगीं समयोचित भाषणें केलीं. संघांतल्या सर्व खेळाडूंना भारतीय चिन्ह कोरलेले नेकटाय देण्यात आले नि ब्रॅडमनना भार-तीय चिन्हांकीत असा ब्लेझरचा कोट देण्यांत आला.

१६ एप्रिल १९४८ रोजीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंडात उतरला. ब्रॅडमन यांची ही अखेरची सफर असल्यानें इंग्लंडमधल्या त्यांच्या सत्कार-समा-रंभाना ऊत आला होता. स्वाक्षरी घेणाऱ्यांची झुंबड त्यांच्यामागें सदोदित होती. दररोज खाजगी शंभर पत्रें त्यांना येत. लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर असतांना आपल्या तरुण खेळाडूंसह ते वुर्सेस्टरशायर

येथें पहिला सामना खेळण्यास आले.

१९३०, १९३४ अन् १९३८ च्या इंग्लंड दौऱ्यांत प्रत्येक खेपेस ब्रॅडमननीं वुर्सेस्टरशायर विरुद्ध द्विशतक काढलें होतें. यावेळीं १०७ धांवा काढून ते बाद झाले, त्यावेळीं सर्वांना अचंबा वाटला, आश्चर्य वाटलें. या खेपेसहि ते द्विशतक लावतील अशी अनेकांची अपेक्षा होती. पण तरुण सहकाऱ्यांना जास्त वाव मिळावा या हेतूनें त्यांनीं जाणून बुजून आपली विकेट दिली. पण योगायोग असा कीं यापूर्वी त्यांनीं इंग्लंडांत अनेक द्विशतकें केलीं होती, तरी या खेपेस त्यांना एकहि द्विशतक काढतां आलें नाहीं. शतकें मात्र त्यांनीं बरींच काढलीं. इसेक्स विरुद्ध द्विशतकाच्या मार्गावर असतांना फक्त १३ धांवा कमी पडून ते बाद झाले.

लॉर्डस् येथें ब्रॅडमन यांचा खेळ पाहून एक गृहस्थ इतके खूष झाले कीं यांनीं लागलीच दहा पौंडाचा चेक ब्रॅडमनना धाडून लिहिलें : "तुम्हीं मला आनंद अन् समाधान मिळवून दिल्याबद्दल आभार. हे पैसे तुम्हीं कुणालाहि देणगी म्हणून द्यावेत." ब्रॅडमननीं ते पैसे ॲडलेड येथील अपंग रुग्णांना पाठविले.

सरे विरुद्ध ब्रॅडमननीं १४६ धांवा काढल्यावर बेडसरनें त्यांची विकेट घेतली. त्याची गोलंदाजी अत्युत्तम असल्याचा अभिप्राय ब्रॅडमननीं या वेळीं दिला अन् कसोटी सामन्यांत त्याच्या गोलंदाजीवर ऑस्ट्रेलियन खेळाडूंना अतिशय जपून खेळावें लागेल अशी भीतीहि त्यांनीं व्यक्त केली.

इसेक्स विरुद्ध ऑस्ट्रेलियन संघानें एका दिवसांत ७२१ धांवा केल्या. एका दिवसांत इतक्या धांवा करण्याचा हा एक उच्चांक होता. पूर्वी कुठल्याहि संघानें एवढ्या धांवा एका दिवसांत केलेल्या नव्हत्या. ब्रॅडमननीं या सामन्यांत १८७ धांवा केल्या. ब्राऊन, लॉक्स्टन अन् सॅगर्स यांनींहि या सामन्यांत शतकें काढलीं. आपल्या संघाच्या साम-

र्थ्याची खरी जाणीव ब्रॅडमनना याच सामन्यांत आली. हा सामना ऑस्ट्रेलियानें सहज जिंकला. नंतर एम्. सी. सी. विरुद्ध ९८, नॉटिंगहॅम विरुद्ध ८६ अन् ससेक्स विरुद्ध १०९ धांवा ब्रॅडमननीं काढल्या.

पहिला कसोटी सामना नॉटिंगहॅम येथें १० जून रोजीं सुरू झाला. इंग्लंडचें नेतृत्व नॉर्मन यॉर्डले यांजकडे होतें. इंग्लंडचा पहिला डाव अवघ्या १६५ धांवांत संपुष्टांत आला. ऑस्ट्रेलियानें पहिल्या डावांत ५०९ धांवा केल्या. ब्रॅडमननीं १३८ धांवा काढल्यावर हटननें त्यांचा झेल घेतला. त्यांची विकेट बेडसरनेंच घेतली. दुसऱ्या डावांत इंग्लंडच्या ४४१ धांवा झाल्या. डेनिस कॉम्पटननें १८४ धांवांची भर घातली. अखेरीस ऑस्ट्रेलियानें सामना ८ विकेट्सनीं जिंकला. 'ब्रॅडमन दुसऱ्या डावांत एकहि धांव न काढतां परतले अन् त्यावेळींहि त्यांची विकेट बेडसरनेंच घेतली. याच सामन्यांत त्यांनीं दौऱ्यावर सर्वांत अगोदर हजार धांवा करण्याचा मान मिळविला. टेस्ट सामन्यांतलें त्यांचें अठ्ठाविसावें शतक याच सामन्यांत लागलें. इंग्लंडविरुद्ध त्यांचें हें अठरावें शतक होतें.

दुसरा कसोटी सामना लॉर्डस् क्रीडांगणावर २४ जून १९४८ रोजीं सुरू झाला. हा सामना ऑस्ट्रेलियानें ४०९ धांवांनीं जिंकला. ब्रॅडमननीं पहिल्या डावांत ३८ नि दुसऱ्या डावांत ८९ धांवा केल्या. याहि खेपेस त्यांची विकेट बेडसरनेंच घेतली.

यापुढील सरे विरुद्ध झालेल्या परतीच्या सामन्यांत ब्रॅडमननीं १२८ धांवा केल्या.

तिसरा कसोटी सामना मँचेस्टर येथें ८ जुलै १९४८ रोजीं सुरू झाला. हा सामना अनिर्णित राहिला. ब्रॅडमननीं या सामन्यांत पहिल्या डावांत ७ आणि दुसऱ्या डावांत नाबाद ३० धांवा केल्या. हा सामना गाजविला इंग्लंडच्या डेनिस कॉम्पटननें !

इंग्लंडच्या लॉर्डस् क्रीडांगणावर स्कोअर कार्ड वाटीत डेनिस कॉम्पटन

जगप्रसिद्ध क्रिकेटपटु झाला. युद्धकाळांत हा सैनिकाचा पेशा पत्करून भारतांत आला होता. त्यावेळीं त्यानें रणजीकरंडक सामन्यांत व पंचरंगी सामन्यांतहि भाग घेतला. १९४४ सालीं मुंबईला ब्रेबॉर्न स्टेडीयमवर रणजी करंडक सामन्यांत होळकर संघातर्फे खेळून मुंबई संघाविरुद्ध त्यानें २४९ नाबाद धांवा केल्या, त्या प्रसंगीं त्याचा खेळ प्रस्तुत लेखकानें पाहिला होता. यावेळीं मँचेस्टर येथें खेळतांना लिंडवॉलनें त्याचें कपाळ चांगलेंच शेकलें. त्यावेळीं त्याचा कपाळमोक्षच व्हायचा. पण तो वांचला. त्याची रवानगी रुग्णालयांत करण्यांत आली. दुसऱ्या दिवशीं टांके घातलेल्या स्थितींतहि तो खेळण्यास आला अन् त्यानें १४५ नाबाद धांवा करून आपली लढाऊ वृत्ति प्रकट केली. मँचेस्टरच्या टेस्टनंतर तो लॉर्ड्स येथें खेळत असतांना खुद्द राणीनें त्याची खुशाली जातीनें विचारली. राणी म्हणाली : "कॉम्पटन् तुझं डोकं शेकलं होतं तें आतां कसं आहे ? तुला मार कसा बसला तें आम्ही उभयतांनीं टेलिव्हिजनवर पाहिलं...पण आतां सर्व ठीक असेलसं वाटतं." कॉम्पटन हा रावापासून रंकापर्यंत नि पोरांपासून थोरांपर्यंत सारखाच लोकप्रिय होता. मँचेस्टरच्या त्याच्या धाडसी खेळाबद्दल ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत प्रशंसोद्गार काढले आहेत.

चौथा कसोटी सामना लीड्स येथें २३ जुलै १९४८ रोजीं सुरू झाला. आतांपर्यंत तिन्ही इंग्लंड दौऱ्यांत (१९३०, १९३४, १९३८) ब्रॅडमननीं या मैदानावर शतकें काढली होतीं. या मैदानावरचा त्यांचा हा शेवटचा टेस्ट सामना होता, अन् त्यांचें हें मैदान अतिशय आवडतें होतें.

इंग्लंडनें पहिल्या डावांत ४९६ धांवा केल्या. एड्रिच अन् वॉशब्रुक यांनीं इंग्लंडतर्फे शतकें काढलीं ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ४५८ धांवा झाल्या. ब्रॅडमन अवघ्या ३३ धांवांत बाद झाले, हॅसेट–मॉरीसहि

लौकर बाद झाले. पण मिलर, हार्वे अन् लॉक्स्टन या त्रिवर्गांनीं डाव सांवरला. हार्वेनें शतक काढलें ( ११२ ) अन् लॉक्स्टननें ९३ धांवा काढून त्याला उत्तम साथ केली.

इंग्लंडनें, दुसऱ्या डावांत ३६५ धांवा झाल्यावर डाव पुरा झाल्याचें घोषित केलें. आठ गडी बाद झाल्यावर यार्डलेनें डाव पुरा करून ऑस्ट्रेलियास खेळण्यास दिलें.

सामना जिंकण्यास ऑस्ट्रेलियाला ४०४ धावांची जरुरी होती. त्यासाठीं वेळ होता फक्त ३४५ मिनिटांचा.

मॉरिस अन् हॅसेट यांची जोडी जमली. पण हॅसेट लौकरच १७ धांवा काढून बाद झाला. नंतर तिसऱ्या अनुक्रमावर ब्रॅडमन खेळण्यास आले. त्यांच्या आवडत्या मैदानावर ते आतां शेवटचा डाव खेळणार होते...टाळ्यांचा कडकडाट झाला. प्रेक्षकांनीं त्यांना मानाची सलामी दिली.

ब्रॅडमन अन् मॉरीस यांनीं धांवा अत्यंत झपाट्यानें काढल्या. दुसऱ्या विकेटसाठीं त्या उभयतांनीं ३०१ धांवांची भर घातली. मॉरीस १८२ धांवा काढून बाद झाला. नंतर आलेल्या मिलरनें फक्त १२ धांवा केल्या. धांवसंख्या ३९६ झाली होती. ब्रॅडमन अजून नाबाद होते अन् सामना जिंकण्यास आठ धांवा हव्या होत्या. शेवटीं हार्वेनें विजय मिळविण्यासाठीं एक चौकार मारला नि ऑस्टेलियाला विजय प्राप्त झाला. ब्रॅडमन १७३ काढून नाबाद राहिले. टेस्ट कारकीर्दींतलें त्यांचें हें २९ वें शतक. इंग्लंड विरुद्ध त्यांचें हें १९ वें शतक. इंग्लंडविरुद्ध एवढीं शतकें काढणारे ते एकुलते फलंदाज होते.

या दौऱ्यांतला शेवटचा अन् ब्रॅडमन यांच्या आयुष्यांतला अखेरचा कसोटी सामना ओव्हल येथें दि. १४ ऑगस्ट १९४८ रोजीं सुरू झाला. इंग्लंडचा पहिला डाव ५२ धांवांतच आटोपला. हटननें यावेळीं ३० धांवा केल्या. लिंडवॉलने सहा विकेटस् घेतल्या, अन् त्यासाठीं धांवा

दिल्या फक्त २०.

ऑस्ट्रेलियाने उत्तम सुरुवात केली. मॉरीस बाद झाल्यावर तिसऱ्या अनुक्रमावर ब्रॅडमन खेळावयास आले. तो त्यांचा शेवटचा टेस्ट सामना होता. त्यांचें अंतःकरण भारावून गेलें होतें. एरवीं भावनेला वश न होणारें त्याचें मन यावेळीं भावनेला बळी पडलें होतें. प्रेक्षकांच्या गळ्यांतले जणुं ताईत असलेले ब्रॅडमन हळुहळू विकेटकडे येत होतें, यार्डले सकट सर्व इंग्लिश खेळाडूंनीं टाळ्या पिटून त्यांचा जयजयकार केला. त्यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यांचें अभीष्ट चिंतिलें.

ब्रॅडमन यांचें मन चलविचल झालें. टोपी अंमळ काढून त्यांनीं जयजयकाराचा स्वीकार केला. होलीज या इंग्लिश गोलंदाजानें एक चेंडू टाकला. तो ते कसाबसा खेळले. अन् दुसऱ्या चेंडूवर त्यांची दांडी उडून ते बाद झाले. पॅव्हेलियनकडे ते परतत होते तेव्हांहि प्रेक्षकांनीं टाळ्या पिटून त्यांचें स्वागतच केलें. एका भव्य कारकीर्दीचा शेवट असा अकल्पित झाला, म्हणूनच क्रिकेटला नशिबाचा खेळ म्हणतात. १९३० मध्यें जॅक हॉब्सनें ओव्हल येथील आपल्या शेवटच्या कसोटी सामन्यांत फक्त ९ धांवा केल्या होत्या. त्यासंबंधीं ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे : "माझ्या अखेरच्या कसोटी सामन्यांतील धांवांपेक्षां नऊ धांवांनीं हॉब्स माझ्यावर मात करील हे त्यावेळीं मला उमगलें नाहीं." ब्रॅडमन यांच्या अखेरच्या नाट्यपूर्ण खेळाचें वर्णन प्रा. दि. ब. देवधरांनीं 'उत्तम क्रिकेट कसें खेळाल ?' या ग्रंथांत पुढीलप्रमाणें केलें आहे : "हातांत आपली आवडती बॅट घेऊन तो पॅव्हिलिअनमधून मैदानावर जात असतांना हजारों प्रेक्षकांनीं टोप्या काढून त्याचें स्वागत केलें; व सर्व प्रतिपक्षीय खेळाडूंनीं हस्तांदोलन करून भावी आयुष्यांत त्याचें अभीष्ट चिंतिलें. त्यावेळचा प्रसंग अपूर्व होता. खेळाडू मित्रांची रणांत शेवटची भेट घेतांना, उत्पन्न होणारा भावनांचा आवेग व मनाची चलबिचल, यांमुळें ब्रॅडमनचें खेळावरील लक्ष उडालें व ज्या

चेंडूला त्यानें सीमापार धाडलें असतें, त्याच साध्या चेंडूनें तो एका-एकीं बाद झाला! अर्थातच तो सामना अनेक दृष्टींनीं संस्मरणीय ठरला."

अखेरीस ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावांत ३८९ धांवा झाल्या. इंग्लंडचा दुसरा डावहि १८८ धांवांत कोसळल्यानें ऑस्ट्रेलियाचा १ डाव अन् १४९ धांवांनीं विजय झाला. पांचपैकीं ४ कसोटी सामने ऑस्ट्रेलियानें जिंकले अन् एक अनिर्णित राहिला. अर्थातच ऑस्ट्रेलियानें ही मालिका जिंकली.

या दौऱ्यांत ब्रॅडमननीं लँकशायर विरुद्ध १३३ (दुसरा डाव) जंटलमेन विरुद्ध १५० साऊथ ऑफ इंग्लंड विरुद्ध १४३ अन् अखेरच्या सामन्यांत लेव्हिसन गोव्हर संघाविरुद्ध १५३ धांवा केल्या. इंग्लंडच्या इतर तिन्ही सफरींप्रमाणें याहि सफरींत त्यांनी दोन हजारांपेक्षां जास्त धांवा ( २४२८ ) केल्या अन् ११ शतकें केलीं. त्यांतलीं दोन कसोटी सामन्यांतलीं होतीं. कसोटी सामन्यांत ९ डावात त्यांनीं ५०८ धांवा केल्या. दोन वेळां ते नाबाद राहिले. त्यांची टेस्टमधली बॅटिंगची सरासरी भरली ७२.५७ तर इतर सामन्यांतल्या धांवांची त्यांची सरासरी झाली ८९.९२. टेस्टमधील सरासरींत मॉरीसनें त्यांच्यावर मात केली. त्याची टेस्टमधील सरासरी झाली ८७. इतर सामन्यांतल्या सरासरींत ब्रॅडमनच अग्रेसर होते. चाळिशीच्या घरांत असतांनाहि त्यांनीं दौऱ्यांत दोन हजारांवर धांवा केल्या अन् टेस्ट मालिकेंतहि ५०० हून जास्त धांवा केल्या, ही वस्तुस्थिति पाहिल्यावर त्यांच्या फलंदाजीच्या सातत्याची कल्पना येते. अखेरपर्यंत त्यांच्या फलंदाजीचा बहर ओसरला नव्हता ही गोष्ट स्पष्ट होते.

जंटलमेन संघाविरुद्ध ब्रॅडमननीं १५० धांवा लॉर्डस् येथें केल्या तेव्हां योगायोगानें त्याच वेळीं ( २७–८–१९०८ ) त्यांचा वाढदिवस होता. तेव्हां इंग्लिश जनतेनें त्यांचा चांगला सत्कार केला. जुना क्रिकेटपटु सर

पेल्हॅम वॉर्नरनें लिहिलेला ग्रंथ अन् पुस्तकाच्या आकारासारखी एक केक त्यांना नजर करण्यांत आली. त्या केककर पुढील मजकूर होता : "To Don Bradman. Many Happy Returns of the Day from all at Lord's" त्यांना त्यावेळीं कृतकृत्य झाल्याचें वाटलें. त्या आवेगांत ते म्हणाले : "या महान् क्रिकेट क्रीडांगणावर, क्रिकेटचा निरोप घेतांना मला दुःख वाटतें. खेळाडू म्हणून नव्हे तरी पण कसोटी सामने पाहण्यासाठीं तरी मी इंग्लंडला हमखास येईन."

लेव्हिसन गोव्हर सामन्याच्या वेळीं यॉर्कशायर संघानें ब्रॅडमनना आपल्या क्लबाचें कायम सभासदत्व बहाल केलें. त्यांना एक चांदीचें तबकहि (Tray) त्या क्लबातर्फे देण्यांत आलें.

इंग्लंडमधल्या 'The People' या पत्रानें फंड गोळा करून कांहीं रक्कम जमविली अन् त्या रकमेंतून ब्रॅडमनना एक चान्दीचा सुंदर चषक बक्षीस दिला. हा चषक इंग्लंडच्या वॉरीक व्हेस नामक प्रसिद्ध चषकासारखा हुबेहूब केलेला होता. त्याची उंची २१ इंच होती. त्यावेळीं झालेल्या मेजवानीला इंग्लंडचे सात माजी कप्तान अन् इतर परगण्यांचे नऊ कप्तान हजर होते. प्रसिद्ध गोलंदाज लारवूडहि त्याप्रसंगीं उपस्थित होता.

इंग्लिश क्रिकेट षौकिनांत ब्रॅडमन अत्यन्त लोकप्रिय ठरले. एवढी लोकप्रियता फक्त रणजी अन् डॉ. ग्रेस यांनाच इंग्लंडांत लाभली होती. पण ग्रेस हा इंग्रज होता अन् रणजींचें वास्तव्य बरींच वर्षे इंग्लंडांत होतें. तसेच ते दोघेहि इंग्लंडतर्फे अन् काऊन्टी सामन्यांतहि खेळत होते. ब्रॅडमन किती झाले तरी परके होते अन् कसोटी सामन्यांत इंग्लंडला त्यांनीं अक्षरशः पिटलें होतें. तरी इंग्लंडमधील क्रिकेटप्रेमी जनता त्यांच्यावर बेहद्द खूष होती यांत शंका नाहीं. फलंदाजींतील त्यांचें असामान्य प्रभुत्व हीच गोष्ट त्यांच्या लोकप्रियतेस कारणीभूत झाली.

१९४८ सालीं विन्स्टन चर्चिल एवढी लोकप्रियता ब्रॅडमनना इंग्लंड-मध्यें लाभली होती. त्यांच्या दिमतीला एक मोटार तिथें सदैव असे.

दररोजचा त्यांच्या पत्रांचा बटवडाहि फार मोठा होता. त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठीं त्यांच्या भोवतीं एकच झुंबड उडे. डॉन ब्रॅडमन यांची ठेंगणी ठुसकी मूर्ति आतां लॉर्डस् क्रीडांगणावर पुन्हां दिसणार नव्हती म्हणून इंग्लंडमधले क्रिकेटप्रेमिक मनापासून हळहळत होते.

ऑस्ट्रेलियन संघ त्या वेळीं ३१ सामने सामने खेळला. त्यांपैकीं २३ सामने त्यानें जिंकले. ८ अनिर्णित राहिले. जिंकलेल्या तेवीस सामन्यांपैकीं पंधरा सामने त्यानें एका डावानें जिंकले. एकाहि सामन्यांत त्याचा पराभव झाला नाहीं. हा ऑस्ट्रेलियन संघ अजिंक्य म्हणूनच ऑस्ट्रेलियांत परतला.

जग जिंकावयाला निघालेला शिकंदर जसा अजिंक्य ठरला त्याप्रमाणेंच ब्रॅडमन यांच्या नेतृत्वाखालचा ऑस्ट्रेलियन संघहि इंग्लंडांत अजिंक्य ठरला. क्रिकेट इतिहासांत इतका बलवान संघ झाला नाहीं, अशी तज्ज्ञांची साक्ष आहे. या संघाचे कर्णधार ब्रॅडमन हे अत्यंत महत्त्वाकांक्षी होते. आपल्या या अखेरच्या दौऱ्यांत एकहि पराभव स्वीकारायचा नाहीं अशी मनीषा त्यांनीं बाळगली अन् त्याला अनुसरून त्यांनीं आपल्या नेतृत्वाचीं सूत्रें हलविलीं. त्यांच्याबद्दल आपल्या ‘ उत्तम क्रिकेट कसें खेळाल ? या ग्रंथांत प्रा. दि. ब. देवधारांनीं पुढील उद्गार काढले आहेत : “ युद्धोत्तर कालांत त्याच्याकडे नेतृत्व आल्यावर, शिकंदरप्रमाणें आपण एकहि पराभव न सोसतां, दिग्विजय करूं, अशी ईर्ष्या त्याला उत्पन्न झाली व त्यानें ती १९४८ मध्यें उत्कृष्ट संघ इंग्लंडच्या स्वारीवर नेऊन पुरी केली. ” डॉन ब्रॅडमन शेवटच्या दौऱ्यांत खरोखरीच दिग्विजय ठरले. त्यांची शेवटची इंग्लंडची स्वारी शिकंदरप्रमाणें अजिंक्य ठरली. जगाच्या इतिहासांत शिकंदरचें नांव जसें अमर आहे. त्याप्रमाणेंच क्रिकेटच्या इतिहासांत ब्रॅडमन यांचें स्थान अग्रमानाचें आहे.

# १५

## "पॉन्सफोर्ड बाद, पण ब्रॅडमन खेळतोय !"

ब्रॅडमन यांच्या वीस वर्षांच्या प्रदीर्घ क्रिकेट कारकीर्दीत, फलंदाजींत त्यांच्याशीं तुल्यबल असलेले थोर क्रिकेटपटु फार थोडे होते. इंग्लंडचा वॉल्टर हॅमंड, वेस्ट इंडिजचा जॉर्ज हेडले अन् ऑस्ट्रेलियाचा बिल् पॉन्सफोर्ड हे तिघे असामान्य फलंदाज होऊन गेले. हे तिघेहि ब्रॅडमन यांचे समकालीन होत. तिघेहि अत्यन्त लोकप्रिय होते अन् अनेक वेळा त्यांची ब्रॅडमन यांच्याशीं तुलना केली जाई.

ब्रॅडमन यांचें नांव निघालें कीं प्रथम आठवण होते हॅमंडची. वयानें हा ब्रॅडमन यांच्यापेक्षां पांच वर्षांनें मोठा असला तरी दोघांच्या कसोटी सामन्यांतल्या कारकीर्दीला सुरुवात जवळ जवळ एकाच वेळीं झाली.

या उभयतांना असंख्य चाहते लाभले. या दोघांत श्रेष्ठ कोण या-बद्दलचा वाद घालून अनेक लेखणीबहाद्दरांनी आपल्या लेखणीची हौस फेडून घेतली. तेव्हां दोघांच्या गुणदोषांची चर्चा करून दोघेहि आप-आपल्यापरी कसे थोर होते तें पाहणें उचित आहे.

क्रिकेटला आवश्यक असलेले गुण दोघांतहि उत्कटतेनें वास करीत असल्यानें हे दोघे वीर, ब्रॅडमन–हॅमंड आपआपल्या संघातून एकमेका-विरूद्ध शर्थीनें लढले अन् म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें चुरस निर्माण झाली. ब्रॅडमन मैदानावर खेळत असले कीं इंग्लिश खेळाडूंची त्रेधा उडे. हॅमंडबद्दलहि तशीच दहशत ऑस्ट्रेलियन खेळाडुंना वाटे. ब्रॅडमननीं आपल्या पहिल्याच इंग्लंड दौऱ्यांत इंग्लिश खेळाडूंना मैदानावर सळो का पळो करून सोडलें. हॅमंडनेंहि आपल्या पहिल्याच ऑस्ट्रेलियन सफरींत ऑस्ट्रेलियन खेळाडूंना सुतासारखे मऊ केले.

हॅमंडनें ज्या वर्षी ( १९२८–२९ ) ऑस्ट्रेलिया विरुद्ध कसोटी सामन्यांच्या मालिकेंत ९०५ धांवा केल्या त्याच वर्षी ब्रॅडमननीं कसोटी सामन्यांत पदार्पण केलें. हॅमंडचा कसोटी मालिकेंतला ९०५ धांवांचा विक्रम ब्रॅडमननीं पुढच्याच वर्षी म्हणजे १९३० सालीं इंग्लंड विरुद्ध कसोटी सामन्यांत ९७४ धांवा करून मोडला. अन् तेव्हांपासून हॅमंडच्या तोडीचे फलंदाज, म्हणून ब्रॅडमन यांचा दबदबा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें पसरला.

हॅमंड क्रिकेट क्षेत्रांत स्वतःच्या हिंमतीवर पुढें आला. इंग्लंडच्या ग्लूस्टर काऊंटी तर्फे खेळून अव्वल दर्जाच्या सामन्यांत त्यानें पदार्पण केलें. १९२८-२९ च्या ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या टेस्ट मलिकेंत त्यानें चार शतकें केलीं. २५१, २००, ११९ ( नाबाद ) नि १७७ अशीं शतकें, द्विशतकें त्यानें काढलीं. याच मालिकेंत ॲडलेड येथें टेस्टमध्यें दोन्ही डावांत शतकें काढण्याचा विक्रमहि त्यानें ऑस्ट्रेलिया विरुद्ध केला. युद्धकाळ वगळतां तो सतत कसोटी सामन्यांत खेळत होता अन् पराक्रमांत ब्रॅड-मन यांचा प्रबळ समकालीन प्रतिस्पर्धी म्हणून, त्याच्या नांवाचा डिंडीम क्रिकेट क्षेत्रांत पसरला होता.

प्रकृतीनें हॅमंड बलदंड अन् ग्रीक रोमन योद्धयांप्रमाणें आकर्षक वाटे. त्याच्यापुढें ब्रॅडमन अगदींच किरकोळ अन् खुजे भासत. रुंद खांदे, उणी-

पुरी उंची, लोखंडाच्या कांबीसारखीं कणखर मनगटें अन् बांधेसूद शरीर-संपदेमुळें हॅमंडचें व्यक्तिमत्त्व अतिशय उठावदार अन् ठसठशीत वाटे. तशी प्रभावी व्यक्तित्वाची देणगी ब्रॅडमनना नाहीं. फलंदाजीच्या शैलीचा, स्टाईलचा विचार करतांहि हॅमंड ब्रॅडमन यांच्यापेक्षां सरस होता. स्टाईल नसणाऱ्या ब्रॅडमननीं टेस्टमध्यें एका दिवसांत ३०९ धांवा केल्या ही गोष्टहि जमेस धरली पाहिजे.

हॅमंडच्या प्रत्येक फटक्यांत सफाई सळसळत असे. शैली व कला ( Art ) हे दोन गुण त्याच्या फलंदाजींत प्रामुख्यानें आढळून येत. ऑफ, कव्हर व बॅकफूट ड्राइव्जमध्यें त्याच्या खेळाचें सारें सौंदर्य खळाळून बाहेर पडे. ब्रॅडमन चणीनें लहान. त्यामुळें ड्राइव्जचे दणकेबाज फटके त्यांच्या फलंदाजीत अगदीं कमी. त्याची कसर ते कमींत कमी वेळांत जास्तींत जास्त धांवा काढून काढीत. ओलसर अगर चिकट ( Sticky ) हिरवळीवर त्यांचे व्यंग उघडे पडे. हॅमंड कशाहि प्रकारच्या हिरवळीवर खेळण्यांत पटाईत होता. या उभय क्रिकेट मल्लांना टेस्ट आखाड्यांत ( समोरासमोर नसले तरी ) पाहण्याचें भाग्य प्रा. दि. ब. देवधरांना लाभलें आहे. ' उत्तम क्रिकेट कसें खेळाल ? ' या आपल्या ग्रंथांत त्यांनीं या उभयतांसंबंधीं पुढील भाष्य केलें आहे: " शतकें व द्विशतकें काढण्यांतील त्याचे उच्चांक पुढें ब्रॅडमननें मोडून टाकले आणि जरी धांवांच्या एकूण संख्येंत तो मागें पडला तरी खेळाची सफाई, कलात्मकता व आकर्षकता या गुणांत तो निःसंशय ब्रॅडमनपेक्षां श्रेष्ठ होता. " हॅमंडचें हें देवधरकृत वर्णन यथातथ्य आहे.

ब्रॅडमन यांची विशेष प्रसिद्धी आहे फलंदाजीसाठीं. ऐन उमेदींत कव्हर पॉइंटचें क्षेत्ररक्षण ते उत्तम प्रकारें करीत तरी पहिल्या प्रतीचा क्षेत्ररक्षक असा त्यांचा कधींच लौकिक नव्हता. फलंदाजी जमेस धरून गोलंदाजी नि क्षेत्ररक्षण या क्रिकेटच्या दोन्ही शाखांत हॅमंड चांगलाच तरबेज होता. ब्रॅडमननीं आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट ' या ग्रंथांत त्याच्या गोलंदाजी-

संबंधीं पुढील उद्‌गार काढले आहेत : " तो जर इतक्या पहिल्या प्रतीचा फलंदाज नसता तर मॉरीस टेट व वेडसर यांच्याइतकें उच्च स्थान त्याला गोलंदाजींतहि मिळालें असतें. "

क्रिकेटचें तिसरें महत्त्वाचें अंग क्षेत्ररक्षण होय. त्यांत हॅमंड अतिशय निपुण होता. चॅपमन, ( इंग्लंड ), कॉन्स्टंटाइन ( वेस्ट इंडिज ) अन् सिड् बार्न्स ( ऑस्ट्रेलिया ) हे क्रिकेटपटु पट्टीच्या क्षेत्ररक्षणाबद्दल जगविख्यात मानले गेले. हॅमंड या त्रिवर्गांच्या तोडीचाच क्षेत्रक्षक होता. स्लीपमधल्या क्षेत्ररक्षणांत त्याचा हातखंडा विशेष असे. कसोटी सामन्यांत त्यानें ११० झेल घेतल्याचें नमूद आहे. क्षेत्ररक्षणाचा भार वहात असतांना त्यानें ८३ विकेट्सहि आपल्या टेस्ट कारकीर्दींत घेतल्या, या सर्व बाबी लक्षांत घेतल्या कीं एक गोष्ट चटकन् लक्षांत येतें ती ही कीं तो अष्टपैलु ( All Rounder ) क्रिकेटपटु होता. ब्रॅडमन यांच्याबद्दल तसें म्हणतां येणार नाहीं.

आतां दोघांच्या बॅटिंगच्या आंकडेवारीकडे दृष्टिक्षेप टाकूया. या शाखेंत ब्रॅडमन यांचें स्थान अद्वितीय आहे. हॅमंडचें कर्तृत्व त्या शाखेंत त्यांच्यापुढें फिकें पडतें. अव्वल दर्जाच्या सामन्यांत हॅमंड ८९६ डाव खेळला, व त्यांत त्यानें १६७ शतकें केलीं. त्याच्या एकूण धांवा झाल्या ५०४९३. त्याच्या फलंदाजीचें सरासरी प्रमाण पडतें ५५.९७. ब्रॅडमन ३३८ डाव खेळले. त्यांनीं ११७ शतकें केलीं अन् त्यांच्या एकूण धांवा झाल्या २८०६७.त्यांच्या फलंदाजीचें सरासरी प्रमाण पडतें ९५.१४. सरासरींत त्यांनीं हॅमंडचा पाडाव केल्याचें दिसतें. हॅमंडनें ३६ द्विशतकें काढलीं तर ब्रॅडमननीं ३७ काढलीं.

आतां या जोडगोळीचें टेस्ट कर्तृत्व पाहुया. हॅमंड ८५ कसोटी सामने खेळला. त्यानें शतकें केली २२. त्याच्या सर्व धांवा झाल्या ७२४९. त्याच्या उच्चांक धांवा ३३६ होत्या. हें त्रिशतक त्यानें दुबळ्या न्यूझीलंड संघाविरुद्ध केलें. त्याची सरासरी भरते ५८.४५. ब्रॅडमन खेळले

अवघे ५२ टेस्ट सामने. त्यांत त्यांनी शतकें केली २९. त्यांच्या एकूण धांवा झाल्या ६९९६. त्यांच्या बॅटिंगचें सरासरी प्रमाण झालें ९९·९४. ३३४ या त्यांच्या उच्चांक धांवा होत. टेस्टमध्यें त्रिशतकें त्यांनीं दोन वेळां केलीं अन् तीहि इंग्लंड विरुद्ध. हॅमंडची ऑस्ट्रेलिया विरुद्ध फक्त ९ शतकें आहेत तर ब्रॅडमननीं इंग्लंड विरुद्ध १९ शतकें केलीं आहेत. सर्व कसोटी सामन्यांत ब्रॅडमननीं १० द्विशतकें २ त्रिशतकें अन् १७ शतकें केलीं तर हॅमंडनें सर्व टेस्ट सामन्यांत ६ द्विशतकें, १ त्रिशतक अन् १५ शतकें केलीं. ही सर्व आंकडेवारी पहातां ब्रॅडमननीं हॅमंडचे सर्व विक्रम उलथून टाकल्याचें दिसून येईल. बॅटिंगमधील कलात्मकता अन् आकर्षकपणा या दोन गोष्टी वगळल्यास केवळ फलंदाज म्हणून ब्रॅडमन हॅमंडहून श्रेष्ठ ठरल्याचें स्पष्ट दिसतें. महायुद्धामुळें आठ वर्षांचा पडलेला खंड अन् मनःस्वास्थ्य बिघडवणाऱ्या अनेक गोष्टी हॅमंडच्या जीवनांत घडत गेल्यामुळेंहि त्याच्या क्रिकेट कौशल्यास अचानक ओहोटी लागली, ही वस्तुस्थितीहि नाकारतां येणार नाहीं.

नेतृत्वाच्या तुलनेंतहि ब्रॅडमन हॅमंडहून वरचढ ठरावेत. १९३६–३७ सालीं पहिले दोन टेस्ट सामने गमावले असतांनाहि डावपेंच अन् फलंदाजींतील प्रभुत्व यांच्या सहाय्यानें ब्रॅडमननीं पुढील टेस्ट सामने ऑस्ट्रेलियाला जिंकून दिले. असे कर्तृत्व हॅमंडला दाखवितां आलेलें नाहीं. १९३८सालीं हॅमंडच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडनें ‘ओव्हल’ येथें एकच टेस्ट सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध जिंकला. पण त्याचें श्रेय हटनलाच दिलें पाहिजे. शिवाय दुखापत झाल्यानें, दोन्हीं डावांत त्यावेळीं ब्रॅडमन खेळूं शकले नाहींत. एरवीं हा सामना त्यांनीं सुखासुखी हातचा जाऊं दिला नसता. १९४६–४७ सालीं ब्रॅडमननीं इंग्लंडचा जबरदस्त पराभव केला तेव्हां हॅमंडचें सारें कर्तृत्व अस्तंगत झालें होतें. त्या दौऱ्यानंतर तो निवृत्त झाला तेव्हां ‘विस्डेन’ सारख्या इंग्लंडच्या प्रख्यात क्रिकेट वार्षिकानें त्याच्या निवृत्तीची दखलाहि कां घेतली नाहीं हें कोडें उलगडणें

मात्र कठीण आहे. १९४८ सालीं ब्रॅडमननीं एकहि सामना न हरतां इंग्लंडांत आपल्या नेतृत्वाची खरी चुणूक दाखविली. तेव्हां कर्णधार म्हणूनहि ब्रॅडमन अद्वितीय ठरले. तो लौकिक हॅमंडच्या वांट्यास आला नाहीं. तात्पर्य नेतृत्वाच्या झटापटींत ब्रॅडमन हॅमंडहून उजवे ठरले.

आतां या उभयतांत श्रेष्ठ कोण या प्रश्नाचे उत्तरहि दिलें पाहिजे. केवळ फलंदाज म्हणून ब्रॅडमन हॅमंडहून श्रेष्ठ ठरतील. अष्टपैलू क्रिकेटपटु म्हणून हॅमंडना जोड मिळणें कठीण आहे. केवळ फलंदाज म्हणून ब्रॅडमन यांचा अनुक्रम पहिला लागेल तर सव्यसाची अन् अष्टपैलू क्रिकेटपटु म्हणून हॅमंडचा अनुक्रम पहिला ठरावा. अलीकडेच, दि० १ जून १९६५ रोजीं तो निवर्तला.

ब्रॅडमन यांचा दुसरा सुप्रसिद्ध समकालीन फलंदाज म्हणजे वेस्ट इंडिजचा जॉर्ज हेडले हा होय. वयानें हा ब्रॅडमन यांच्या बरोबरीचा [ जन्म ३० मे १९०९ ] याला ‘ काळा ब्रॅडमन ’ ( Black Bradman ) म्हणत. यावरून त्याच्या फलंदाजीची कल्पना सहज येईल. ह्याची फलदाजी अत्यंत आकर्षक होती. ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज ग्रिमेट याची गोलंदाजी ऐन पणांत असतांनाहि ह्यानें कसोटी सामन्यांत त्याच्या गोलंदाजी विरुद्ध खेळून दोन शतकें काढलीं होतीं. ‘ हेडले हा कुठल्याहि संघात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण खेळानें खुलून दिसेल ’ असें ब्रॅडमननीं आपल्या ‘ फेअरवेल टू क्रिकेट ’ ग्रंथात म्हटलें आहे. प्रसिद्ध क्रिकेट टीकाकार अन् लेखक जॅक फिंगल्टन यानें तो ब्रॅडमन, मॅकेब, हॅमंड, नोर्स ( दक्षिण आफ्रिका ) यांच्या तोडीचा होता असें म्हटलें आहे.

ब्रॅडमन यांच्याप्रमाणेंच हेडलेनें १९२९–३० मध्यें इंग्लंड विरुद्ध टेस्टमध्यें चार शतकें फडकावून त्या मालिकेंत ७०३ धांवा केल्या होत्या. त्याच वेळीं टेस्टमध्यें दोन्हीं डावांत शतकें करण्याचा विक्रमहि त्यानें केला. १९३९ सालींहि इंग्लंडच्या सुप्रसिद्ध लॉर्डस् क्रीडांगणावर त्यानें टेस्टमध्यें इंग्लंडविरुद्ध दोन्हीं डावांत पुन्हां शतकें केलीं. टेस्ट साम-

ऱ्यांत इंग्लंडविरुद्ध दोन्हीं डावांत दोन वेळा शतकें करणारा याच्याशिवाय दुसरा फलंदाज एकच आढळतो. ब्रॅडमननीं भारताविरुद्ध टेस्ट सामन्यांत दोन्ही डावांत शतकें केलीं असलीं तरी असा विक्रम त्यांना इंग्लंडविरुद्ध करतां आला नाहीं. हेडलेनें ती अपूर्व किमया दोन वेळा केली. ब्रॅडमन यांचा पराक्रम पहावा पक्क्या विकेटवर. ओल्या विकेटवर त्यांचा प्रभाव फारसा पडत नसे. हेडले कसल्याहि विकेटवर उत्तमपणें खेळे अन् ओलसर अगर चिकट विकेटवर खेळण्यांत तर त्याचा हातखंडा होता.

हेडलेची ब्रॅडमन यांच्याशीं समोरासमोर गांठ १९३०-३१ मध्यें ऑस्ट्रेलियाशीं झालेल्या टेस्ट मालिकांच्या वेळीं घडली. पहिल्या दोन टेस्ट सामन्यांत हेडले यशस्वी झाला नाहीं. तिसऱ्या टेस्टमध्यें (ब्रिस्बेन) त्यानें शतक काढलें अन् तो नाबाद राहिला. पांचव्या कसोटी सामन्यांत (सिडने) विकेट चिकट (स्टिकी) असूनहि त्यानें शतक काढलें. ऑस्ट्रेलियांत त्यावेळीं त्यानें अव्वल दर्जाच्या सामन्यांत हजार धांवाहि केल्या. ऑस्ट्रेलियाचा प्रसिद्ध संघनायक हर्बर्ट कॉलीन्स (१८८९-१९५९) याला फिंगल्टननें एकदां जगांतल्या पहिल्या प्रतीच्या चार फलंदाजांची नांवें विचारलीं. तेव्हां कॉलीन्सनें ट्रंपर, ब्रॅडमन अन् हॉब्स अशीं नांवें सांगून म्हटलें: " आतां आश्चर्याचा धक्का सोसण्यास सज्ज हो " अखेरीस चवथें नांव हेडलेचें सांगून तो पुन्हां म्हणाला: " हेडलेच्या तोडीचें पदलालित्य ( Footwork ) मला कुणाहि फलंदाजांत आढळलें नाहीं. " चार्लस फ्राय, मॅकलॅरेन, प्रभृती क्रिकेटपटूंनींहि हेडलेला स्तुतिसुमनें वाहिलीं आहेत.

१९३३ च्या इंग्लंडच्या दौऱ्यांत हेडलेनें २००० धांवा केल्या. टेस्टमध्येंहि त्यानें शतक काढलें. १९३९ सालीं त्यानें ' लॉर्डस् ' वर टेस्टमध्यें इंग्लंड विरुद्ध दोन्हीं डावांत शतकें केली. त्या क्रीडांगणावर दोन्हीं डावांत शतकें काढणारा हा एकच फलंदाज आहे. हा चणीनें ब्रॅडमन यांच्यासारखाच लहानखुरा होता. त्याचे फटके

चांगले जोरकस असत. त्यानें जोरानें मारलेला चेंडू थोंपविण्याची छाती क्षेत्ररक्षकांना होत नसे. त्यानें मारलेल्या फटक्याच्या चेंडूचा वेग इतका जोरदार असे कीं मध्यें हात घातल्यास तो रक्तबंबाळ व्हावा. त्याच्या पायाची हालचाल ब्रॅडमन यांच्यासारखीच जलद होती. उत्तम हिरवळीवर ब्रॅडमनना जोड नव्हती. ओल्या हिरवळीवर हेडले ब्रॅडमन यांच्यापेक्षां सहस्रपटींनीं श्रेष्ठ होता. फलंदाजींत तो ब्रॅडमन यांच्या तोडीचा होता असें सांगतांना एका टीकाकारानें मार्मिक उद्गार काढले आहेत ते असें : "हो ! खरोखरीच काळा ब्रॅडमन ! एक काळ असा होता कीं त्यावेळी मला मनापासून वाटायचं कीं ब्रॅडमनच्या ऐन उमेदींत त्याला 'गोरा हेडले' म्हणणें उचित झालें असतें." सारांश तरुणपणीं हेडले हा प्रती ब्रॅडमनच होता.

हेडलेची बॅट हलकीशीच ( वजनानें ) असे. खेळण्यास जाण्यापूर्वी सिगरेटचे झुरके तो मोठ्या हौशीनें घेई. सर्व जगानें त्याला 'ब्लॅक ब्रॅडमन' म्हणून कौतुकानें संबोधिलें आहे. पण ब्रॅडमननीं आपल्या 'फेअर-वेल टू क्रिकेट' ग्रंथांत हेडलेच्या या नामकरणाबद्दल पुसटहि उल्लेख केला नाहीं. एवढेंच नव्हें तर त्यांनीं जगांतल्या उत्तम फलंदाजांची नामावलि दिली आहे त्यांत हेडलेचें नांवहि आढळत नाहीं. या अनुल्लेखाचें कारण अनाकलनीय आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर हेडलेच्या कौशल्याचा हॅमंडप्रमाणेंच ऱ्हास झाला. तो अवघे २२ कसोटी सामने खेळला. त्याच्या धांवा झाल्या २१९० त्यानें एकंदर १० शतकें कसोटी सामन्यांत केलीं. त्यांतलीं आठ इंग्लंड विरुद्ध अन् दोन ऑस्ट्रेलिया विरुद्ध आहेत. इंग्लंड विरुद्ध त्यानें दोन द्विशतकेंहि काढलीं. ब्रॅडमन ५२ टेस्ट सामने खेळले. इतके सामने हेडले खेळता तर आणखी विक्रम करणें त्याला अशक्य नव्हतें. ओलसर विकेटवर खेळता न येणें हें ब्रॅडमन यांचें नाजूक मर्मस्थान होय. असें व्यंग हेडलेच्या फलंदाजींत नव्हतें. ब्रॅडमन यांचा जसा त्यांच्या

देशांत अन् परदेशांत उदोउदो झाला तसा हेडलेचा त्याच्या मायदेशांत अगर अन्यत्र झाला असेल असें म्हणवत नाहीं. एकेकाळीं काळ्या लोकांना (निग्रो) वेस्ट इंडिज संघात उपेक्षेनें वागविलें जाई. या उपेक्षेची झळ अंशतः तरी हेडलेला लागली असणारच. १९४८–४९सालीं वेस्ट इंडिज संघाबरोबर तो भारतांत आला होता. त्यावेळीं त्या संघाचें नेतृत्व त्याच्याकडेच जावयास हवें होतें. पण काळ्या लोकांबद्दलच्या दुजाभावामुळें तसें झालें नाहीं. तरी रसिकांनीं त्याला 'काळा ब्रॅडमन' असें स्वयंस्फूर्तीनें म्हटलें यांतच त्याचा खरा गौरव आहे. त्याला स्वतःला मात्र 'काळा ब्रॅडमन' म्हटलेलें आवडत नसे. आपल्या जमातीला काळें म्हणण्याचा हीनपणा त्याला मान्य नसावा. 'प्रति ब्रॅडमन' म्हणून गौरविलेला जॉर्ज अलफॉन्सो हेडले असा होता.

ब्रॅडमन यांचा तिसरा समकालीन फलंदाज म्हणून बिल पॉन्सफोर्डचें नांव सांगतां येईल. त्यांच्याहून हा आठ वर्षांनीं मोठा असला तरी त्याची गणना त्यांच्या समकालीनातच करावयास हवी. पॉन्सफोर्डचे विक्रम पुढें ब्रॅडमननीं मोडले तरी फलंदाजींत तो त्यांच्या तोडीचा होता. खुद्द ब्रॅडमन यांनींहि आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट' या ग्रंथात फलंदाज म्हणून पॉन्सफोर्डलाच अग्रपूजेचा मान दिला आहे. अव्वल दर्जाच्या क्रिकेट सामन्यांत ४०० च्या वर धांवा दोन वेळां करणारा पॉन्सफोर्ड हा एकच फलंदाज होय.

पॉन्सफोर्डचें संपूर्ण नांव विल्यम हॅरॉल्ड पॉन्सफोर्ड असलें तरी बिल पॉन्सफोर्ड या नांवानें तो क्रिकेट वर्तुळांत प्रसिद्ध होता. १९२२–२३ मध्यें त्यानें ४२९ धांवांचा वैयक्तिक उच्चांक केला. पुनःश्च पांच सहा वर्षांनीं १९२८–२९ मध्यें त्यानें ४३७ धांवांचा वैयक्तिक उच्चांक करून आणखी एक विक्रम केला. आपल्या पहिल्याच टेस्टमध्यें त्यानें शतक काढलें. (१९२४–२५) अन् अखेरच्या टेस्ट सामन्यांतहि द्विशतक काढून तो निवृत्त झाला. ब्रॅडमन यांच्याप्रमाणेंच त्याला भरपूर धांवा काढ-

ण्याची हांव असे. १९३४ मध्यें इंग्लंडविरुद्ध अखेरच्या ओव्हल सामन्यांत ब्रॅडमन यांना साथीला घेऊन ४५१ धांवांची भागिदारी त्यानें केली. हा उच्चांक अजूनहि अबाधित आहे. ऑस्ट्रेलियाचा संघनायक वुडफूल त्याचा निकट स्नेही होता. दोघेहि व्हिक्टोरिया तर्फे आघाडीला खेळण्यास जात अन् टेस्टमध्येंहि दोघें आघाडीलाच खेळत. १९३४ च्या इंग्लंड दौऱ्यानंतर वुडफूल निवृत्त झाल्यावर त्यानेंहि आपली बॅट खालीं ठेवली. अवघ्या ३४ व्या वर्षी तो निवृत्त झाला. अव्वल दर्जाच्या सामन्यांत त्यानें ४७ शतकें केली. पांच टेस्ट सामन्यांत त्यानें ७ शतकें केलीं. पांच इंग्लंड विरुद्ध अन् दोन वेस्ट इंडिजविरुद्ध. तो अवघे २९ टेस्ट सामने खेळला अन् त्यानें २१२२ धांवा केल्या.

पॉन्सफोर्डला धांवांची हांव बेसुमार होती. त्यानें एकदां न्यू साऊथ वेल्स विरुद्ध ३५२ धांवा केल्या. इतक्या धांवा काढल्या तरी धांवा काढण्याची त्याची हौस फिटली नव्हती. तो बाद झाला तेव्हां म्हणाला; " अरे रे! मी कमनशिबी आहे. " हा अबोल असून ब्रॅडमन यांच्याप्रमाणेंच एकांडा शिलेदार होता. मात्र त्याच्यापाशीं विनोदबुद्धिहि होती. भिडस्तपणामुळें छायाचित्रकारांना तो नेहमींच झुकांडी देई. हा उणापुरा उंच अन् वजनानेंहि चांगला १८० पौंड होता. वजन कमी व्हावें म्हणून उपाहाराच्या वेळीं हा फक्त फळेंच खाई अन् इतर वेळीं चालण्याचा व्यायाम घेई. त्याच्या पायांची हालचाल अगदीं जलद होई. टेस्ट सामन्यांच्या ४८ डावांत तो एकदांहि पायचीत झाला नाहीं. त्याची बॅट जाडजूड असे. एकेकाळचा प्रख्यात गुगली गोलंदाज व हल्लींचा पत्रकार ऑर्थर मेले एकदां सबंध दिवस त्याला बोलिंग टाकीत होता परंतु हा कांहीं बाद होईना. तेव्हां खंवचटपणें मेले त्याला म्हणालाः " अरे, तुझ्या बॅटीची जाडी तरी किती आहे ? " पॉन्सफोर्ड म्हणालाः " तूं इतका वेळ मला बोलिंग टाकीत आहेस तरी माझ्या बॅटीची जाडी तुला दिसली नाहीं वाटतं ? " इतका वेळ बोलिंग करूनहि मेलेला आपली

अनुक्रम ०७१०७ वि: ५।२७। क्रमांक १२६८ नों दि:


विकेट घेतां आली नाहीं, ह्या मेलेल्या वर्मावर पॉन्सफोर्डनें अचूक बोट ठेवलें तें असें.

ऑस्ट्रेलियांत एका दिवसांत ३०० धांवा करणारा पॉन्सफोर्ड हा एकच फलंदाज आहे. त्यानें २६ व्या वर्षी ३३४ धांवा एका दिवसांत अवघ्या ५॥ तासांत न्यू साऊथ वेल्स विरुद्ध केल्या. त्यावेळीं त्याच्या धांवांचा वेग ताशीं ६० असा होता. शंभर धांवा झाल्यावर शांत डोक्यानें पुन्हां पवित्रा घेऊन तो २०० च्या तयारीला लागे अन् दोनशेंची शीव ओलांडलीं की त्याची नजर तिनशेंवर लागलेली असे. ड्रेसिंग रूममध्यें आला की तो बॅट कोपऱ्यांत कुठेंहि भिरकावून देई. कारण त्याची बॅट जाड असल्यानें तिची चोरी होण्याची शक्यता नसे. एक बॅट त्याला दोन वर्षें पुरत असे. तो ज्या दुकानदाराकडून बॅट विकत घेई तो दुकानदार मात्र आपल्या बॅटीची जाहिरात करून गब्बर होई. त्याच्याविरुद्ध जेव्हां पायचीतचें अपील केलें जाई तेव्हां टारगट प्रेक्षक त्याला " याहून थोडी जाड बॅट आण " असें ओरडून सांगत. मित्रमंडळींत ' पॉनी ' या टोपणनांवानें तो ओळखला जाई.

पॉन्सफोर्डच्या ऐन उमेदींत ' या आणि पॉन्सफोर्डचा खेळ बघा ' असे मोठमोठाले फलक ऑस्ट्रेलियांत झळकत असत. १९२६ सालच्या डिसेंबरांत व्हिक्टोरियानें न्यू साऊथ वेल्स विरुद्ध ११०७ धांवा केल्या. पॉन्सफोर्ड सबंध दिवस खेळला. दिवस अखेरीस परततांना दरवाजाच्या एका बाजूला तो उभा राहिला अन् प्रतिपक्षाचे खेळाडू जेव्हां दरवाजांतून आंत जाऊं लागले तेव्हां तो त्यांना हलकेंच म्हणाला, " राम राम मंडळीं, आतां पुन्हां उद्यां भेटूं " ( " Goodnight chaps–see you tomorrow " ) त्याच सामन्यांत त्यानें ३५२ धांवा केल्या. त्याला वेगवान गोलंदाजी खेळतां येत नसे असा एक प्रवाद होता. खुद्द ब्रॅडमनना हा प्रवाद पोरकट ( Pure Rubbish ) वाटतो.

पॉन्सफोर्डचे विक्रम ब्रॅडमननीं मोडले तरी त्यांच्या सिंहासनाशीं बस-

ण्याचा मान त्याचाच आहे. सवाई ब्रॅडमन होणें जसें अशक्य आहे तसेंच सवाई पॉन्सफोर्ड होणेंहि अशक्य कोटींतले आहे. ब्रॅडमननीं आपल्या आत्मचरित्रांत त्याच्यासंबंधीं पुढील उद्गार काढले आहेतः " त्याच्याहून उत्तम शैलीचे अन् सौंदर्यपूर्ण फलंदाजी करणारे अनेक क्रिकेटपटु असतील पण कर्तृत्वांत अन् धांवांच्या आंकडेवारींत त्याच्याशीं बरोबरी करणें कुणालाहि जमणार नाहीं " त्याच्या निवृत्तीनंतर सोळा वर्षांनीं हा अभिप्राय ब्रॅडमननीं व्यक्त केला आहे त्यावरून त्याची योग्यता ध्यानीं येतें.

युद्धकाळांत १९४३ सालीं मुसोलिनीची शोकान्तिका झाली नि हुकूमशहा हिटलर तेवढा शिल्लक राहिला. या प्रसंगाला अनुसरून, इंग्लंडच्या लोकसभेच्या एका सभासदानें रूपकात्मक भाष्य केलें होतें. तो म्हणालाः " पॉन्सफोर्ड बाद झाला पण ब्रॅडमन अजून खेळतोंय. " ( " We have got Ponsford out cheaply but Bradman is still batting " ) या रूपकावरून पॉन्सफोर्ड कसा प्रति ब्रॅडमन होता त्याची कल्पना सहज येते. हॅमंड, हेडले अन् पॉन्सफोर्ड हे तीन शिलेदार ब्रॅडमन यांचे नुसते समकालीनच नव्हते तर त्यांच्याप्रमाणें श्रेष्ठ फलंदाजहि होते. ब्रॅडमन यांचा तो काळ जसा वैभवसंपन्न होता तसेच त्यांना समकालीनहि तोडीस तोड लाभले. गेले ते दिवस ! राहिल्या त्या त्यांच्या रोमांचकारी डावांच्या आठवणी ! !

# १६

## सूर्यास्त

ब्रॅडमन इंग्लंडहून ऑस्ट्रेलियांत परतल्यावर त्यांचें टोलेजंग स्वागत झालें. एक तर ते आतां निवृत्त होणार होते अन् इंग्लंडचा धुव्वा उडविण्यांत त्यांनीं दाखविलेलें कर्तृत्वहि असामान्य होतें. तेव्हां हा सत्कार समयोचितच होता.

साऊथ ऑस्ट्रेलियन क्रिकेट असोसिएशननें ब्रॅडमन यांच्या मोठ्या सत्काराची योजना आंखली. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ( Testmonial ) एक जंगी सामना या असोसिएशननें ठरविला. हा सामना मेलबोर्न मैदानावर होणार होता. इंग्लंड दौऱ्यावर गेलेले खेळाडूहि या सामन्यांत भाग घेणार होते. ब्रॅडमन स्वतःहि या सामन्यांत खेळले. त्यावेळीं पन्नास हजार प्रेक्षक उपस्थित होते.

ब्रॅडमन खेळावयास निघाले तेव्हां प्रेक्षकांनीं त्यांना टाळ्यांची सलामी दिली. त्यांनीं ९७ धांवा केल्या. शतक होण्यास त्यांना तीन धांवा हव्या होत्या. त्याच वेळीं त्यांचा झेल उडाला. पण तो मॅकूलच्या

हातांतून निसटला अन् मग त्यांचें शतक लागलें. ( १२३ ) या सामन्याचें उत्पन्न ९३४२ पौंड, १८ शिलिंग अन् ६ पेन्स आलें. त्या रकमेचा चेक ब्रॅडमनना देण्यांत आला.

१ जानेवारी १९४९ रोजीं ब्रॅडमन यांच्या क्रिकेट सेवेच्या प्रित्यर्थ इंग्लंडच्या राज्यकर्त्यांनीं त्यांना ' नाइटहुड ' म्हणजे ' सर ' पदवी देऊन त्यांचा असामान्य गौरव केला. निवृत्त होण्यापूर्वी वयाच्या चाळिशींत असतांना खेळाडूला असा मान प्रथमच मिळत होता. जॅक हॉब्सलाहि ' सर ' पदवी मिळाली होती, पण तो निवृत्त झाल्यानंतर सुमारें वीस वर्षांनीं, १९५३ सालीं मिळाली. सर पदवी मिळाली तेव्हां ब्रॅडमनना ' सर डॉन ' म्हणावें कीं ' सर डोनॉल्ड ' म्हणावे असा गंमतीचा वाद सुरू झाला; तेव्हां त्यांना ' सर डोनॉल्ड ' म्हणावें असें ' लेडी ब्रॅडमननीं ' ठासून सांगितल्यावर हा मजेदार वाद मिटला.

फेब्रुवारी १९४९ मध्यें ब्रॅडमननीं ओल्डफील्ड किपॅक्स स्मृतिप्रित्यर्थ झालेल्या सामन्यांत भाग घेऊन ५३ धांवा काढल्या. त्यांचें क्रिकेट जीवन आतां स ुष्टात येत चाललें होतें. पण अजून एक सामना खेळा-यचा होता.

ऑर्थर रिचर्डसनच्या स्मृतिप्रित्यर्थ एक सामना ठेवण्यांत आला होता. ब्रॅडमन दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे त्यावेळीं व्हिक्टोरिया विरुद्ध खेळले. त्यावेळीं त्यांनीं ३० धांवा केल्या. दुसऱ्या डावांत घसघशीत धांवा करून आपल्या अखेरच्या सामन्यांतहि धांवांचा डोंगर रचण्याचा त्यांचा मनसुबा होता. पण दैवानें त्यांना झुकांडी दिली. कारण क्षेत्ररक्षण करीत असतांना दुखापत झाल्यानें त्यांना पुन्हां खेळण्याची संधि लाभली नाहीं. अखेरच्या सामन्यांत ड्रेसिंगरूममध्यें हात चोळीत बसण्याखेरीज त्यांना दुसरा उपाय नव्हता. अव्वल दर्जाच्या सामन्यांत त्यांनीं शतक काढूनच ( ११८ ) पदार्पण केलें. पण अखेरच्या सामन्यांत त्यांना अवघ्या ३० धांवांवरच आपली हौस भागवावी लागली. धांवांची बेसुमार हांव

असलेल्या ब्रॅडमन यांच्यावर क्रिकेट नियतीनें केलेला हा मोठाच आघात होय.

क्रीडा क्षेत्रांत जसें वय वाढत जातें, तशी प्रगती खुंटत जाते खेळाडूचें कौशल्य अस्तंगत होत जातें. म्हणून शहाणे खेळाडु योग्य वेळीं निवृत्त होण्याची समयज्ञता दाखवितात. ब्रॅडमन हे अशा शहाण्या खेळाडूंपैकीं एक होत. निवृत्त कधीं व्हायचें त्याचें तारतम्य खेळाडूला राहिलें नाहीं तर वयपरत्वें त्याला सक्तीनें निवृत्त केलें जाऊन ( हवें तर संघातून गचांडी देऊनहि ) त्याचें हंसें होतें. ब्रॅडमन यांना त्याची जाणीव होती. अन् म्हणून चाळिशीच्या घरांत आल्यावर, आपल्या फलंदाजीतील नैपुण्य कमी झालें नसूनहि त्यांनीं क्रिकेट खेळाला रामराम ठोकला. त्याबद्दल प्रा. देवधरांनीं काढलेले उद्‌गार मननीय आहेत. ‘ उत्तम क्रिकेट कसें खेळाल ? ’ या आपल्या ग्रंथात त्यांनीं पुढील भाष्य ब्रॅडमन यांच्याबद्दल केलें आहे : “ १९३० पासून १९४८ पर्यंत अव्याहत तो क्रिकेटक्षेत्रांत तळपत होता व निस्तेज होऊन, अस्ताला जाण्यापूर्वीच १९४८ मध्ये आपण होऊन निवृत्त झाला. पराक्रमाच्या व कीर्तीच्या शिखरावर असतांना, आपला आवडता खेळ सोडण्यांत, त्याचा मनावर जो ताबा दिसला, तो कौतुकास्पद होता. ” सामन्यांत जसे ब्रॅडमननीं विजय मिळविले तसाच विजय त्यांनीं मनावरहि मिळविला होता. अन् म्हणूनच योग्यवेळी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा शहाणपणा त्यांनीं दाखविला.

रणजी पन्नाशींपर्यंत खेळत होते. ग्रेस तर साठी उलटल्यावरहि खेळतच होता. हॉब्सहि पन्नाशी पर्यंत खेळत होता. हॅमंड ४३ वर्षांचा होईपर्यंत खेळत होता. पण या सर्व खेळाडूंचा बहर अखेरी अखेरीस ओसरला होता ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. ब्रॅडमननीं आपल्या फलंदाजीचा बहर कायम असतानाच ४० व्या वर्षी क्रिकेटचा निरोप घेतला ही घटना त्यांच्या चारित्र्याला साजेशी आहे.

१९३८ सालापासून ते १९४८ सालापर्यंत २० वर्षे ब्रॅडमन यांच्या

पराक्रमानें क्रिकेट क्षेत्र उजळून निघालें. वीस वर्षें त्यांचा कीर्तिसूर्य क्रिकेट क्षितिजावर तळपत होता. पण त्यांच्या जीवनाची सायंकाळ आतां आली होती. मन अन् उत्साह, टवटवीत असला तरी शरीर थकणार होतें. त्याची त्यांना जाणीव होती. अन् म्हणून आपलें पराक्रमी क्रिकेट पर्व समाप्त करण्याचा उचित निर्णय त्यांनीं घेतला.

ब्रॅडमन यांच्या या निर्णयाबद्दल प्रा. देवधरांचें भाष्य मार्मिक आहे, तें असें : ( रसरंग, ब्रॅडमन विशेषांक, ३० ऑगस्ट १९५८ ) " कीर्तीच्या अशा उच्च शिखरावर असतांनाच, सूर्याप्रमाणें क्रिकेट क्षितिजावर अस्तंगत होण्यांत, त्याची समयसूचकता त्याच्या खेळाप्रमाणें विशेष उठून दिसली " देवधरांचे हे उद्‌गार यथातथ्य आहेत. ब्रॅडमन यांच्या निवृत्तीनें ' ब्रॅडमन युग ' समाप्त झालें. त्यांचा पराक्रम खरोखर सूर्यासारखा तेजस्वी होता. त्यांची निवृत्ति ही सूर्यास्तासारखी भासली अन् आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें त्यामुळें जी पोकळी निर्माण झाली ती भरून येण्यास बराच कालावधि लोटावा लागला. १९२८ सालीं त्यांचा उदय हा सूर्योदय मानला तर १९४८ सालीं त्यांची निवृत्ति हा सूर्यास्त मानावा लागेल. क्रिकेट इतिहासाची साक्ष अशीच आहे, अभिप्राय हाच आहे.

# १७

# विश्वविख्यात क्रिकेटपटु : सर डोनॉल्ड ब्रॅडमन

विसाव्या शतकांत विविध क्षेत्रांत ज्या व्यक्ति आपल्या कर्तृत्वामुळें विशेष गाजल्या, त्या व्यक्तींच्या पंगतींत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्यें दिगंत कीर्ती मिळविणाऱ्या सर डोनॉल्ड ब्रॅडमननाप्रमुख स्थान द्यावें लागेल.

कुस्तींत गामा, हॉकींत ध्यानचंद, मुष्टीयोद्धयांत जो लुई, ऑलेंपिक स्पर्धेतला जेसी ओवेन, शरीरसौष्ठवांत युजीन सँडो अन् शारीरिक क्षेत्रांतल्या मॅकफिड्न यांच्याप्रमाणेंच ब्रॅडमननीं अमाप लोकप्रियता अन् कीर्ती क्रिकेट क्षेत्रांत मिळविली. तसा लौकिक कुणाहि क्रिकेटपटूच्या वांट्याला आला नाहीं.

ब्रॅडमननीं आपल्या क्रिकेट कारकीर्दींत फलंदाजींत अनेक नवे उच्चांक निर्माण केल्यामुळें ट्रंपर, मॅकार्टनें, पॉन्सफोर्ड, डॉ. ग्रेस अन् हॉब्स या ऑस्ट्रेलिया-इंग्लंडच्या रथीमहारथींचें कर्तृत्व त्यांच्यापुढें कमी ठरलें-थिटें भासूं लागलें. ज्ञानेश्वरांनीं जशी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली, शिवाजीनें जसें सोळाव्या वर्षी तोरणा किल्ल्यावर स्वातंत्र्याचें निशाण

रोवलें, त्याचप्रमाणें ब्रॅडमननाहि विशी-एकविशींत असतांनाच त्रिखंड कीर्ती मिळाली.

रामाचा बाण, अर्जुनाचें गांडीव धनुष्य, हनुमंताची गदा अगर इंद्राच्या वज्रांत जशी असामान्य शक्ति होती तसेंच बळ ब्रॅडमन यांच्या बॅटींत होतें. त्यांच्या एकट्याच्या पराक्रमामुळें ऑस्ट्रेलियन संघ आंतरराष्ट्रीय लढतींत जवळ जवळ वीस वर्षें अग्रेसर होता ही गोष्ट त्यांचा पराक्रम सिद्ध करण्यास पुरी आहे. अर्जुनाच्या रथावरील मारुती उतरून गेल्यानंतर त्याचा रथ धाडकन् कोसळला अशी एक कथा महाभारतांत आहे. ब्रॅडमन यांच्या क्रिकेटमधील अवतारसमाप्तीनंतर ऑस्ट्रेलियन संघाच्या शौर्यालाहि उतरती कळा लागली, त्यांच्या तोडीचा फलंदाज त्या संघांत त्यांच्यानंतर झाला नाहीं. त्यांची निवृत्ति ऑस्ट्रेलियन संघाला तीव्रपणें जाणवली. इंग्लंडमधले क्रिकेट प्रेमिकहि त्यांना विसरूं शकले नाहींत. इंग्लंडमधल्या वर्तमानपत्राच्या चालकांनीं अमाप पैसा देऊन टेस्ट मोहिमेवर लेखमाला लिहिण्यास त्यांना पाचारण केलें. डॉ. ग्रेस अन् हॉब्सप्रमाणें क्रिकेटमध्यें त्यांनीं एक वेगळेंच युग निर्माण केलें. त्यांच्यासारखा क्रिकेटपटु शतकांत एखादाच होतो. अन् म्हणून त्यांची गणना युगप्रवर्तक क्रिकेटपटूंत केली जाते.

सामन्यांत भाग घेत असतांना त्यांची प्रकृति नेहमीं उत्तम असे. जागरणें ते कटाक्षानें टाळीत. टेस्ट सामन्यापूर्वीं आदल्या दिवशीं मेजवानीचीं निमंत्रणें ते बहुधा टाळीत. हेतु हा कीं, जडान्न सेवनाचा परिणाम खेळावर न व्हावा. टेस्ट सामने चालू असतांना ते आपली भूक चहा-पावावरच भागवीत. एकदां व्हिटिंग्टन नांवाच्या क्रिकेटरनें उपाहाराच्या वेळीं त्यांना न्याहारीसाठीं बोलाविलें. तेव्हां ब्रॅडमन त्याला म्हणाले : " नको, मी माझा खाना इथेंच मागवला आहे, मला जेव्हां मध्यंतरानंतर खेळायचें असेल तेव्हां मी फक्त पाव, फळें व कमी भुकटी घातलेला चहाच घेतों. " मद्य ते घेत नसत अन् धूम्रपानहि करीत नसत.

क्वचित् कधीं घेतली तर मौजेनें बीअर ते घेत.

ब्रॅडमननीं क्रिकेटचा अभ्यास सर्वांगीण केला आहे. पंचाची परीक्षा त्यांनीं दिली त्याचा वृत्तांत मागें आलाच आहे. नवीन ज्ञान संपादन करण्याची त्यांना जबर हौस असे. १९३० सालीं ते इंग्लंडात आले तेव्हां प्रसिद्ध क्रिकेट लेखक नेव्हिल कार्डस् याजकडून कांहीं पुस्तकांची यादी त्यांनीं मागून घेतली अन् दौरा चालू असतांनाहि तीं सर्व पुस्तकें मिळवून त्यांनीं वाचूनहि काढलीं. या साध्या गोष्टींत जशी त्यांची एकाग्रता दिसून येते, तशीच एकाग्रता क्रीडांगणावरहि त्यांच्या अंगांत बाणलेली असे. त्यांच्या खेळांत विशिष्ट धोरण नि ध्येय असे. आत्मविश्वासहि त्यांना विलक्षण असे. एकदां नेव्हिल कार्डसनें त्यांना म्हटलें : " बाबारे, तुझ्या यशाची गुरुकिल्ली कोणती ? " त्यावर ते म्हणाले : " एकाग्रता. माझ्या धांवा शून्य झाल्या अगर दोनशें झाल्या असल्या तरी प्रत्येक चेंडू हा पहिलाच चेंडू आहे अशी सावधगिरी बाळगूनच मी खेळतों. मला कुणी बाद करील अशा भीतीचे काजवे माझ्या डोळ्यांसमोर कधींच उभे रहात नाहींत. "

ब्रॅडमन यांच्या यशाची मीमांसा प्रा. दि. ब. देवधरांनीं पुढीलप्रमाणें केली आहे :

" ब्रॅडमन यानें फलंदाज व संघनायक म्हणून जे अनेक पराक्रम गाजविले, अपूर्व कीर्ती मिळविली व एकामागून एक उच्चांक प्रस्थापित केले त्याची कांहीं ठळक कारणें शोधून काढणें बोधप्रद ठरेल. त्यांपैकीं काहीं अशीं सांगतां येतील.—"

" नियमित राहणीनें व सतत व्यायाम व खेळानें त्यानें उत्तम तन्दुरुस्ती ठेवली होती. शरीरयष्टि अत्यंत काटक, चपळ, सुदृढ ठेवली होती म्हणूनच न दमतां, पांच तासांच्या अवधींत एकट्यालाच तीनशेंवर धांवा रचण्याचा विक्रम त्याला मोठ्या सामन्यांत करतां आला. "

" उत्तम फलंदाजाला जी अत्यंत तीक्ष्ण दृष्टि लागते, ती उत्तम

आरोग्यामुळें त्याला लाभलेली होती. शिवाय डोळे, मेंदू व शरीराचे इतर अवयव यांच्यांत जो अचूक सहकार व संघशक्ति लागते ती त्यानें कमावली होती."

"खेळाडूंच्या यशाला कांहीं मानसिक गुणहि आवश्यक असतात. मुख्य म्हणजे मनाची एकाग्रता व स्थिरता. कितीहि धोक्याचा प्रसंग असला तरी या गुणांमुळें मनुष्य गडबडून जात नाहीं. मोठ्या सामन्यांत उतरतांना जी अनेकांची गाळण उडते, ती ब्रॅडमनच्या बाबतींत क्वचितच्च दिसून येई. तो नेहमीं शांतपणें आखाड्यांत उतरत असे."

"मोठ्या सामन्याच्या वेळीं व तत्पूर्वी कांहीं दिवस जाग्रणें, समारंभ, सहली, भेटी व गप्पा यांत आपल्या सामर्थ्याचा अपव्यय तो कधींहि करीत नसे, लोकांत व मित्रांत अशा वेळीं तो मिसळत नसल्यानें, गर्विष्ठ व एकलकोंडा म्हणून त्याच्यावर पुष्कळ टीकाहि होत असे. पण सर्व शक्तीचा संचय करतांना त्यानें सर्व टीका सहन केली. आपल्या आत्मचरित्रांत त्यानें या लोकापवादाला उत्तर दिलें आहे तें प्रत्येक मोठ्या खेळाडूला पटण्याजोगें आहे."

"निर्व्यसनीपणाचें व्रतहि त्यानें कटाक्षानें पाळल्याचें दिसेल. भारतीय खेळाडू १९४७ सालीं ऑस्ट्रेलियाच्या सफरीवर असतांना, मला व आमच्या खेळाडूंना त्याची राहणी जवळून पाहतां आली. धूम्रपान करतांनाहि आम्हीं त्याला कधीं पाहिलें नाहीं. मग इतर व्यसनांची गोष्ट दूरच. खेळासाठीं कोणताहि त्याग करण्याची त्याची तयारी दिसून येई."

"थोड्या यशानें कित्येकांचीं डोकीं फिरतात व तेथेंच त्यांची घसरगुंडी सुरू होते. पण ब्रॅडमननें केवढेहि व कितीहि मोठे उच्चांक केले, तरी त्याच्या मनाचा व वागणुकीचा संयम सुटला नाहीं."

"त्याची महत्त्वाकांक्षा दांडगी होती व तिच्या सिद्धयर्थ सतत प्रयत्न व कष्ट करण्याची त्याची तयारी असे. स्वतःच्या तीनशेंपेक्षां

जास्त धांवा झाल्या तरी, त्याचें समाधान होत नसे व आपलें धांवांचें यंत्र तो चालूंच ठेवीत असे. अशी कठोरता, खेळाडूवृत्तीविरुद्ध आहे अशी निंदा प्रतिपक्षी मनांतून करीत. पण क्रीडांगण हें एक प्रकारचें रणांगण असून, तेथें दया क्षमा वगैरे भावनांना स्थान नाहीं व अशी भावना ठेवल्याशिवाय खेळांत उच्च कौशल्य व प्रगति शक्य नाहीं अशी त्याची खात्री होती." (रसरंग साप्ताहिक, ब्रॅडमन गौरव अंक, ३०-८-१९५८)

ब्रॅडमन यांच्या आत्मविश्वाससंबंधीं एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. हुकर नांवाच्या एका क्रिकेटपटूला फलंदाज खेळण्यास निघाला कीं, सदिच्छा अन् शुभेच्छा व्यक्त करण्याचा छंद होता. बहुतेक बॅटस्मन 'थँक्स' असें म्हणून पुढें सटकत. ब्रॅडमन एकदां खेळावयास निघतांना, नेहमींच्या संवयीप्रमाणें हुकरनें त्यांचें शुभ चिंतिलें. त्यावेळीं नुसते आभार मानून ते पुढें गेले नाहींत. ते त्याला म्हणाले: "हे बघ, आतां बारा वाजून पांच मिनिटें झालीं आहेत. उपहाराला अजून ७० मिनिटें आहेत. म्हणजे मला ६० धांवा सहज मिळतील अन् चहा-पानापर्यंत २०० च्या घरांत मी सहज जाईन." त्यांनीं म्हटल्याप्रमाणें उपाहारापर्यंत ६० नि चहाच्या वेळेपर्यंत २०० धांवा करून हुकरच्या शुभेच्छा सार्थकीं लावल्या. धांवा काढण्यापुरते ते क्रिकेटमधले बृहस्पतीच होते म्हणा ना! त्यांच्या ऐन उमेदींत उपाहारापर्यंत किती धांवा करूं, चहापानापर्यंत आपण किती मजल मारूं अन् एक दिवस टिकाव धरूं कीं दोन दिवस, अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या डोक्यांत घोळत असत. ९० धांवा झाल्यावर १०० धांवांपर्यंतच्या मधल्या वेळांत ते गलीतधैर्य कधींच होत नसत– केवळ शतकावर त्यांची भूक कधींच भागत नसे.

१९३० सालच्या दौऱ्यावरून आल्यानंतर त्यांच्या नांवाचा उपयोग करून ब्रॅडमन बॅटी, ब्रॅडमन हॅटस्, ब्रॅडमन बुट्स, ब्रॅडमन ग्लोव्हज् नि

आरोग्यामुळें त्याला लाभलेली होती. शिवाय डोळे, मेंदू व शरीराचे इतर अवयव यांच्यांत जो अचूक सहकार व संघशक्ति लागते ती त्यानें कमावली होती. ”

“ खेळाडूंच्या यशाला कांहीं मानसिक गुणहि आवश्यक असतात. मुख्य म्हणजे मनाची एकाग्रता व स्थिरता. कितीहि धोक्याचा प्रसंग असला तरी या गुणांमुळें मनुष्य गडबडून जात नाहीं. मोठ्या सामन्यांत उतरतांना जी अनेकांची गाळण उडते, ती ब्रॅडमनच्या बाबतींत क्वचितच दिसून येई. तो नेहमीं शांतपणें आखाड्यांत उतरत असे. ”

“ मोठ्या सामन्याच्या वेळीं व तत्पूर्वी कांहीं दिवस जाग्रणें, समारंभ, सहली, भेटी व गप्पा यांत आपल्या सामर्थ्याचा अपव्यय तो कधींहि करीत नसे, लोकांत व मित्रांत अशा वेळीं तो मिसळत नसल्यानें, गर्विष्ठ व एकलकोंडा म्हणून त्याच्यावर पुष्कळ टीकाहि होत असे. पण सर्व शक्तीचा संचय करतांना त्यानें सर्व टीका सहन केली. आपल्या आत्मचरित्रांत त्यानें या लोकापवादाला उत्तर दिलें आहे तें प्रत्येक मोठ्या खेळाडूला पटण्याजोगें आहे. ”

“ निर्व्यसनीपणाचें व्रतहि त्यानें कटाक्षानें पाळल्याचें दिसेल. भारतीय खेळाडू १९४७ सालीं ऑस्ट्रेलियाच्या सफरीवर असतांना, मला व आमच्या खेळाडूंना त्याची राहणी जवळून पाहतां आली. धूम्रपान करतांनाहि आम्हीं त्याला कधीं पाहिलें नाहीं. मग इतर व्यसनांची गोष्ट दूरच. खेळासाठीं कोणताहि त्याग करण्याची त्याची तयारी दिसून येई. ”

“ थोड्या यशानें कित्येकांचीं डोकीं फिरतात व तेथेंच त्यांची घसरगुंडी सुरू होते. पण ब्रॅडमननें केवढेहि व कितीहि मोठे उच्चांक केले, तरी त्याच्या मनाचा व वागणुकीचा संयम सुटला नाहीं. ”

“ त्याची महत्त्वाकांक्षा दांडगी होती व तिच्या सिद्ध्यर्थ सतत प्रयत्न व कष्ट करण्याची त्याची तयारी असे. स्वतःच्या तीनशेंपेक्षां

जास्त धांवा झाल्या तरी, त्याचें समाधान होत नसे व आपलें धांवांचें यंत्र तो चालूंच ठेवीत असे. अशी कठोरता, खेळाडूवृत्तीविरुद्ध आहे अशी निंदा प्रतिपक्षी मनांतून करीत. पण क्रीडांगण हें एक प्रकारचें रणांगण असून, तेथें दया क्षमा वगैरे भावनांना स्थान नाहीं व अशी भावना ठेवल्याशिवाय खेळांत उच्च कौशल्य व प्रगति शक्य नाहीं अशी त्याची खात्री होती." (रसरंग साप्ताहिक, ब्रॅडमन गौरव अंक, ३०-८-१९५८)

ब्रॅडमन यांच्या आत्मविश्वासासंबंधीं एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. हुकर नांवाच्या एका क्रिकेटपटूला फलंदाज खेळण्यास निघाला कीं, सदिच्छा अन् शुभेच्छा व्यक्त करण्याचा छंद होता. बहुतेक बॅटस्मन 'थँक्स' असें म्हणून पुढें सटकत. ब्रॅडमन एकदां खेळावयास निघतांना, नेहमींच्या संवयीप्रमाणें हुकरनें त्यांचें शुभ चिंतिलें. त्यावेळीं नुसते आभार मानून ते पुढें गेले नाहींत. ते त्याला म्हणाले: "हे बघ, आतां बारा वाजून पांच मिनिटें झालीं आहेत. उपहाराला अजून ७० मिनिटें आहेत. म्हणजे मला ६० धांवा सहज मिळतील अन् चहा-पानापर्यंत २०० च्या घरांत मी सहज जाईन." त्यांनीं म्हटल्याप्रमाणें उपाहारापर्यंत ६० नि चहाच्या वेळेपर्यंत २०० धांवा करून हुकरच्या शुभेच्छा सार्थकीं लावल्या. धांवा काढण्यापुरते ते क्रिकेटमधले बृहस्पतीच होते म्हणा ना! त्यांच्या ऐन उमेदींत उपाहारापर्यंत किती धांवा करूं, चहापानापर्यंत आपण किती मजल मारूं अन् एक दिवस टिकाव धरूं कीं दोन दिवस, अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या डोक्यांत घोळत असत. ९० धांवा झाल्यावर १०० धांवांपर्यंतच्या मधल्या वेळांत ते गलीतधैर्य कधींच होत नसत– केवळ शतकावर त्यांची भूक कधींच भागत नसे.

१९३० सालच्या दौऱ्यावरून आल्यानंतर त्यांच्या नांवाचा उपयोग करून ब्रॅडमन बॅटी, ब्रॅडमन हॅटस्, ब्रॅडमन बुट्स, ब्रॅडमन ग्लोव्हज् नि

ब्रॅडमन पॅड्स् इत्यादि क्रिकेटला लागणारीं आयुधें तयार करून अनेक व्यापाऱ्यांनीं खोऱ्यांनीं पैसा मिळविला. ब्रॅडमन यांच्या नाममहिम्याची जादू ही अशी होती. ते क्रिकेट खेळत होते तोंपर्यंत त्यांची ही लोकप्रियता कधीं कमी झाली नाहीं. पुढें एकदां त्यांना एका बॅटीच्या कारखानदारानें बॅटींवर स्वाक्षऱ्या करण्यास बोलाविलें. हेतु हा कीं त्यांच्या नांवामुळें बॅटींचा खप व्हावा. या प्रसंगीं त्यांच्या एकाग्रतेचें उत्कृष्ट दर्शन घडलें. फुरसत झाली कीं येईन असें त्यांनीं त्या कारखानदाराला आश्वासन दिलें. तेव्हां तो गृहस्थ मोठ्या अदबीनें म्हणाला : " त्या कामासाठीं तुमचे दोन दिवस तरी मोडतील." त्यावेळीं ते कांहींच बोलले नाहींत. एके दिवशीं सकाळींच ते त्या बॅटींच्या कारखान्यांत आले. नऊ वाजल्यापासून त्यांनीं बॅटींवर स्वाक्षऱ्या करण्यास सुरुवात केली अन् संध्याकाळपर्यंत सर्व बॅटींवर सह्या करून ते उठले. दरम्यान चहा घेण्यास वेळ फुकट गेला असेल तेवढाच. अशीच एकाग्रता अन् सातत्य फलंदाजी करतांना ते नेहमीं बाळगीत असल्यानें त्यांना धांवांचे डोंगर रचतां आले. अर्जुनाला जसा पोपटाचा डोळाच दिसत होता, त्याप्रमाणेंच कमींत कमी वेळांत जास्तींत जास्त धांवा काढण्यावर त्यांची नजर खिळलेली असे.

ब्रॅडमन यांच्या कारकीर्दीचें समालोचन करतांना नेव्हिल कार्डस् या प्रसिद्ध इंग्लिश लेखकानें आपल्या 'ऑस्ट्रेलियन समर' या ग्रंथांत पुढीलप्रमाणें मार्मिक विचार प्रकट केले आहेत : " ब्रॅडमन सबंध दिवस खेळत राहिला कीं त्याच्या संघाची पराभवापासून सुटका झाली असें निश्चित समजावें. सामना हमखास जिंकण्यांत त्याचा हातखंडा होता. तो खेळत असला कीं वृद्ध अन् तरुण, गुणज्ञ अन् गांवढळ लोकांची त्याचा खेळ पहाण्यासाठीं थाप लागलेली असे." एका इंग्लिश इसमानें निसारी हयात क्रिकेट विषयावर लेखन करण्यांत घालविलेल्या रसिक अन् मर्मज्ञ टीकाकारानें ब्रॅडमन यांच्यासंबंधीं केलेलें हें भाष्य पाहिलें कीं

त्यांच्या पराक्रमाची महती ध्यानांत येतें.

समकालीन क्रिकेटपटूंत ब्रॅडमन फारसे लोकप्रिय नव्हते. त्यांना चाहते खूप पण मित्र कमी. याचें कारण त्यांचा एकलकोंडा स्वभाव हेंच सांगतां येईल. खेडेगांवांतून ते क्रिकेट खेळण्यास आले म्हणून त्यांची प्रथम उपेक्षाच झाली–हेटाळणीहि झाली. हें शल्य त्यांच्या मनांतून कधीं गेलें नाहीं. तशांत त्यांचा स्वभाव बोलका नाहीं. घुमाच म्हणा ना. विशी उलटल्यावर लागलीच त्यांनीं ४५२ धांवांचा जागतिक उच्चांक केल्यानें लहानपणींच त्यांना अफाट कीर्ति मिळाली. अर्थातच त्यांचे समकालीन त्यांच्याशीं घसट करण्याचा– स्नेह वाढविण्याचा प्रयत्न करीत. पण अबोल स्वभावामुळें मित्रमंडळींत मिसळण्याची अगर चारचौघांत बसून दिलखुलासपणें गप्पा मारण्याची हौस अगर कला त्यांच्या अंगीं अजिबात नव्हती. त्यामुळें बरोबरीच्या क्रिकेटपटूंशीं ते समरस होत नसत. म्हणून त्यांना आपल्या फलंदाजींतील पराक्रमाचा मोठा गर्व आहे अशी भावना त्यांच्या बरोबरीच्या क्रिकेटपटूंत निर्माण झाली. तसा समज होण्यास एक तात्कालिक कारणहि घडलें.

१९३० सालीं ब्रॅडमननीं इंग्लंडांत टेस्ट सामन्यांत ३३४ धांवांचा उच्चांक केला तेव्हां एका गृहस्थानें त्यांना हजार पौंडाची बक्षिसी दिल्याची हकीगत मागें आलीच आहे. या उच्चांकानंतर ते फक्कडशी मेजवानी देतील अशी त्यांच्या तेव्हांच्या सहकारी खेळाडूंची कल्पना. पण ब्रॅडमन पडले मुलखावेगळे ! ते एकांतात स्वरमुद्रिकाच लावीत बसले. त्यामुळें त्यांचे समकालीन त्यांच्यावर रुष्ट झाले. अबोल स्वभावामुळें त्यांच्या मनाचा थांगपत्ता लागत नसे अन् त्यामुळें बरोबरीच्या खेळाडूंना त्यांच्याशीं समरस होणें कठीण जाई. १९३० च्या ३३४ च्या उच्चांकावर ते स्वरमुद्रिका लावीत बसले या टीकेवर त्यांनीं आपल्या 'फेअरवेल टू क्रिकेट' या आत्मचरित्रांत पुढील उद्गार काढले आहेत : "मी त्यावेळीं मिरवणूक काढून लीडसच्या रस्त्यांवरून

मिरवावें अशी त्यांची अपेक्षा होती काय ? मला शीण घालवायचा होता अन् गायन ही त्यावर उत्तम औषधी आहे अशी माझी भावना होती. एखाद्या गाणाऱ्याला तसें नाहीं वाटणार पण मला वाटतं."

खेळांतल्या इतर बारीक सारीक बाबतींकडेहि ब्रॅडमन गंभीर वृत्तीनें पहात त्यामुळें इतर खेळाडू त्यांच्यापासून दोन हात दूर रहात. बरोबरीच्या खेळाडूंशीं त्यांचें सौहार्द राहिलें नाहीं. १९३० सालीं इंग्लंडात ते क्षेत्ररक्षणाला बाहेर पडले तेव्हां 'हा नवखा रक्षक कोण बुवा ?' असा टोमणा मारण्यास त्यांच्या सहकाऱ्यांनीं कमी केलें नाहीं. ते सहकाऱ्यांशीं मिसळत नसत ही गोष्ट खरी असली तरी त्यांच्या झंझावाती विक्रमांनीं त्यांच्या बरोबरीच्या खेळाडूंत त्यांच्याविषयीं असूया निर्माण झाली ही गोष्टहि खोटीं मानतां येणार नाहीं.

१९४८ सालीं लॉर्डस क्रीडांगणावर १५० धांवा काढून त्या क्रीडांगणाचा अखेरचा निरोप घेतांना ब्रॅडमनना बघण्यासाठीं मैदानावर प्रेक्षकांची एकच झुंबड उडाली होती. त्यांना हातांची सलामी देण्याची प्रेक्षकांना उत्कंठा होती– आतुरता होती. त्यांनीं पॅव्हेलियनच्या सज्जांत येऊन दर्शन द्यावें, थोडा हास्यविनोद करावा अशी रसिकांची अपेक्षा. पण क्रिकेटप्रेमिकांचा हा साधा हट्टहि त्यांनीं पुरविला नाहीं अन् ते बाहेरहि आले नाहींत. याचा अर्थ त्यांना अहंकार होता असें नव्हे पण गर्दीशीं समरस होण्यास जी वृत्ति लागते तिचा त्यांच्यात अभाव होता. अन् म्हणून त्यांच्या या स्वभावामुळें प्रेक्षकांचाहि फार विरस होई.

एकदां एका पत्रविक्या पोऱ्यानें ब्रॅडमनना ओळखलें अन् तो त्यांच्याशीं बोलण्याचा प्रयत्न करूं लागला. पण त्यांनीं त्याला मुळींच ओळख दिली नाहीं. उलट ते त्याला म्हणाले : "ब्रॅडमन आतां वृद्ध झाला असून, त्याला आतां चष्मा लावावा लागतो." या उत्तरानें त्या पोऱ्याचें समाधान झालें नाहीं पण तो पुरा खजिल झाला. बोलका

स्वभाव, विनोदी वृत्ति, संभाषणचातुर्य अन् बरोबरीच्या खेळाडूंशीं नि अपरिचितांशीं दिलखुलासपणें वागण्याचा खेळाडुपणा त्यांच्या ठायीं मुळींच नसल्यानें क्रिकेटपटु म्हणून त्यांना जेवढी लोकप्रियता लाभली तितका लौकिक क्रिकेटक्षेत्राबाहेर अन् सार्वजनिक जीवनांत त्यांना लाभला नाहीं. क्रिकेटपटु ब्रॅडमनना त्रिखंड कीर्ति लाभली, साधे नागरिक अगर गृहस्थ म्हणून ते नेहमीं अप्रकाशित राहिले.

टीकाकारांच्या टीकेचें ब्रॅडमननीं नेहमींच स्वागत केलें. पण वैयक्तिक अगर शिवराळ स्वरूपाच्या टीकेकडे त्यांनीं नेहमींच दुर्लक्ष केलें. अशी टीका त्यांना झोंबे कारण त्यांचा स्वभाव संवेदनाक्षम अन् भावनाप्रधान आहे. विधायक टीकेबद्दल त्यांना नेहमींच आस्था वाटे. अशा टीका-कारांच्या टीकेमुळें आपणांस बरेंच शिकतां आलें असें मत त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत नमूद केलें आहे. नेव्हिल कार्डस्, जिम स्वॅटन, जॉनी मॉईज, ऑर्थर मेले अन् जॅक हॉब्स वगैरे टीकाकार त्यांच्या मर्जीतले असत.

ब्रॅडमनना धांवांची बेसुमार हांव होती असा टीकाकारांचा त्यांच्यावर मोठा आक्षेप होता. पॉन्सफोर्डलाहि धांवांची विलक्षण हांव होती ही गोष्टहि विसरून चालणार नाहीं. ब्रॅडमनना जास्तींत जास्त धांवा काढण्यांत आनंद वाटे ही गोष्ट खरी आहे. अर्थातच टीकाकारांच्या आक्षेपांतलें सत्य नाकारून चालणार नाहीं. पण पुष्कळदां ब्रॅडमन यांच्या खेळावर संघाची इभ्रत असल्यानें त्यांना धांवांचा हव्यास धरणें भागच होतें. किंबहुना तशी महत्त्वाकांक्षा त्यांनीं बाळगली म्हणूनच त्यांना धांवांचे डोंगर रचतां आले—त्रिखंड कीर्ति मिळवितां आली.

मैदानावर गोलंदाजांच्या बोलिंग प्रभुत्वावर त्यांना आदर असे तरी त्यांनीं त्यांची कधीं धास्ती घेतली नाहीं. आपली विकेट गलथानपणानें खेळून ते प्रतिपक्षाला कधींच देत नसत. गोलंदाजांवर ते हुकुमत गाजवीत त्याप्रमाणेंच टीकाकारांच्या टीकेलाहि ते कृतीनें उत्तर देत.

त्यासंबंधीं एक आठवण सांगण्यासारखी आहे.

एकदां ऑस्ट्रेलियाच्या आयर्नमाँगर नांवाच्या गोलंदाजानें ब्रॅडमनना बाद केलें. त्यासंबंधीं उभयतांविषयींचा लेख वृत्तपत्रांत आला होता अन् त्यांत आयर्नमाँगरची बरीच स्तुति करण्यांत आली होती. त्या टीकाकारानें ट्रंपर अन् मॅकार्टनेच्या मानानें, फलंदाजींत ब्रॅडमन कनिष्ठ भासतात असें म्हटलें होतें. ती टीका ब्रॅडमन यांच्या अवलोकनांत आलेली होती. एका सामन्याच्या वेळीं त्यांनीं त्या टीकेचा उल्लेख करून भोंवतालच्या मंडळींना म्हटलें : "आज बघा कशी मौज उडवून देतों ती !" बॅटिंगच्या वेळीं त्यांनीं पहिल्या चेंडूपासून टोलवाटोलवीस प्रारंभ केला. त्यावेळीं आयर्नमाँगरच त्यांना बोलिंग टाकीत होता. त्यांनीं त्या दिवशीं त्याची गोलंदाजी पुरी खिळखिळी करून टाकली. पॅव्हेलिअन मध्यें आल्यावर सभोंवतालच्या मंडळींना ते खेवचटपणें म्हणाले, "तो लेख कशाबद्दल आहे हो ?" या प्रश्नानें आजुबाजूची मंडळीं काय समजायचें तें समजली. नाहक टीका करणाऱ्या टीकाकारांच्या डोळ्यांत ते कृतीनें अंजन घालीत तें असें. एकाची स्तुति करायची म्हणजे दुसऱ्याची निंदा केलीच पाहिजे अशा तऱ्हेची टीका त्यांना पसंत नसे. खेळाडूंचें मूल्यमापन समतोल बुद्धीनें अन् उच्च पातळीवरून करावयास पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

ब्रॅडमन जरी उत्तम हिरवळीवर खेळण्यांत यशस्वी होत तरी ओलसर अगर चिकट हिरवळीवर ( Sticky ) त्यांची मात्रा चालत नसे असा आक्षेप टीकाकारांकडून घेण्यांत येतो. ट्रंपर, हॉब्स, हॅमंड, हेडले अगर हटन प्रमाणें ओलसर विकेटवर धांवा काढण्यांत त्यांना यश लाभलें नाहीं हें खरें. पण त्याला कारणेंहि आहेत. त्यांची उभी हयात कोरड्या हिरवळीवर खेळण्यांत गेली; त्यामुळें त्यावर त्यांचें प्रभुत्व असाधारण अन् असामान्य होतें. त्यामुळें ओलसर विकेटवर यशस्वीपणें खेळण्याचें कसब आत्मसात करण्याच्या भानगडींत ते कधींच पडले नाहींत. दहा

सामन्यांपैकीं फार तर दोन सामन्यांत ओलसर हिरवळीवर खेळावें लागतें असें प्रमाण धरलें तर ब्रॅडमन आठ डावांत धांवांची एवढी रास रचून ठेवीत कीं उरलेल्या ओलसर विकेटवरील सामन्यांत काळजीपूर्वक खेळण्याची दक्षता ते बहुधा घेत नसत. विशेषेंकरून इंग्लंडमध्येंच ओलसर अगर चिकट हिरवळीवर खेळण्याचा प्रसंग येतो. अशा परिस्थितींत इंग्लंडच्या चारहि दौऱ्यांत प्रत्येक सफरींत त्यांनीं दोन हजारांहून जास्त धांवा केल्या या वस्तुस्थितीकडे टीकाकार जाणूनबुजून डोळेझांक करतात.

ओलसर विकेटवर खेळण्याची कला ब्रॅडमनना अवगत नसली तरी नामांकित फलंदाजांच्या मानानें त्यांचा कस कमी ठरविणें न्यायाचें ठरणार नाहीं. ओलसर विकेटवर यशस्वी होणारे हॉब्स, हॅमंड, हटन नि हेडले हे फलंदाज उत्तम हिरवळीवर ब्रॅडमन यांच्याइतके कुठें यशस्वी झाले? याचा अर्थ त्यांना त्या विकेटवर खेळता येत नसे असें म्हणतां येणार नाहीं. चांगल्या हिरवळीवर आपण विपुल अन् मुबलक धांवा मिळवूं अशी ब्रॅडमनना खात्री असल्यानें ओलसर विकेटवर मन लावून खेळण्याविषयीं ते उदासीन असत. अशा विकेटवर खेळण्याचे श्रमहि त्यांनीं विशेष घेतल्याचें दिसून येत नाहीं.

युद्धकाळ वगळतां ब्रॅडमन जवळ जवळ वीस वर्षें क्रिकेट खेळत होते. एवढ्या दीर्घ काळांत त्यांचा फॉर्म कधीं ओसरला नाहीं. त्यांची भूक शतकांवर भागत नसे. द्विशतकाचा डोंगर पार झाला कीं तीनशेंच्या पल्ल्यावर त्यांची नजर भिरभिरत राही. अन् हा पल्ला त्यांनीं गांठला कीं कुणाचा तरी उच्चांक त्यांनी मोडलेला असे. क्रिकेट क्षेत्रांत पदार्पण केल्यावर थोड्याच वर्षांत तमाम क्रिकेटपटूंच्या उच्चांकाच्या ध्वजा आपल्या पराक्रमानें त्यांनीं खालीं आणल्या. ओलसर विकेटवर त्यांच्याहून जास्त चांगले खेळणारे फलंदाज अनेक होते. कुणाचें पदलालित्य (Foot work) त्यांच्याहून मनोहर होतें तर कुणाच्या बॅटिंगमध्यें

त्यासंबंधीं एक आठवण सांगण्यासारखी आहे.

एकदां ऑस्ट्रेलियाच्या आयर्नमाँगर नांवाच्या गोलंदाजानें ब्रॅडमनना बाद केलें. त्यासंबंधीं उभयतांविषयींचा लेख वृत्तपत्रांत आला होता अन् त्यांत आयर्नमाँगरची बरीच स्तुति करण्यांत आली होती. त्या टीका-कारानें ट्रंपर अन् मॅकार्टनेच्या मानानें, फलंदाजींत ब्रॅडमन कनिष्ठ भासतात असें म्हटलें होतें. ती टीका ब्रॅडमन यांच्या अवलोकनांत आलेली होती. एका सामन्याच्या वेळीं त्यांनीं त्या टीकेचा उल्लेख करून भोंवतालच्या मंडळींना म्हटलें : "आज बघा कशी मौज उडवून देतों ती !" बॅटिंगच्या वेळीं त्यांनीं पहिल्या चेंडूपासून टोलवाटोलवीस प्रारंभ केला. त्या वेळीं आयर्नमाँगरच त्यांना बोलिंग टाकीत होता. त्यांनीं त्या दिवशीं त्याची गोलंदाजी पुरी खिळखिळी करून टाकली. पॅव्हेलिअन मध्यें आल्यावर सभोंवतालच्या मंडळींना ते खवचटपणें म्हणाले, " तो लेख कशाबद्दल आहे हो ? " या प्रश्नानें आजुबाजूची मंडळी काय समजायचें तें समजली. नाहक टीका करणाऱ्या टीकाकारांच्या डोळयांत ते कृतीनें अंजन घालीत तें असें. एकाची स्तुति करायची म्हणजे दुसऱ्याची निंदा केलीच पाहिजे अशा तऱ्हेची टीका त्यांना पसंत नसे. खेळाडूंचें मूल्यमापन समतोल बुद्धीनें अन् उच्च पातळीवरून करावयास पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

ब्रॅडमन जरी उत्तम हिरवळीवर खेळण्यांत यशस्वी होत तरी ओलसर अगर चिकट हिरवळीवर ( Sticky ) त्यांची मात्रा चालत नसे असा आक्षेप टीकाकारांकडून घेण्यांत येतो. ट्रंपर, हॉब्स, हॅमंड, हेडले अगर हटन प्रमाणें ओलसर विकेटवर धांवा काढण्यांत त्यांना यश लाभलें नाहीं हें खरें. पण त्याला कारणेंहि आहेत. त्यांची उभी हयात कोरड्या हिरवळीवर खेळण्यांत गेली; त्यामुळें त्यावर त्यांचें प्रभुत्व असाधारण अन् असामान्य होतें. त्यामुळें ओलसर विकेटवर यशस्वीपणें खेळण्याचें कसब आत्मसात करण्याच्या भानगडींत ते कधींच पडले नाहींत. दहा

सामन्यांपैकीं फार तर दोन सामन्यांत ओलसर हिरवळीवर खेळावें लागतें असें प्रमाण धरलें तर ब्रॅडमन आठ डावांत धांवांची एवढी रास रचून ठेवीत कीं उरलेल्या ओलसर विकेटवरील सामन्यांत काळजीपूर्वक खेळण्याची दक्षता ते बहुधा घेत नसत. विशेषंकरून इंग्लंडमध्येंच ओलसर अगर चिकट हिरवळीवर खेळण्याचा प्रसंग येतो. अशा परिस्थितींत इंग्लंडच्या चारहि दौऱ्यांत प्रत्येक सफरींत त्यांनीं दोन हजारांहून जास्त धांवा केल्या या वस्तुस्थितीकडे टीकाकार जाणूनबुजून डोळेझांक करतात.

ओलसर विकेटवर खेळण्याची कला ब्रॅडमनना अवगत नसली तरी नामांकित फलंदाजांच्या मानानें त्यांचा कस कमी ठरविणें न्यायाचें ठरणार नाहीं. ओलसर विकेटवर यशस्वी होणारे हॉब्स, हॅमंड, हटन नि हेडले हे फलंदाज उत्तम हिरवळीवर ब्रॅडमन यांच्याइतके कुठें यशस्वी झाले ? याचा अर्थ त्यांना त्या विकेटवर खेळता येत नसे असें म्हणतां येणार नाहीं. चांगल्या हिरवळीवर आपण विपुल अन् मुबलक धांवा मिळवूं अशी ब्रॅडमनना खात्री असल्यानें ओलसर विकेटवर मन लावून खेळण्याविषयीं ते उदासीन असत. अशा विकेटवर खेळण्याचे श्रमहि त्यांनीं विशेष घेतल्याचें दिसून येत नाहीं.

युद्धकाळ वगळतां ब्रॅडमन जवळ जवळ वीस वर्षं क्रिकेट खेळत होते. एवढ्या दीर्घ काळांत त्यांचा फॉर्म कधीं ओसरला नाहीं. त्यांची भूक शतकांवर भागत नसे. द्विशतकाचा डोंगर पार झाला कीं तीनशेंच्या पल्ल्यावर त्यांची नजर भिरभिरत राही. अन् हा पल्ला त्यांनीं गांठला कीं कुणाचा तरी उच्चांक त्यांनी मोडलेला असे. क्रिकेट क्षेत्रांत पदार्पण केल्यावर थोड्याच वर्षांत तमाम क्रिकेटपटूंच्या उच्चांकाच्या ध्वजा आपल्या पराक्रमानें त्यांनीं खालीं आणल्या. ओलसर विकेटवर त्यांच्याहून जास्त चांगले खेळणारे फलंदाज अनेक होते. कुणाचें पदलालित्य (Foot work) त्यांच्याहून मनोहर होतें तर कुणाच्या बॅटिंगमध्यें

कलेचा अन् आकर्षकतेचा नोकझोंक जास्त होता. पण गोलंदाजाच्या बोलिंगची कुवत आधीं ओळखून, त्याच्या आत्मविश्वासाला सुरुंग लावण्यांत त्यांच्याशीं कुणालाहि बरोबरी करतां आली नाहीं. "आम्हां सर्वांपेक्षां सहा फूट आधीं, डॉनला चेंडूचें दर्शन घडे" असे उद्गार पॉन्सफोर्डनें त्यांच्याबद्दल काढले आहेत.

गोलंदाजांची अचूक अन् पल्लेदार गोलंदाजी ब्रॅडमन पुढें येऊन बडवूं लागले कीं बोलरच्या आत्मविश्वासाचे बुरुज ढासळूं लागत अन् क्षेत्र-रक्षकांचा व्यूहहि उधळला जाई. त्यांच्या धांवांची घोडदौड सुरू झाली कीं गोलंदाजांचे अवसान गळून जाई अन् प्रतिपक्षाचे कर्णधार किंकर्तव्य-मूढ बनत. क्षेत्ररक्षकांच्या पळण्यांत ढिलाई उत्पन्न होई. ते खेळत असले कीं बघ्यांची एकच झुंबड उडे नि ते बाद झाले कीं प्रेक्षकांचा पूर ओसरूं लागे. एखादा गलथान चेंडू ( loose ball ) नजरेंत आला कीं त्यांनीं चौकार ठोकलाच असें समजावें.

उंचीचें देणें ब्रॅडमनना देवानें दिलें नसल्यानें षट्कार मारणें त्यांना जमत नसे. चौकार मात्र ते हुकुमतीनें मारीत. त्यांचा चरित्रकार जॉनी मॉईज यानें त्यांच्यासंबंधीं पुढीलप्रमाणें मार्मिक उद्गार, आपल्या 'ऑस्ट्रेलियन समर' ग्रंथात काढले आहेत : "ब्रॅडमनची उंची अगदीं सुमार आहे. चणीनें तो किरकोळ असला तरी चांगला चपळ आहे. प्रयत्न करूनहि त्याला षट्कारांची फैर झाडतां आली नसती. पण षट्काराच्या संभाव्यतेपेक्षां चौकाराचा फटकाच केव्हांहि फलदायक. मेलेल्या सिंहापेक्षां जिवंत कुत्र्याची मातब्बरी केव्हाहि जास्त होय."

ब्रॅडमनना 'स्टाईल' म्हणजे आकर्षक शैली, नसली तरी त्यांचे फटके ओबडधोबड खास नसत. त्यांत सफाई असे. पुल मारण्यांत ते पटाईत होते. मिड् ऑनकडे चेंडूला झोंका देण्यांत त्यांना मौज वाटे. त्यांची नजर घारीसारखी स्वच्छ होती. अन् त्यांचा पदविन्यास कमालीचा चपळ होता. हुक्स, स्क्वेअरकट्स, लेगग्लाईड्स वगैरे फटक्यांची झिलई

ते आपल्या फलंदाजीवर चढवीत. फटके अंतराळांत न मारण्याची दक्षता ते हमखास येत, त्यांच्या फटक्यांची फैर बहुधा हिरवळीला समांतर असे. धांवा ते फार झपाट्यानें काढीत, त्यामुळें क्षेत्ररक्षकांना पळतां भुई थोडी होई.

कर्णधार म्हणूनहि ब्रॅडमननीं चांगला लौकिक मिळविला. नेतृत्वाची जबाबदारी पेलत असतांना त्यांच्या फलंदाजींतील पराक्रमाला कधींहि ओहोटी लागली नाहीं. २४ कसोटी सामन्यांत त्यांनीं ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व केलें. त्यांत १५ कसोटी सामने त्यांनीं जिंकले, सहा अनिर्णित राहिले अन् तीन सामने त्यांनीं गमावले. या गमावलेल्या तीन सामन्यांपैकीं पहिले दोन सामने १९३६–३७ सालीं नेतृत्वाची जबाबदारी त्यांच्यावर प्रथम पडली तेव्हां ते हरले. पण त्याच वेळीं पुढील तिन्ही सामने जिंकून त्यांनीं ऑस्ट्रेलियाला ती मालिका जिंकून दिली. १९३६–३७ सालीं नेतृत्वाचा अनुभव त्यांना नवा होता, पहिल्या दोन सामन्यांत त्यांचा स्वतःचा खेळहि साफ पडल्यामुळेंच त्यांना ते सामने गमवावे लागले. गमावलेल्यापैकीं तिसरा टेस्ट सामना १९३८ सालीं इंग्लंडच्या ओव्हलवर झाला. त्यावेळीं दुखापतीमुळें दोन्ही डावांत ते खेळूं शकले नाहींत. नेतृत्व करीत असतांना, विजयासाठीं वाममार्गांचा अगर नियमबाह्य डावपेचांचा अवलंब त्यांनीं कधींहि केला नाहीं, अगर आपल्या सहकाऱ्यांना कंटाळवाणा खेळ खेळण्यास त्यांनीं कधींहि उत्तेजन दिलें नाहीं, कर्णधार म्हणून त्यांची शिस्त कडक असे अन् म्हणूनच त्यांना मोठे विजय संपादन करतां आले. १९४८ सालीं इंग्लंडच्या शेवटच्या दौऱ्यांत त्यांनीं एकहि सामना न गमावतां ३१ सामन्यांपैकी २३ सामने जिंकले यांत त्यांच्या कुशल नेतृत्वाचा वांटा बराच आहे. कप्तानपदाची जबाबदारी पडल्यावर बरेच क्रिकेटपटु फलंदाजींत अयशस्वी ठरतात. पण ब्रॅडमन त्याला अपवाद ठरले म्हणून कुशल संघनायक म्हणून त्यांना मोठी कीर्ती लाभली.

कलेचा अन् आकर्षकतेचा नोकझोंक जास्त होता. पण गोलंदाजाच्या बोलिंगची कुवत आधीं ओळखून, त्याच्या आत्मविश्वासाला सुरुंग लावण्यांत त्यांच्याशीं कुणालाहि बरोबरी करतां आली नाहीं. “आम्हां सर्वांपेक्षां सहा फूट आधीं, डॉनला चेंडूचें दर्शन घडे” असे उद्गार पॉन्सफोर्डनें त्यांच्याबद्दल काढले आहेत.

गोलंदाजांची अचूक अन् पल्लेदार गोलंदाजी ब्रॅडमन पुढें येऊन बडवूं लागले कीं बोलरच्या आत्मविश्वासाचे बुरुज ढासळूं लागत अन् क्षेत्ररक्षकांचा व्यूहहि उधळला जाई. त्यांच्या धांवांची घोडदौड सुरू झाली कीं गोलंदाजांचे अवसान गळून जाई अन् प्रतिपक्षाचे कर्णधार किंकर्तव्यमूढ बनत. क्षेत्ररक्षकांच्या पळण्यांत ढिलाई उत्पन्न होई. ते खेळत असले कीं बव्यांची एकच झुंबड उडे नि ते बाद झाले कीं प्रेक्षकांचा पूर ओसरूं लागे. एखादा गलथान चेंडू ( loose ball ) नजरेंत आला कीं त्यांनीं चौकार ठोकलाच असें समजावें.

उंचीचें देणें ब्रॅडमनना देवानें दिलें नसल्यानें षट्कार मारणें त्यांना जमत नसे. चौकार मात्र ते हुकुमतीनें मारीत. त्यांचा चरित्रकार जॉनी मॉईज यानें त्यांच्यासंबंधीं पुढीलप्रमाणें मार्मिक उद्गार, आपल्या ‘ऑस्ट्रेलियन समर’ ग्रंथात काढले आहेत : “ब्रॅडमनची उंची अगदीं सुमार आहे. चणीनें तो किरकोळ असला तरी चांगला चपळ आहे. प्रयत्न करूनहि त्याला षट्कारांची फैर झाडतां आली नसती. पण षट्काराच्या संभाव्यतेपेक्षां चौकाराचा फटकाच केव्हांहि फलदायक. मेलेल्या सिंहापेक्षां जिवंत कुत्र्याची मातब्बरी केव्हाहि जास्त होय.”

ब्रॅडमनना ‘स्टाईल’ म्हणजे आकर्षक शैली, नसली तरी त्यांचे फटके ओबडधोबड खास नसत. त्यांत सफाई असे. पुल मारण्यांत ते पटाईत होते. मिड्‌ ऑनकडे चेंडूला झोंका देण्यांत त्यांना मौज वाटे. त्यांची नजर घारीसारखी स्वच्छ होती. अन् त्यांचा पदविन्यास कमालीचा चपळ होता. हुक्स, स्क्वेअरकट्‌स, लेगग्लाईड्‌स वगैरे फटक्यांची झिलई

ते आपल्या फलंदाजीवर चढवीत. फटके अंतराळांत न मारण्याची दक्षता ते हमखास घेत, त्यांच्या फटक्यांची फैर बहुधा हिरवळीला समांतर असे. धांवा ते फार झपाट्यानें काढीत, त्यामुळें क्षेत्ररक्षकांना पळतां भुई थोडी होई.

कर्णधार म्हणूनहि ब्रॅडमननीं चांगला लौकिक मिळविला. नेतृत्वाची जबाबदारी पेलत असतांना त्यांच्या फलंदाजींतील पराक्रमाला कधींहि ओहोटी लागली नाहीं. २४ कसोटी सामन्यांत त्यांनीं ऑस्ट्रेलियाचें नेतृत्व केलें. त्यांत १५ कसोटी सामने त्यांनीं जिंकले, सहा अनिर्णित राहिले अन् तीन सामने त्यांनीं गमावले. या गमावलेल्या तीन सामन्यांपैकीं पहिले दोन सामने १९३६–३७ सालीं नेतृत्वाची जबाबदारी त्यांच्यावर प्रथम पडली तेव्हां ते हरले. पण त्याच वेळीं पुढील तिन्ही सामने जिंकून त्यांनीं ऑस्ट्रेलियाला ती मालिका जिंकून दिली. १९३६–३७ सालीं नेतृत्वाचा अनुभव त्यांना नवा होता, पहिल्या दोन सामन्यांत त्यांचा स्वतःचा खेळहि साफ पडल्यामुळेंच त्यांना ते सामने गमवावे लागले. गमावलेल्यापैकीं तिसरा टेस्ट सामना १९३८ सालीं इंग्लंडच्या ओव्हलवर झाला. त्यावेळीं दुखापतीमुळें दोन्ही डावांत ते खेळूं शकले नाहींत. नेतृत्व करीत असतांना, विजयासाठीं वाममार्गाचा अगर नियमबाह्य डावपेचांचा अवलंब त्यांनीं कधींहि केला नाहीं, अगर आपल्या सहकाऱ्यांना कंटाळवाणा खेळ खेळण्यास त्यांनीं कधींहि उत्तेजन दिलें नाहीं, कर्णधार म्हणून त्यांची शिस्त कडक असे अन् म्हणूनच त्यांना मोठे विजय संपादन करतां आले. १९४८ सालीं इंग्लंडच्या शेवटच्या दौऱ्यांत त्यांनीं एकहि सामना न गमावतां ३१ सामन्यांपैकी २३ सामने जिंकले यांत त्यांच्या कुशल नेतृत्वाचा वांटा बराच आहे. कप्तानपदाची जबाबदारी पडल्यावर बरेच क्रिकेटपटु फलंदाजींत अयशस्वी ठरतात. पण ब्रॅडमन त्याला अपवाद ठरले म्हणून कुशल संघनायक म्हणून त्यांना मोठी कीर्ती लाभली.

रे रॉबिनसन या ऑस्ट्रेलियन टीकाकारानें आपल्या ‘ ब्रिटविन् विकेट्स ’ या ग्रंथात ब्रॅडमन यांच्या नेतृत्वाबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत : “ युद्धापूर्वीच्या त्याच्या सहकारी गोलंदाजांच्या मतानें त्याचें नेतृत्व वरच्या दर्जाचें नव्हतें. वुडफूलप्रमाणें सहकाऱ्यांच्या खाजगी बाबींशीं तो समरस होत नसे. १९३८ मध्यें त्याच्यावर नेतृत्वाचा एवढा ताण पडला कीं पुन्हां ही जबाबदारी आपण पत्करणार नाहीं असें त्यानें आपल्या मित्रांना सांगूनहि टाकलें....युद्धानंतर केवळ साहसी वृत्ती-मुळेंच पुन्हां त्याचें पुनरागमन झालें. तरण्या अन् नव्या दमाच्या खेळाडूंकडे तो माणुसकीनें पाहूं लागला अन् मग नेतृत्वांतहि तो अग्रेसर ठरला....क्षेत्ररक्षणाचा व्यूह रचण्याच्या बाबतींत तो अद्वितीय होता... नेतृत्वाची जबाबदारी पेलतांना त्यानें आपल्या मनांत भावनाविवशतेला थारा दिला नाहीं. त्याच्या धंद्यात जसें त्याचें धोरण होतें तशाच पद्ध-तीची दृष्टि त्यानें नेतृत्वाची धुरा घेतल्यावरहि ठेवली. इंग्लंडला नेलेला आपला संघ अजिंक्य ठरावा अशी महत्त्वाकांक्षा त्यानें बाळगली होती. ” रे रॉबिनसन हा ब्रॅडमन यांचा कठोर टीकाकार म्हणून प्रसिद्ध असल्यानें त्यांच्या नेतृत्वाबद्दल त्यानें प्रदर्शित केलेले विचार मननीय आहेत.

जणुं एखादी लढाई जिंकावी त्याप्रमाणें ब्रॅडमन क्रीडांगणाला रणांग-णाचें स्वरूप देण्यांत अग्रेसर होते. सामना जिंकलाच पाहिजे असें त्यांचें ब्रीद होतें. त्या दृष्टीनेंच डावपेचांचीं पावलें ते टाकीत. टेस्ट सामना असेल तर त्यांची तयारी अगदीं जय्यतच व्हायची. सामने ते अटातटीनें लढवीत म्हणून त्यांच्यावर टीकाहि होई. पण त्याची फिकीर त्यांनीं कधीं केली नाहीं.

क्रीडांगणावर त्यांची शिस्त कडक असली तरी कित्येक प्रसंगीं ते सहकाऱ्यांच्या मतांना नि भावनांना मान देत. त्याविषयीं एक आठवण सांगण्यासारखी आहे. १९४८ सालीं इंग्लंडच्या दौऱ्यावर असतांना

लॉर्ड्स्‌वरील दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी लिंडवॉलच्या पायाला दुखापत झालेली असल्यानें त्याची निवड करूं नये असें ब्रॅडमनना वाटत होतें. पण लिंडवॉलचा आत्मविश्वास पाहून त्यांनीं त्याची निवड केली. पुढें सामना सुरू झाल्यावर लिंडवॉलची पायदुखी पुन्हां सुरू झाली. तरीहि उत्साहाच्या भरांत त्यानें ७० धांवांत ५ विकेट्स घेतल्या. दुसऱ्या डावांतहि त्यानें आणखी तीन बळी घेतले. त्याचा पाय दुखत आहे ही गोष्ट ब्रॅडमन यांच्या लक्षांत आली होती, पण त्यांनी त्याची जाणीव लिंडवॉलला दिली नाहीं. कारण त्यामुळें त्याचा हिरमोड झाला असता नि त्याची गोलंदाजी पाहिजे तशी पडली नसती. १९५३ सालीं ब्रॅडमननीं त्याबद्दलची आठवण लिंडवॉलला दिली, तेव्हां तो म्हणाला : "त्याच वेळीं तूं मला तसं कां नाहीं म्हणालास?" त्यावर ब्रॅडमन म्हणाले : "तुझं दुखणं कुणाच्या नजरेंत येऊं नये म्हणून तूं पराकाष्ठा करीत होतास. माझ्या लक्षांत तुझं दुखणं आलेलं नाहीं असं तुला वाटत असल्यामुळं तूं चांगली गोलंदाजी करशील याची खात्री मला होती." सहकाऱ्यांच्या कौशल्याला वाव व संधी देण्यास ब्रॅडमन कसे तत्पर होते त्याची कल्पना वरील प्रसंगावरून येतें. तथापि असें असलें तरी प्रत्यक्ष क्रीडांगणावर ते अतिशय गंभीर असल्यानें त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल वचक वाटायचा.

ऑस्ट्रेलियाचा अलीकडचा अप्रतिम फलंदाज नील हार्वे याला चार कसोटी सामन्यांत ब्रॅडमन यांच्याबरोबर खेळण्याची संधि लाभली होती. त्यानें आपल्या 'माय्‌ वर्ल्ड ऑफ क्रिकेट' या ग्रंथात त्यांच्याविषयीं पुढीलप्रमाणें गौरवपर उद्‌गार काढले आहेत : "ब्रॅडमन नेतृत्वात अग्रसर होता. क्रिकेटच्या व्यासंगांत त्याला जोड मिळणें कठीण आहे. मैदानावर आपल्या संघाकडून डावपेंच लढविण्याची समयज्ञता त्याच्या अंगीं होती. नेता म्हणून त्याची कामगिरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. त्याच्या अधिपत्याखालीं ऑस्ट्रेलियन संघ इंग्लंड विरुद्ध एकहि मालिका

हरला नाहीं. फलंदाजींतली त्याची कामगिरी एखाद्या कादंबरींतल्या नायकालाहि लाजवील अशी आहे. आपल्या बॅटिंगच्या जोरावर वीस वर्षें त्यानें जगांतल्या पहिल्या प्रतीच्या गोलंदाजांवर आपलें अधिराज्य गाजविलें, अन् वयाच्या ३९ व्या वर्षीहि त्यानें इंग्लंडात, इंग्लंड विरुद्ध टेस्ट मालिकेंत ५०८ धांवा केल्या."

"त्याच्यासारखे जोरदार फटके तोच मारूं शके. गोलंदाजी कमी प्रतीची असली कीं मग तिच्यावर तो अक्षरशः तुटून पडे. एवढेंच नव्हे तर जगांतल्या उत्तमोत्तम बोलिंगचीहि तो रेवडी उडवी...क्रिकेट खेळांतली प्रत्येक बाजू त्याला माहीत आहे. एखादा खेळाडू केवढा कां अनुभवी असेना, तो जर तासभर त्याच्याशीं बोलत बसला तर बॅटिंग-बोलिंगबद्दलचें अकल्पित ज्ञान त्याला त्याच्याकडून होईल." हार्वेनें ब्रॅडमन यांचें केलेलें हें वर्णन यथातथ्य आहे यांत शंका नाहीं.

ब्रॅडमन यांचा समकालीन खेळाडू अन् आतां पत्रकार असलेला जॅक फिंगल्टन यानें आपल्या 'ब्राइटली फेड्स दी डॉन' या ग्रंथात त्यांच्यासंबंधीं पुढील उद्‍गार काढले आहेत: "ब्रॅडमनचा प्रत्येक डाव हेतुपूर्वक असे. १९४८ सालीं एकहि सामना घालवायचा नाहीं हें त्याचें ध्येय होतें अन् त्यानें तें पुरें केलें. सर्वांत जास्त धांवा त्यानेंच केल्या. चाळीसाव्या वर्षीहि धांवा काढण्याचा त्याला कंटाळा नव्हता. प्रत्येक डावाच्या वेळीं तो योजना आंखी अन् त्या पार पाडी. चांगल्या हिरवळीवर तो जगज्जेता होता. त्या हिरवळीवर त्याला जोड नव्हती. त्याचे टीकाकार अनेक असतील पण त्याचें कर्तृत्व मान्य न केलेला टीकाकार शोधूनहि सांपडणार नाहीं. खेळाचा कंटाळा त्याला कधीं आला नाहीं. शीणहि त्याला कधीं वाटला नाहीं. आणि त्याच्या खेळांतली भरारीहि कधीं कमी झाली नाहीं."

याच आपल्या ग्रंथांत फिंगल्टननें कांहीं टीकाकारांची अन् क्रिकेटसंबंधीं लिहिणाऱ्या लेखकांचीं ब्रॅडमनसंबंधीं मतें पुढीलप्रमाणें नमूद केलीं

अनुक्रम .. ८०७०१ .. वि: ...
क्रमांक ........ ९२८० ........ नोंद दि: ........


आहेत :

सर पेल्हॅम वॉर्नर [ १८७३–१९६३ ] इंग्लंड : " मागील पिढींतल्या अगर सांप्रतच्या क्रिकेटपटुंच्या कर्तृत्वाशीं ब्रॅडमनची तुलना करणें शक्य असलें तरी एक गोष्ट मात्र खरी कीं, त्याच्या एवढा कर्तृत्ववान क्रिकेटपटु पुढें कधीं होईल असें वाटत नाहीं. गोलंदाजच सामने जिंकू शकतात हें क्रिकेटमधलें त्रिकालाबाधित सत्य आहे. पण ब्रॅडमननें एकट्याच्या बाहुबळावर सामने जिंकून प्रतिपक्षीय गोलंदाजांच्या बोलिंगवर धांवांचा सडा शिंपडला...त्यांच्या चारहि इंग्लंडच्या दौऱ्यांत ऑस्ट्रेलियांत फलंदाजांच्या सरासरींत तो नेहमी पहिला असे...क्रिकेट खेळाचे भावी इतिहासकार त्याच्याबद्दल कांहीं म्हणोत, १९२८ ते १९४८ या काळाला मात्र ' ब्रॅडमन युगच ' समजलें पाहिजे "

आर. सी. रॉबरसॅन ग्लासगो, (इंग्लंड) : " मला ज्यावेळीं ब्रॅडमनचें प्रथम दर्शन झालें, त्यावेळीं गोलंदाजांची हत्या करणारा जणूं कृतांत काळच असा तो मला भासला. त्यानें १९३० सालीं इंग्लंडात लीड्स येथें ३३४ धांवा केल्या, तशा तऱ्हेचा अपूर्व डाव पुनरपि दिसणार नाहीं. क्रिकेट क्षेत्रांतला तो बृहस्पतीच ( Genius ) होय. "

रेगी स्पूनर ( इंग्लंड, जन्म १८८०, फलंदाज ) : " मागल्या पिढीं-तल्या फलंदाजांशीं त्याची तुलना करणें अनिष्ट होय. पण धांवा काढ-ण्याच्या बाबतींत माझ्या काळांतला एकतरी क्रिकेटपटु, त्याच्याशीं बरोबरी करूं शकला असता कीं नाहीं तें सांगणें कठीण आहे "

डेन्झिल बॅचलर : ( सिडने ), " मला गबी ॲलन विरुद्ध त्यानें केलेल्या समयज्ञ नेतृत्वाची चांगली आठवण आहे. दोन टेस्ट सामने हरले गेले होते अन् तीन खेळायचे होते. पण एखाद्या सार्वभौम राजा-प्रमाणें त्यानें मालिका सहज जिंकली. पत्रव्यवहारानें बुद्धिबळाचा डाव खेळावा, अशा थाटांत मेलबोर्नचा तिसरा टेस्ट सामना त्यानें जिंकला अन् तोहि कुशल डावपेचांच्या बळावर. "

जिम किलवर्न ( इंग्लंड ) : " माझी अशी श्रद्धा आहे कीं ब्रॅडमन तुलनेच्या पलीकडे आहे. जिथें जिथें क्रिकेट खेळला जातो तिथें तिथें ब्रॅडमनवर चर्चा निश्चित होईल – त्याच्यावर खरमरीत टीकेचे आसूडहि ओढले जातील पण लोकांना त्याचें विस्मरण कधींहि होणार नाहीं. "

चार्लस् ब्रे (इंग्लंड) : " त्याच्या कर्तृत्वाचें गुणगान करण्याची गरज नाहीं. क्रिकेट इतिहासांत त्याचा पराक्रम सुवर्णाक्षरांत लिहिलेला आहे... टीकाकारांच्या बाबतींत त्याची मनोवृत्ति नाजूक आहे अन् पत्रकारांबद्दल त्याला फारसें ममत्व नाहीं. तरी क्रिकेटप्रेमिकांसाठीं ब्रॅडमनच्या कर्तृत्वाचे पोवाडे प्रथम पत्रकारांनींच म्हटले आहेत. "

वरील सर्वांचीं मतें पाहतां ब्रॅडमन यांच्या क्रिकेट कर्तृत्वाबद्दल कुणांत दुमत नाहीं ही गोष्ट स्पष्ट होते. वरीलपैकीं कुणीहि कडवट अशी टीका त्यांच्यावर केलेली दिसत नाहीं, पण पंधरा कसोटी सामन्यांत त्यांच्या नेतृत्वाखालीं खेळलेल्या कीथ मिलरनें, ऑस्ट्रेलियाच्या अष्टपैलू क्रिकेटपटूनें त्यांच्यावर अत्यंत चरचरीत अन् कडवट टीका केलेली आढळते. आपल्या ' क्रिकेट क्रॉसफायर ' या ग्रंथात त्यानें त्यांच्यावर टीकेचा पुढीलप्रमाणें कडाडून हल्ला केला आहे : " ब्रॅडमनच्या क्रिकेट कारकीर्दींत त्याच्या मनाच्या दोन बाजू मला नेहमीं दिसत. आम्ही बरेच क्रिकेटपटुहि त्याच माळेचे मणी आहोंत. त्याच्याबरोबर प्रवास करण्यांत मला मौज वाटे. आमचा त्याचा निकट परिचय असा फारसा झाला नाहीं अन् तोहि त्याचा वेळ एकांतवासांत मन मानेल तसा घालवी. वक्तशीरपणाखेरीज खेळाडूंना इतर बाबतींत त्याचा कसलाच आग्रह नसे. संघातल्या खेळाडूंच्या स्वास्थ्याकडे तो जातीनें लक्ष पुरवी. भिडस्तपणामुळें तो एकांतप्रिय होता त्यामुळें त्याचा स्वभाव मनमिळाऊ वाटत नसे. दोन वेळां तर आम्हां ऑस्ट्रेलियन खेळाडूंना त्यानें अगदीं अडचणींत टाकलें होतें. १९४८ सालीं इंग्लंडला जात असतांना, आम्हीं

मुंबईला थांबलों होतों. विजय मर्चंटसारखा भारतांला सर्वोत्कृष्ट खेळाडू ब्रॅडमनला भेटण्यासाठीं बोटीवर आला असतांना, त्यानें बोटीच्या बाहेर येण्याचें साधें सौजन्यहि दाखविलें नाहीं. तो महान् अन् आघाडीचा भारतीय खेळाडू, आपला सर्व मानापमान गिळून अखेरीस बोटीवर आला. १९४८ च्या दौऱ्यावरून परततांनाहि त्यानें असाच एक फार्स केला. बोट एडनला थांबली होती. तेथल्या स्थानिक लष्करी अधिकाऱ्यानें खेळाडूंना खाण्यापिण्याचें खास निमंत्रण तारेनें दिलें होतें. आम्हीं सगळें गेलों पण फक्त ब्रॅडमन तेवढा आला नाहीं. त्या अधिकाऱ्यानें त्याला पुन्हां दुसऱ्यांदा निमंत्रण धाडलें पण ब्रॅडमन गेला नाहीं. त्याचें हें वागणें आमच्यापैकीं अनेकांना मोठें चमत्कारिक वाटलें. ”

“ ज्या न्यू साऊथ वेल्स मधून त्यानें क्रिकेटक्षेत्रांत पदार्पण केलें तेथें तो मुळींच लोकप्रिय नाहीं. त्यांनीं त्याला पुढें आणलें अन् जेव्हां तो नांवारूपाला आला तेव्हां त्यानें स्थलांतर करून दक्षिण ऑस्ट्रेलियातर्फे खेळण्याचें ठरवून त्यांना तोंडघशीं पाडलें अशी आहे त्यांची भावना. न्यू साऊथ वेल्सच्या क्लबमध्यें फक्त ट्रंपरचेंच छायाचित्र टांगलेलें आढळतें...असें असलें तरी ब्रॅडमन म्हणजे कांहीं देव नव्हे. व्यक्ति म्हणून तो कसा आहे अन् त्याच्यांतहि कांहीं दोष कसे आहेत हेंच मला सांगायचें आहे. फलंदाज म्हणून त्याला जोड नाहीं. युद्धापूर्वीं त्याच्या बॅटिंगमधली तडफ विलक्षण होती. मला असं निश्चित वाटतं कीं त्यावेळीं त्यानं ‘ टायसन ’ ‘ स्टेथॅम ’ यांच्यासारख्या वेगवान गोलंदाजांचा अगर लेकर, लॉक यांच्यासारख्या फसव्या मंदगति बोलर्सचा बट्ट्याबोळ केला असता. विकेट प्रतिकूल असली कीं नामांकित गोलंदाजांपुढें त्याचा प्रभाव पडत नसे ही गोष्टहि सांगितली पाहिजे. युद्धानंतर त्याचा नेहमींचा फॉर्म उरला नसला तरी त्या काळांतल्या इतर फलंदाजांच्या मानानें तो सर्वश्रेष्ठच होता. ”

फलंदाज ब्रॅडमन अन् व्यक्ति ब्रॅडमन यांच्यासंबंधीं मिलरनें व्यक्त केलेले वरील विचार चुकीचे आहेत असें म्हणतां येणार नाहीं. क्रिकेटपटु म्हणून ब्रॅडमनना जेवढी लोकप्रियता लाभली तेवढीच अप्रियता त्यांना व्यक्ति म्हणून सोसावी लागली. मानवी स्वभावांत असलेले दोष त्यांच्यातहि असल्यानें वैयक्तिक जीवनांत अन् क्रीडांगणा-बाहेर त्यांना बराच मनःस्ताप भोगावा लागला. यासंबंधीं प्रा. देवधरांनीं आपल्या 'उत्तम क्रिकेट कसें खेळाल?' या ग्रथांत पुढील भाष्य केलें आहे : "सीझरप्रमाणें ब्रॅडमन आपल्या क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाकांक्षी असल्यानें त्याच्याविषयीं सर्वांना आदर वाटला, तरी आपुलकी वाटली नाहीं, व तो अपेक्षेप्रमाणें बरींच वर्षे लोकप्रिय झाला नाहीं. त्याच्या वर्तनांतला दोष म्हणजे क्रीडांगणावरहि तो व्यवहारी, हिशेबी व गंभीर दिसे व त्या मानानें खेळीमेळीचें वातावरण कमी होई." त्याच्या समकालीनांपुरते अन् त्याच्या बरोबर खेळलेल्या कांहीं तरुण खेळाडूं-पुरता विचार केल्यास देवधरांचे विचार खरे मानावे लागतील. सर्व-साधारण क्रिकेट षौकिनांत अन् क्रिकेट प्रेमिकांत मात्र त्यांना अफाट लोकप्रियता लाभली. त्याचें कारणहि देवधरांनीं सांगितलें आहे तें असें : "१९३४ पासून १९५२ पर्यंत ऑस्ट्रेलियानें इंग्लंडवर जे अनेक विजय मिळविले व 'रबर' हस्तगत केलें, त्याचें मुख्य श्रेय, त्यांचा सर्वश्रेष्ठ फलंदाज व कुशल सेनानी डॉन ब्रॅडमनला दिले पाहिजे. तो ज्या ज्या वेळीं व्यक्तिशः यशस्वी होई व धांवांचे डोंगर रची, त्या त्या साम-न्यांत ऑस्ट्रेलिया हटकून जय मिळवी. उलट तो अपेशी झाला तर मात्र संघ पराभूत होई. इतका त्याचा संघ त्याच्या खेळावर अवलंबून असे. त्याची अत्यंत तीक्ष्ण नजर, स्थिर मन, निश्चयी बुद्धि व महत्त्वा-कांक्षी स्वभाव या गुणसमुच्चयामुळें त्यानें कोणी पूर्वी मिळविलें नव्हतें इतकें यश क्रीडांगणावर मिळविलें. त्याचा खेळ यंत्रासारखा अचूक असून, टांकसाळींतून नाणीं बाहेर पडावींत तशा धांवा निघत."

नेव्हिल कार्डस् या प्रख्यात क्रिकेट समीक्षकानें ब्रॅडमन यांचा उदय पाहिला तसा अस्तहि पाहिला. त्यांचा सारा इतिहास त्याच्या डोळ्यादेखत घडला. १९६० सालच्या एका लेखांत त्यांनीं ब्रॅडमन यांच्याविषयीं पुढील उद्‌गार काढले आहेत: "न्यू साऊथ वेल्सच्या कुटमुंडरा खेड्यांत त्याचा जन्म झाला. क्रिकेटपुरतें पाहिल्यास त्यानें तें शिक्षण स्वतःच मिळविलें. त्याला जागतिक कीर्ती एवढ्या झपाट्यानें मिळाली कीं त्याच्याहून दुय्यम असलेल्या खेळाडूंचीं डोकीं फिरावीं. असूयेला, मत्सरालाहि त्याला बळी पडावें लागलें. एकलकोंडा असल्याचें, आरोपहि त्याच्यावर करण्यांत आले. पण क्रिकेट हेंच त्याचें मुळीं जीवन होतें...'सर' पदवी त्यानें केवळ गुणांवर मिळविली, तशी इतरांनीं क्वचितच मिळविली. आज ॲडलेड येथें सर डोनॉल्डनें उद्योगपती म्हणून सर्वांकडून आदराचें स्थान मिळविलें आहे."

कौटुंबिक जीवनांत ब्रॅडमनना कांहीं काळ बराच मनःस्ताप भोगावा लागला. त्यांचा मुलगा (जॉन) पोलियोनें बरेच दिवस आजारी होता. तर मुलगी 'शिलें' अपंग म्हणून अंथरुणाला खिळलेली होती. त्यांच्या पत्नीवर त्यांचें निरतिशय प्रेम आहे. आपल्या आईवडिलांवरहि त्यांनीं असेंच प्रेम केलें. त्यांचा सारा पराक्रम त्यांच्या वडिलांना पहावयास मिळाला. ओल्डफील्ड किपेक्स स्मृतिप्रीत्यर्थ झालेल्या सामन्यांत (१९४९) ब्रॅडमननीं ५३ धांवा काढल्या तेव्हां तो सामना पहाण्यास ते उपस्थित होते.

ब्रॅडमन यांची पत्नी शाळेंत असतांना त्यांची मैत्रीण होती. पुढें ती त्यांच्या जीवनाची जोडीदारीण झाली. त्यांची ती स्फूर्तिदात्री ठरली. युद्धानंतर ते पुन्हां क्रिकेट खेळू लागले ते तिच्याच प्रोत्साहनामुळें. त्यांचा संसार सुखी आहे. खाजगी जीवनांत ढवळाढवळ केलेली त्यांना आवडत नाहीं. सांप्रत त्यांचें वास्तव्य दक्षिण ऑस्ट्रेलियांत, ॲडलेड येथें आहे. त्यांची सांपत्तिक स्थिति उत्तम असून अनेक मोठ्या पेढ्यांचे

संचालकत्व त्यांना लाभलें आहे. जोडीला त्यांचा शेअर्सचा व्यवसायहि आहे. आपल्या या व्यवसायांतहि त्यांनीं प्रशंसनीय कर्तृत्व दाखविलें आहे. त्यांचा एक चरित्रकार जॉनी मॉईज यानें आपल्या 'सेंच्युरी ऑफ क्रिकेटर्स' या ग्रंथांत त्यांचें पुढीलप्रमाणें मार्मिक वर्णन केलें आहे : "जानेवारी १९४९ मध्यें तो सर डॉन ब्रॅडमन झाला. शेअर-व्यवसायांतील यशस्वी असामी म्हणून त्याचा लौकिक वाढला. अनेक पेढ्यांचें संचालकत्व त्याच्याकडे चालून आलें आणि जागतिक पुरुषश्रेष्ठांत त्याची गणना झाली."

क्रिकेटमध्यें प्रत्यक्ष भाग घेत असतांना ब्रॅडमननीं 'डॉन ब्रॅडमन्स बुक', 'माय क्रिकेटिंग लाईफ' अन् 'हाऊ टू प्ले क्रिकेट' वगैरे छोटे मोठे ग्रंथ लिहिले. निवृत्त झाल्यानंतर 'फेअरवेल टू क्रिकेट' हा आत्मवृत्तपर ग्रंथहि लिहिला. १९५८ सालीं उदयोन्मुखच नव्हे तर टेस्ट क्रिकेटपटूनांहि मार्गदर्शक ठरेल असा नमुनेदार अन् क्रिकेट खेळाची शास्त्रोक्त महिती सांगणारा 'दि आर्ट ऑफ क्रिकेट' नांवाचा उत्कृष्ट ग्रंथ त्यांनीं लिहिला. ते स्वतः जसे क्रिकेटपटू होते तसेच त्यांचा त्या खेळाचा व्यासंगहि दांडगा होता. त्याची साक्ष त्यांच्या 'दि आर्ट ऑफ क्रिकेट' या ग्रंथात सांपडते.

निवृत्त झाल्यानंतर १९४९ सालीं त्यांना 'सर' पदवी मिळाल्याचा वृत्तांत मागें आलाच आहे. १९५८ सालीं त्यांना पन्नास वर्षे पूर्ण झालीं तेव्हां इंग्लंडच्या एम्. सी. सी. ने त्यांना आपल्या क्लबचें आजीव सभासदत्व (Life membership) देऊन त्यांचा बहुमान केला.

ऑस्ट्रेलियन बोर्डाच्या निवड समितीवर तर ते अनेक वर्षें आहेत. (१९३६ ते १९५२ व १९५४ ते १९६५) १९६० सालीं ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाचें अध्यक्षपद त्यांना लाभलें.

ब्रॅडमन यांच्या विक्रमांची माहिती यापूर्वी येऊन गेलीच आहे. आंकडेवारी अगदीं बारकाईनें पाहणाऱ्यांसाठीं, त्यांच्याविषयीं कांहीं

मजेदार माहिती देणें उचित वाटतं. आपल्या क्रिकेट कारकीर्दीत त्यांनीं ३६ विकेट्स घेतल्या. टेस्टमध्यें त्यांनीं दोन विकेट्स घेतल्या. एक १९३२–३३ सालीं इंग्लंडविरुद्ध अन् दुसरी ३०–३१ सालीं वेस्ट इंडिज विरुद्ध. आपल्या क्रिकेट कारकीर्दींत त्यांनीं १२२ झेल घेतले. त्यांतले ८२ ऑस्ट्रेलियांत घेतले तर ४० इंग्लंडात. टेस्टमध्यें त्यांनीं ३२ झेल घेतले. इंग्लंडविरुद्ध २०, वेस्ट इंडिज विरुद्ध ४, दक्षिण आफ्रिके-विरुद्ध २ अन् भारताविरुद्ध ६ झेल त्यांनीं घेतले. सुरुवातीला ते डीपवर क्षेत्ररक्षण करीत. त्यांचा थ्रो अगदीं अचूक असे. संघनायक झाल्यावर मिडऑफ व एक्स्ट्रा कव्हरवर ते क्षेत्ररक्षण करीत. त्यांची ग्राऊंड फिल्डिंग चांगली असली तरी झेल टिपण्यांत ते हॅमंडप्रमाणें पटाईत नव्हते. आपल्या संपूर्ण कारकीर्दींत सोळा वेळा एकहि धांव न काढता ते बाद झाले. टेस्टमध्यें एकहि धांव न काढतां ते सात वेळां बाद झाले. टेस्टमध्यें इंग्लंड विरुद्ध एकहि धांव न काढतां ते सहा वेळा बाद झाले. तर वेस्ट इंडिजविरुद्ध एक वेळा. त्यांनीं ३३४ धांवांचा विक्रम टेस्टमध्यें केला तेव्हां त्यांच्या धांवांचा वेग ताशीं ५२ असा होता. टेस्ट कारकीर्दींत त्यांनीं फक्त सहा षटकार मारले. ५ इंग्लंडविरुद्ध अन् एक भारताविरुद्ध. अव्वल दर्जाच्या सामन्यांत, १२० सामन्यांचे त्यांनीं नेतृत्व केलें. त्यांत त्यांनीं ६१ सामने जिंकले, ४५ अनिर्णीत राहिले, १३ ते हरले अन् एक बरोबरीनें सुटला. या १२० सामन्यांत त्यांनीं ५७ वेळां ओली-सुकी जिंकली तर ६३ वेळां त्यांना नाणें प्रतिकूल पडलें.

शतक पुरें होण्याची वेळ आली कीं बहुतेक फलंदाजांचें चित्त विचलित होतें. ९० धांवा झाल्यावर कित्येकांचा धीर खचतो अन् चेंडूवरची एकाग्रता कमी होते. यात्र वेळी प्रतिपक्षाचे गोलंदाज शतक पुरें होऊं न देण्यासाठीं प्रयत्नांची शर्थ करतात. अशा वेळीं पहिल्या प्रतीचे फलंदाजहि अचानक बाद होतात. आपल्या टेस्ट कारकीर्दीत ९० धांवा झाल्यावर शतक पुरें केल्याशिवाय ब्रॅडमन केव्हांहि बाद झालें

नाहींत. यावरून कसोटी सामन्यांतली त्यांची एकाग्रता अन् आत्मविश्वास दिसून येतो.

सध्यां ऑस्ट्रेलियांत ब्रॅडमन म्हणजे एक प्रख्यात व्यक्ती बनून राहिली आहे. पूर्वी ते फारसे मिसळत नसत अन् कुणी मुलाखत मागितली तर ती देण्याचे ते बहुधा टाळीत. अलीकडे त्यांच्या स्वभावांत बदल झाला असावा असें दिसतें. माझे एक स्नेही डॉ. ललीत देशपांडे (एम्. ए. पीएच्. डी.) शिक्षणासाठीं ऑस्ट्रेलियांत गेले होते. त्यांना क्रिकेटची फार आवड आहे असें नव्हे, पण ब्रॅडमनना भेटण्याची त्यांना उत्कंठा होती. तेव्हां त्यांनीं त्यांना भेटण्याचें ठरविलें. अन् आश्चर्य म्हणजे ब्रॅडमननीं त्यांना भेटीस बोलाविलें. अखेरीस ही मुलाखत मे १९६२ मध्यें झाली. ती वरून ब्रॅडमन यांच्या व्यक्तिमत्त्वावर चांगला प्रकाश पडतो हें एक, अन् एका भारतीय गृहस्थांना ते कसे दिसले—कसे वाटले, तेंहि समजतें. म्हणून त्या मुलाखतीचा वृत्तान्त श्री. देशपांडे यांच्याच शब्दांत पुढें देत आहे: “ अॅडेलेडला येऊन मला आठ दहा दिवस झाले होते. परंतु शहर पाहण्यास वेळ मिळाला नव्हता. ज्यांच्या घरी मी रहात होतो त्यांनीं शहर दाखविण्यासाठीं मला बाहेर काढलें. जातांना वाटेंत केनिंगस्टन पार्क नांवाचा भाग लागला. “ हा भाग कशासाठीं प्रसिद्ध आहे तें माहीत आहे का तुम्हांला ? ” असा प्रश्न माझ्या यजमानांनीं (Host) मला विचारला. “ ब्रॅडमन इथं राहतात. ” मीं जबाब दिला. माझ्या उत्तरानें यजमानांना धक्का बसला. त्यांनीं मोटार केली उभी. समोरच ब्रॅडमन यांचें घर होतें. ऑस्ट्रेलियांत येऊन ब्रॅडमनना न भेटतां जाणें म्हणजे अलाहाबादला जाऊन संगमांत स्नान न करण्यासारखे होतें. ब्रॅडमन यांच्या प्रसिद्धिपराङ्मुख स्वभावाबद्दल पुष्कळच ऐकलें असल्यामुळें, त्यांना भेटण्याचा योग लाभणार नाहीं अशी माझी खात्री होती. तरीहि पहावा एकदां प्रयत्न करून म्हणून माझ्या मित्राजवळ माझी मनीषा मीं बोलून दाखविली. सुदैवानें

माझ्या मित्राचे वडील वायदेबाजारांत दलाली करीत असल्यानें ब्रॅडमन यांच्याशीं त्यांची ओळख होती. संध्याकाळीं टेलिफोनवरून ब्रॅडमन यांच्या भेटीची वेळ व ठिकाण त्यांनी मला कळविलें.

मला स्वाक्षऱ्या गोळा करण्याचा छंद नव्हता तरीहि ब्रॅडमन यांची स्वाक्षरी घ्यावी या इराद्यानें मी एक स्वाक्षरी पुस्तकहि विकत घेतलें.

सकाळच्या थंडींत व धुक्यांत आठला मी ब्रॅडमन यांच्या कचेरींत गेलों. एका उंच इमारतीच्या चौथ्या मजल्यावर ब्रॅडमन यांची कचेरी होती. माझ्या बरोबर माझ्या मित्राचें वडीलहि होतें. आम्हीं आल्याचें कळतांच सर डोनॉल्ड आपल्या खोलींतून बाहेर आले. माझ्या मित्राच्या वडिलांनीं ' हॅलो डॉन ' म्हणून त्यांचें स्वागत करून माझी ओळख त्यांच्याशीं करून दिली. कचेरींत बोलतां येणें शक्य नसल्यानें, त्याच इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील आपल्या खाजगी खोलींत, ब्रॅडमन मला घेऊन गेले. एक टेबल, खुर्ची अन् टेलिफोन एवढेंच सामान त्या खोलींत होतें. आमची बातचीत सुरू झाली. " एवढ्या लांबून, केवळ मला भेटण्यासाठींच आपण आमच्या देशांत आला नसालच ! " त्यांनीं हंसत हंसत प्रश्न केला. माझ्या प्रवासाचें कारण मीं त्यांना सांगून म्हटलें : " ऑस्ट्रेलियांत येऊन आपल्याला भेटलों नाहीं तर परत गेल्यावर आमचें लोक मला हंसतील. अन् म्हणून आपल्या भेटीसाठीं मी आलों आहे. " मोकळेपणानें माझ्या भेटीचें कारण मीं त्यांना सांगितलें. पुन्हां लागलीच ते म्हणाले : " तुमच्या देशांत क्रिकेटचं वेड फार दिसतं. तुमच्याकडील कांहीं पद्धतीचं मला फार आश्चर्य वाटतं. एखाद्या फलंदाजानं शतक काढलं कीं तुमच्याकडं त्याला हार घालतात. पण त्या-मुळं खेळ थांबतो अन् फलंदाजाची खेळावरील पकड ढिली होण्याचा संभव असतो. "

" मेलबोर्नमध्यें टेस्ट चालू असतांना मेलबोर्न कपसाठीं होणारी घोड्यांची शर्यंत थांबेपर्यंत, तुमच्याकडे देखील खेळ थांबविला जातो. "

मीं त्यांच्या प्रश्नाला उत्तर दिलें.

" अरे हो ! मी हें विसरलोच होतों. " हंसत हंसत ते उद्गारले.

त्या वर्षी वेस्ट इंडिजला गेलेल्या भारतीय संघाचा पांचहि टेस्ट सामन्यांत तिथें दणकून पराभव झाला होता. त्याला अनुलक्षून ब्रॅडमन म्हणाले : " वेस्ट इंडिज मध्यें भारतीय संघाला फार जोराचा मारा खावा लागला नाहीं ? "

" नुसते निकाल घेतले तर तसं म्हणावं लागेल. पण आमच्या संघाची गोलंदाजी चांगली ठरली. वेस्ट इंडिजसारखा बलाढ्य संघ आमच्याविरुद्ध कुठल्याहि डावांत तीनशेंपेक्षां जास्त धांवा करूं शकला नाहीं. आमचे फलंदाज जरी अयशस्वी झाले तरी त्यांचा धांवा काढण्याचा वेग वेस्ट इंडिज फलंदाजांपेक्षां जास्त होता. त्या दृष्टीनं आमचा संघ तेवढा कांहीं अयशस्वी ठरला नाहीं. " मीं माझें क्रिकेटविषयीचें ऐकीव ज्ञान प्रदर्शित केलें. "

" अहो, शेवटीं निकाल काय लागला त्यावरच तुमची पत अवलंबून असते. सर्व टेस्ट हरल्यानंतर या बारीक-सारीक मुद्द्यांकडे कोण लक्ष देतो. " ब्रॅडमन म्हणाले. त्यांचें हें उत्तर मला निरुत्तर करणारें होतें. मी अंमळ थांबलों, तेवढ्यांत ते लागलीच म्हणाले : " तुमच्या सरकारनें तुमच्या देशांत पंचवार्षिक योजनांद्वारा फारच प्रगति घडवून आणली आहे. हें मी नुसतं वाचून सांगतों आहे असं नव्हे तर माझे कांहीं मित्र प्रत्यक्ष पुष्कळशा औद्योगिक योजनांना भेट देऊन आले आहेत. अन् त्या सर्वांनीं तुमच्या प्रगतीची मजजवळ स्तुति केली आहे. "

" आमच्या पुढचे प्रश्न इतके मोठें, अन् बिकट आहेत कीं सामान्य माणसांची स्थिति सुधारण्यासाठीं फार विलंब लागेल. पण सुरुवात चांगली झाली एवढें मात्र खरें ! " मीं त्यांच्या विचारांना दुजोरा दिला. "

" इतक्यांत टेलिफोनची घंटा खणखणली. ब्रॅडमनना भेटण्यासाठीं-

धंद्याच्या कामासाठीं कुणीतरी आले होते. माझ्या स्वाक्षरी पुस्तकांत त्यांनीं दोन स्वाक्षऱ्या तत्परतेनें केल्या. माझ्याशीं त्यांनीं हस्तांदोलन केलें नि मग मीं त्यांचा निरोप घेतला."

"साधारण उंचीचा, चौकोनी तोंडाचा हा गृहस्थ माझ्या पुढून चालला होता..."

"त्याच्या चालण्यांत, बोलण्यांत एक प्रकारचा आत्मविश्वास होता, ऐट होती, नजरेंत चमक होती अन् बोलण्यांत मनाचा मोकळेपणा होता."

"माझ्यासारख्या रिकामटेकड्याशीं, ज्याला क्रिकेटचें ज्ञान काडी-इतकेंहि नाहीं अशा माणसाशींहि, आपलीं दहा पंधरा मिनिटें फुकट घालविण्याचा मोठेपणा त्याच्या अंगीं होता."

"ब्रॅडमनविषयीं क्रिकेटपटु अगर लेखक कांहींहि बोलोत, लिहोत, माझा अनुभव मात्र अगदीं निराळा होता, मला दिसलेले ब्रॅडमन अगदीं वेगळे होते."

वरील मुलाखत इतकी बोलकी आहे कीं त्यावर वेगळें भाष्य करण्याची गरज नाहीं.

१९६४ सालीं पाकिस्तानचा संघ ऑस्ट्रेलियांत गेला होता. १७ डिसेंबर १९६४ रोजीं दक्षिण ऑस्ट्रेलिया क्रिकेट असोसिएशननें पाकिस्तान संघाचा सत्कार केला त्यावेळीं ब्रॅडमन यांची, पाकचा प्रसिद्ध फलंदाज हनीफ महंमद याच्याशीं प्रथमच भेट झाली. त्यावेळीं ते म्हणाले, "माझा ४५२ धांवांचा उच्चांक मोडणाऱ्या या क्रिकेटपटूला पाहण्याची माझी फार दिवसाची इच्छा होती. हा हनीफ चांगला सहा फूट तीन इंच उंचीचा अन् दोनशें पौंडाहून अधिक वजनाचा असा धिप्पाड खेळाडू असेल असं मला वाटलं होतं. परंतु आतां या पांच फूट पांच इंच उंचीच्या अन् १३३ पौंड वजनाच्या हनीफला पाहून मला केवढा जबर धक्का बसला त्याची कल्पनाच केलेली बरी."

" माझ्या नाबाद ४५२ धांवांबद्दल बोलायचं तर, मी धांवा काढण्याच्या ऐन भरांत असतांनाच आमच्या संघनायकानें डाव पुरा झाल्याचें घोषित केलें. हनीफ मात्र शेवटच्या षटकांतील अगदीं शेवटच्या चेंडूवर स्वतःची ५०० वी धांव काढतांना धांवचीत झाला." त्यांच्या या भाषणानें सभागृहांत हास्याची एकच लाट उसळली.

ब्रॅडमन यांच्यावर बॉडीलाईनचा मारा करणारा लारवूड आतां ऑस्ट्रेलियांतच स्थायिक झाला आहे. १९५२ मध्यें तो सहज त्यांना रस्त्यांत भेटला. सिडने शहरांत ते दोघे गप्पा मारीत होते. तेव्हां लारवूड म्हणाला : " वीस वर्षांपूर्वी असं नव्हतं नाहीं ?" ब्रॅडमन म्हणाले : " मला नाहीं समजला तुझ्या बोलण्याचा अर्थ !" तेव्हां लारवूड म्हणालाः " वीस वर्षांपूर्वी आपण असें रस्त्यांत उभे रहातों तर आपल्या भोवतीं गर्दीची एकच झुंबड उडाली असती." ब्रॅडमनना त्याचें म्हणणें पटलें अन् मग ते मोकळेपणानें हंसले. त्यांच्या मनांत लारवूडबद्दल अजिबात राग नव्हता.

सांप्रत ब्रॅडमन आपल्या व्यवसायांत दंग असतात. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं ते गोल्फ खेळतात. बिलियर्डचा खेळ त्यांचा विरंगुळा आहे. लहान मुलांविषयीं त्यांना अपार प्रेम आहे. लहान मुलांकडून आलेल्या पत्रांना ते स्वतःच्या हस्ताक्षरांत पत्रें धाडतात. क्रिकेट खेळांत ते प्रत्यक्ष भाग घेत, तेव्हां त्यांना दररोज सुमारें शंभर पत्रें येत. ऑर्थर जेम्स नांवाचा माणूस, पंचवीस वर्षें खेळाडूंचें अंग रगडण्यासाठीं ऑस्ट्रेलियन संघाबरोबर ठेवलेला असे. संध्याकाळीं वेळ असेल तेव्हां खेळाडूंची तो इतर सटरफटर कामेंहि करी. ब्रॅडमन यांचीं पत्रें गोळा करण्याचें काम हाच करी. त्यांच्या पत्रांचा बटवडा करतांना हा जिकीरीला येई. इंग्लंडमध्यें ब्रॅडमन असतांना त्यांच्या हॉटेलची पत्रपेटी सदोदित भरलेली असे. ते निवृत्त झाल्यावर ही पेटी ओस पडली. जवळ जवळ वीस वर्षें त्यांना खाजगी जीवन असें जणुं राहिलेंच नाहीं. स्वाक्षरीसाठीं अन् प्रश्न

विचारण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं चहात्यांचीं एकच झुंबड उडे. तेव्हां एकटे दुकटे फिरण्याची त्यांना सोय नव्हती. एकदां इंग्लंडमध्यें ते खेळत होते तेव्हां त्यांच्या पत्रावर ‘ कुठें तरी इंग्लंडमध्यें खेळत असलेला ’ ( somewhere playing in England ) असा पत्ता लिहिलेलें एक पत्र ते लॉर्डस् क्रीडांगणावर असतांना त्यांना मिळालें. नांवाच्या जागीं त्यांच्या फक्त चेहेऱ्याच्या भागाचें छायाचित्र होतें. तें पत्र पाहून त्यांना धन्यता वाटली अन् त्यांनीं इंग्लंडमधल्या पोस्टखात्याच्या कार्यक्षमतेला धन्यवाद दिले. या पत्राच्या लिखाफ्याचें छायाचित्र या ग्रंथात अन्यत्र दिलें आहे.

पत्रांना उत्तरें पाठविण्यांत ब्रॅडमननीं लहानमोठा असा भेद कधीं केला नाहीं. पुण्याच्या क्रिकेटषौकीन बाबु टांगेवाल्यापासून ते जगांतल्या अनेक क्रिकेटरसिकांना त्यांनीं स्वतःच्या हस्ताक्षरांत पत्रें धाडलेलीं आहेत.

प्रस्तुत पुस्तकासंबंधानें मी त्यांना पत्र धाडलें, त्याचें उत्तर लगोलग आलें. त्याचा शेवट, त्यांच्या कीर्तीला अन् थोरपणाला साजेसा असा आहे. त्यांत त्यांचें सौजन्य अन् विनय स्पष्ट दिसतो. ते म्हणतात : “ असं पहा, मी खेळाचा निरोप घेऊन आतां सतरा वर्षें लोटलीं आहेत. अन् माझ्यासारख्या जुन्या खेळाडूंचा कलहि आतां प्रसिद्धिपासून दूरदूर राहण्याचा आहे. ”

हो ! ब्रॅडमनना क्रिकेटमधून निवृत्त होऊन सोळा सतरा वर्षें झालीं आहेत खरीं. त्यामुळें ब्रॅडमन ही व्यक्ती जणु अंतर्धान पावली. पण विश्वविख्यात क्रिकेटपटु सर डोनॉल्ड ब्रॅडमन या फलंदाजाचें स्मरण क्रिकेटच्या अंतापर्यंत होईल–जिथें जिथें क्रिकेट खेळला जातो, त्या त्या देशांत त्यांच्या पराक्रमी खेळाची स्मृति–आठवणी अक्षय राहतील अन् त्या अनेकांना स्फूर्ति देतील. त्यांचें तेजस्वी क्रिकेट जीवन आठवलें कीं कविवर्य मोरोपंतांच्या पुढील काव्यपंक्ति मी मनांत गुणगुणुं लागतों :

**झाले बहु होतील बहु**
**आहेतहि बहु परंतु यासम हा**

# परिशिष्ट १ : ब्रॅडमन यांच्या जीवनांतील प्रमुख घटना

| | |
|---|---|
| २७–८–१९०८ | जन्म. ( कुटमुंडरा, न्यू साऊथ वेल्स-ऑस्ट्रेलिया ) |
| १९२८ | कसोटी सामन्यांत पदार्पण |
| जानेवारी १९३० | ४५२ धांवांचा जागतिक उच्चांक |
| मे १९३० | महिना अखेर इंग्लंड दौऱ्यांत हजार धांवा |
| ११ जुलै १९३० | टेस्ट सामन्यांत एका दिवसांत ३०९धांवा. उपाहारापूर्वी शतक. |
| ३० एप्रिल१९३२ | विवाह ( जेसी ) |
| १९३२ | अमेरिका–कॅनडाच्या सफरी |
| १९३२–१९३३ | बॉडीलाईनचें अरिष्ट |
| १९३३–१९३४ | पंचाची परीक्षा उत्तीर्ण |
| १९३४ | इंग्लंडात टेस्टमध्यें पुनःश्च त्रिशतक. दुसऱ्या विकेटसाठीं पॉन्सफोर्ड बरोबर ४५१ धांवांची भागिदारी |
| १९३६–१९३७ | नेता म्हणून निवड. निवडसमितीवर निवड. अपत्य निधन |
| १९३८ | इंग्लंडात मे महिन्यांत पुनःश्च हजार धांवा |
| १९३९ | अपत्ययोग ( जॉन ) |
| १९४७–१९४८ | शंभरावें शतक. भारतीय संघाविरुद्ध टेस्ट सामन्यांत दोन्ही डावांत शतकें. |
| १९४८ | इंग्लंडात ओव्हल वरील अखेरच्या टेस्ट सामन्यांत शून्य धांवा. |
| १ जानेवारी १९४९ | ‘ सर ’ पदवी |
| १९४९ | क्रिकेट संन्यास |
| १९५८ | एम्. सी. सी. नें आजीव सभासद केलें. |
| १९६० | ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाचें अध्यक्षपद |

# परिशिष्ट २ : प्रमुख संदर्भ-साहित्य

1. Don Bradmans Book—Don Bradman ( 1930 )
2. My Cricketing Life—Don Bradman ( 1937 )
3. Cricket Crisis—J. H. Fingleton ( 1946 )
4. Bradman—A. G. Moyes ( 1948 )
5. Brightly Fades The Don—J. H. Fingleton ( 1949 )
6. Farewell To Cricket—Don Bradman ( 1950 )
7. Cricket Caravan—Keith Miller--R. S. Whitington ( 1950 )
8. Century of Cricketers—A. G. Moyes ( 1950 )
9. Don Bradman—Philip Lindsay ( 1951 )
10. Australian Batsmen—A. G. Moyes ( 1954 )
11. Cricket Crossfire—Keith Miller ( 1956 )
12. Between Wickets—Ray Robinson ( 1958 )
13. Bradman The Great—B. J. Wakley ( 1959 )
14. Sir Donald Bradman—Anthony Davis ( 1960 )
15. Wisden's Cricketer's Almanack, 1930 to 1949
16. The Larwood Story—Harold Larwood with Kevin Perkins ( 1965 )
१७. उत्तम क्रिकेट कसें खेळाल ? —प्रा० दि. ब. देवधर ( १९५५ )
१८. माझा ऑस्ट्रेलियाचा दौरा—श्रीरंग सोहनी ( आनंदवन-क्रिकेट विशेषांक जाने० १९६० )
१९. नेव्हिल कार्डसूचे कांहीं लेख.

## ब्रॅडमनविषयीं इतर मराठी ग्रंथ

१. ब्रॅडमन—जी. एन्. नातू ( १९३६ )
२. असामान्य क्रिकेटपटु डॉन ब्रॅडमन-शं. ल. चिटणीस ( १९६० )
३. क्रिकेटमधील आश्चर्य, डॉन ब्रॅडमन-शं. ल. चिटणीस ( १९६० )

# परिशिष्ट ३ : ब्रॅडमन यांचे कांहीं जागतिक उच्चांक

( ब्रॅडमन यांचे डोळे दिपविण्याजोगे अनेक विक्रम आहेत. येथें मोडले न गेलेले उच्चांकच दिले आहे. )

१. पहिल्या दर्जाच्या सामन्यांत तीनशेंच्या वर धांवा सहा वेळा.

२. ३७ द्विशतकें,

३. इंग्लंडमध्यें मे महिना अखेर ( म्हणजे एक महिन्याच्या खेळांत ) एक हजार धांवा दोन वेळां काढल्या.

४. ५२ टेस्ट सामन्यांत २९ शतकें ( इंग्लंडविरुद्ध १९, भारताविरुद्ध ४, दक्षिण अफ्रिकेविरुद्ध ४ आणि वेस्ट इंडिज विरुद्ध २ )

५. इंग्लड विरुद्ध टेस्टमध्यें ८ द्विशतकें

६. १९३० च्या टेस्ट मालिकेंत इंग्लंडविरुद्ध ९७४ धांवा.

७. १९३४ सालीं इंग्लंड विरुद्ध ओव्हल येथें दुसऱ्या विकेटसाठीं पॉन्सफोर्ड बरोबर केलेली ४५१ धांवांची भागिदारी.

८. १९४६-४७ सालीं इंग्लंडविरुद्ध सिडनें येथें पांचव्या विकेटसाठीं बार्न्स बरोबर केलेली ४०५ धांवांची भागिदारी.

९. इंग्लंडच्या चार सफरीत प्रत्येक वेळा दोन हजारांहून जास्त धांवा केल्या.

१०. टेस्ट सामन्यांत दोन वेळा त्रिशतकें काढलीं. १९३० मध्यें ३३४ धांवा नि १९३४ मध्यें ३०४ धांवा

११. टेस्टमध्यें एका दिवसांत ३०९ धांवा (१९३०)

# परिशिष्ट ४ : ब्रॅडमन यांची टेस्ट कारकीर्द

| विरुद्ध पक्ष | वर्ष | सामने | डाव | नाबाद | एकूण धांवा | उच्चांक धांवा | सरासरी | शतकें |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इंग्लंड | १९२८-२९ | ४ | ८ | १ | ४६८ | १२३ | ६६-८५ | २ |
| इंग्लंड | १९३० | ५ | ७ | – | ९७४ | ३३४ | १३९·१४ | ४ |
| वेस्ट इंडिज | १९३०-३१ | ५ | ६ | – | ४४७ | २२३ | ७४·५० | २ |
| दक्षिण आफ्रिका | १९३१-३२ | ५ | ५ | १ | ८०६ | २९९● | २०१.५० | ४ |
| इंग्लंड | १९३२ ३३ | ४ | ८ | १ | ३९६ | १०३● | ५६·५७ | १ |
| ,, | १९३४ | ५ | ८ | – | ७५८ | ३०४ | ९४·७५ | २ |
| ,, | १९३६-३७ | ५ | ९ | – | ८१० | २७० | ९०·०० | ३ |
| ,, | १९३८ | ४ | ६ | २ | ४३४ | १४४● | १०८.५० | ३ |
| ,, | १९४६-४७ | ५ | ८ | १ | ६८० | २३४ | ९७.१४ | २ |
| भारत | १९४७·४८ | ५ | ६ | २ | ७१५ | २०१ | १७८.७५ | ४ |
| इंग्लंड | १९४८ | ५ | ९ | २ | ५०८ | १७३ | ७२.५७ | २ |
| एकूण | | ५२ | ८० | १० | ६९९६ | ३३४ | ९९.९४ | २९ |

● नाबादची खूण

टेस्टमध्यें ब्रॅडमननीं आणखी चार धांवा काढल्या असत्या तर त्यांच्या फलंदाजीची सरासरी शंभर झाली असती.

## परिशिष्ट ५ : अव्वल दर्जाच्या सामन्यांतील ब्रॅडमन यांची कारकीर्द

| हंगाम | डाव | नाबाद | एकूण धांवा | सरासरी | उच्चांक धांवा | शतकें. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९२७–२८ | १० | १ | ४१६ | ४६·२२ | १३४ | २ |
| १९२८–२९ | २४ | ६ | १६९० | ९३·८८ | ३४०● | ७ |
| १९२९–३० | १६ | २ | १५८६ | ११३·२८ | ४५२● | ५ |
| १९३० (इंग्लंड) | ३६ | ६ | २९६० | ९८·६६ | ३३४ | १० |
| १९३०–३१ | १८ | | १४२२ | ७९·०० | २५८ | ५ |
| १९३१–३२ | १३ | १ | १४०३ | ११६·९१ | २९९● | ७ |
| १९३२–३३ | २१ | २ | ११७१ | ६१·६३ | २३८ | ३ |
| १९३३–३४ | ११ | २ | ११९२ | १३२·४४ | २५३ | ५ |
| १९३४ (इंग्लंड) | २७ | ३ | २०२० | ८४·१६ | ३०४ | ७ |
| १९३४–३५ | | | | खेळले नाहींत | | |
| १९३५–३६ | ९ | — | ११७३ | १३०·३३ | ३६९ | ४ |

( पुढे चालू

समोरील पानावरून पुढे चालू

| हंगाम | डाव | नाबाद | एकूण धांवा | सरासरी | उच्चांक धांवा | शतकें. |
|---|---|---|---|---|---|---|
| १९३६–३७ | १९ | १ | १५५२ | ८६·२२ | २७० | ६ |
| १९३७–३८ | १८ | २ | १४३७ | ८९·८१ | २४६ | ७ |
| १९३८ (इंग्लंड) | २६ | ५ | २४२९ | ११५·६६ | २७८ | १३ |
| १९३८–३९ | ७ | १ | ९१९ | १५३·१६ | २२५ | ६ |
| १९३९–४० | १५ | ३ | १४७५ | १२२·९१ | २६७ | ५ |
| १९४०–४१ | ४ | – | १८ | ४·५० | १२ | |
| १९४५–४६ | ३ | १ | २३२ | ११६·०० | ११२ | १ |
| १९४६–४७ | १४ | १ | १०३२ | ७९·३८ | २३४ | ४ |
| १९४७–४८ | १२ | २ | १२९६ | १२९·६० | २०१ | ८ |
| १९४८ (इंग्लंड) | ३१ | ४ | २४२८ | ८९·९२ | १८७ | ११ |
| १९४८ण | | | ▌▌▌ | ‖ ० | १२३ | १ |
| | ३३८ | ४३ | २८०६७ | ४ | ४५२● | ११७ |

एकुअव्वल दर्जाच्या सामन्यांत ९५·१४ सरासरी हा जागतिक उच ९५·शांक आहे. ● नाबादची खूण

## परिशिष्ट ६ : ब्रॅडमन बाद कसे झाले !

### डाव–३३८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नाबाद | ४३ | वेळां |
| २ | झेलबाद | १७३ | ” |
| ३ | बोल्ड | ७८ | ” |
| ४ | पायचित | २७ | ” |
| ५ | स्टंप्ड | १२ | ” |
| ६ | धांवचित | ४ | ” |
| ७ | हिट्‌विकेट | १ | ” |
| | एकूण | ३३८ | |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४४६७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.................. वि...................
क्रमांक .......................... नों. दि: ..........
REFBK-0014467

૪૦૭૦૭

ચારિત્ર

ચરિત્ર
૧૨૬૩

૨૮.૧૨ ૬૫.

૨૧-૨૧૧.

૧૨૬૩

[illegible] ઉ[illegible] .. [illegible]

મનુક્ર.. ૪૦૭૦૭ વિ: ચરિત્ર

ક્રમાંક ૧૨૬૩ નોંધ દિ ૨૮।૧૨।૬૫

૧૨૬૩

સંગ ૧૯૯૮